
मुद्गल पुराण



॥ श्रीगणेशाय नमः ॥

मुद्गल पुराण

(प्लॅस्टिक कव्हरसह)

: लेखक :

प्राध्यापक गो. ह. कुलकर्णी

द्विमित्र प्रकाशन, मुंबई ४.

प्रकाशक :
प्रभाकर शिवराम आवटी
द्विमित्र प्रकाशन,
द्वारा / श्री भारत बुक डेपो,
ठाकुरद्वार नाका, मुंबई ४.

किंमत २० रु.

मुद्रक :
आर. डी. मांद्रेकर
बी. एससी., एलएल. बी.,
इंडो फॉरेन प्रिंटींग वर्क्स,
मु पो. नागाव, इंग्रजी शाळेसमोर,
ता. अलिबाग, जि. रायगड.

दोन शब्द

श्रीगणेश ही एक हिंदूना सर्वाधिक प्रिय असलेली देवता ही देवता ऋद्धिसिद्धि प्रदान करणारी, सर्वसुख प्रदान करणारी, विघ्ने हरण करणारी व विद्येचे दान देणारी आहे. कोणत्याही कार्यारंभी गणेशाचे पूजन करून मगच कार्यारंभ करण्याची प्रथा आहे. अशा ह्या गणेश देवतेच्या संबंधी माहिती व कथा सांगणारे दोन मुख्य ग्रंथ लोकप्रिय आहेत. एक 'गणेशपुराण' व दुसरा 'मुद्गलपुराण.' ह्या दोन ग्रंथापैकी 'गणेशपुराण' सार रूपाने उपलब्ध आहे पण 'मुद्गल पुराण' मात्र गेली बरीच वर्षे उपलब्ध नव्हते म्हणून साररूपाने 'मुद्गल पुराण' प्रसिद्ध करण्यास आनंद वाटत आहे.

'मुद्गल पुराण' ह्या मूळ संस्कृत ग्रंथाची रचना नऊ खंडात झालेली असून त्यात एकूण ४२८ अध्याय व श्लोकसंख्या २३००० एवढी आहे. असा हा प्रचंड ग्रंथराज ह्या ग्रंथाचे कर्ते मुग्दल ऋषि यांच्या नावानेच प्रसिद्ध आहे. गाणपत्य संप्रदायात 'मुग्दल पुराणा' ला अतिशय मान आहे 'गणेशपुराणा' तल्या सर्व कथांचा ह्यात समावेश आहेच शिवाय इतर पुराणात ज्या गणेश कथा आढळतात त्या कथांचाही समावेश ह्या ग्रंथात केला आहे. 'मुग्दल पुराण' हे परंपरागत अठरा महापुराणे व उपपुराणे यापैकी कशातच समाविष्ट नाही, तरीही गणेश भक्तांच्या दृष्टिने 'मुग्दल पुराणाचे' महत्व अनन्य साधारण आहे. हे त्याचे महत्व दोन–तीन कारणासाठी आहे.

हे पुराण गणेशाच्या अध्यात्मिक स्वरुपाचे वर्णन करणारे असून रूपकात्मक आहे. ह्या पुराणात वर्णिलेले मत्सरासुर, दंभासुर, क्रोधासुर, कामासुर, लोभासुर, आणि मदासुर हे माणसाच्या अंतःकरणातील षड्रिपु असून त्यांचा नाश गणेश कृपेने होतो हेच ह्या पुराणात अप्रत्यक्ष रित्या सांगितले आहे. ' गणेश पुराणात गणेशासंबंधी साक्षेपाने व विस्ताराने लिहिले गेले आहे, पण मुद्गल ऋषिनी मुद्गल पुराणाद्वारा गणेशतत्त्वाचा सर्वांगपरिपूर्ण विचार विस्ताराने मांडला आहे. मुद्गल पुराण गुणवत्तेने, शद्बार्थ गांभीर्याने विशेष उल्लेखनिय झाले आहे. शिव, विष्णु उपाधि असलेल्या ब्रह्मप्रतिपादक पुराणांची रेलचेल असताना मुग्दल पुराणाची काय आवश्यकता ? ह्या प्रश्नाला मुद्गल ऋषिंनी सुरवातीलाच उत्तर दिले आहे. ते ह्मणतातः– शिव, विष्णु उपाधि असलेले ब्रह्म हे मुख्य नाही, कारण ते महावाक्यात वर्णित नाही. मात्र गणेशतत्त्व ' तत्त्वंमसि ' या महावाक्यातच प्रकट झालेले आहे. त्वं पदं नरश्च तत्पद गजश्च एतयोरमेदात्मको गणेशदेहः प्रत्यक्ष ब्रह्मात्मकत्वात् ' या मुद्गल ऋषिंनी मांडलेल्या सिद्धांताचा विस्तार त्यांनी नऊ खंडात केला आहे. या पुराणात सगुणनिर्गुणांचा व व्यक्ताव्यक्तांचा अंतर्भाव करून दोघांची उत्पत्ति व नियमन करणाऱ्या स्वानंदवासी श्रीगणपतीच्या अवताराच्या कथा आहेत. या ग्रंथात सर्व श्रुतिस्मृतींस मान्य जे अद्वैतब्रह्मतत्त्व त्याचा अंगिकार करून त्या ब्रह्माची प्राप्ति होते ती विहित नित्यकर्माचे निष्काम आचरण, निष्कामभक्तिने श्रींगणेशाची नवविध सेवा आणि सर्व ज्ञानविज्ञानांचा अंतर्भाव करणारे शुद्धज्ञान यांच्या द्वाराच होते हे ह्यातील कथाद्वारे

पटवून दिले आहे. सर्व जीव आपआपल्या वर्णाश्रमधर्मानुसार चालत असले ह्मणजे ब्रह्म हें साक्षित्वाने राहते; पण कामक्रोधादिकांच्या उत्कर्षाने जीव आसुरी व उन्मत्त झाले म्हणजे या स्वानंदवासी ब्रह्माला सगुणत्व प्राप्त होऊन अवतार सिद्ध होतो आणि उन्मादाचा विच्छेद होतो, हा सर्व गणेशचरित्राचा सारांश आहे. येथे ज्याला गणेशब्रह्म म्हटले आहे त्याला दुसरीकडे शिव किंवा विष्णु या रूपाने वर्णिलेले असले तरी सर्वत्र एकवाक्यता ही आहे की, प्रत्येक भारतीय आर्यधर्मग्रंथात उपनिषद्प्रणित ब्रह्माचा मात्र स्विकार केला आहे. उपासना मार्ग निराळे असले तरी सर्व उपासनांचे रहस्य एकच असल्यामुळे प्राप्तव्यांत (ब्रह्मस्वरूपात) भेदभावाला जागाच मिळत नाही. म्हणून इतर पुराणांशी या पुराणाचा विसंवाद नाही. या पुराणांत गणपतीच्या मुख्य मुख्य नावांचे निर्वचन दिले आहे हे अवश्य लक्षांत ठेवावे.

नैमिष नावाच्या महारण्यांत ज्ञानयज्ञ चालू होता त्यावेळीं शौनक ऋषींच्या विनंतीवरून रोमहर्षण नावाच्या सूताने ज्या कथा सांगितल्या त्याच कथा मुद्गल पुराणात समाविष्ट केलेल्या आहेत. दक्ष–मुद्गल संवाद रूपाने हे पुराण विस्तार पावते. प्रत्येक खंडात एक यानुसार वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज आणि धूम्रवर्ण अशा आठ अवतारांच्या लिला विस्ताराने वर्णिलेल्या आहेत. या अवतार लिलांच्या वर्णनाद्वारे गणेश हेच परब्रह्म असल्याचे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. नाना रूपक कथा, स्तोत्रे, तीर्थक्षेत्रे, पुण्यक्षेत्रे यांचे वर्णन, गाणपत्यांच्या कथा व अवतार इ. वैशिष्ट्यांनी हे पुराण समृद्ध आहे. सबंध वर्षातील शुद्ध पक्ष आणि वद्य पक्ष यांत येणाऱ्या चतुर्थ्यांचे पूजाविधि, त्यांची

फले यासंबंधीची शास्त्रशुद्ध माहिती दिलेली असून त्या त्या व्रतांची फले कोणा कोणाला अनुभवास आली त्यांच्याही कथा ह्यात आढळतात. भारतात जी सिद्धक्षेत्रे आहेत त्यांपैकी स्वानंदभुवन (मोरगाव) या क्षेत्राचे विस्तृत वर्णन या क्षेत्राची लोकविलक्षण ख्याति सिद्ध करणारे आहे.

अशा प्रकारे गणेश भक्तांना उपयुक्त व योग्य मार्गदर्शन होण्याच्या दृष्टीने हे पुराण अत्यंत उपयोगी ठरेल यात कांही संशय नाही. गणेश भक्त ह्या ग्रंथाचे चांगले स्वागत करतींल ही अपेक्षा. ह्या ग्रंथात कांही त्रुटी आढळल्यास व त्या दृष्टोत्पत्तोस आणून दिल्यास पुढील आवृत्तीच्या वेळो त्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करू. धन्यवाद.

प्रभाकर आवटी

स्वतः श्रीगणेश म्हणतात–

'मुग्दल पुराणा' शिवाय माझे यथार्थ स्वरूप कळणार नाही, कारण मुग्दल पुराणांत माझे पूर्ण आणि सर्व प्रकाशक स्वरूप प्रगट झाले आहे.'

❀ अनुक्रमणिका ❀

द्वितीय खंड

तृतीय खंड

[महोदर चरित्र]

चतुर्थ खंड

[गजानन चरित्र]

पंचम खंड

[लंबोदर चरित्र]

षष्ठ खंड

सप्तम खंड

[विघ्नराज खंड]

अष्टम खंड

[धूम्रवर्णचरित्र]

नवम खंड

यंत्र

स्तोत्रे, आरत्या व भूपाळ्या

भूपाळ्या

आरत्या

* * *

मुद्गल पुराण

[गणेशकथामृत]

श्रीगणेशप्रार्थना

श्रीगणेशाय नमः सर्व सिद्धींचा दाता, बुद्धीचा प्रकाशक व योग्यांच्या हृदयांत राहणारा जो श्रीभगवान् गणेश त्याचें एकचित्तानें मी ध्यान करतों या देवानें 'ब्रह्म' नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंस आत्मवश केले आहे, तसेच सर्व देव व सर्व तत्त्वें यांसहीं स्ववश केलें आहे. स्वतः निर्गुण असतांही भक्तांच्या संरक्षणासाठीं व कल्याणार्थ या देवानें अनेक अवतार धारण केले आहेत. असा हा नरकुंजररूपी जो श्रीगणपती, त्याला मी नमस्कार करतो. तसेंच, शिव, विष्णु इत्यादि देव, योगी, महर्षी यांस ही पुराणज्ञानसिद्धि व्हावी एतदर्थ नमस्कार करतो.

नैमिषारण्यांत सूताचें आगमन, पुराणकथन व मुद्गलपुराणप्रवेश

पूर्वकल्पांत एकदां शौनकादि ऋषी नैमिषारण्यांत तपश्चर्या करीत असतां तेथें एका पुराणज्ञ व महाविचक्षण सूताचे आगमन झाले. त्यानें तेथील ब्राह्मणांचे पवित्र आश्रम, त्यांची दैदीप्यमान कांति व त्यांचे

ब्रह्मतेज पाहिलें व नम्र होऊन त्यानें सर्व मुनींस साष्टांग प्रणिपात केले, व त्यांचे पुष्कळसे धन्यवाद गाइले. नंतर शौनकप्रमुख ऋषींनी सूताला शुभासनावर बसवून त्यास विनविले कीं, 'व्याससंनिध राहून तू जी कलिमलापह पुराणें ऐकली आहेस ती आह्मांस सांग ' सूताने या विनंतीस मान देऊन अनेक पुराणें सांगितली. ह्या धर्मयुत पुराणांत अनेक कथा, आख्यानें, सहजगत्या येऊन गेली; त्यायोगें सर्व ऋषींस समाधान वाटलें, आनंद झाला, हें खरें; पण अनेक पुराणांत असणारीं नानामतें ऐकून त्यांच्या मनाचा घोटाळा झाला. शिव श्रेष्ठ की विष्णु श्रेष्ठ, ज्ञान श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ, अन्न ब्रह्म की वायु ब्रह्म इत्यादि सर्व घोटाळा होऊन ऋषींनी पुनः सूताची प्रार्थना केली की, 'वेदांस मान्य, सर्व संशयांचा नाश करणारा एकच मार्ग सांग.' ही प्रार्थना मान्य करून सूतानें श्रुतिस्मृतींचे सार असें मुद्गलप्रणीत प्रवचन सांगण्यास आरंभ केला. 'मुनिहो! दक्षप्रजापतींच्या यज्ञाचा विध्वंस झाल्यानंतर तेथें मुद्गल मुनि आले व दक्षकृत पूजेचा स्वीकार करून ते म्हणाले :–

शौनक :– कृपा करा आणि आम्हाला दक्षानें यज्ञ कां केला, त्याचा विध्वंस कां व कोणी केला इत्यादि सर्व वर्तमान विस्तारानें सांगा. तसेच मुद्गल ऋषि कोण हे सांगा.

दक्षयज्ञ व त्याचें प्रमथन

सूत :– मुनिहो! दक्ष हा ब्रह्मदेवाचा श्रेष्ठ मुलगा तो लवकरच प्रजापतित्व पावला; पण त्या बरोबरच तो उन्मत्तही झाला. एकदा कैलास पर्वतावर विष्णुप्रमुख देव, गंधर्व, सिद्ध, नाग, यक्ष हे सर्व शंकरदर्शनासाठी गेले. शंकरांनी सर्वांचा यथायोग्य सत्कार

करून पूजा केली व कुशल प्रश्न विचारण्यास आरंभ करणार इतक्यात नारदादि ऋषींनीं शंकरस्तवन करण्यास आरंभ केला. अप्सरा नाचू लागल्या, गंधर्व गाऊं लागले आणि सर्व आनंदाने डोलूं लागले. याप्रमाणे सभा रंगात आली असता तेथें शंकरश्वशुर दक्षप्रजापति आले. त्यांचाही सत्कार शंकरांनी केला, पण त्यास नमस्कार केला नाही. तेव्हा उन्मत्त दक्षास संताप येऊन त्याने भरसभेत शंकरास वाटतील तसल्या गलिच्छ शिव्या दिल्या. हा प्रकार पाहून व शंकर स्वस्थ बसले आहेत हे पाहून तामसो नंदिकेश्वराने शंकरमहिमा गाइला व दक्षास शाप दिला की, 'तुला मेंढीचे तोंड उत्पन्न होईल.' दक्षानेही त्याला प्रतिशाप दिला की, 'सर्व शंकरभक्त अज्ञानी, दुर्वृत्त व पाखंडी होतील.' नंतर ब्रह्मदेवाने दक्षाची निर्भर्त्सना केली. तेव्हा दक्ष क्रोधवश होत्साता स्वगृहाप्रत जाता झाला, सर्व देवही खिन्नचित्त झाले व सर्व सभेचा विरस झाला. दक्ष घरी जळफळतच गेला व शंकराची मानहानि कशी करावी, हा विचार करू लागला. त्याच्या सुदैवाने तेथे नारदाची स्वारी आली. नारदाचा दक्षाने योग्य सत्कार केला खरा; पण मनांत चिंता होती, ती त्याला झांकता आली नाही. अर्थातच नारदापाशी त्याने आपले गुह्य सांगितले व 'उपाय सांगा' म्हणून प्रार्थना केली. नारदांनी सांगितले की, 'तूं 'बृहस्पति' यज्ञ कर व शंकराला यज्ञभाग देऊं नको. आता तूं भाग दिला नाहीस म्हणजे पुढेही कोणी देणार नाही आणि असे त्याचे महत्व कमी होईल.' दक्षाला ही युक्ति मानवली. त्याने यज्ञाचा संकल्प केला व शंकराशिवाय सर्व देवांस, कश्यपादि ब्राह्मणांस, गंधर्वादि सर्व जातींस, 'सहकुटुंब सहपरिवार यावे, अशी निमंत्रणे केली. बोलाविलेली सर्व मंडळी आली. पाहुण्यांत

गणपति नाही व शंकर नाही असे होते ! गणेशविस्मरण तर सर्वांसच झाले. असो; शिवभक्त दधीचि आदि ऋषींनी शंकर नाही असे पाहून दक्षाची कानउघाडणी केली. पण त्या उन्मत्ताला ऐकूच आले नाही. 'यज्ञाचे लक्षण चांगले दिसत नाही' असे म्हणून कित्येक ऋषी उठून चालते झाले. त्यांनी जातांना विष्णूस व इतर देवांस शाप दिले. असो. ही मंडळी गेल्यावर जिकडे तिकडे स्वस्थता होऊन यज्ञकर्मास सुरवात झाली व सर्व मंडळीस आनंद झाला. दक्षाच्या आनंदाला तर पारावरच नव्हता. इकडे नारद कैलासास गेले. उभयतांस नमस्कार करून नारदांनी शिवपत्नी जी सती तिला सहज विचारल्यासारखे केले की, 'तुझ्या पित्याच्या येथे येवढा यज्ञ चालला असून तू का गेली नाहीस ? तुझ्या बाकीच्या सर्व बहिणी तेथे आहेत. माहेरी जाण्याला बोलावणे काय करायचे आहे ?' इतके बोलून कलहप्रिय नारद गेले मात्र, तो सतीने 'यज्ञप्रेक्षणास चला' असा शंकरास आग्रह केला. पण ते येण्यास प्रतिकूल आहेत असे पाहून व शंकर 'जाऊ नको, तुझा अपमान होईल, दुष्टाच्या येथे आपण जाऊ नये' असे सांगत असतानाही ते न ऐकून सती विमानात बसली व पितृगृही जाऊन उतरली. दक्षाने तिचे स्वागत चांगले केले व 'आलीस, यज्ञाला शोभा आली.' असे म्हणाला तेव्हा 'माझ्या पतीस का पाचारण नाही' असे सतीने विचारतांक्षणी दक्षाने शंकरनिंदा करण्याला आरंभ केला; तेव्हां ही निंदा सहन करता येईना म्हणून सतीने योगाग्नि पेटवून आपल्या दक्षप्राप्त देहाचा नाश केला. हीच पुढे पार्वती झाली. इकडे कैलासावर सर्व मंडळी खिन्नच होती. अपशकून पुष्कळ झाले काय वार्ता तीही कळेना, इतक्यात नारदमहाराज आले आणि त्यांनी सतीदहनाचा वृत्तांत सांगितला

तो ऐकून शंकरास परम दुःख झाले व ' आपण विघ्नहर्ता जो गणेश त्याला विसरलो ' हे ध्यानांत येऊन त्यास पश्चात्तापही झाला. लागलीच त्यांनी गणपतीचे सगुण ध्यान करून भक्तीने स्तुती केली श्रीगणपति सगुणरूपाने प्रकट होऊन ' सती पार्वतीरूपाने तुला मिळेल ' असा आशीर्वाद दिला व अंतर्धान पावले. नंतर शंकरास दक्षाच्या उन्मत्तपणाची आठवण होऊन तो क्रोधसंतप्त झाला. त्याने रागाने जटा आपटल्या तो वीरभद्राचा अवतार झाला. ' काय आज्ञा ' म्हणून हात जोडून विचारल्यावर वीरभद्रास शंकरानी ' दक्षयज्ञाचा विध्वंस कर ' अशी आज्ञा केली. आज्ञेचा अवकाश; सर्व शिवगण दक्षयज्ञमंडपात गेले व यज्ञाचा विध्वंस करून ब्राह्मणांस भेडसावून, इंद्रादि देवास धुडावून, ऋषिपत्न्यांची निंदा करून त्यांनी सर्वत्र हलकल्लोळ उडवून दिला. इतक्यात शंकरही तेथे आले. रुद्रांचे व देवांचे व शंकराचे व विष्णूचे महाघोर युद्ध झाले. प्रत्येक देवास यज्ञाला आल्याचे प्रायश्चित्त मिळाले. वीरभद्राने दक्षाला खाली पाडून त्याचे शिर तोडले व ते यज्ञाग्नींत घालून जाळून टाकिले. इतक्यात आकाशवाणी होऊन शंकरविष्णूचे युद्ध थांबले. ब्रह्मदेव येऊन त्यांनी थावराथावर केली व शंकराकरवी ज्यांचा म्हणून काही घात झाला होता, तो नाहीसा केला सर्वांनी गणपतीची स्तुति केली. ब्रह्मदेवाच्या प्रार्थना-मंत्राला यश आले. शंकराच्या आज्ञेवरुन वीरभद्राने दक्षाच्या धडाला अजाशिर चिकटविले, व त्याचा पुनर्जन्म केला, दक्षानेही पश्चात्ताप पुरःसर शंकराची क्षमा मागितली. शंकरानीही त्यास वर दिला की, ' माझ्या देवालयांत ' अजा ' सारखा तुझे स्मरण करून जो ध्वनि काढील तोही सुख पावेल. ' असो. यानंतर सर्व देव स्वगृही गेले. पण आपला

यज्ञ मोडला, विघ्नपरंपरा उत्पन्न झाली, याचे दुःख दक्षाच्या अंतःकरणात राहिले होते. त्याने मुद्गल ऋषीला हे दुःख सांगून दुःखप्रशमनाचा उपाय विचारला होता, तोच संवाद आता मी सारल्याने सांगतो.

दक्ष मुद्गलसंवाद–सृष्टीची उत्पत्ति

मुद्गल :- दक्षा ! ब्रह्मादि देवानी संपूजित, ज्येष्ठराज, विनायक स्वानंदवासी, विघ्नहर्ता, ज्ञानदाता चिंतामणि, सर्व सत्ताधीश जो भगवान् गणपति. त्याला शरण जा. तुझी सर्व विघ्ने नष्ट होतील; तुझ्या चिंतेचा क्षय होईल. प्रत्यक्ष शंकरही त्याचे रात्रंदिवस ध्यान करतात. तो मायामय असून मायातीत आहे; तोच विश्वकर्ता, विश्वभर्ता व विश्वहर्ता आहे, तो सर्वाधार, सर्वपुरुषार्थसाधक आहे. त्याच्याच आधाराने व आश्रयाने पुरुष व प्रकृति जगत्व्यवहाराचे कार्म करतात. पुरुषप्रकृतिसंयोगाने महत्तत्त्व उत्पन्न झाले. मग अहंकार, (सात्विक, राजस व तामस,) तामसी अहंकारापासून शब्द, शब्दापासून आकाशादि, स्व-स्वगुणांसह पंचमहाभूते, राजसी अहंकारापासून पंचकर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रिये, पंचप्राण, व सात्विकी अहंकारापासू पंचज्ञानद्रियांचे व पंचकर्मेंद्रियांचे मिळून दहा देव झाले. या सर्वा गणपतिप्रसादाने सृष्टिकर्तृत्व सामर्थ्य आलें. मग सर्व तत्वे एक होउ एक अंडे तयार झाले. त्यात पाणी व परमात्मा होते. अंडे फुटल्या एकच देव त्रिधा झाला. हेच ब्रह्मा, विष्णु, महेश होत. य गणेशस्तुति केली व वर संपादून सृष्टिरचना केली. दक्षा! गणेशाची ज्ञानपूर्वक भक्ति केली असता येथे सौभाग्य वाढून स्वानंदसाम्राज्यात जाता येते. ह्या गणेशापासून वरप्राप्ति करून घे

गुणेशनामक हिरण्यगर्भाने वेद श्वासरूपाने उध्दृत केले. याप्रमाणे अष्टमूर्ति प्रकृतीची व वेदांची उत्पत्ति झाली. नंतर आठ आवरणांनी युक्त असे अंडे झाले व एक पुरुष झाला. पृथ्वीचे, आपाचे, तेजाचे, वायूचे, आकाशाचे, अहंकाराचे, महताचे व मायेचे अशी ही आठ आवरणे होत. ही अंड्याची आवरणे (कवचे) होत. या आठ आवरणांचे, कडे विराट् पुरुषाभोवती होते. स्थावर व जंगम, ह्मणजे सर्व चराचर भूते त्याच्या देहामध्ये होती. त्याच्या कमरेपर्यंत सात पाताळे व कपाळापर्यंत भूर्भुवादि लोक होते. त्याला अनंत इंद्रिये व अनंत अवयव होते. तो सर्वव्यापी, अमर व स्वप्रकाश होता. त्याच्या आंत हिरण्यगर्भ व त्याच्याही आंत ईश्वर व त्याच्याही अंतर्यामी आत्मरूप होते. असो. या विराटाने हजार वर्षे श्रीगणेशाची भक्तिपूर्वक तपश्चर्या केली, व साक्षात्कार झाल्यावर प्रसाद मागितला की, 'मला अखंड भक्ति असावी, ऐश्वर्य असावे व सृष्टिविरचनेचे सामर्थ्य असावे.' 'तथास्तु' ह्मणून श्रीगजानन महाराज अंतर्धान पावले. हा एका ब्रह्मांडाचा विचार झाला. अशी अनंत ब्रह्मांडे निर्माण होऊन श्रीगणेशकृपेने त्यांची व्यवस्था अनंत विराट पुरुष करीत आहेत. असो. या विराटापासूनच ब्रह्मा, विष्णु, महेश, सूर्य व शक्ति ह्या देवता उत्पन्न झाल्या. तपश्चर्या करून त्यांनी यच्चयावत वस्तूंचे ज्ञान संपादन केले. श्रीगणपतीने वरप्रदान देऊन रजोगुणांकित ब्रह्मदेवाला सृष्टिकर्तुत्वाचे; सत्वगुणांकित विष्णूला सृष्टिपालनाचे, तमोगुणांकित शंकराला सृष्टिसंहाराचे, कर्मचालक व अहंभावजन्य सूर्याला सर्व प्रकाशकाचे व त्रिदेहापासून उत्पन्न झालेल्या शक्तिला जगन्मोहनाचे अशी कामे वाटून दिली. प्रत्येकास अनुक्रमे सत्यलोक, वैकुंठ, कैलास

सौरलोक व शक्तिलोक, अशी राहण्यास स्थानें दिली व हंस, गरुड, वृषभ, अश्वरथ व सिंह अशी वाहने देऊन श्रीगजानन अंतर्धान पावले.

शौनक : सूता ! इतर व्यर्थ गोष्टी ऐकण्यापेक्षा तूं जें गणेश-चरित्र आम्हांस सांगत आहेस तें अति जास्त मधुर व पुण्यात्मक आहे. म्हणून आम्हास गणेशकथा सांग; पण अगोदर या देवांनी काय काय केलें तें सांग.

सूत :– सर्वांच्या अगोदर ज्याचे पूजन होतें, असा तो गणराज 'ज्येष्ठराज' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याची भक्ति तुम्हांला लागली फार उत्तम झाले. असो, प्रथम या देवतापंचकाने काय काय केलें तें ऐका. प्रथम प्रथम या सर्वही भावंड देवतांत ऐक्यभाव होता व ते परस्परांचे हितच करीत. पण पुढें. 'मी श्रेष्ठ, मी श्रेष्ठ' असा अभिमान प्रत्येकाला उत्पन्न होऊन ते सर्वही मत्सरी झाले. एकदा विष्णूने स्वशरीरप्रभावाने जल उत्पन्न करून तेथेंच निद्रा केली. त्या जलावर शेवाळ निर्माण होऊन त्यापासून ही पृथ्वी झाली. नंतर विष्णूच्या नाभीतून एक अतितेजस्वी व अतिसुंदर कमल उत्पन्न झाले. नंतर तेथे ब्रह्मदेव आले व विष्णूस जागे करून ' निर्माण करण्याचा माझा भाग (हक्क) असता, तुझी कमळ का निर्माण केले.' असा त्यास मत्सरमूलक प्रश्न केला; व आढ्यतेने असें सांगितले की, मी उत्पन्न करीन तेव्हा तुला पालन करण्याचे सामर्थ्य येईल. तस्मात मी मोठा व तूं लहान आहेस. ' तेव्हा विष्णूनें सौम्यपणाने उत्तर दिले. ' मी हे कमळ केवळ गमतींने उत्पन्न केले आहे. तुझा भाग अंगावर घेण्याची

माझी बिलकुल इच्छा नाही. शिवाय, लहानमोठ्याचा प्रश्न कशाला काढतोस? मी तुझे पालन करतो ह्मणून तुझे सृष्टिकर्तृत्वाचे काम ठीक चालतें!' हें ऐकून संतापलेल्या ब्रह्मदेवाने विष्णुस सांगितलें की, योगमायेने माझ्या शरीरांत शिरून माझा प्रभाव पहा! विष्णु आंत जाऊन पाहतो, तों आंत अनंत ब्रह्मांडें व नाभिकमळयुक्त विष्णु पाहिलें, तेव्हां विस्मित होऊन व आंत अंत लागेना, तेव्हां बाहेर येऊन 'तू अनंत आहेस' असे ब्रह्मदेवाला नमस्कार करून सांगितलें; आणि ह्मणाला 'माझाही प्रभाव पहा.' तें ऐकून ब्रह्मदेव आंत शिरला. तेथें त्याने अनंत ब्रह्मांडे, अनंत ब्रह्मदेव व अनंत चमत्कार पाहिलें. कशाचाच अंत लागेना; तेव्हा बाहेर येण्याचा विचार करून वाट शोधूं लागला, तों वाट सांपडेना. पुष्कळ खटपट केली, तेव्हां विष्णूच्या नाभींत जें कमळ होते ते फोडून येण्याची युक्ति त्याला सुचली व तसा तो बाहेरही आला. रागाऊन तो विष्णुला कांहीं अपशब्द बोलला. पण विष्णु शांत होता, त्याने ब्रह्मदेवाची क्षमा मागितली. 'आपण रागावलों, पण विष्णु रागावला नाही, तेव्हां तो आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे.' असा निश्चय करून आपले लघुत्व व विष्णूचे गुरुत्व त्याने कबूल केले मग दोघांनी असे ठरविले की, 'बाकीच्या तीन देवांचा प्रभाव काय आहे ते पाहूं या.' हे ठरवून त्यांनी शंभु, सूर्य व शक्ति यांचे स्मरण केल्याबरोबर सर्व मंडळी तेथे जमली; पण प्रथम शंकर तेथे आला. स्वागत कुशल झाल्यावर 'कां स्मरण केले?' असें शंकराने सगर्व विचारल्यावर पहिल्या दोघांनी

'आपला प्रभाव काय आहे तो पहावा, या उद्देशाने तुला बोलाविले आहे' असे सांगितले. तेव्हा क्रोधसंतप्त होऊन शंकराने 'माझे अंतकाचे काम आहे व तुमचा दोघांचाही अंतक मीच आहे' असे म्हणून आपले स्वरूप प्रकट केले. ते विश्वव्यापी स्वरूप पाहून ब्रह्मा विष्णूला आश्चर्य वाटले. नंतर ब्रह्मदेवाने वरून व विष्णूने खालून शिवस्वरूपाचा अंत लावावा, असे ठरवून उभयता निघणार इतक्यांत विष्णूने ब्रह्माजवळ एक गोष्ट मागितली व ती त्याने देण्याचे कबूल केले. असे वचन घेऊन 'तूं माझा मुलगा हो!' हा वर मागितला व वचनभंगाच्या भीतीमुळे ब्रह्मदेवाला 'होय' ह्मणावे लागले, व 'सृष्टीच्या उत्पत्तीसमयीं मी तुझ्या नाभिकमळातून बाहेर येत जाईन व तुझा आत्मज होईन' असे सांगितले. पुढे, ठरल्याप्रमाणे दोघे दोहीकडे निघाले, पण कांही पार लागेना. तेंव्हा खिन्न मनाने बाहेर येऊन त्यांनी शंकराचे स्तवन केले व 'प्रकट स्वरूप दाखवा' अशी विनती केली तेव्हा उजवीकडे ब्रह्मा, डावीकडे विष्णु व सर्व विश्वंभर शंकरलिंगाची व्याप्ति आहे असे पाहून उभयतांनी 'पूर्वरूप घ्या' असे विनविले व शंकरानी पूर्वरूप धारण करून 'वर मागा' ह्मणाले, तेव्हा विष्णूने सुचविल्यावरून 'माझा मुलगा हो' असा ब्रह्मदेवाने शंकराजवळ वर मागितला! या वरदानाने शंकर ब्रम्हाचा मुलगा व विष्णूचा नातु होऊन उभयतांच्या खालच्या पायरीवर जाऊन बसणार असे झाले. 'तुझ्या कपालापासून उत्पन्न होऊन मी तुझा मुलगा होईन' हा वर ब्रह्मदेवाला शंकराने दिला व तिघेही, 'आपण सर्वश्रेष्ठ आहो', हे समजून आनंदाने गोष्टी करूं लागले. शंकरानीही उभयतांचे स्वरूप अपार आहे असे पाहिलेच होते. याचप्रकारे सर्व प्रकाशक सूर्यांच्या व सर्वमोहक शक्तिच्या प्रभावाची परीक्षा होऊन सर्वही पांच-

जण ‘ आपण पांचजण मात्र सर्वशक्ति आहों ’ हे समजून महा आनंद पावले. पण पुनः त्यांस असा संशय पडला की, वेदांत तर एका प्रभूचे वर्णन आहे, पांच प्रभु आहेत असे कोणतेही शास्त्र ह्मणत नाही, वेदशास्त्र तर खोटे नसावे, तेव्हां एक प्रभु तो कोणता ? ’ ही शंका गणेशविस्मृतीमुळे त्यांस उत्पन्न झाली, पुढे त्यांनी दश दिशांस जाऊन वाटेल तितका शोध केला, पण कांही पत्ता लागेना. एकत्र झाले व योगमार्गाने पुनः त्यांनी ध्यान करण्यास आरंभ केला. सर्वही समान-योग्यतेचे होते. सूर्य तेजस्वी, ब्रह्मा वेदज्ञ, विष्णु चतुर, शंकर निस्पृह व शक्ति सर्वमोहक होय. प्रत्येक स्वगुणात उत्तम म्हणून सर्व समान-प्रभावाचे होते. सर्वांचा लय लागून सर्वांची समाधि ब्रह्मस्वरूपावरच झाली. श्रीगणपतीची कृपा होऊन त्यांनी आपले स्वानंदनिवासी स्वरूप दाखविले ते स्वरूप शंकराच्या हृदयांत प्रथम अवतीर्ण झाले. शंकरास पूर्वस्मरण देऊन व ‘ माझी माया विलक्षण आहे ’ असे सांगून श्रीगणेश विष्णूआदि सर्व देवांस दिसते झाले. सर्वांनी स्तुति केली व सर्वांस वर प्रसाद देऊन श्रीगणपतीनी सांगितले की, ‘ गर्व केव्हांहि धरूं नका, सर्वजण माझ्या स्वाधिन आहां, माझ्या तंत्राने तुम्हास वागले पाहिजे, क्रीडा करण्यासाठी मी तुम्हास निर्माण केले आहे. ’ नंतर परमेश्वरांनी या देवपंचकास गुह्य ज्ञानाचा उपदेश केला व त्यास मोह-विनिर्मुक्त केले; व ‘ हे पांच देव हो तुम्ही माझे, परमेश्वराचे, अंश आहांत. मायाधीन जीवांच्या दृष्टीचे विरूद्ध दिशेला, ब्रम्हाचे वक्र तोंड असते ह्मणून मला वक्रतुंड म्हणतात. माझी पूजा प्रथम करा; माझे स्मरण ठेवा ह्मणजे तुम्हास मोह होणार नाही व विघ्नेंही अडविणार नाहीत. ’ इतके बोलून गणेशदेव अंतर्धान पावले व ते देवपंचक गणेशानुज्ञेने आपआपली सृष्टिगत कर्मे करूं लागले.

ब्रह्मा–विष्णू–महेश–सूर्य–शक्ति यांचे गर्वहरण–श्रीगणपतिप्रसाद

सूत : ऋषीहो ! पार्वतीने एकदा शंकरास विचारले 'मी आपली भार्या कशी झाल्ये ?' शंकर तामसी व पार्वती मोहदा; या दोघांचा योग कसा झाला, हे शंकर पार्वतीला सांगतात, ते ऐका : 'पार्वती ! त्यावेळी आम्ही सगळ्यांचे प्रभाव पाहून झाल्यावर तुझ ऐश्वर्य पाहून मला फार आश्चर्य वाटले ह्मणून तुझ्या प्राप्तीसाठी मी मोठी तपश्चर्या केली व तुला प्रसन्न करून घेऊन तुझ्यापाशी वर मागितला की माझी भार्या हो !' आणि तूं माझा वर पूर्ण केलास. ब्रह्मदेवपत्नी सावित्री तुझ्या उजव्या अंगापासून व नारायणपत्नी लक्ष्मी तुझ्या डाव्या आणि रविपत्नी 'संज्ञा' ही तुझ्या हृदयापासून, असा या तिघींचा जन्म आहे. 'नंतर पार्वतीने गणपतीची तपश्चर्या करून शांति प्राप्त करून घेतली व शंकरसान्निध्याला राहिली.

मुद्गलाचे पूर्ववृत्त

ऋषींहो ! दक्षाने मुद्गलास विचारले :– 'श्रीगणपतींने वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज, व धूम्रवर्ण असे आठ अवतार घेतले त्याची कारणे व अवतारचरित्रे मला सांगता काय ? आपण संत आहां. लोककल्याणार्थ आपला संचार आहे. कृपा करा व मला अखंडानंद व स्वानंदनिवासी ब्रह्माने अवतार का घेतले ते व अवतारचरित्रे सांगा.' ऋषींनी ही विनंति मान्य केली व प्रथमतः आपली कथा सांगून मग अवतारकथनास सुरवात केली. राजा ! मी, मुद्गल ऋषि, उग्र तपश्चर्या करून पंधरावे दिवशी मात्र एक द्रोणभर अन्न खावयाचे असा संकल्प करिता झालो व

व गणपतीच्या ध्यानाला बसलो. कांही दिवस गेल्यावर देवांस 'हा आपले पद घेणार की काय ?' अशी काळजी पडली; म्हणून सत्व-हरणार्थ त्यांनी दुर्वास ऋषीला मजकडे पाठविले. पारण्याच्या दिवशी दुर्वास मुनि आले व माझे द्रोणभर अन्न घेऊन खाऊन गेले. मला संतोष झाला. काहीं न खाता मी पुनः तपाचरणास बसलो, पंधरावे दिवशी म्हणजे द्वादशीला उत्थान करून जमविलेली कणसें घेऊन व त्यांचा नैवद्य दाखवून मी पारणे सोडणार तों पूर्ववत् दुर्वास दत्त म्हणून आले व पुनः भिक्षा मागून मी दिलेले अन्न भक्षून निघून गेले. याप्रमाणे तीन महिने उपोषणाचे लोटले. श्रीकृपेने माझ्या तपश्चर्येला विघ्न आले नाहीं. पुढे दुर्वासांनी हे माझे सत्व पाहून आपले स्वरूप प्रकट केले, व मला पुष्कळसे वर दिले. नंतर ते निघून गेले, इतक्यात विमान घेऊन देवदूत आले व 'इंद्रानी बोलाविले आहे, चला,' असे म्हणाले. पण त्यांच्याकडून स्वर्गातील भोगांचे, पुण्य सरल्यानंतर अधःपाताचे व स्वर्गस्थ लोकांच्या निष्करुणतेचे वर्णन ऐकून मला वैराग्य झाले व त्याच देवदूतांस निर्दुष्ट अशा ब्रह्मपदाचा मार्ग विचारला. व देवदूतांनी मला धर्मार्थादि मोक्षापर्यंतचा मार्ग सांगितला. तेव्हा स्वर्गामध्ये पुनः खाली पडण्याचे भय आहे म्हणून येत नाहीं. असे मी सांगितल्यावर देवदूतांनी स्वर्गाचे मनमोहक वर्णन केले. तथापिही मी वश होईना. मला दुःखविरहित सुख हवे होते व ते देणे स्वर्गाच्या हाती नव्हते. असो; देवदूत गेल्यावर ब्रह्म कसे संपादन करावे, याचा मीं पुष्कळ विचार केला, पण निश्चय होईना. तेंव्हा महाब्रह्मज्ञ अंगिरस मुनींच्या पवित्र आश्रमात जाऊन तेथील शांत

निर्वैर–स्थिति पाहिल्यावर माझें मन प्रसन्न झाले. तसेच, तेथे ऐका
गोड असा वेदनिर्घोष चाललेला ऐकून, यज्ञयागांत झालेल्या भूम
पवित्र स्पर्श सेवन करून, तेथील अग, खग, नग, मृगांची अभि
संपत्ति पाहून मनाला आश्चर्य, आनंद व धन्यता वाटली. [illegible]
कुशासनावर बसलेल्या त्या तपोधन, अपरसूर्य अंगिरसाची गंभीरसु
ब्रह्मनिरुपणामध्यें तल्लीन झाली आहे, असें पाहून भक्त्यश्रुपूर्ण नयनां
व सहसा नम्र झालेल्या मस्तकाने त्या महर्षीस नमस्कार केला. त्यांनी
पुत्रभावाने माझ्या मस्तकाचे अवघ्राण करून मला आशिर्वाद दि
कांही दिवस त्यांची सेवा केल्यानंतर ‘ महाराज ’ ब्रह्माचे वर्णन वेदांम
अनेक प्रकारचे आहे; तेव्हा कोणते वर्णन प्रमाण मानावे, हे कृ
करून सांगावे ’ अशी विनंती केली. नंतर अन्नब्रह्म, प्राणब्रह्म मनोब्रह्म,
विज्ञानब्रह्म व आनंदब्रह्म इत्यादि जे ब्रह्मप्रकार सांगितले, ते स
नीटच आहेत व ते अन्नकोश, प्राणकोश, मनःकोश, विज्ञानकोश व
आनंदकोश प्रकाशित करितात. ह्यापुढे, महाकारणाचा आधार चैतन्य-
ब्रह्म, बिंदुब्रह्म, ‘ सोहं ’ मात्रात्मक चिद्ब्रह्म, बोधब्रह्म, विदेहाधारक
सांख्यब्रह्म, नंदनात्मक समब्रह्म, सहज अव्यक्तब्रह्म, असद्रूपप्रकाशक
शक्तिब्रह्म, आत्मरूप सूर्यब्रह्म, उभयात्मक विष्णुब्रह्म, निर्मोहप्रकाशक
शिवब्रह्म, व संयोगमय स्वानंदब्रह्म इत्यादि अनेक प्रकारची ब्रह्मवर्णने
आहेत व ती ती जीवाच्या अधिकारानुसार योग्यच आहेत. बृहं
‘ म्हणजे मोठे होणे ’ यापासून ब्रह्म म्हणजे अमर्याद महत्त्व, असा
अर्थ झाला आहे, असो; अन्नब्रह्मापासून चिद्ब्रह्मापर्यंतची ब्रह्मरूपें
उपाधियुक्त आहेत. या पुढची रूपे श्रेष्ठ, श्रेष्ठतर अशी आहेत. या
सर्वांस ‘ गण ’ अशी सञ्ज्ञा आहे. त्याचा स्वामी तो गणेश होय.
यालाच ब्रह्मणस्पति म्हणतात. योग्य मार्गांने वरील गणांचे संपादन

करून गणपतीची भक्ति केली तर ब्रह्मतादात्म्य पावशील. ह्मणून प्रथम योगाभ्यास कर. नंतर गणपतीच्या अवतारकथा समजून घे. पुढे तुला भक्ति उत्पन्न होईल आणि एकनिष्ठ भक्तिचा अवलंब केलास ह्मणजे भगवान प्रसन्न होऊन तुला स्वानंदब्रह्म नामक शांतिब्रह्माची प्राप्ती करून देतील. आता प्रथम गणपतीच्या मुख्य मुख्य अवतारकथा सांगतो, ऐक;

मत्सरा सुरजन्म–मत्सराला शंकर वर देतात– देवदैत्ययुद्ध–शंकरमत्सरयुद्ध

प्रथम वक्रतुंडावतार कथा सांगतो. दक्षा! या कथेला आरंभ करावयाचे अगोदर नवविधा भक्तिचे प्रकार सांगतो. श्रवण, किर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, हे भक्तिरस प्रवर्धक प्रकार आहेत गणपतीच्या कथांचे श्रवण, त्यांचे प्रवचन, गणपतीचे स्मरण, चरणसेवा, त्याची पूजा, त्याला नमस्कार, त्याची सेवा, त्याचे सख्य व त्याला आत्मसंबंधी निवेदन हे सर्व भक्ति-प्रपोषक प्रकार आहेत. उत्तरोत्तर श्रवणानतर कीर्तन, नंतर स्मरण अशा भूमिका आक्रमित गेले म्हणजे श्रीगणेशाचे पूर्ण ज्ञान होऊन स्वानंदवासी होता येते. असो; आता वक्रतुंडकथेकडे वळू. देवांचा असा संप्रदाय आहे की, ज्या दिवशी इंद्राला स्वपदप्राप्ति झाली तो वर्षाचा दिवस, ते मोठ्या समारंभाने साजरा करितात. एकवर्षी ह्या वार्षिक उत्सवाला ब्रह्मा, विष्णु, शंकर, सूर्य, वरुण, अग्नि, धर्म (यम), कुबेर इत्यादि देव सकुटुंब व सपरिवार आले होते. त्याचप्रमाणे सिद्ध, यक्ष, गंधर्व, किन्नर, नाग हेही तेथे विद्यमान होते. सर्व देवर्षि राजर्षि विराजमान झाले होते. नारद तुंबर तेथे होते हे सांगावयास नकोच. सर्वत्र जिकडे तिकडे गडबड उडाली

आहे, सभा थाटून बसली आहे, अप्सरा नाचत आहेत, गंधर्व गात आहेत, वाद्ये वाजत आहेत, चारण स्तोत्रें ह्मणतात, असा, सर्वमनोहर कार्यक्रमानुरूप उत्सव चालला असता अभिनवसुन्दर रंभा हावभावयुत इतक्या ललितपूर्ण कौशल्याने आपला मंजुळ नाच सुरु करिती झाली. की तिचे ते रूप, तिचे नेत्रकटाक्ष तिचे पदविभ्रम इत्यादि रतिप्रपोषक नृत्य पाहून इंद्र कामातुर झाला. त्याने लज्जा सोडून दिली. समारंभ बंद करून आणि निर्लज्ज होऊन रंभेसह तो जलक्रिडा करण्यासाठी वनात निघून गेला, व रंभेबरोबर क्रिडा करीत कित्येक दिवस वनातच राहिला. तो तेथे असता अकस्मात दुर्वास ऋषींची स्वारी त्याचठिकाणी प्राप्त झाली. त्या मुनीचे ते तपस्तेज पाहून इंद्राला खिन्नता प्राप्त झाली. रंभेला त्याने झिडकारून देऊन मुनिवर्यांस नमस्कार केला; पण त्याची ती नीचावस्था पाहून मुनिही त्याच्याशी अवाक्षर न बोलता एकदम तडक चालते झाले. हा मुनिकोप व ही आपली पशुसमता इत्यादि पाहून इंद्र भयाभित झाला त्याची गात्रे विगलित झाली. तेव्हाच त्याचे वीर्य पतन झाले आणि रंभेस तेथेच ठेऊन तो आपल्या राज्यात अगदी खिन्नमनस्क होऊन गेला. इकडे त्या भुमीवर पडलेल्या वीर्यांपासून एक महाभयंकर राक्षस उत्पन्न झाला. त्याचे संगोपन मातृवात्सल्यपुरःसर पृथ्वीने केले. तो आजानुबाहु, दीर्घाक्ष, महावक्षा (मोठ्या छातीचा) बळकट. रक्तवर्ण. व तेजस्वी असा होता. त्याचे 'मत्सरासुर' असे नाव ठेवले. पुढे पांचव्या वर्षी त्याची मुंज झाली. नंतर तो सर्व वेदविद्यापारंगत झाल्यावर आपले लग्न करिता झाला. त्याची 'मदकरा' या नावाची स्त्री ही दुर्बुद्धीची कन्या होती. लग्न झाल्यावर काही दिवसांनी त्याला अशी इच्छा उत्पन्न झाली की,

आपल्यास त्रैलोक्याचे स्वामित्व मिळावे. अर्थातच ही इच्छा सफल होण्याला तपश्चर्येची आवश्यकता होती,. म्हणून त्याने शुक्रगुरुकडे जाऊन पंचाक्षरी मंत्राचा उपदेश घेतला व शिवाची तपश्चर्या करून त्याला संतुष्ट केले. पण हे करण्याला त्याला एक सहस्र वर्षे उग्र व एकनिष्ठ तपश्चर्या कंदमुळे भक्षून करावी लागली. या उग्र तपश्चर्येचे तेज इतके फाकले की, प्रत्यक्ष सूर्यादि तेजोदेवतांसही ते असह्य झाले. असो; शंकर प्रसन्न झाले व 'वर माग' असे म्हणाले. ती करुणपूर्ण वाणी ऐकून मत्सराने आपले डोळे उघडले. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले आणि पूजा करून उत्तम प्रकारची स्तुति केली. ती ऐकून शंकर जास्तच संतुष्ट झाले आणि तुला काय पाहिजे ते माग, मी देतो' असे वचन दिले. 'देवा! आपण प्रसन्नच झालां आहांत, तेव्हां पंचमहाभूतात्मक व त्रिगुणसंवलित वस्तूपासून मला मरण नसावे, आरोग्यादि सर्व प्रकारचे ऐश्वर्य असावे आणि ब्रह्मांडाचे राज्य मिळावे, हे वर द्या.' हे मागितले. भोळ्या शंकरानी 'तथास्तु' म्हणून ते अंतर्धान पावले. नंतर अतिहर्षयुक्त होऊन मत्सरासुर घरी गेला. त्याच्या मातुःश्रीस,पत्नीस व इष्टमित्रांसही अतिआनंद झाला. पुढे काही दिवसांनी त्याला 'सुंदरप्रिय' व 'विजयप्रिय' असे दोन तेजस्वी पुत्र झाले. त्या पुत्रांस घेऊन मत्सरासुर एक दिवस आपल्या सासुरवाडीला गेला. त्याच दिवशी तेथे सर्व दैत्यमंडळी जमली होती. बोलतां बोलता मत्सरासुराने वरदान मिळविले त्याच्या गोष्टी निघाल्या व दैत्यांनीं त्या असुराला आग्रह केला की. वरानुसार त्रैलोक्य जिंकण्याचा हेतु सिद्धीस न्यावा. मत्सरासुरास तेच हवे होते. एक फक्त त्याची भूमिमाता त्याला अनुकूल नव्हती. कारण इंद्राच्या पुत्रानेच इंद्राचे

राज्य हरण करावे हे तिला संमत नव्हते. पण दैत्यांनीं 'शंभूने जलंधरासुराने शंभूविरुद्ध लढाई करून त्याचा पराभव केला' हे दाखला दिला व या कामात मातेचे वगैरे ऐकण्यात कांही अर्थ नाही असे सांगितले. नतर सर्व मंडळी शुक्राचार्याकडे जाऊन त्यांना मत्सराच्या राज्याभिषेकार्थ घेऊन आली. राज्याभिषेक यथाविधि झाला. राजपद प्राप्त झाल्यावर मत्सरासुराने आपली महापराक्रमी राक्षसी चतुरंग सेना शस्त्रास्त्रांसह सज्ज केली. अनेक सहस्र हत्ती, तसेच अश्वारूढ योध्दे, तितकेच रथ व पदाति घेऊन मत्सरासुर सहपुत्र निघाला. त्यांनी थोडक्याच वेळात पृथ्वीवरील क्षत्रियांचा पराभव करून जे जे राजे मेले, त्यांचे पुत्र राज्यावर बसवून त्यास व जिवंत राहिले त्यासही करभार घेऊन मांडलिक केले. याप्रमाणे सर्वच्या सर्व ससद्वीप पृथ्वी पादाक्रांत केल्यावर हे अजिंक्य सैन्य पाताळात शिरले. येथे मोठेच घनघोर युद्ध झाले. हजारो दैत्य व हजारो नाग मारले गेले. रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या. एकदा दैत्यांनी जोर करून नागांस मागे हटवून त्यांचे हजारो वीर समरांगणात ठार केले. तेव्हा वासुकी नामक मुख्य नागाला संताप येऊन त्याने पळणाऱ्या नागास धीर दिला आणि आपल्या मारक विषाचा असा पर्जन्य पाडला की, सर्व पाताळच्या पाताळ दग्ध होऊ लागले, हजारों दैत्य माशासारखे तडफडून मरू लागले, त्यांची शस्त्रे जळाली, हत्तीघोड्यांची राख झाली, एक क्षणभर एके ठिकाणी ऊभे राहतां येईना, असा दारुण प्रसंग प्राप्त झाला. तेव्हा विरोचन धीर धरुन उठला व शुक्राची प्रार्थना करून त्यांनी ह्मटलेल्या मत्रप्रभावाच्या साहाय्याने सर्व असुर विषरहित केले. ह्या दैत्यांनी गरुडास्त्राचा जप केल्याबरोबर हजारो गरुड उत्पन्न होऊन त्यांनी नागांचा संहार केला. वासुकीने आपल्या विषप्रभावा

गरुडांचा नाश केला. तेव्हा दैत्यांनी स्वतःच गरुडांची रुपे घेतली व नागांचा संहार केला. नागसैन्याचा येणप्रमाणे पराजय होऊन अवशिष्ट सैन्य मागे फिरले. हा वृत्तांत शेषनागाला कळल्यावर तो साम करण्याच्या बुद्धीने बाहेर आला व दैत्यांकडे जाऊन नम्र वाणीने त्याने सांगितले; 'अहो तुमचे व आमचे वैर काय म्हणून? आपण सगळे पाताळवासीना?' हे ऐकून विरोचनाने सांगितले. की 'आपण करभार देण्याला कबूल असाल तर व त्रैलोक्याचे आधिपत्य मिळवू इच्छिणाऱ्या मत्सरासुराचे श्रेठत्व मान्य करीत असाल, तर आम्ही आपले बाण भात्यात घालण्यास तयारच आहोत.' नागास हेच हवे होते. ते करभार देऊन मोकळे झाले. नंतर असुरांनी वरुणलोकांवर स्वारी केली. तेथेही तीन चार दिवस घनघोर युद्ध झाले. राक्षस जखमी झाले अगर मेले तर त्यांच्या जखमा बऱ्या करणारे व त्यांस जिवंत करणारे शुक्राचार्य होते, ह्मणून राक्षस बलवत्तर झाले व वरुण व त्याचे जलचर अनुयायी यांस पकडून त्यापासून ते राक्षस करभार घेते झाले. नंतर उत्तर दिशेकडे त्यानी धनपति कुबेराच्या राज्यावर चाल केली. पण कुबेराने 'य : पलाय' केल्यामुळे दैत्यांस अलका नगरीत सुखाने प्रवेश करता आला व तेथे आपले स्वामित्व स्थापता आले. नंतर मृत्युस्वरुपी यमाशी व त्याच्या रोगरुपी सैन्याशी पांच दिवस लढून दैत्यांनी त्यांचा पराभव केला व यमास बंदीत घातले. लागलीच त्यांनी आपला मोर्चा अमरावतीकडे फिरविला तेथेही देवदैत्यांचे सात दिवस अतिभयंकर युद्ध झाले. दैत्यांचा एकदा कोठें पराभव होण्याचा संभव दिसू लागला तो सुंदरप्रिय, मत्सराचा पुत्र सिंहनाद करीतच तेथे आला. त्याने इंद्रावर हल्ला केला. इंद्राने आपले अमोघ शस्त्र वज्र त्याच्या अंगावर टाकले. पण तो

दैत्यपुत्र एक पाऊलही मागे सरला नाही, इतकेच नव्हे तर त्याने ऐरावतनामक इंद्राच्या वाहनाला मूर्छित करून इंद्राचा पाय धरून खाली ओढले व त्याला पकडून घेऊन तो आपल्या बापाजवळ गेला. हा पुत्राचा पराक्रम पाहून बापाला जो आनंद झाला तो केवळ सत्पुत्राचे पराक्रम पाहणाऱ्या बापासच कळणार ? असो; इंद्राला पकडल्यावर सर्व देव पळून गेले आणि स्वर्गाची मालकी मत्सरासुराकडे आली. इकडे सर्व देव कश्यपास घेऊन सर्व ऋषी-समागमें ब्रह्मदेवाकडे गेले व करुण वृत्तांत सांगितला. ब्रह्मदेवाने आपल्या हातून काही होणार नाही; असे पाहिले व त्यास घेऊन तो विष्णुकडे गेला. सर्वपालक विष्णूनेही 'शंकरवराने प्रमत्त झालेल्या असुराचा पराभव करण्यास आपण असमर्थ आहो' असे सांगितल्यावर सर्व मंडळी कैलासाला शंकराकडे गेली. पण त्यानेही आपल्यास कांही करता येणार नाही, असे सांगितले. पुनः शंकर ह्मणाले, 'विष्णु ! तूं बुद्धिवान् आहेस, कांही तरी शक्कल काढ. पण विष्णूस युक्ति सुचेना. मग देवांनी आपापले लोक सोडून कैलासावर येऊन राहण्याचा बेत केला. त्यास वाटलें कीं, मत्सरासुर कैलासावर येऊन काही गडबड करणार नाही. कारण कैलास ह्मणजे मत्सरासुराच्या इष्ट देवतेचे स्थान होते. इकडे मत्सराने अमरावतीस जाऊन इंद्राचे सर्व भोग भोगण्यास आरंभ केला. सिद्ध, गंधर्व, चारण हे त्याची सेवा करूं लागले. मत्सराने आपल्या विरोचनादि मित्रास देवांची स्थाने दिली. इतक्यात त्याला आठवण झाली की, ब्रह्मा, विष्णु, शंकर हे देवतात्रय आपल्या अभिनंदनास आले नाही. तेव्हा त्याने आपल्या प्रबल अशा अंधकासुराबरोबर 'बऱ्या बोलाने या; नाहीतर आपल्यास पकडून आणावे लागेल' असा निरोप तिघास, पण प्रथम ब्रह्मदेवास

पाठविला. अंधक सत्यलोकी गेला. पण तेथे कोणी नाही; असे पाहून तो वैकुंठास गेला तेथेही ओसाड पाहून तो कैलासास गेला. तेथे पाहतो तो सर्व देव, सर्व ऋषी आनंदात बसले होते. हे पाहून त्याला वाईट वाटले. तो आंत गेला तेव्हां त्यास सत्कार-पूर्वक एका आसनावर नेऊन बसविले. पुढे शिष्टरीतीचा धि:कार करून अंधकाने शिवास सांगितले की 'माझ्या धन्याने सर्व स्वर्गलोकावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले आहे. तो स्वर्गाचा स्वामी आहे, म्हणून त्याच्या दर्शनासाठी व त्याची चरणसेवा करण्यासाठी तुम्ही तिघाजणांनी आता माझ्याबरोबर चलावे. नाही तर तुमचे कल्याण होणार नाही.' हा उर्मट निरोप ऐकून शंकर क्रोधसंतप्त झाला. आपणच वर देऊन मत्सराला मातविला व आता तो उलट गोष्टी सांगावयास लागला आहे, हे पाहून त्यास वाईटही वाटले. असो; 'आम्ही येत नाही, आम्ही काही त्याचे चाकर नाही.' असे प्रत्युत्तर शंकराने दिले व तो अंधक ते उत्तर जसेच्या तसे मत्सरासुराला भरसभेत सांगता झाला. अर्थातच मत्सरासुर खवळून जाऊन म्हणाला की, 'मला वर दिला म्हणून शंकराला असा मान यावा काय? तप केले म्हणून मला वर मिळाले. त्यात शंकराने आपल्या पदरचे मला काय दिले? काही न करिता दिले असते, तर बरीक तो जगदीश्वर खरा झाला असता. चला, त्याच्या लोकाला जाऊन आपण त्याला बंदीवान करून आणू. तो आपल्याला मोठा समजतो काय? बेटा जसा तो, तसाच मी. त्याने कर्म केले. त्याला कैलास मिळाला; मी कर्म केले, मला त्रैलोक्याचे राज्य मिळाले. सर्व विश्व कर्माधीन आहे. ह्यात त्याची काय प्रतिष्ठा? चला, उठा, तयार व्हा, आज कैलासावर स्वारी आहे." झाले; सैन्य तयार झाले

व कैलासावर चाल करून गेले. पर्वताच्या माचीवर जे राखणदार शिवगण होते त्यास राक्षसांनी आधी हाकून लाविले. शत्रु गर्जना ऐकून कैलासावर जे जे देव होते त्यांनी लढाईचा वेष धारण केला. वीरभद्रादी सर्व शिवगण, विष्णु, ब्रह्मा, सूर्य काली इत्यादि सर्व देव शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन रणांगणावर गेले. शंकरही नंदिकेश्वरावर आरूढ होऊन तेथे आला. नंतर देवदैत्यामध्यें हाणामारीचे मोठे घनघोर युद्ध झाले. बाणांचा वर्षाव असा काहीं झाला की, ' न भूतो न भविष्यति ' जिकडे तिकडे काळोख पडला. आपपर ओळखता येईना; घंटा, शंख, तुताऱ्या, शिंगे, नौबती यांची, तसेच अश्व, हत्ती, वाघ, सिंह इत्यादि यांची भैरव गर्जना अशी कांहीं दुमदुमून राहिली की, कोणाचे बोलणे कोणास ऐकूं जाईना. मारामारी पराकाष्ठेची झाली. रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या व त्यांतच हत्तींचीं, घोड्यांची, देवदानवांची धडे तरंगतांना दिसूं लागली. असो; पुढें राक्षसांनी महापराक्रम करून देवांची फळी फोडली व त्यांस पळावयास लाविले, देवसेनापतींनी देवांस थांबविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. त्यांतच द्वंद्व युद्धास आरंभ झाला. विषयप्रिय आणि ब्रह्मा, सुंदरप्रिय आणि शंकर, प्रल्हाद आणि विष्णु, विप्रचिती आणि सूर्य इत्यादिकांचे भयंकर द्वंद्व युद्ध सुरू झाले. ह्या थडकाथडकीच्या झोंबाझोंबीनें बिचारी भूमि कांपावयास लागली. याप्रमाणे नऊ दिवस अहोरात्र युद्ध झाले. मत्सरासुर नुसता हा युद्ध-चमत्कार पाहत होता व आपल्या अनुयायांस उत्तेजित देत होता. दहाव्या दिवशी राक्षस पुनः एक

होऊन चालून येत आहेत, असे पाहून विष्णुशंकरांनी आपली अमोघ अस्त्रे त्यांच्यावर फेंकली, त्रिशुलांचा व चक्रांचा भडिमार केला, तेव्हा दैत्य मागे हटले, हजारों दैत्य मृतप्राय पडले व बाकींचे गडबडून गेले. हे पाहून व आपण प्रत्यक्ष गेलो नाहीतर दैत्यांचा पराभव होतो, असे जाणून मत्सरासुराने महानाद करून, धनुष्याचा टणत्कार करून व बाणांचा प्रलयकालीन पर्जन्य पाडून त्यानें असा काही पराक्रम केला की, विष्णु शंकरसुद्धा तोंडात बोट घालून गप्प बसले. इकडे मत्सराच्या अचुक शरसंधानाने कुमार कार्तिकेय, वीरभद्र, अग्नि, वायु महाकाली, ब्रह्मा हे व इतर मुर्छित झाले. विष्णु: युद्धास प्रवृत्त झाला. तो त्याचीही तीच अवस्था झाली व तो धरणीवर मृतप्राय होऊन पडला. शंकराचा त्रिशूल नांहीसा करून गळयात पाश घालून शंकरास ओढीत नेले व तुच्छतादर्शक हास्य करून विचारले ‘ उगीच ऐट कशाला ? गर्व टाकून दे ’ असें ह्मणून शंकरास व विष्णू आदि सर्व देवांस बंदीत टाकले. आणि आपण कैलासपदी बसून तेथील अनुपमेय भोग मोठ्या आढ्यतेने भोगावयास लागला.

मत्सर–ब्रह्मांडाचा अधिपति होतो–धर्मलोप

यांप्रमाणे मत्सर हा ब्रह्मांडाधिपती झाला. त्याने कैलासावर सुंदरप्रियांची, वैकुंठावर विषयप्रियांची, सत्यलोकावर प्रल्हादाची अशा योजना केल्या आणि आपण भूलोकावर येऊन तेथे एक रम्य व विस्तीर्ण नगर निर्माण केले आणि त्रैलोक्याची ती राजधानी केली. व स्वतेजाने सर्वत्र आपले स्वामित्व सुस्थिर करून सर्व प्रकारचे भोग

सेवन करू लागला. शिवादि सर्व देव त्याने राजधानीत आणिले होते. पुढे सर्वथा दीन झालेल्या देवांस पाहून तो त्यास हर्षाने म्हणाला, 'माझी आज्ञा व माझे वर्चस्व मान्य करा, आणि तुह्मांस वाटेल तिकडे संसार करावयास जा.' शंकरादिकांस ही मोकळीक मिळाल्याबर तेथून ते निसटले आणि पर्वताच्या दऱ्याखोऱ्यात जाऊन दुःख करीत व 'हेही दिवस जातील' असे म्हणत बसले. इकडे मत्सराने देवळा-तील देवांच्या प्रतिमा फोडून तेथे आपल्या प्रतिमा बसविल्या. धर्मलोप होत चालला, वेदपठण, तपश्चर्या, योगयाग इत्यादि सर्व राहिले. 'घरोघर मत्सराची पूजा करा' अशी आज्ञापत्रे सुटली. 'वेदोक्त मंत्रांनी माझी पूजा करून, मला अर्पण करण्यासाठी यज्ञ करा' असे त्याने ब्राह्मणास सांगितले व ज्यांनी ऐकले नाही, त्यांना ठोक दिला. तसेच, गायत्रीजप, अग्निहोत्रादि सर्व विधि मत्सराच्या नावाने होऊ लागले. सारांश 'मत्सर हा ईश्वर आहे' अशी भावना उत्पन्न करण्या-विषयीचे सर्व उपाय मत्सराने केले. प्रजेपैकी प्रत्येकजण मत्सरभक्त व देवद्वेष्टा झाला. स्वाहा, स्वधा यांचा लोप झाल्यामुळे देवपितरांस खड-खडित उपास पडू लागले. अर्थातच देवास सुखाचा लवलेशहि मिळत नव्हता. पण त्यांच्या सुदैवानी तेथे महायोगी श्रीदत्त महागणेशभक्त, देवांच्या समाचाराकरिता आले. शंकरादि सर्व देवांनी त्याना नमस्कार करून व 'योगी विरक्त तथापि लोकहितकर्ते आपण आहा' अशी वास्तविक भक्तिपुरःसर स्तुति करून त्यांस विचारले. 'महाराज'! धर्मलोप झाला, सर्व जग भोगमय झाले आहे. आह्मी असे निर्जळ निराहार करीत आहो. तेव्हां दुःखविमोचनाचा कांही उपाय सांगा. तेव्हा दत्ताने उत्तर दिले.

वक्रतुंडाचा जन्म–मत्सराचे गर्वहरण व गणेशस्तवन

'शंकरा ! तुम्हांस सर्व समजतेच आहे, तथापि विचारलें ह्मणून सांगतो. क्षमा करा, 'मी सर्वेश्वर आहे' असा जो गर्वयुक्त मत्सर तुमचे हृदयांत वास्तव्य करीत आहे तो मारा, म्हणजे बाहेरचा मत्सर मरेल. आपल्यापेक्षां श्रेष्ठ कोणी भेटला ह्मणजे जी ईर्ष्या, असूया तुमच्या मनांत उद्भवते, ती नाहीशी करा. गणेशाचा एकाक्षरी मंत्राने योगपूर्वक सेवा केली ह्मणजे ही ईर्ष्या नष्ट होईल. तुह्मीं गणेशाची सेवा करा, तुमच्या सर्व संकटांचा परिहार होईल.' याप्रमाणे शंकरासहित सर्व देवांनी तपश्चर्या करण्याचे कबूल केल्यावर दत्तयोगी अंतर्धान पावले. देवांनी स्थिरसुख आसने घालून एकनिष्ठेने एकाक्षरी मंत्राचा जप पुजापुरःसर केला. हजार वर्षे झाल्यावर श्रीगणपति प्रकट झाले. सिंहारूढ, गजवक्त्र, शूर्पकर्ण, महोदर, चतुर्बाहु, पाशांकुशविराजित, सिद्धिबुद्धियुत, किरिटकुंडलधारी, अशी तेजस्वी मूर्ति आर्विभूत झाली. व 'वर मागा, प्रसन्न झालो' असे ह्मणाली, देव, ऋषी इत्यादि देवांनीं सहस्रशः नमस्कार करून भक्तिपुरःसर श्रीगणेश देवाची स्तुति करून मागणे मागितले की, 'जगताला पीडा देणाऱ्या मत्सरासुराचा नाश करा.' श्रीगणेशाने उत्तर केलें. 'शंकराने त्याला विलक्षण वर दिले आहेत; तथापि तुमचे हित होईल ते मी करीन, भिऊं नका.' असे ह्मणून श्रीदेवांनीं आपल्या गणांचे स्मरण केले. त्याबरोबर, सर्व गणमंडळी शस्त्रास्त्रांसहित तेथे प्रकट झाली. नंतर त्यास 'मत्सरासुराचा नाश करावयाचा आहे, त्याला युद्धचमत्कार दाखवून मग

त्याचा समाचार घेऊं. चला. ' अशी आज्ञा झाली. आनंदाने त्यांनीही मत्सरपुरावर स्वारी केली. इकडे मत्सरासुर आपल्या ऐश्वर्याच्या आढ्य-तेत व नाचरंग, खाणेपिणे इत्यादि उपभोगांत दंग होऊन गेला होता लक्ष्मी मागून भोग आणि भोगामागून रोग, हे चक्र चालावयाचेच. ज्ञान व भक्ति असतील तर लक्ष्मीही कांही करू शकत नाही. असो; गर्व झाला होता, तथापि मत्सरालाही भय देणारी अशुभ चिन्हे होऊ लागली व आपला काळ संपला, असे त्यास वाटावयास लागले. पुनः ' माझा नाश कशानेच व्हावयाचा नाही, असा मला शंकरवर आहे, भिण्याचे कारण नाही ' असेही वाटले. गणेशगणांची स्वारी येऊन थडकल्यावर भयाने व क्रोधाने विव्हल होऊन आपल्या ' अजिंक्य ' चतुरंग बलासह तो युद्धाकरतां बाहेर पडला; पण त्याचे चित्त बावरल्या-सारखे झाले होते. असो; यावेळीही देवदैत्यांचे अतिभयंकर युद्ध झाले. कित्येक दिवसपर्यंत कोणाचा जय होतो, हे कळेना. प्रल्हाद व इंद्र यांचे व्दंद्व युद्ध झाले, त्यांत प्रल्हादाचा पराभव झाला. नंतर महिषा-सुराने इंद्राशी गांठ घातली, तो तिकडून अग्नि आला, तिकडून विरोचन, इकडून यम अशी पुनः युद्धाची धुमश्चक्री उडाली. शंकर विष्णु हेही आले, पण त्यांचेही मत्सरपुत्रांपुढें कांही चालेना. हे पाहून श्रीगणेशाचे प्रमोद, आमोद, ब्रह्मप्रिय, योगप्रिय इत्यादि गणनायक आपआपल्या पथकांसह पुढे सरसावले पुनः युद्धे जुंपली दैत्यास पुनः पुनः सावध करणाऱ्या शुक्रमुनीला ब्रह्मप्रियाने एका दूरच्या गुहेत कोंडून ठेविले. तेव्हां आधारशून्य दैत्यसैन्यांत हाहाकार झाला व मरावयाचे व मारावयाचे असा निश्चय करून ते युद्धाला सरसावले. पण प्रमोदाने त्यांच्यावर भयंकर शरवृष्टि करून त्यांचा विलक्षण संहार केला व मत्सराच्या दोन्ही पुत्रांस ठार केले. ते पाहून मत्सराचा शोक

अनावर झाला व पुत्र मेल्यावर जगून काय करावयाचे आहे, असे त्यास वाटले. पुढे त्याचे सांत्वन वृद्धांनी केल्यावर मत्सरासुर युद्धाच्या तयारीने आला. देवांस पुनः भीति उत्पन्न झाली. आपली आता धडगत नाही, पुनः हा मत्सरासुर आपणा सर्वांचा लढाईत पराजय करील की काय, अशी जबरदस्त धास्ती लढाई सुरू होण्याच्या आधीच त्यांनी घेतली. वक्रतुंडानी त्यांस पुस्कळ धीर दिला, पण लढाईच्या जागी येऊन उभे राहाण्याचे त्यांनी नाकारले. असो; मत्सरासुर रणांगणावर आला तो, वक्रतुंड कोठे आहे, असे ओरडतच आला. वक्रतुंडही त्याचा समाचार घेण्यासाठी सज्ज झाले. ते समोर आल्यावर 'तूं मूर्ख आहेस, शंकरविष्णूंनी लबाडी करून तुला फसविले आहे, मला शरण ये, सुखाने राहशील' इत्यादि क्रोधयुक्त व तिरस्कारयुक्त स्वराने मत्सर बोलला. त्यावर हांसत हांसत, वक्रतुंड ह्मणाले : 'गर्व करूं नको; मी पंचभूतात्मक नाही, त्रिगुणसवीलितही नाही, मला अहंकाराचा किंवा महताचा किंवा प्रकृतीचा सबंध नाही. मी आनंदरुप ब्रह्म केवळ तुझा नाश करून मुनिदेवांची स्थापना करण्यासाठी अवतीर्ण झालो आहे. तुझे पुण्य संपले. तुझा वरप्रसाद शिथिल झाला आहे, तर देवादिकांचा व मुनींचा द्वेष करणार नाहीस, वैदिकधर्मांचा दास होशील, तर तुला जिवंत ठेवितो. बोल लवकर.' हे बोलणे ऐकून व गणपतीचे स्वरूप पाहून तो आश्चर्यविस्मित झाला. व नम्रतेने बोलला 'आपण जर समरूपी ब्रह्म आहा, तर देवांचाच पक्षपात का करिता? व आपल्यास आकार कसा?' वक्रतुंड ह्मणालेः 'मला सर्व सारखे आहेत. आपआपली कर्तव्यें जोपर्यंत सर्व जीव करितात, तोपर्यंत सर्व ठीक चालते व धर्मही सुयंत्रित चालतो, पण जेव्हा देव आपला धर्म सोडून देऊन उन्मत्त होतात, तेव्हां दैत्यांच्या करवी मी

तपश्चर्या करवितों व त्यास विष्णु, शंकर व ब्रह्मा यांच्याकडून देवविनाशक वर देवविततो. नंतर देवांचे सर्व ऐश्वर्य आपलेसे करणारे दैत्य उन्मत्त होऊन आपला धर्म सोडून देऊं लागले, तर देवांच्या हृदयांत शिरून त्यांस दैत्यांची वर्मे सांगतो व त्यांचा नाश करण्यासाठी मी देहधर होतों व दैत्यांचा नाश करितो. याप्रमाणे दोघेही सावध होतात. व सर्व जगताचा गाडा सुयंत्र चालतो;' असे बोलून मत्सरासुराला श्रीगणपतींनी आपले स्वरुप दाखविले व ते पाहण्यासाठी मत्सरास त्यांनी दिव्यचक्षूही दिले. ते अतिविलक्षण, ना सगुण ना निर्गुण, न न्यून न अधिक, न विदेही न सदेही, न मायी न अमायी, देह सगुणरूप, मस्तक निर्गुणरूप, असे अभिनवसुंदर, अतितेजस्वी स्वरुप पाहून तो दैत्यराज विगलितगर्व झाला, त्याच्या अंतःकरणांत भक्तिभावाचा पूर लोटला, हात जोडून त्याने ज्ञानी भक्ताप्रमाणे परमेश्वराची भक्तिपूर्ण स्तुति केली व दर्शन झाल्याबद्दल आपण आपलेच धन्यवाद गाईले. श्रीगणपतिही प्रसन्न झाले. त्याला अखड भक्तिचा व गणेशभक्तांच्या संगतीचा असे दोन वर देऊन आज्ञा केली की, कोणत्याही कार्यारंभी माझे भक्तिपूर्वक पूजन करीत जा व स्वधर्माने जे वागत असतील, त्यांचे संरक्षण कर. जे कोणी लाभाच्या आशेने कर्म करतील व ज्ञान मिळवितील, त्यांचे फल त्या त्या कर्त्यास दे, पण तेथे आसुरभाव प्रकट कर. पण जे निष्काम कर्म करतील किंवा निष्काम ज्ञान संपादन करतील त्या त्या लोकांची तूं सेवा कर आणि त्यास तुझी पीडा होऊं देऊं नको.' 'तथास्तु' असे मत्सर म्हणाला व पुनः गणेशास वंदन करून तो स्वस्थानी गेला. नंतर सर्व प्रकारचे ज्यांचे ताप हरण झाले आहेत, असे देव श्रीगणपतीची स्तुति करते झाले व 'आम्हांस अखंड भक्ति दे' असे मागून व देवाने 'तथास्तु'

झटल्यावर व श्रीगणपति अंतर्धान पावल्यावर आपआपल्या स्थानी रवाना झाले.

‘रिद्धिसिद्धिपति’ अवतार व दंभासुरमंथन

एकदां सृष्टिविरचना करीत असतां ‘मी मोठा’ असा ब्रम्ह्यास गर्व झाला, तेव्हां काही विलक्षण प्राणी उत्पन्न होऊन ब्रह्मदेवास ठोक देऊं लागले. नंतर या त्रासांतून मुक्त व्हावे ह्मणून तो गणपतीस शरण गेला व अनेक वर्षें एकाग्रचित्ताने त्याने उत्तम तपश्चर्या केली, गणपति प्रसन्न होऊन त्याला अखंड भक्ति देते झाले व ‘पुत्ररूपाने माझ्या घरीं व्यक्त स्वरूप घ्या म्हणजे लालनपालनादि अनेक सोहाळे करून मी आपली भक्ति करीन’ असा वर ब्रह्मदेवाने मागितला होता, त्यालाही ‘तथास्तु’ म्हणून व ‘पुनः गर्वाविष्ठ होऊं नको’ असे सांगून गणराज अंतर्धान पावले. पुढें ब्रह्मदेवापासून दंभासुर नावाचा राक्षस उत्पन्न झाला व त्याने आपल्या वडिलांस संतोष उत्पन्न होईल अशी तपश्चर्या केली. नंतर मृत्यु टळण्याचे व ऐश्वर्य मिळण्याचे वरप्रदान घेऊन तो कर्म भूमिवर आला. तेथे त्याने आपले राज्य स्थापन करून कर्ममार्गांचा लोप केला. सर्व देवांचा पराभव केला, त्यांस देशोधडीस लाविले आणि त्रैलोक्याचा स्वामी झाला. त्याच्या नाशार्थ गणपतीनीं ब्रह्मदेवाच्या घरी ‘रिद्धिसिद्धिपति’ या नावाने अवतार घेतला. दुसऱ्याच वर्षी या देवेश्वराने दंभासुराला युद्धाचे आवाहन केले. दंभासुर विस्मित झाला व दैत्यगुरुशुक्रास बोलावून त्यास ‘हा रिद्धिसिद्धिपति कोण?’ असे विचारले. शुक्र ह्मणाले: “हे ब्रह्म आहे, सिद्धि म्हणजे सफलता, यशस्विता होय. ही

एक माया आहे. ही शंकरापासून तो स्तंबापर्यंतच्या सर्व जीवांस मोहित करते. बुद्धि ही उजव्या मांडीवर बसणारी माया आहे. हे सर्व चराचर विश्व बुद्धिमय आहे. या बुद्धींत जे मन आहे ते क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र व निरुद्ध (व निरोधक) असे पाच प्रकारचे आहे. बुद्धीचेही तेच प्रकार व अनंत उपप्रकार आहेत; म्हणून बुद्धि एकच असता अनेक प्रकारची दिसते. हिच्याच सामर्थ्याने भक्तियुक्त जीव ब्रह्मप्राप्ति करून घेतो. असो; या दोघींचा स्वामी गणेश्वर आहे. त्याला शरण जा; तरच जगशील. नाहीतर मरशील.'' हा उपदेश ऐकून व लोभ हा सुरांचाही घातक आहे, तेव्हा त्यास टाकून द्यावा ' असा विचार करून तो सिद्धिबुद्धिपतीस शरण गेला व ' स्वधर्माने चालले असता कोणासही भय नाही ' असा वर व दृढभक्तीचा उत्तम वर संपादून तो स्वस्थानी गेला व देवही प्रमुदित होऊन आपापले लोकांस गेले. अवतारकार्य संपवून गणनाथहीं स्वानंदवासी झाले.

वसिष्ठ आणि विश्वामित्र–विश्वामित्र–याज्ञवल्क्यसंवाद-दिवोदासाची कथा–विश्वामित्र गणपतीभक्त होऊन मुक्त होतो.

सूत :– ऋषीहो ! नंतर मुद्गलांनी वामनावतारांतील बलियज्ञाची, वामनाने व बलीने गणेशदेवाला भक्तिने संतुष्ट केल्याची व बलीस पाताळाचे राज्य व पुढील मन्वंतरांत इंद्राचे राज्य दिल्याची कथा सांगून मत्सराचा नाश करण्याकरिता झालेला वक्रतुंडाचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला माध्यान्ही झाला हे सांगितले. तसेच ऋषीक ऋषींनी वृद्धपणी लग्न करूनही आपल्या पत्नीस सर्व प्रकारचे भोग

दिले, तिला व तिच्या आईला निरनिराळे प्रसाद देऊन तिच्या पोटी महातपस्वी ब्राह्मण व आईच्या पोटी महापराक्रमी धनुर्धर होतील असे सांगितले असताही प्रसादाची अदलाबदल झाल्यामुळे आईच्या पोटी विश्वामित्र व पत्नीच्या पोटी परशुरामाचा पिता जमदग्नी झाले; पुढे विश्वामित्रास वसिष्ठाने कामधेनु दिली नाही ह्मणून तो रानांत वसिष्ठाची गाय घेऊन चालला असतां ब्रह्मतेजाने क्षत्रिय-तेजाचा पराभव केला. ब्रह्मर्षि होण्याकरितां विश्वामित्राने तपश्चर्या किती खडतर केली इत्यादि वृत्तांत सांगितला. पुढे काय सांगितले ते ऐका:- एक दिवस याज्ञवल्क्य ऋषि विश्वामित्राच्या मठांत आले तेव्हा विश्वामित्राने त्यास परम आदराने प्रणिपात करून आपले उग्र तप व त्यांत आलेली आपसिद्धी ह्यांचा वृत्तांत दीनवाणीने सांगितला व प्रार्थना केली की 'मी सर्वमान्य ब्रह्मर्षि कसा होईन ते सांगा.' तेव्हा याज्ञवल्क्य ह्मणाले: 'प्रथम अभिमान सोड. मत्सराचा त्याग कर आणि मी सांगतो ती कथा ऐकून निर्मत्सराने व निरभिमानाने श्रीगणेशाची उपासना कर. पूर्वी एकदा काशीला व विश्वेश्व-राला गर्व झाला की 'आपण एकमेकांस सोडून कोठेही गेलो नाही.' गर्व उत्पन्न झाला ह्मणजे विघ्ने येतात व नंतर पतन होते, हा सामान्य सिद्धांत आहे. असो; एकदा महाभयंकर दुष्काळ पडला. त्यावेळी प्रजेचा अतोनात क्षय होऊन सर्व भूमि त्रस्त होऊन गेली. तेव्हा हा क्षय पाहून दुःखविव्हल झालेला ब्रह्मदेव दिवोदास-नामक राजा मोक्षासाठी तपश्चर्या करीत होता, त्याकडे गेला आणि 'मी प्रसन्न झालो, काशीक्षेत्राचे राज्य तुला देतो' असा न मागताच वर देता झाला. राजाने 'राज्य नको' असे आग्रहाने सांगितले असताही 'तूं राजा झालास ह्मणजे पर्जन्य पडेल, लोकसंग्रह होईल,

तूं अवश्य जा आणि राज्य घे ' अशी आज्ञा केली ह्मणून व राजास लोकांची दया आली ह्मणून, दिवोदास ' मी शंकराची पूजा करीत जाईन ' असे ब्रह्मदेवास सांगून काशीच्या राज्यावर आरूढ झाला. इतक्यात ब्रह्मदेवाने शंकराला मंदरपर्वतावर मरीची ऋषि तप करीत होता, त्याला वर देण्याकरिता ह्मणून नेले आणि ' काशीस जाऊं नका, अनावृष्टि होऊं नये, ह्मणून मी दिवोदासाला राज्य दिले आहे, कांही वर्षे मंदरास रहा ' असे हात जोडून सांगून त्यांस मंदरावर राहविले. पण काशीचा वियोग शंकराला सहन होईना. तेव्हा अनावृष्टीचे विघ्न आले आहे, ते घालविण्यासाठी त्याने व शंकरप्राप्तीसाठी काशीने गणेशाची उपासना केली इकडे दिवोदास राज्य करूं लागला. तेव्हा यथाकाल पर्जन्य पडून जिकडे तिकडे सुपीक झाले व प्रजेस मोठा आनंद होऊन त्या स्वधर्माने वागूं लागल्या. पापाचा शिरकाव कोठेही नाही, हे पाहून दिवोदास आपले स्वर्गपद घेणार की काय अशी देवांस भीति पडली व पंचमहाभूतांवरील मुख्य देवतांनी पृथ्वीवरील आपआपली कर्मे करण्याचे नाकारिले. दिवोदास पुण्यवान राजा! त्याने सर्व देवतांची कामे आपण चालविली. तेव्हा देवांनी त्याजवळ जाऊन आपआपली कर्मे मागून घेतली. इकडे शंकरांनी तपश्चर्या केली. ती पाहून गणेश प्रसन्न झाले व गुणेशनामक तेजस्वी व सुंदर ब्राह्मण उत्पन्न करून ' दिवोदासाला मोह पाड, तो गर्वयुक्त झाला आहे आणि काशीचे राज्य शंकरास दे ' अशी आज्ञा केली. हा गुणेश ह्मणजे ढुंढी होय. तसेच, गणपतीने शिवप्रियार्थ व काशिच्या तपाचे सार्थक करण्यासाठी विष्णूला बौद्धरूप धरून लोकांस धर्मभ्रष्ट करण्यास पाठविले. असो; ढुंढीचे सौंदर्य, तेज व सात्विकता पाहून दिवोदासाचा गर्व नाहीसा झाला. पुढे ढुंढीने त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश

केला; व दिवोदास मुक्तही झाला. अर्थातच शंकरास काशी मिळाली व धर्मभ्रष्ट झालेले लोक पुनः स्वधर्मात आले.' याप्रमाणे याज्ञवल्क्यांनीं सांगून विश्वामित्राला अहंकार सोडण्याचा उपाय सांगितला तो हा– 'माझे तप कसले? माझे सामर्थ्य कसले? मी देहधारी, पराधीन आहे. देवाची कृपा झाली तर मला यश मिळेल.' अशी मनोवृत्ति ठेवली ह्मणजे अहंकार जातो. मत्सर सोडून गणेशभक्ति करण्याचाही उपदेश त्या ऋषीने केला. 'सर्वांपेक्षा मी कमी योग्यतेचा आहे असे मानून परमेश्वर भजन केले ह्मणजे मत्सर जातो' हे व गणेशमाहात्म्य सांगून विश्वामित्राची खातरी केली की, गणेश हाच देवदेवेश्वर, सर्व तत्त्वांचा, सर्वभूतांचा व सर्व देवांचा आधार आहे. सर्व तत्त्वे नष्ट झाली, तरी गणेशदेवाच्या आधाराने सर्व विश्व तसेच राहील. याचप्रमाणे सर्वभूते व सर्व देव नाहीसे झाले तरी एका गणेशदेवाच्या आधारावर सर्व विश्व जिवंत राहील, यांत संशय नाही. सर्वांचा विशेष नायक म्हणून त्यास विनायक म्हणतात. हे विनायकमाहात्म्य ऐकून विश्वामित्राने भक्तिपुरःसर गणेशभक्ति केली व तो ब्रह्मर्षिपद पावला. विश्वामित्राने गजाननापाशी मागणे मागितले की, 'मला अखंड भक्ति आणि गणेशभक्तांचा सहवास असावा.' 'तथास्तु' ह्मणून गणनाथ अंतर्धान पावले व विश्वामित्र परमगणेशभक्त होऊन स्वानंदसुखाचा अनुभव घेता झाला.

—०—

द्वितीय खंड

—०—

सृष्टीची रचना–ब्रह्मादिकांची उत्पत्ती-चतुर्वर्ण व चार आश्रम

श्रीगणेशायनम :– **शौनक : सूता !** आपण जे वक्रतुंडाचे अतुल चरित्र सांगितले ते ऐकून आम्हाला एकदंताच्या कथा आणखी सांगा, आमची तृप्ति होत नाही, असे ह्मणावे लागते, ' ते ऐकून सूताला हर्ष झाला व तो ह्मणाला : ' ऋषीहो ! मुद्गलऋषींसही दक्षप्रजापतीने असाच प्रश्न करून विनंति केली होती की, ' गजाननाच्या कथा, त्यांचे कर्म, त्याचे वाहन, त्याचे स्वरूप इत्यादि सर्व सांगा. ' हे ऐकून मुद्गलऋषीने पापविनाश करणारी गणेशकथा सांगण्यास आरंभ केला. प्रथम त्याने सृष्टीचा आरंभ सांगितला, तो असाः गणेशांनी वर दिला होता ह्मणून ब्रह्मदेवाला सृष्टि करावी असे वाटले. मग तो विष्णुशरीरांत एक वर्ष राहून नाभिद्वाराने बाहेर आला व कमळावर बसून हेरंबध्यान करू लागला. तेव्हा त्याच्या शरीरामधून प्रचंड जलप्रवाह निघाला व तो सर्वत्र पसरला. ब्रह्मा ह्या जलांत पोहत असता त्यांत श्रीगण-पतीची मनोहर पण अंगुष्ठाकार मूर्ति दिसली. ब्रह्मदेवाने तिचे स्तवन केले. पुढे तो श्वासमार्गाने गणपतीच्या उदरांत गेला व तेथे

त्याने व्यवस्थित विश्वरचना पाहिली. बाहेर येऊन त्याने पुनः ईशस्तवन केले, तेव्हां सृष्टिरचनेचे गुह्य त्याला समजले. असो; नंतर ब्रह्मदेवाजवळ स्वयंभू अविद्या, माया, प्रकट झाली. प्रथम ब्रह्मदेवाने सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार हे मानसपुत्र उत्पन्न केले. हे सर्व महाज्ञानी होते. पित्याच्या आज्ञेवरून त्यांनी योगमार्ग स्थापन केला. पण हे पुत्र सृष्टिकर्म करीनात; यामुळे वडिलांचे समाधान झाले नाही. त्याने सृष्टीसाठी महातेजस्वी रुद्र ह्मणजे शंकर जन्मास आणला व त्याला अष्टमूर्तिधर केले. शंकराला-लाही ब्रह्मदेवाने सृष्टि करण्यास सांगितले, तेव्हा त्यांनी अमरसृष्टि निर्माण केली पण जन्ममरणात्मक सृष्टि नाही ह्मणून ब्रह्मदेवाचे समाधान होईना, तेंव्हा त्याने वेद, शास्त्रे व पुराणे निर्माण करून त्यांस विश्वरचनेचे काम सांगितले. त्यांनी नानाप्रकारची कर्में उत्पन्न केली. ब्रह्मदेवाने यज्ञ करून चतुर्भुज विष्णूची उत्पत्ति केली व त्यास गणेशस्मरण करावयास सांगितले व सृष्टिरचनेची आज्ञा केली. विष्णूने अनेक यज्ञ निर्मिले नंतर ब्रह्मदेवाने मरीचि, भृगु, अत्रि, पुलस्त्य, पुलह, ऋतु, दक्षा ! तुला व अंगिरा, वसिष्ठ व नारद अशा दहा तेजस्वी पुत्रांस जन्म देऊन त्यांसही सृष्टिरचनेविषयी आज्ञा केली. नारदाशिवाय ही आज्ञा सर्वांनी मान्य केली व ते तपश्चर्येला गेले. 'ब्रह्मचारी राहीन' असा संकल्प करणाऱ्या नारदाला 'तूं शूद्र होशील व पुढे गंधर्व होऊन भोगरत होशील' असा ब्रह्मदेवाने शाप दिला व आपल्याला उगीच शाप दिला म्हणून नारदाने पित्याला 'तूं अपूज्य होशील' असा प्रतिशाप दिला. पुढे नारदाने गणपतिपूजन व स्तवन करून उःशाप संपादन केला व गणेशभजनामध्ये निमग्न झाला.

नंतर पुरुषसूक्तांत सांगितल्याप्रमाणे ब्रह्मदेवाने चतुर्वर्णांची उत्पत्ति केली व मस्तकापासून संन्यासाश्रम, हृदयापासून वानप्रस्थ, जंघापासून गृहस्थाश्रम व नाभीपासून ब्रह्मचर्याश्रम संपादिता झाला; तसेच, उदरापासून धर्म, पाठीपासून अधर्म, व याचप्रमाचे पशुपक्षांपासून तो सिद्ध, गंधर्व, देव इत्यादिपर्यंत सर्व जातीचे जीव उत्पन्न केले. तसेच, महत्तत्त्व पंचतन्मात्रा, इंद्रिये, व स्थावर, तिर्यग्योनि (पशुपक्षादि), देव, मानव, भूते, प्रेते, पिशाचे व मानसपुत्र (कुमार) असे नऊ सर्ग उत्पन्न केले. नंतर दक्षिणांगातून पुरुष व वामांगापासून प्रकृति उत्पन्न करून त्यांस मैथुनात्मक सृष्टि उत्पन्न करण्याची आज्ञा केली,

मधुकैटभवध

असो; एकदा विष्णूने कानांतील मळ काढला. त्यापासून मधु व व कैटभ या नांवाचे दोन भयंकर राक्षस उत्पन्न झाले. त्यांनी लवकरच स्वभुजवीर्याने त्रिभुवनाचे स्वामित्व संपादिले; व ब्रह्मदेवाचा व विष्णूचा पराभव केला. तेव्हां या विघ्ननाशार्थ शंकरांनी 'श्रीगणपतीच्या षडक्षरी मंत्राचा जप करा' असा विष्णूस उपदेश केला; त्याप्रमाणे विष्णूने तपश्चर्या करून गणपतीस प्रसन्न केले व त्या बुद्धिदात्या गणपतीचे भक्तिपूर्वक स्तवन करून त्यापासून भक्ति, ज्ञान, कीर्ती ईत्यादिकांसह मधुकैटभांचा वध करण्याचा मंत्र मागून घेतला व जेथे ईश्वर प्रसन्न झाला तेथेच (सिद्धिपुरास) गणपतीची स्थापना करून आपणही सपरिवार राहूं लागला. पुढे लवकरच विष्णूने मधुकैटभाचा वध केला.

इकडे नऊ मानसपुत्रांनी गणेशाची एकनिष्ठ तपश्चर्या करून त्यास प्रसन्न करून घेतले आणि अखंड भक्ति व सृष्टिकर्माची शक्ति मागून

घेतली. पुढे दक्षराजा ! त्वां शक्तीचे आराधन करून तिच्याकडून वर घेतलास कीं, ‘ मी तुझ्या पोटीं येईन व पुत्रपौत्रादिकांस अवतीर्ण करीन.’ ‘ पण पुढे तूं गणेशविस्मरण केलेस व त्यामुळे संकटात पडलास.

सूत:- मुनिहो ! दक्षाला मुद्गल ऋषींनी पुढें सांगितलें:—

स्वायंभुव मनूनें गणेशतपश्चर्या केली. काही कालानें परमेश्वर प्रसन्न झाला व त्यास सर्व प्रकारचे मंगलप्रद आशीर्वाद देता झाला. त्यानेंही अखंडभक्ति सृष्टिरचनासामर्थ्य व प्रजापालनत्व मागून घेऊन तो सर्वथा सुखी झाला. पुढें त्या महागाणपत्य मनुराजाला शतरूपा स्त्री ब्रह्मदेवाने दिली. त्यांस प्रियव्रत व उत्तानपाद असे दोन पुत्र व आकूति, देवहूति व प्रसूति ह्या तीन सुलक्षणी मुली झाल्या. पुढे त्या उपवर झाल्या असे पाहून त्याने ह्या आपल्या मुली अनुक्रमें रुचि, कर्दम व दक्षा ! तूं, यांस दिल्या. कर्दम-देवहूतींच्या उदरीं कपिल महामुनि विष्णूच्या अंशाने झाले. रुचि—आकूति यांच्या उदरी यज्ञ नामक ऋषि महागाणपत्य झाला. तुलाही चोवीस अपत्यें झाली. त्यांपैकीं श्रद्धादि तेरा कन्या तूं यम धर्माला दिल्या. त्यांच्या ह्मणजे श्रद्धादिकांच्या पोटीं काम, अर्थ इत्यादि मातृस्वभावानुसार सत्पुत्र झाले व त्यांनीं दैवी संपत्तींचा विस्तार केला. पण ब्रह्मदेवाच्या पाठींपासून अधर्म झाला होता, त्यास हिंसा ही बायको मिळून त्यांनीं, अमृत नामक मुलगा व निकृति नामक मुलगी अवतीर्ण केली. या उभयतांनीं आसुरी संपत्तीचा विस्तार केला.

असो; बाकीच्या राहिलेल्या दहा कन्या रुद्र, मरीचि, अंगिरस इत्यादिकांस दिल्या व त्यांस कार्तिकेयादि पुत्र झाले. सोम, दुर्वास,

दत्त हे अत्रि–अनसूया–यांचे मुलगे होत याप्रमाणें प्रत्येक कन्येस संतति झाली व तुझी व तुझा वंशविस्तार पुष्कळच झाला. यापैकी कित्येक ऋषिपुत्रांनी गणपतींची भक्ति करून त्याला प्रसन्न करून घेतले आणि एकाग्रभक्ति,, स्वकर्मसामर्थ्य व सत्यसंकल्पत्व इत्यादि वर मागून घेतले.

स्वायुंभव मनु–त्याची संतती–चंद्र, दुर्वास व दत्त यांचा वृत्तांत

शौनक ऋषि विचारतातः- ‘सूता! अत्रिपुत्रांचें पवित्र चरित्र आह्मास सांगता का?’

सूत :– ‘होय’ चंद्र हा ब्रह्मदेवाचा अंश असून गणपतीच्या प्रसादाने तो अमृतस्वरूप झाला. हा चंद्र आपल्या षोडश कलांनी देवांचे पोषण करतो व आपल्या किरणांनी तो अन्नवृद्धि करतो. दत्त हा विष्णूचा अंश आहे. तो नित्य योगी स्वरूपाने राहतो. त्याचा योग व त्याचे वैराग्य पाहून द्विजादि सर्व वर्ण त्याचे भक्त झाले, पण त्याच्या स्वतःच्या मनाला समाधान नव्हते. ह्या मंडळींतून कसे सुटावे व काय करावे हे त्याला सुचेना. तेंव्हा त्याने एकदा जळांत उडी टाकली व स्वतःच्या योगसामर्थ्याने एका हातात मोक्षलक्ष्मी घेतली व दुसऱ्या हातात मद्यकुंभ घेऊन तो पिण्यास त्याने आरंभ केला. स्त्रियांसह अनेक प्रकारचे विलास हा दत्तयोगी भोगू लागला. हे

भ्रष्टाचार पाहून त्याचे शिष्य भ्याले व पळून गेले. तेंव्हा दत्ताचा योगाभ्यास ठीक सुरू झाला. तो सहजावस्थेत राहत असे. तथापि योगाने त्याचे चित्ताला स्थिरता येईना. तेव्हा तो वडिलांकडे म्हणजे अत्रिऋषींकडे गेला व ‘मी सोपाधिक राहून पाहिले, निरुपाधिक होऊन पाहिले, साम्यावस्था कायम व सहजावस्था संपादित करून. योगाभ्यासातही राहिलों: पण चित्ताला शांति प्राप्त होत नाहीं. म्हणून कृपा करून मला शांतियोग आपण सांगा.’ अशी विनंती केली. मग वडिलांनी त्यास गणपतीची आराधना करावयास सांगितली. त्यांनी श्रीगणपतीचे स्वरूप, अभेदज्ञानयोग, सहजयोग, स्वानंदयोग, शांतियोग व पूर्णयोगात्मक श्रीगणेश इत्यादिक स्वरूपांची पूर्ण माहिती, पंच-चित्तांचा प्रणाश व पंच ऐश्वर्यांचा लय इत्यादि शांतियोगांची प्रक्रिया व एकाक्षरी मंत्र, ह्या सर्व गोष्टी सांगून दत्ताला गणेशभक्तिचा मार्ग दाखवून दिला. दत्तांनीहीं गणपतीची गंगादक्षिणतीरी उत्तम भक्ति करून त्यांस प्रसन्न करून घेतले. श्रीगणेशानेही त्यांचे सुंदरस्तोत्र ऐकून घेऊन त्यांला इष्ट वर दिले आणि आपण स्वतः तेथेच ‘विज्ञानगणप’ या नावाने आपल्या भक्ताजवळ राहूं लागले. शंकरानीच त्या देवाला ‘विज्ञानगणराज’ असे नांव ठेऊन गणेशभक्तिसंप्रदाय वाढविला. ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस स्थापना झाली ह्मणून त्या दिवशी या ठिकाणी सर्व देवदानवादि महात्मे प्रतिवर्षी मोठा उत्सव करतात. अत्रीचा तिसरा मुलगा महातामसी दुर्वासऋषि यानेही गणेशसेवा करून आपला तमःस्वभाव सोडून दिला व शांतियोगाचे संपादन करून घेतले.

मनुपुत्र प्रियव्रत व उत्तानपाद–जंबूद्वीप–भूर्भुवादि सप्त लोक–सप्तपाताले–ह्याची माहिती

पुढें दक्षराजाने मुद्गलऋषीला स्वायंभुव मनूच्या पुत्रांची कथा विचारली व मुद्गलाने सांगितल्याप्रमाणेच सूताने शौनक ऋषीस सांगितली ती अशी. मनूला दोन मुलगे झाले. एक प्रियव्रत व दुसरा उत्तानपाद. यांतील प्रियव्रत निवृत्ति मार्गाला लागला ह्मणून बापाच्या सांगण्यावरुन नारदाने प्रियव्रतास प्रवृत्तिमार्गाचा उपदेश केला. त्यांत मुख्य गोष्ट ही की ' आपण नरदेहांत आल्यानंतर वर्णाश्रमधर्मांचे यथास्थित अनुपालन केले ह्मणजे विश्वसंरक्षण होते; यज्ञयागादिकांनी देवऋण फिटते. श्राद्धतर्पणादिकांनी पितृऋण फिटते व पुत्रोत्पत्तीने मनुष्यऋण फिटते. ही ऋणे फेडल्यावर व वर्णाश्रमधर्म यथास्थित पाळल्यावर मग निवृत्तीच्या मार्गाला लावावे. ' पुढे नारदांनी त्याला गणेशदेवतेच्या आराधनेचे स्वरूप, फलमहात्म्य ही सांगितली. ही ऐकून प्रियव्रताने गणपतीचे नारदाच्या उपदेशाप्रमाणे आराधन केले. निवृत्तिपंथ सोडून देऊन त्याने राज्याचा स्वीकार केला व यथाधर्म, यथान्याय, यथानीति प्रजांचे पालन करून गणपती-प्रसादाने तो स्वानंदाख्यनामक गणेशलोकांप्रत जाता झाला. आपल्या दहा पुत्रांपैकी सात पुत्रांस त्याने जंबु प्लक्ष, शाल्मल, कुश, क्रौंच शाक व पुष्कर या सप्तद्वीपांचे अधिपति केले. पुष्करव्दीप अति सुंदर असून तेथे सूर्यचंद्रास स्वतःभोवती फिरावयास लावणारा लोकालोक पर्वत आहे. तेथील सर्व प्राणी एकच वर्णाश्रमधर्मांचे आहेत. सर्व दैवीसंपत्तीचे लोक तेथे राहतात. याचप्रमाणे प्रत्येक द्विपात नद्या पर्वत वृक्ष, प्राणी इत्यादिकांची विशेष समृद्धि असून आपआपल्या वर्णाश्रमानुसार चालणारे आहेत. जंबुद्वीपामध्ये जो मेरु पर्वत आहे तो

सुवर्णधातुमय असून तेथे अनेक धातूंच्या खाणी, सर्व प्रकारची झाडे, सुजलवाहिनी नद्या, भव्य गुहा इत्यादि अनेक चमत्कार आहेत. हा पर्वत खूप मोठा, खूप उंच व खूप रुंद आहे. येथे देवापासून तो सूक्ष्म कीटकांपर्यंतचे सर्व प्राणी राहतात. हा नऊ खंडाच्यामध्ये आहे. येथे हिमालयनामक अति मोंठा पर्वत आहे. ज्या वर्षांत हा हिमालय आहे, त्याला भारतवर्ष ह्मणतात. कर्मांचा भर येथे असतो ह्मणून त्याला भारतवर्ष हे नाव दिले आहे. या भारतवर्षांत शीतोष्णता रोगसमृद्धि, चारवर्ण व त्यांचे संकर, व स्वार्थी लोक विशेष आहेत !

असो; सूर्यचंद्राचे किरण पोहोचतात तेथपर्यंत भूलोक, भूलोकापासून सूर्यापर्यंत भुवर्लोक, तेथून ध्रुवा१ पर्यंतचा स्वर्गलोक, ध्रुवापासून कोटि योजन दूर असणारा महर्लोक (येथे कल्प आयुष्याचे लोक राहतात), तेथून कोटियोजन असणारा जनोलोक, तितकाच दूरचा

---

१ येथे सूर्यचंद्रादिकांचे आकार व विस्तार दिले आहेत, पण आध्यात्मिक ज्योतिषाच्या ज्ञानाशिवाय हे आकडे समजणार नाहीत, ह्मणून येथे दिले नाहीत. मुळांत रवि हा प्रकाशदाता, सृष्टिस्थितिलयकर्ता, सर्वाधार आहे, असे वर्णन आहे. यमादि लोकांचे वर्णन आहे. याप्रमाणे द्वादशमासांत सूर्याबरोबर फिरणारे देव, ऋषि, नाग, अप्सरा, पक्षी, वायु, गंधर्व इत्यादिकांच्या याद्या दिल्या आहेत. तसेच चंद्राबरोबर असणारी मंडळी, अमृत पिणारे देव, स्वधा पिणारे पितर, मंगळ, बुधादिकांचे सहचर, इत्यादिकांची माहिती देऊन हे सर्व ज्योतिर्गण ध्रुवाधारानें राहतात हे जे सांगितले आहे, ते चिंत्य होय.

तपोलोक (येथे वैराज देव असतात), तितकाच. लांब सत्य लोक आहे. (येथे नित्य ब्रम्ह्याची वसति आहे.) येथे नैष्ठिक ब्रह्मचारी, तापसी, सिद्ध, याजक राहतात. हा तेजस्वी लोक गणेश लोकांचे द्वार आहे, याच्याही पुढे हजारो हजार कोटी योजने लांब असे निराधार सूर्यलोक, विष्णु लोक (वैकुंठ), शंकरलोक व शेवटी ब्रह्मस्वानंद लोक आहेत. याच्या पलीकडे कांही नाही. येथे स्वानंदनामक ब्रह्म आहे. ब्रह्म चार प्रकारचे आहे. (१) अव्यक्त व निर्मोहरूपक ब्रह्म (शिवसंज्ञक); (२) समब्रह्म (विष्णुसंज्ञक); (३) आत्मस्वरूप-ब्रह्म (सूर्यसंज्ञक); (४) असन्मय ब्रह्म (शक्तिसंज्ञक). या सर्वांत अभेद आहे, असे ज्ञानविज्ञान होणे हाच स्वानंद होय. हा पूर्ण आहे. गणपतीचे हेच स्वरुप आहे.

अतल, वितल, सुतल, तलातल, महातल; रसातल व पाताल, ही सात पातालांची स्थाने आहेत, व पातालांत शेष राहतो. त्याची सेवा करणारे दैत्य, सुर व नाग आहेत. येथे सर्व प्रकारचे भोग मिळतात. येथील महाराज शेष हा गणेशभक्त आहे. ह्यालाच अनंत ह्मणतात. याच्याखाली कच्छप पाताल, त्याच्या खाली निराधार वराहपाताल व त्याच्याखाली नरकलोक आहे. ह्याप्रमाणे हे ब्रह्मगोल वर्णन आहे.

गणेशयोग–भरताच्या तीन जन्मांची कथा

प्रियव्रताच्या पणत्वाला १०० पुत्र झाले. यांत ८१ ब्राह्मण, ९ योगी, ९ राजे व भरत असे हे शंभर होत. मनूने नऊ मुलांस ९ खंडाचे राज्य देऊन आपण ऋषभ नावाने वनात जाऊन तेथे उत्तम योगाभ्यास केला. तो अवधूत झाला. पण त्याला शांति देणारे ब्रह्माचा अधिगम झाला नाही. ह्मणून त्याने शंकराची प्रार्थना करून तारकयोग

(गणेशयोग) समजून घेतला. सामवेदांत ह्मटले आहे. " मनाला व वाणीला गोचर असणारे जे दृश्य व अदृश्य स्वरूपी विश्व ते 'ग' काररूपी आहे. यांत 'त्वं' पद व 'तत्' पद यांचा अंतर्भाव होतो. नंतर मनोवाणीस जे अगोचर व जे संयोगवियोगात्मक आहे; ते 'जीवात्म-परमात्म-ऐक्यभावरूप' असून तेच 'ण' कारसंज्ञेने ओळखिता येते. या उभयतांचा स्वामी गणेश आहे' ह्मणून शंकरांनी ऋषभाला सांगितले की 'तूं गणेशयोगाचे आराधन कर.' हा गणेश चित्ताच्या पंचभूमीवर प्रकाश पाडतो ह्मणून त्याला 'चिंतामणि' ह्मणतात. ह्याचे आराधन कर ; तुला शांति मिळेल.' याप्रमाणे उपदेश घेऊन ऋषभाने गणपतीची भक्ति व गणेशयोगाचे आराधन, या साधनांनी परमेश्वरास प्रसन्न केले. व तो प्रकट झाल्यावर त्याची स्तुति केली. परमेश्वर त्याला वर व शांति देऊन अंतर्धान पावले. ऋषभाने संन्यास घेऊन योगमार्गाचा अवलंब केला. ह्याचा ज्येष्ठपुत्र भरत होय. याने पुष्कळ वर्षे धर्मयुक्त राज्य केले व पुत्रास राज्य समर्पण करून आपण वनामध्ये गेला व शालिग्रामपूजा करीत व विष्णुस्मरण करीत राहिला. एकदा भरत हा नदीतीरावर तपश्चर्या करीत असता तेथे पारध्यांनी गाठलेली व ह्मणून भयभीत पण गर्भवती अशी एक हरिणी उडी मारून नदीपलीकडे गेली; तेव्हां तिचा गर्भ पाण्यात पडला. दयावत्सल भरताने तो बालमृग उचलून घेतला व त्याचे पुत्राप्रमाणे प्रेमपुरःसर पालन केले. पुढें त्याला त्या मृगपोतकाचे वेडच लागले. यामुळे स्नानसंध्यादि नित्यकर्मांचा लोप झाला. पुढे तो मृग सहज पळून गेला, पण भरताने 'मृग, मृग !' ह्मणून दुःखाने हाय घेतली. अंतःकाली मृगाचे स्मरण व ध्यान राहीले ह्मणून भरत मृगजन्मास गेला. तथापि पूर्वपुण्याईमुळे त्याचे पूर्वज्ञान जिवंत होते. अर्थातच

तो इतर मृगांपासून विभक्त झाला व हिंसा न करता शुष्कतृणावर आपली उपजीविका करू लागला. पुढे त्याच वनात पुलह नामक ऋषि महागाणपत्य होते, त्यांच्या आश्रमांत कर्मधर्मसंयोगाने हा मृग गेला व गणपतिस्मरण करीत तेथेच राहिला. पुढे एकदा तेथे ब्रह्मदेव आले, ऋषींनी त्यांचा यथासांग पूजापूर्वक सत्कार करून व त्याचे पादसंवाहन करण्यास आरंभ केला व ज्ञानवृद्धीसाठी 'संसारी जीवांची सुटका होण्याला मार्ग काय?' असा प्रश्न विचारला. ब्रह्मदेव सांगतातः

'सत्पुत्रा! संसार ह्मणजे दुःखात्मक आहे. दुःख ह्मणजे विघ्नच होय. विघ्नविनाश करणारा देव ह्मणजे गणपति होय. याची भक्ति केली नाही, तर विघ्ने ह्मणजे दुःखे उत्पन्न होऊन ती जीवाला कर्मांच्या व जन्ममरणाच्या चक्रात घालतात. तेव्हां सुटका करून घ्यावयाची असेल तर आपल्या या चार देहात कल्पनारूप मोहाचे जे बंधनरूपी वास्तव्य आहे त्याचा नाश ह्मणजे कल्पनांचा नाश झाला पाहिजे. कल्पना त्वंपदात्मक असो, तत्पदात्मक असो, 'असि' पदात्मक असो, ती कल्पनाच आहे, विघ्नकारिणीं आहे, ह्मणून कल्पनेचा त्याग करून चित्तांतील पांचही भूमींचा त्याग कर; तुला शांति मिळेल' इतके सांगून ब्रह्मदेव अंतर्धान पावले. पुलह ऋषीने वडिलांनी सांगितल्याप्रमाणे योगाभ्यास केला व ध्यानांत गणपति येईनासा झाला तर त्याची पूजा करून तो प्रसन्न होईल असे केले. कांही दिवसांनी त्याला गणपतीचा साक्षात्कार झाला. पूजा; स्तोत्र इत्यादि उपचार झाल्यावर गणेश त्याला 'अव्यभिचारी भक्त तूं होशील' असा आशीर्वाद देऊन अंतर्धान पावले पुलह तर महाभक्त झालाच, पण जो हरिणरूपी भरत तेथे होता त्यालाही

ज्ञान झाले व त्याने आनंदाने गणेशभक्ति केली. अर्थातच तो पुढे मनुष्ययोनीत जन्मास आला. अंगिरानामक ब्रह्मकुलांत त्याचा जन्म झाला. पण पूर्वी ठेच लागल्यामुळे त्याने संग विवर्जित केला. उत्तम ज्ञानी असूनही 'आपण बुद्धिहीन आहोत' असे तो दाखवी. बुद्धि नाही, कांही कळत नाही, ह्मणून त्याला 'जडभरत' हे नांव मिळाले. असो; त्याची मुंज मात्र कष्टाने झाली. लग्न झालेच नाही. माता-पिता स्वर्गवासी झाल्यावर त्याच्या भावाभावजयांनी त्याचा अतिछळ केला, त्यास उष्टेमाष्टे खाण्यास घातले, अंगाला धड वस्त्र दिले नाही, वाटतील ते शिव्याशाप दिले. पण भरताने आपले गणेश-ध्यान व आपले शांतिव्रत, ही कांही सोडिली नाहीत. खावयास घरी मिळेना ह्मणून तो लोकांचे काम करून खाणेपिणे मिळवू लागला. जडभरत काम करतो हे पाहून त्याच्या भावांनी पुनः आनंदाने त्याला घरी आणले व काम करावयास लावले. त्याच्या भावजया पण त्याला वाईट अन्न देत असत. तथापि जडभरत आपले अन्न 'अमृत आहे' असे मानून ते प्रेमाने खात असे. पुढे त्याला भाताच्या शेतावर राखणीस ठेविले असतां एका रात्री चोरांनी पकडले. चोराच्या नायकाने आपल्या देवीला असा नवस केला होता की, 'मला पुष्कळ द्रव्य मिळाले तर मी तुला एक उत्तम पुरुषपशु बळी देईन.' द्रव्य मिळाल्यावर त्या चोरांच्या नायकाने पुरुषशोधार्थ आपले लोक पाठविले व जडभरतास पाहून त्यांनी त्याला जबरीने नायकाकडे नेले. जडभरतानेही मनोनिश्चय केला की, आपले देहप्रारब्धच या प्रकारचे! ठीक आहे. पुढे बळीची पूजा करून, त्यास गोडधोड खावयास घालून, व वाजंत्री लावून त्याला देवीपुढे नेले व देवीला अर्पण करण्यासाठी

नायकाने तरवारीचा हात उगारला. पण भरताने 'हूं का चूं' केले नाही! गणपतीचे स्मरण करीत तो स्वस्थ उभा होता. 'देह आज गेला काय किंवा शंभर वर्षांनी गेला काय गणेशस्मरण असेल तर फलश्रुति एकच आहे,' असा त्याच्या मनाचा निश्चय होता. इकडे चोराने तरवारीचा हात उगारिला होता, तो स्तब्ध करून त्याच तरवारीने गणेशभक्त देवीमातुश्रीने, चोराला बळी दिला आणि त्याचे व त्याच्या साथीदारांचे रक्त पिऊन ती गणेशस्तवन करीत अंतर्धान पावली व भरतही गणेशस्मरण करीत रानावनांत हिंडू लागला.

रहूगण-राजास उपदेश

इकडे रहूगण या नांवाचा एक राजा प्रारब्धानुसार संसारापासून विरक्त होऊन अंतर्निष्ठ झाला. पुढें मनाला शांति मिळावी म्हणून तो गंगातीरावर असणाऱ्या कपिल महामुनींच्या आश्रमांत राहून कपिल महामुनींचा उपदेश घ्यावा एतदर्थ निघाला होता. गौतमीच्या दक्षिण-तीराला त्यास जावयाचें होतें. तो राजा शिबिकेत बसून चालला होता. पुढें डोलीवाले थकत चालले म्हणून त्यांनीं मार्गात दृष्टिस पडलेल्या भरतास पकडलें व पालखी उचलण्यास भाग पाडले. मुनींनीं 'हेंही प्रारब्धच आहे' असे समजून आनंदाने पालखी वाहूं लागले. पण ते स्वतः फार दयाळू, कीडमुंगी वाटेंत आली, तर ती चुकवून पाय टाकीत, यामुळें पालखीला हिसका बसून आंतील राजाला त्रास होई. तेव्हां संतापून राजानें हुकूम केला की 'पालखी नीट चालवा; नाहींतर शिक्षा होईल.' इतर वाहकांनीं भरताविरुद्ध तक्रार केली कीं 'हा

मद्यप्यासारखा उड्या मारीत चालतो.' मग राजा भरताला रागें भरूं लागला. तेव्हां हा 'योगनिष्ठ आहे, शांतीप्रीत्यर्थ हिंडत आहे, याच्यावर आपणच अनुग्रह करावा' असा राजाच्या प्रारब्धबलानें भरतमुनींचा निश्चय होऊन त्यांनीं वेदांत बोलण्यास आरंभ केला. ब्रह्मरूप सांगितल्यावर 'बोधनाश झाला ह्मणजे उत्थान नाहींसे होऊन स्वसुखै-करत पुरुष होतो. पण परसुख जेथें नाही तेथे स्वसुख नसते. तेंव्हा 'पर' नामक उत्थानाचे बींज समजून घेऊन तें उत्थान व स्वतःचे उत्थान या उभयतांच्या व्यतिरिक्त जे स्वानंदसुख आहे, ते जाणून घ्यावे व पुढे पांच प्रकारचे ब्रह्म आहे तेही समजून घ्यावें; म्हणजे निर्मायिक जो गणेश त्याचे शांतिमंय स्वरुप समजेल; पण हें समज-ण्याला चित्ताच्या पांच भूमिका ओलांडून गेले पाहिजे. ही स्थिती प्राप्त झाली ह्मणजे शांति मिळते.' हे ऐकून राजा चकित झाला. त्याने खाली उतरून भरताला अनेक शिरसाष्टांगप्रणिपात करून त्याची पुष्कळ स्तुति केली. पुढे, गुरुपदेश घेऊन व भरताची आज्ञा घेऊन तो बनांत निघून गेला. इकडे भरतयोगी हिंडत हिंडत गणेश क्षेत्रास आले व तेथे एक वर्षभर राहून त्यांनी गणेशाची योगपूर्वक एकनिष्ठ उपासना केली. ह्यास गजाननांनी प्रत्यक्ष दर्शन दिले. भरतांनी योग्य स्तुति करून 'भक्ति' मागितली. परमेश्वरांनी संतुष्ट होऊन ती दिली. काय क्तीचे सामर्थ्य की स्वानंदसुखी गणेशराज भक्तिमोहित होऊन भरताला व्यक्तस्वरुपांत दिसला! असो; भरताचा देहमोक्ष झाल्यावर ते गणेश-रूप झाले. त्यांची ही गुहा गणेशस्थानापासून एक कोसावर आहे. याप्रमाणे भरताची गोष्ट झाली.

धृवराजा–वेनराजा व पृथुराजा यांची गोष्ट

मुद्गल सांगतात :– स्वायंभु मनूला उत्तानपाद ह्मणून दुसरा मुलगा होता, तो मध्यदेशाचा राजा झाला. त्याला सुनिति व सुरुचि अशा दोन बायका होत्या. सुनीतीला ध्रुव व सुरुचीला उत्तम असे दोन पुत्र झाले. राजा सुरुचीला वश झाल्यामुळे सुनीति व तिचा मुलगा या उभयतांवर त्याचे मुळीच प्रेम नव्हते. असो. एकदा राजबालक ध्रुव आपल्या मांडीवर बसावयास गेला तो सुरुचीने त्यास लाथ मारुन ढकलून दिले. तेव्हां त्या बालकाला अत्यंत क्रोध येऊन तो आईला विचारून अरण्यात गेला. तेथे त्याची व नारदाची गाठ पडली व त्यांच्याकडून विष्णुमंत्राची दीक्षा घेऊन ध्रुव मथुरेस गेला. तेथे सहस्त्रवर्षें तपश्चर्या करून त्याने विष्णूस प्रसन्न करून घेतले. श्रीविष्णूंनी त्यास पृथ्वीचे राज्य व अखंड ध्रुवपद दिले. ध्रुवबाळाने हे वर्तमान मातापित्यांस जाऊन सांगितले, तेव्हा त्यास अतिहर्ष झाला. उत्तानपादालाही पश्चात्ताप होऊन त्यानें धृवाला राज्यकारभार सोपवला व आपण वनांत तपश्चर्येसाठी गेला. तेथे नारदाची गांठ पडून त्यांनी राजांस गणेशोपासना दिली व ती करून राजाने सायुज्यमोक्ष मिळविला इकडे राजा ध्रुव राज्य करीत असतां एकदिवस नारदाची स्वारी स्वशिष्याकडे ह्मणजे ध्रुवाकडे जाऊन त्याला वैकुंठवासी विष्णूचा संदेश सागती झाली की ‘स्वकल्याणासाठी गणेशयात्रा व गणेशमंत्राचा जप कर, ह्मणजे अखंडपदाची प्राप्ति निर्विघ्न होऊन तुला शांति मिळेल.’ ध्रुवाने उपदेशानुसार गणेशयात्रा, गणेशमंत्रजप व ‘ध्रुवविनायका’ ची स्थापना केली व गणपतीचे एकनिष्ट आराधन करुन शांतचित्ताने धर्म–न्याय–नीतिने राज्य केले. पुढे देहप्रारब्ध संपल्यावर तो गणेशलोकाप्रत जाऊन सायुज्यपद पावला.

ध्रुवाचा नातु वेन हा बाप असताच वाईट छंदास लागला. बाप राज्य सोडून गेला तेव्हा अराजकी वाढली. ह्मणून ब्राह्मणांनी वेनास गादीवर बसविले. त्याने चोरांचा नाश केला पण 'मलाच देव ह्मणा' असा आग्रह धरुन बसला. हा अत्याचार पाहून ब्राह्मणांनी शाप दिला व तो मेला. पुढे ब्राह्मणांनी त्याचे वामांगमंथन केले तेव्हां र्‍हस्व, केसाळ, कुरुप असा निषाद उत्पन्न झाला. ब्राह्मणांनी त्यास वनांत पाठविले. हाच निषादांचा मूळ पुरुष होय. वेनाच्या उजव्या अंगापासून विष्णुप्रसादाने पृथुनामक पुरुष उत्पन्न झाला. हा धर्मप्रवर्तक राजा सर्वांस सुख देता झाला. तथापि वेनाच्या पापामुळे पृथ्वीने सुपीकपणा आकर्षण करून घेतला होता, तो बाहेर काढला नाही त्यामुळे सर्वांस अतिताप झाला. लोक व राजा संतापले. पृथ्वीस मारण्यासाठी राजा उद्युक्त झाला; तेव्हा गोरुप धरून पृथ्वीने त्याला विनंती केली किं; 'आर्य लोक स्त्रियांस कधीही वाईट वागवीत नाहीत; राजा मला मारूं नको; मी गिळलेली सुपीकता पुनः बाहेर यावी, असा तुझा हेतु असेल तर पर्वत मोडून मला सारखी कर व मी दूध देईन ते सर्वत्र शिंपड.' मग पृथूने पर्वतादिकांचे चूर्ण करून पृथ्वी सारखी केली, ग्राम नगरे इत्यादिकांची रचना केली, गोरुपी पृथ्वीचे दोहन करून सर्व प्रकारची षड्रसअन्ने निर्माण केली. त्याच वेळी देवादिकांनीही दोहन करून अनंत प्रकारच्या सुंदर व उपयोगी वस्तु काढल्या. सर्वत्र आनंद झाला. कारण सर्वत्र सुभिक्ष झाले. असो; यानंतर पृथूने ९९ यज्ञ केले. १०० व्या यज्ञाच्या वेळी इंद्राने यज्ञीय अश्व चोरण्याची सहा वेळा खटपट केली व सहा वेळा पृथुपुत्राने व पृथूने इंद्रास पकडला असतां त्याला सोडून दिले.

असो; याप्रमाणे पृथु राज्य करीत असता एक दिवस राजसभेमध्ये महायोगी सर्वमान्य व नित्य तरुण सनकादि चार महामुनींनी प्रवेश केला. राजानेही त्यांचा योग्य असा अतिथिसत्कार केला. राजाने हे मुनि स्वतः आपण होऊन आपल्या दर्शनार्थ आले म्हणून आपण अतिनम्रभावाने आपल्या धन्यजन्मत्वाबद्दल धन्यवाद गाइला. हा स्तुतिवाद झाल्यावर राजाने सनकादिकांस सांगितले की, 'महाराज' अनेक वर्षे राज्यभोग भोगून मला कंटाळा आला आहे. तेंव्हा माझी अशी विनंती आहे की, आपण कृपाळू होऊन मला शांतियोग समजून द्या.' ही विनंती ऐकून कुमारास अत्यानंद झाला व त्यांनी राजास ब्रह्मस्वरुपाचा उपदेश करून गणेशयोगाचा मार्ग दाखविला. राजाला आनंद झाला व पुत्रावर राज्यभार सोपवून त्याने वनांत जाण्याचा संकल्प केला. सनकादि कुमारही त्याला आशीर्वाद देऊन गणेशभजन करीत करीत अदृश्य झाले. पृथुराजाने राज्यत्याग केला व पत्नीसह अरण्यात राहून तेथे योगक्रमाने गाणपत्य झाला व अंती मोक्षपद पावला.

सूत :– शौनकादि ऋषीहो, नंतर मुद्गलांनी प्राचीनबर्हिषी नामक पृथुपुत्राची कथा दक्षास सांगितली. त्या कथेचे रहस्य इतकेच आहे की, पश्वादिकांची हिंसा करून अनेक यज्ञ केले, तथापि दुसऱ्या जीवांस हे यज्ञ प्राणघातक होतात, म्हणून ते यज्ञही बद्ध होतात. त्यापेक्षा जीवाने ज्ञानसंपादन करावे, वेदांमध्ये जे अनेक ब्रह्मप्रकार सांगितले आहेत, त्याचे आक्रमण यथाशक्ति करून शेवटी संयोगायोगात्मक जे स्वानंदनिवासी गणेशब्रह्म त्याची आराधना करावी, व तत्प्रसादाने गणेशरूप होऊन स्वानंदलोकी शांतिसुखांत राहावे. पुढे मुद्गल ऋषींनी चराचर सृष्टि

होण्याच्यापूर्वी नारदांनी प्राचेतसाचे पुत्रांस गाणेशयोग कसा सांगितला व त्यास संसारांतून कसे निवृत्त केले हे सांगितले व सृष्टिक्रम सांगितला. हा सृष्टिक्रम सांगितला. हा सृष्टिक्रम सांगत असता ओघानेच कश्यपाच्या दिति, अदिति, विनता, कद्रु इत्यादि स्त्रियांपासून दैत्य, देव, गरुड, अरुण, सर्प इत्यादि कसे निर्माण झाले. पुलस्त्यवंशांत रावणकुंभकर्णाचा जन्म होऊन त्याचा रामाने वध केला व वसिष्ठांनी तपोबलाने गणपतिप्रसन्नता करून घेतली इत्यादि गोष्टी दक्षाच्या स्मरणार्थ मुद्गलांनी सांगितल्या.

गजासुराचे त्रैलोक्याधिपत्य व पराशराच्या पोटी गणपतिचा अवतार–गजासुरवध व मोक्ष

इतके कथानक झाल्यानंतर वसिष्ठांचा नातु पराशर याच्या तपश्चर्येचे वर्णन करून मुद्गल ह्मणाले:– ‘पराशराने एकाग्र मनाने व ज्ञानपूर्वक जी तपश्चर्या केली, ती सफल होऊन गणराज प्रसन्न झाले. पराशराने देवापाशी अखंडभक्तिचे मागणे मागितले व ‘माझ्या घरी आपण पुत्ररुपाने अवतार घ्या, ह्मणजे भक्ति करावयास व आपले लालनपालन करण्यास मला पुष्कळ अवसर सांपडेल आणि माझ्या मनाला स्थिरता येऊन मला, माझ्या पत्नीला व आमच्या संसाराला ब्रह्मत्व येईल. आपण दयाळू आहां, सर्व सृष्टिस्थितिलयांची कामें आपल्या इच्छेनुसार होतात, ब्रह्मादिकांचे गुरु आपण आहांत, आपण भक्तकामकल्पद्रुम आहांत, कृपा करा आणि माझी ही इच्छा पूर्ण करा’ अशी प्रार्थना केली. श्रीगणपति ह्मणाले: ‘तुझ्या सर्व इच्छा सफल होतील गजासुराला मारण्यासाठी मला अवतार घेणे आहे व त्यावेळी तुझाच पुत्र होऊन मी हे धर्मकार्य करीन’ असे ह्मणून परमेश्वर अंतर्धान पावले व श्रीपराशरमुनीही पत्नीसह आनंदाने स्वगृही गेले.

असो; आता गजासुर कोण होता, ते सांगतो ऐक. गजासुर हा महिषासुराचा मुलगा. आपल्या बापास देवीने मारले ह्मणून तो देवीचा व देवांचा द्वेष करी. पितृवधाचा प्रतिशोध करण्यासाठी ह्मणजे देवांचा नाश करण्यासाठी त्याने शंकराची हजार वर्षे पंचाक्षरी मंत्र जपून तपश्चर्या केली आणि भोळा शंकर प्रसन्न झाल्यावर त्यापाशी वर मागितला की 'मला ब्रह्मांडाचे राज्य असावे व ब्रह्मांडांतील कोणत्याही प्राण्याच्या हातून माझा वध होऊ नये.' याला 'तथास्तु' ह्मणून शंकर अंतर्हित झाला. वरप्राप्ति झाल्यावर गजासुर घरी आला व आपल्या इष्टमित्रांकडून उत्तम प्रकारचे स्वागत झाले. पुढे सर्व दैत्यमंडळ एकत्र जमले व त्रैलोक्य जिंकण्याचा संकल्प केला. त्यांनी प्रथम शुक्रहस्ताने गजासुरास राज्याभिषेक करून घेतला. नतर पृथ्वी, स्वर्ग, पाताल, या लोकांत अंमल बसवून सर्व दैत्यांनी कैलासावर स्वारी केली. व युद्धांत शंकराचा पराजय करून त्यास व इतर देवांस स्वर्गातून हाकलून दिले. निरुपाय होऊन ते अरण्यात गेले आणि विष्णूने सुचविल्याप्रमाणे स्वानंदवासी गणपतीची एकनिष्ठ तपश्चर्या करू लागले. तो दीनदयाळू भगवान तेव्हांच प्रकट झाला व 'भिऊं नका, पराशराच्या उदरी पुत्ररूपाने येतो व गजासुराचा वध करतो; देव हो! माझ्या ठिकाणी तुमची भक्ति अखंड असो.' असा आशीर्वाद देऊन स्वलोकांस गेला. इकडे नारद हा गजासुराच्या सभेत देवांस गजाननाने दिलेल्या वरांचा वृत्तांत सांगता झाला ते ऐकून खवळलेला गजासुर देवांस ठार मारण्यासाठी अरण्यांत गेला, पण गणेशकृपेनें गजासुराचा बेत सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्यानें देवांस सांगितलें कीं "तुम्हीं दोन्ही हातांनीं आपले दोन्ही कान धरून माझ्या चरणांवर

मस्तक आपटून व साष्टांग नमस्कार करण्याचें सर्वजण कबूल करींत असाल, तर तुम्हांस जिवंत ठेवतो, त्या वक्रतुंडास सुद्धां घेऊन या, खबरदार नाहीं आला तर!" तसें करण्याचें विष्णुप्रमुख देवांनीं कबूल केलें, व गजाननाकडे जाऊन त्यास ही हकीकत सांगितली. देव किती दीन झाले आहेत हे पहाण्यासाठी 'गजासुराने सांगितल्या-सारखा नमस्कार मला भाक्तिपूर्वक करा' असें गणपतींनीं म्हटलें मात्र तो सर्व देव गर्वशून्यवृत्तीनें व एकनिष्ठ भक्तीने गणपतीस वंदन करिते झाले. देवांचा साह्यकर्ता श्रीगणेश देवकार्यासाठी नित्य सिद्धच असावयाचा. त्याप्रमाणें श्रीभगवान् देवांसह गजासुराच्या नगरीवर चालून गेले, तेथे देवदानवांचे अति घोर युद्ध झाले. देवांनी पुष्कळ वेळ टिकाव धरला, पण गजासुराच्या अद्वितीय हस्तलाघवापुढे त्यांचें काही चालेना. तेव्हां श्रीगणेश स्वतः युद्धसन्मुख झाले. अर्थातच गजासुराचे युद्धकौशल्य लुप्तप्राय झाले. मग तो मल्लयुद्धास तयार होणार असे पाहून भगवंतांनीं आपले विश्वरूप त्याला दाखविले. ब्रह्मांडाहून ते निराळे, हाताने न धरतां येणारे, व सर्व व्यापी स्वरूप पाहून गजासुर भयाने गांगरला, भक्तीने सद्गदित झाला, बुद्धीने नम्र झाला आणि त्याने एकदम गणपतीची स्तुति करण्यास आरंभ कला. शेवटी त्याने मागणें मागितले की ' मला आपल्या परशूनें ठार करा म्हणजे मी पापमुक्त होईन " गणपतींनीं त्याचें तें भक्तिपूर्ण प्रेम पाहून त्याच्या म्हणण्यास रुकार दिला व त्याप्रमाणे दैत्यास मारून देवांस सुखीकरून व मातापितरांचे समाधान करून ते स्वानंद-वासी झाले.

शुककथा–च्यवन ऋषीची कथा–मदासुराचा जन्म व तपश्चर्या–मदासुर ब्रह्मांडाचा स्वामी होतो– मदासुराचा उद्धार

सूत :- ऋषींहो ? व्यासांनें वेदांचीं व्यवस्था लावून यजुर्वेद्यांकडे अध्वर्युत्व, ऋग्वेद्यांकडे होतृत्व, सामवेद्यांकडे उद्गातृत्व व अथर्ववेद्यांकडे ब्रह्मात्व दिले, तसेच वैशंपायनाकडे यजुर्वेद, पैलाकडे ऋग्वेद, जैमिनी-कडे सामवेद व सुमंतूकडे अथर्ववेद देऊन व पुराणें रोमहर्षणनामक सूताकडे देऊन अठरा पुराणें व अठरा उपपुराणें व्यासाने निर्माण केलीं, भारत हा उत्तम इतिहास, धर्माधर्म व्यवस्थेसाठी केला व "ह्या वेदादि सर्व ग्रंथांत तात्पर्यानें 'गणेशस्तुति' आहे, हे समजून त्यांचे पठण करावें" असें आपल्या शिष्यांस सांगितले झाला; इत्यादि वर्तमान जगद्विख्यातच आहे. तो गणेश ॐकाररूप आहे म्हणून त्याचें प्रथम व अंतीं व मध्यें ध्यानासहित पूजन करावें. असोः या व्यासाचा मुलगा शुक मातेच्या उदरातून बाहेर पडला तो पळतच सुटला. पुत्रमोहाकुल व्यासानें पुष्कळसा सांसारिक बोध केला पण 'संगति झाली म्हणजे संसार उत्पन्न होतो' ही शुकाची समजूत होती म्हणून मुलानें बापाचें ऐकले नाहीं. मुलगा नर्मदातीरी गेला व तेथे तपश्चर्या व ब्रह्मध्यान करू लागला. पुढें शंकर प्रगट होऊन त्यानें व नंतर जनकाने शुकास योगमार्ग सांगितला. तथापि चित्ताला शांति मिळेना. शेवटीं बापाकडे शुकयोगींद्र आला व व्यासानें मुलाला गणेशयोग सांगितला, तो स्वीकारून शुकाने त्या योगाचे आचरण केलें व अखंड शांति मिळविली.

सूतः- शौनका ! काशींस मरुत्त राजा होता. त्यानें इंद्राच्या व बृहस्पतीच्या मताविरुद्ध गणेशभक्त संवर्त याचें साह्य घेतले व यज्ञ करून मुक्त झाला. त्याची कथा, भयंकर दुष्काळ पडला असतां गणपतींच्या वराने अन्नसंतर्पण करून दुःखनिवारण करणाऱ्या व अन्न खाऊनही आपल्या यजमानाचा छळ करणाऱ्या ब्राह्मणांस शाप देणाऱ्या गौतमाची कथा, याच द्विजांस मोहित करणारी पाखंड शस्त्रें निर्माण होऊन पापी द्विजांस अज्ञानात ढकलण्याची, त्याचप्रमाणे कश्यप-दितिपुत्र जे हिरण्याक्ष, हिरण्य-कशिपु यांची कथा दक्षास सांगून मुद्गल ह्मणाले नरहरीचा जो प्रथम पराभव झाला तो त्याने श्रीविघ्नेशस्मरण केले नाही ह्मणून झाला. पण गणेशभक्ति केल्यावर विष्णुरुपी नरहरीला शत्रुमर्दनाचें सामर्थ्य आले व विष्णुरूपी वराहाला हिरण्याक्षाचा वध करता आला. या उभयतांनी पृथ्वीवर गणपतीची स्थापना करून तद्भक्तीचा संप्रदाय वाढविला. असो; प्रल्हाद, महाविष्णुभक्त, पुष्कळ-दिवस विष्णूचे एकनिष्ठेने आराधन करीत होता, पण काही संगती-दोषामुळे विपर्यास घडून तो विषयासक्त व विष्णु-विन्मुख झाला. तथापि त्याचे पूर्वसंचित बलवत्तर होते ह्मणून त्याच्या येथे गृत्समदऋषि आले. त्या पुण्यपुरुषाचे दर्शन झाल्याबरोबर प्रल्हादास पश्चात्ताप झाला व ‘ मला ज्ञान सांगा व भवसागरांतून तारून न्या ’ अशी करुणस्वराने ऋषींची त्याने प्रार्थना केली.

गृत्समद :- प्रल्हादा ! तुझ्या हृदयांत मदाचो वसति आहे; ह्मणून तुला मदासुराचो कथा सांगतो त्या कथेवरून तुला ज्ञानप्राप्ति होऊन मोक्षाचा मार्गही कळेल. ऐकः-एकदा एक राक्षस भृगुऋषि नाहीत असे पाहून त्यांच्या आश्रमात गेला व त्यांच्या पत्नीजवळ ह्मणजे

सुलोमेजवळ जाऊन ह्मणालाः ' सुलोमे ! तुझ्या बापाच्या मनांत मला जावई करावयाचे होते, पण भृगूने तुझी मागणी केली ह्मणून त्याचा बेत फसला. असो; आतां मी तुझे हरण करतो ' नतर त्याने अग्नीला प्रत्यंतरासाठी बोलाविले. दोन तीन वेळ तोच प्रश्न विचारल्यावर अग्नीने सांगितले की, ' हिच्या बापाचा निश्चय तुला ही मुलगी द्यावी, असा होता. असो; आता ही भृगूची पत्नी आहे, हिचे हरण करू नको. ही महापतिव्रता आहे. ' राक्षसाने कोणाचेही न ऐकता त्या रडणाऱ्या गर्भवती सुलोमेस हट्टाने घेऊन जाण्याचे काम आरंभिले. पण इतक्यांत आतील गर्भ संतप्त होऊन बाहेर आला व त्या पापी राक्षसाला जाळून भस्म करिता झाला. हा राक्षसहंता गर्भ मातेच्या उदरांतून च्युत झाला म्हणून त्याला च्यवन म्हणतात सुलोभा, त्याची आई, रडत गेली व भृगूस तिने सर्व वृत्तांत सांगितला पुढें त्याने ' तूं सर्व भक्षक होशील ' असा अग्नीला शाप दिला. तेव्हा अग्नि रुसला पण ' विनायकाव्यतिरिक्त एक काटीही जाळण्याचे तुला सामर्थ्य नाहीं. व्यर्थ गर्व न करतां जे जे भक्षण त्यांस पवित्र करून विनायकपूजा कर ' असे त्याचे देवांनीं समाधान केले. तोही विनायक-भक्ति करून स्वानंदयोगाचा लाभ घेता झाला. तसेच त्याने ' काही खाल्ले तरी त्याचे अमृतच व्हाते ' असा त्यास गणपतींनी वर दिला इकडे च्यवन ऋषीने वडिलांची आज्ञा घेतली व मोठी घोर तपश्चर्या जलामध्ये बसून आरंभिली. पुढें दैवयोगाने धीवरांच्या जाळ्यात सांपडून त्यास नहुषराजापुढे जावे लागले. नंतर त्यास धीवरापासून सोडविण्यासाठी राजाने सर्व राज्यावर उदक सोडण्याचे मनात आणले. पण च्यवनाचे समाधान होईना. तेंव्हा गणपतिभक्त भरद्वाजाने राजास शहाणपण शिकविले व ' एक गाय हेच तुझे मोल आहे ' असे

म्हणून च्यवनाची सुटका व समाधान केले. पुढें, च्यवन ऋषि राजास पुष्कळसे आशीर्वाद देऊन पुनः वनामध्ये तपश्चर्या करण्यास गेला. हजारवर्षे तपश्चर्येला झाली, अंगावर वारुळे वाढली, गवतही सपाटून वाढले. याप्रमाणे वारुळाने व गवताने आच्छादिलेला हा ऋषि तपोबलाचा संचय करीत असतां तेथे मृगयेकरितां आलेल्या शर्याति राजाच्या कन्येनें कौतुकाने 'वारुळांत माणकासारखे काय लकाकत आहे, तें पहावें.' ह्मणून आंत कांटे घालून पाहिले व रक्त लागलेले पाहून ती घाबरली. तिच्या या पापाने सर्व सैन्यांतील लोकांची पोटे फुगली. या अनर्थाचा शोध करतां, मुलीने आपले अपकृत्य बापास सांगितले व बापाने मुलीला वारुळाच्या बाहेर काढलेल्या ऋषीच्या पायांवर घातली. च्यवनाने तिचे पाणिग्रहणच केले. तिने त्या अंध ऋषीची सेवा उत्तमोत्तम रीतीने केली. ऋषि प्रसन्न झालेच, पण अश्विनीकुमार देवही प्रसन्न होऊन त्यानी च्यवनास तारुण्य, आरोग्य व चाक्षुषत्व ह्या वस्तु दिल्या. हा सर्व वृत्तांत ऐकून शर्याति राजास हर्ष झाला. व जांवयास व मुलीस घेऊन तो स्वनगरीत आला. नंतर राजाने एका यज्ञाला आरंभ केला व त्यांत तो आपल्या उपकारकर्त्या अश्विनीकुमारास यज्ञभाग देऊं लागला. तेव्हा त्याच्या आड इंद्र आला. ह्या इंद्राचा पराभव करण्यासाठी स्वतपाच्या बलाने च्यवनाने एक महाभयंकर व काळाकुट्ट असा 'मद' नावाचा राक्षस उत्पन्न केला. ते त्याचे अक्राळविक्राळ स्वरुप पाहून यज्ञार्थ आलेले देव व ऋषी भिऊन दश दिशाला पळून गेले इंद्र मात्र च्यवनऋषीस शरण गेला व 'अश्विनीकुमारांस यज्ञहवीचा भाग देतो' असे कबूल करून आपली सुटका करून घेता झाला. यज्ञ समाप्त झाल्यावर च्यवनमुनि स्वभार्येसह

पित्याच्या ह्मणजे भृगुऋषीच्या आश्रमास गेला. बापास अर्थातच आनंद झाला. पुढे महासुराच्या जन्माला कारण जो च्यवन ऋषीचा गर्व तो भृगूच्या दृष्टोत्पत्तोस आला. तेव्हा त्यास वाईट वाटले. पण त्याने एक खासा उपाय केला. त्याने ब्रह्मा, विष्णु, महेश या तिघांच्या मोठेपणाचे माप घेऊन सर्वांचा गर्व हरण केल्याची व विष्णूला आपण लत्ताप्रहार केला असतांही त्याने शांतपणा धरून आपले पाय चुरुं लागल्याची कथा सांगितली व 'क्षमा हे मनोधैर्याचे मुख्य शस्त्र आहे. क्षमेचा सर्वत्र विजय होतो' असा पुत्रास उपदेश केला. शिवाय, ऋषीहो! दक्षयज्ञांत गणेशविस्मरणामुळे आपले हाल झाले, आपल्यास मेंढ्याची हनु व वारुणीत्व प्राप्त झाले, गणेशविस्मरणाचे वाईट परिणाम झाले, सर्व देवतांस गणपतिविस्मृतीने जलरुप प्राप्त झाल्यावर देवांगनांच्या गणेशभक्तिने त्यास पूर्वस्वरुप मिळाले व आपण गणेशभक्त झालो, हा सर्व वृत्तांत भृगूने आपल्या पुत्रांस कथन केला. 'मुला!' भृगु ह्मणालाः 'गणेशज्ञानाने, तद्भक्तीने व तद्योगाच्या साह्याय्याने माझा मद नष्ट झाला व शांति मिळविली, तूंही गणेशभक्ति कर; तुम्हाही तेच फळ मिळेल.' नंतर भृगूने आपल्या मुलास गणेशयोगाचा उपदेश केला, व मुलाने बापाच्या उपदेशानुसार श्रीगणेशभक्ति करून शांति मिळविली, आणि गणपतीची स्थापना करून गणेशभक्तिचा संप्रदाय वाढविला. इकडे च्यवनाने निर्माण केलेला मदासुर पातालांत गेला. तेथे त्याने शुक्रमुनीची गांठ घेऊन आपली जन्मकथा सांगितली व 'मला त्रैलोक्याचे राज्य हवे आहे, त्याचा उपाय मला सांगा.' अशी प्रार्थना केली. शुक्रांनी भक्तिमंत्राचे आवाहन–विसर्जन त्यास सांगून 'तपश्चर्येला जा' ह्मणून सांगितले. मदासुर गेला व उग्र व दारुण

तपश्चर्येच्या जोराने त्याने शक्तिदेवीला प्रसन्न करून घेतले व तिची स्तुति करून तिच्याकडून 'इष्टवर' प्राप्त करून घेतले. 'ज्याची उत्पत्ति झाली आहे, त्यापासून तुला मरण येणार नाही व तुझ्या स्वाधीन पंचमहाभूतात्मक विश्व राहील' असे वर देऊन देवी अंतर्धान पावली. नंतर मदाने लग्न केले व त्यास विलासी, लोलुप व धनप्रिय असे तीन पुत्र झाले. पुढे गुरुजींच्या अनुज्ञेने त्याने सप्तद्वीपवती पृथ्वीला पादाक्रांत करून स्वर्ग लोकावर स्वारी केली. मदासुराचा वृत्तांत ऐकून व तो येतो आहे असे पाहून देवांनी बृहस्पतीच्या उपदेशानुसार 'य: पलाय' केले. देवांची इच्छेस येईल तेथे जाणारी विमाने घेऊन मदासुराने सर्व भोगांचा उपभोग घेतला. पुढे ब्रह्मादि देवत्रयाच्या लोकांवर हल्ले करून त्याच्यावर आक्रमण केले व त्यांस तेथून बाहेर काढले. सर्व देव शक्तिलोकास गेले व मदासुर-विक्रमाचा वृत्तांत देवीला सांगते झाले. देवीला वाटले, मदासुर आपला पोसणा आहे, आपल्या वाटेला जाणार नाही, गेलाच तर त्याचा समाचार घेण्याला काय उशीर आहे, असे मानून तिने देवांस अभय दिले व शक्तिलोकांत राहण्यास अनुज्ञा दिली. इकडे मदासुर व त्याचे अनुयायी कैलासलोकांचे सुख अनुभवित राहिले. पण सुख-विषयांचा कंटाळा येऊन अन्य विषय हवेसे वाटतात, त्याचप्रमाणे राक्षसांची अवस्था झाली. त्रिपुरादि राक्षसांनी मदास सांगितले की, 'देवांनीं आपल्याशी नित्य वैर केलें आहे, हिरण्यक्षादि आपले लाखों बंधु देवांनींच मारले, हे नेहमी आमचा पराभव करण्याची व आम्हांस पृथ्वीवरून व स्वर्गातून घालवून देण्याची योजना करण्यात

दंग असतात. आतां ते शक्तिलोकांत जाऊन राहिले आहेत, चला आपण जाऊन त्यांचा समाचार घेऊ.' 'शक्ति आपली, इष्ट देवता आहे. मी माझ्या देवतेविरुद्ध लढणार नाही इत्यादि काही आढेवेढे मदाने घेतले, पण वृद्धांनी त्याची समजूत घातली व सर्वांचा निश्चय झाला, की शक्तिलोकांवर स्वारी करावयाची. शक्तिलोकाला ससैन्य जाण्याच्यापूर्वी मदासुराने तारकासुर नामक दैत्याला शिष्टाईकरतां पाठविले. तो शक्तिलोकास गेला व तेथील सभेत त्याने मदासुराचा संदेश सांगितला. की, 'देवी! मी तुझा भक्त होय. तूं राक्षसांची कुलदेवता आहेस; म्हणून देवांचा पक्ष सोडून आमच्याकडे ये. आपण देवांचा नाश करूं' हा निरोप देवींस पसंत पडणे शक्य नव्हते. तिने प्रतिसंदेश पाठविला की, 'मीं जगदंबा आहे; मला सगळेच सारखे आहांत. तुम्हीं पातालांत सुखानें राज्य करावे व देवांनीं स्वर्गात करावें. हें मान्य करून तुम्हीं पाताळांत जा.' हा उलट निरोप तारकासच मान्य झाला नाही, मग तो मदादिकांस पसंत पडणे दूरच राहिले. त्याने कर्मांचा व बलाचा गौरव करून देवीचा निषेध केला आणि 'युद्धाची तयारी करा' हा निर्णय सांगून तो परत गेला पुढे राक्षसांनी शक्तिलोकावर स्वारी केली त्यावेळी अति भयंकर युद्ध झाले. देवदैत्यांनी आपआपली पराकाष्ठा नेली. जयापजयाची पारडी क्षणोक्षणी खालीवर होऊ लागली. रक्ताच्या नद्या, मांसाचा चिखल, कबंधाचे नाचणे, बाणांची छते व तज्जन्य भेसुर अंधकार हा सर्व चित्तभेदी प्रकार पाहून सर्व सैनिक तर गर्भगळीत झाले पण राक्षसांस शुक्राचार्यांचे साहाय्य होते, यामुळे त्यांच्या सैन्या-

तील मेलेले वीर पुनः जिवंत झाले व युद्ध करू लागले. देवांस पुनः जिवंत करणारा कोणी नव्हता. यामुळे राक्षसांचा पक्ष जोरा-ऊन तो मदासुराच्या हस्तकौशल्याने विजयश्री बळकाविता झाला. मदासुराच्या मुलांनीही त्या संग्रामात सूर्य, विष्णु व शंकर यांचा पराभव केला व त्यांस घेऊन ते वडिलांच्या पाया पडण्यासाठी गेले. नंतर शक्तिचे व मदासुराचे तीन दिवस लोकोत्तर युद्ध झाले. शेवटी शक्तिचा पराभव झाला व ती मदासुराच्या हस्तगत झाली. याप्रकारे मदासुराचे राज्य सर्व ब्रह्मांडावर झाले. त्याला कोठेही शत्रु उरला नाहीं. नंतर राक्षसांनी वैदिकधर्मांचा नाश करण्यासाठी वेद व त्यांचे पठण करणारे भिक्षुक यांचा नाश करण्यास आरंभ केला. अर्थातच वेद व वेदवेत्ते व वेदकर्में लुप्त झाली. स्वार्थी कर्म वृद्धिंगत झाले. परोपकाराचे कर्म अस्तंगत झाले. यामुळे देवांस उपास पडू लागले. तेव्हा देवांनी सनत्कुमाराचा उपदेश घेतला, मंत्रतंत्र पुरस्सर गणेशभक्ति भक्तिभावाने केली, त्याचे एकनिष्ठ ध्यान केले, गर्वाचा व मदाचा त्याग केला, 'एक' ह्मणजे माया व 'दंत' ह्मणजे सत्ता, अर्थात् एकदंत ह्मणजे मायेचा आधार व मायातीत जो गणपति त्याची त्यांनी वेदविहित मार्गांने स्तुति केली व निराहाराचे व्रत पाळले. याप्रमाणे शंभरवर्षे अव्यभिचारी तपश्चर्या विघ्नेशाचे कृपेने निर्विघ्नपणे सिद्धीस गेल्यावर तो भक्तकामकल्पद्रुम श्रीगणपती प्रसन्न व प्रकट झाला व भक्तांस इष्ट वरांचा आशीर्वाद देऊन स्वानंदवासी झाला. ही बातमी नारदाने मदासुराला कळविली. मदासुराने गणपतीच्या नाशाचा संकल्प करून आपले चतुरंग सैन्य सज्ज आहे, असे पाहिले. इतक्यात श्रीगणपतीची स्वारी तेथे 'दत्त' ह्मणून उभी राहिली, व 'एकदंत, स्वानंदवासी गणपति मी सर्वेश्वर आहे. तुला मारण्यासाठी, देवांस सुख

देण्यांसाठी, अधर्मांचा नाश करून सद्धर्मांचा प्रसार करण्यासाठी मी अवतरलो आहे. एक शरण तरी ये अथवा युद्धास तरी तयार हो ' असा दूताच्या हाती निरोपही गणेशाने पाठवला. नंतर युद्धाच्या तयारीने दैत्यराज बाहेर आला व लीलेसाठी गजवदनांनी त्याच्याशी थोडा वेळ युद्ध केलेही. पण लवकरच मदासुराला आढळून आले की, निराकार, निर्गुण, प्रकृतीच्या पलीकडचा व तिचा अध्यक्ष जो गणपति त्याच्याशी युद्ध करणे व्यर्थ आहे. शिवाय श्रीपरमेश्वर-दर्शनाने त्याचा मोह, त्याचा गर्व, त्याचे अज्ञान, यांचा नाश होऊन तो परमेश्वरचरणी लीन झाला, त्याला ज्ञान झाले व तो कृतार्थही झाला. त्याने देवांशी वैर न करण्याचे कबूल केले; व श्रीदेवापासून असा वर मिळविला की, ' सकाम भक्ति अथवा कर्म दिसेल तेथे त्या भक्तिकर्मफलाचे भक्षण करून सकाम भक्तांच्या व कर्त्यांच्या हृदयांत वास्तव्य कर म्हणजे ते मदयुक्त होतील व जेथे निष्कामत्व दिसेल तेथे शांतिरुप हो म्हणजे त्यांची शांति वाढेल. ' असा वर देऊन गणपति स्वस्थानी गेले, देव व दैत्यही आपआपल्या स्थानी जाऊन शांतिसुखाचा अखंड अनुभव घेते झाले.

कश्यपाच्या घरी विनायकावतार–बाललिला–काशियात्रा राक्षसवध–भृशुंडी–आशापूरक

सूत :– ऋषींनो ! गौडदेशामध्ये गौड या नावाचे एक नगर होते, तेथे रौद्रकेतु व शारदा या नावाचे ब्राह्मणदांपत्य सुखाने राहात असे. त्यास देवांतक व नरांतक या नावाचे एक भयंकर जुळे झाले. मुले मोठी झाली, तेव्हां नारदाने त्यास पंचाक्षरी शिव-मंत्राचा उपदेश केला व त्यास तपश्चर्या करण्यास सांगितले. त्यांनी

जी तपश्चर्या केली ती पाहून शिव प्रसन्न झाले 'गुण व रूप ही ज्या वस्तूस आहेत, तिच्यापासून तुह्माला भय नाही' हा वर दिला. झाले! पुढे, हे ब्राह्मणरुपी दैत्य प्रबल होऊन त्यांनी त्रैलोक्य पादाक्रांत केले. देवधर्म अर्थातच राहिले. कोठेही स्वाहा, स्वधा, वषट्कार यांस आश्रय राहिला नाही, त्यामुळे देवांस अन्न मिळेना. मग त्यांनी गणपतीची आराधना केली व त्यास प्रसन्न केले. 'कश्यपाचे घरी अवतार घेऊन मी तुमचे संकट दूर करतो' असा देवास गणपतीने वर दिला. कश्यपाचे घरी देवांस जन्म घ्यावयाचा होताच. कारण देवमाता अदितीला 'ब्रह्म आपल्या उदरी यावे व पुत्ररूपी देव होऊन आपण त्याची सेवा, चाकरी करावी' अशी इच्छा उत्पन्न झाली व गणपतीची आराधना करून तिने आपली मनकामना पूर्ण होईल असा वर मिळविला. पुढे गणपतीचा अवतार झाला. बाळपणी विघ्नेशांनी अनेक प्रकारची क्रीडा केली. व पुष्कळ खोड्याही केल्या. एकदा एका राक्षसीने गिळल्यावर तिचे पोट फोडून देव बाहेर आले, उद्धत व धुंधु या शुकरूपी राक्षसास त्यांनी मारले, इंद्राच्या गर्वाचे हरण करून वायु, अग्नि यांचाही पराभव केला, काशीस जातांना अनेक राक्षसांचा संहार केला, काशीत विनायकाचे सिद्धिबुद्धीशी लग्न झाले, इत्यादि बाललिलांनी विनायकाने स्वमातापितरांचे ठायी व भक्तजनांचे ठायी महाकौतुकाने उत्पन्न केले, एकदा काशीराजा पूजा करण्यास आला तो विनायकाची षोडशोपचार पूजा झालेली त्याला दिसली. ही भृशुंडीनामक भक्ताने पूजा केली आहे, असें समजतांच त्याला राजाने बोलावणे पाठविले; पण तो येईना. कारण शुंडाधरगणपतीशिवाय कोणासही मी नमस्कार करावयाचा नाही, असा भृशुंडीचा निश्चय होता. राजा स्वतः गेला, पण व्यर्थ. पुढें, विनायक शुंडाधर झाले हे

ऐकून योगसामर्थ्याने राजास घेऊन भृशुंडी काशीक्षेत्रांत आला. नंतर भृशुंडीने भक्तिपुरःसर विनायकाची स्तुति केली, व 'आशापूरक' या नावानें प्रसिद्ध हो व मला पूर्ण भक्त कर' म्हणून गणपतीपाशी मागणे मागितले व विनायकाने 'तथास्तु' म्हटले.

भृशुंडीचें पूर्ववृत्त व पश्चात्ताप–सूर्यपत्न्या छाया व संज्ञा यमकृत गणेशस्तुति– गणेशप्रसाद– भृशुंडी भक्ति व ब्राह्मणत्व

सूतः- शौनकादि मुनींहो! 'हा भृशुंडी कोण?' असें विचाराल तर मुद्गलाने दक्षास सांगितले ते सांगतोः पूर्वी नंदुरगांवी 'नामा' या नावाचा एक दुष्ट व्याध राहत असे. हिंसा, वाटमारी, चोरी करून पोट भरावे हा त्याचा धंदा असे. तो एकदा एका गृहस्थाच्या पाठीमागे धावता धावता थकला व विश्रांति घ्यावी ह्मणून एका तळ्यावर उतरून तेथे त्याने स्नान केले. स्नान करून बाहेर आला तो त्यास उपरति झाली व त्याने आपला क्रम सोडून दिला. या तळ्याचा हा प्रभाव होय. याची हकीकत अशीः पूर्वी सूर्यास संज्ञेपासून वैवस्वतमनु, यम आणि यमुना ही अपत्ये झाली. पण संज्ञेला सूर्यतेज सहन होईना; ह्मणून तिने छायेला उत्पन्न केले व आपण रागाने निघून गेली; छायेवर सूर्याचे प्रेम जडले व तिच्या उदरी सावर्णिमनु, शनि आणि तापी यांचा जन्म झाला. छाया आपल्या सावत्र मुलांस छळित असे ह्मणून एकदा यमाने तिला लाथ मारिली, तेव्हां 'तुझा पाय किडे पडून गळून पडेल' असा छायेने यमाला शाप दिला. नंतर यमाने गणेशभक्ति करावी असे नारदाने ठरविले इकडे सूर्याने अश्वरूप घेऊन अश्विनीचे रूप घेतलेल्या संज्ञेला वश करण्याचा प्रयत्न केला; त्यावेळी अश्विनीकुमाराची उत्पत्ति

झाली. व सूर्य आणि संज्ञा यांचे पुन: प्रेम जडले. यमाने गणेशाची उत्तम स्तुति केली व अखंड भक्ति मिळविली तसेच 'तुझ्या पायांत एक महिनाभर किडे पडतील व नंतर तो बरा होईल, मातृशाप कोणालाही निवारण करतां यावयाचा नाही, माझी भक्ति कर, तुला दुःख होणार नाही. तूं दक्षिण दिशेचा स्वामी होशील व यमधर्म असे तुला ह्मणतील, असा गणपतीने वर दिला. शिवाय ज्या तळ्यांत यम नित्यशः स्नान करी, त्या तळ्यांत स्नान केले असतां जीवास पश्चात्ताप होऊन तो पापविन्मुख होईल, असा त्या तळ्यालाही वर दिला. असो; ज्या गृहस्थाच्या ह्मणजे मुद्गलाच्या मागे धांवतां धांवतां, हा नामा थकला होता, त्या ऋषीस नामा व्याध लागलीच शरण गेला. ऋषीने कृपायुक्त होऊन त्यालाही गणेशमंत्राची दीक्षा देऊन सांगितले की 'ही माझी शुष्क काठी येथे मी ठेवतो, तिला अंकुर येईपर्यंत जपपूर्वक तपश्चर्या कर. वायु मात्र भक्षण कर; तुझे कल्याण होईल.' मुद्गलाने सांगितल्याप्रमाणे नामाने हजार वर्षे तपश्चर्या केली व तो पापमुक्त झाला. त्याचा पुण्यसंचय इतका झाला की, त्याला सोंड फुटली! त्याची तपश्चर्या फलोन्मुख झाली, तेव्हां मुद्गल येऊन त्यांनी त्याला वारुळाबाहेर काढला व त्याला आपला पुत्र करून ह्मणजे ब्राह्मणत्व देऊन त्याचे नाव भृशुंडी ठेविले. पुन: त्याला एकाक्षरी गणेशमंत्र दिला व त्याचा जप करून गणपतिप्रसन्नता संपादिली आणि अखंड भक्तीचा वर मागून घेतला. जेथे भृशुंडीने तपश्चर्या केली, त्या आश्रमाला 'आमलाश्रम' असे नांव मिळून ती जागा एक पुण्यक्षेत्र झाले. तेथेच मानसपूजा करीत भृशुंडी पुष्कळ दिवस राहत असे. असो; भृशुंडीच्या दर्शनाने काशीराजाही परम शांति पावला. पुढे श्रीविनायक काशीक्षेत्रांत राहून व पुष्कळशा राक्षसांस मारून सर्वांस आपल्या प्रसादाचा लाभ देत

असतां एकदा शुक्लनामक गरीब ब्राह्मणाने ' भाजी भाकरी ' खाण्यास बोलाविले ह्मणून काशीराजाचे आमंत्रण टाकून त्या गरीबाच्या येथे देव गेले व त्यावर अनुग्रह करून त्यांनी त्याला चिंतामुक्त केले. पुढे नरांतकाने काशीवर स्वारी केली तेव्हां विनायकानें एक गण पाठवून नरांतकाला धरून आणले. त्याच्याशीं व इतर दैत्यांशी युद्ध करून त्यांचा सपराभव वध केला व काशीक्षेत्रात ' ढुंढी ' राज या नावाने प्रसिद्ध होऊन, सर्व लोकांस शांति मिळणारे ज्ञान देऊन, कश्यपासह अदितीला सर्व प्रकारचे सुख देऊन व भूभार हरणाचे अवतारकृत्य संपवून विनायकराज स्वानंदवासी झाले.

दुर्मति आख्यान–शिवसुतला–शनिदुःखविमोचन दुर्मतिवध

सूत :– मुनिगणहो ! शकुनिनामक राक्षसाला दुर्मति नावाचा एक महापराक्रमी मुलगा झाला. त्याने शक्तीची आराधना करून विलक्षण वर मागून घेतले. नंतर या वरसामर्थ्याने त्याने विष्णुप्रमुख देवांचा पराभव केला इतकेच नव्हे तर शक्तीला ' माझी भार्या हो ! ' अशी उर्मट मागणी केली. तेव्हां भीतीमुळे शंकरासह शक्तीने वनवास पत्करला व नारदाच्या सांगण्यावरून श्रीगणपतीचे १०० वर्षे आराधन केले. देव प्रसन्न झाल्यावर ' पुत्र हो व दुर्मतीचा वध कर ' असा वर मागितला, तो मिळवून शिव व पार्वती हे दांपत्य तेथेच राहिले. पुढे, वैशाखमासांत शिवपार्वतीनी वैशाखस्नान करून एक मातीची गणेशमूर्ति केली व तिचे ध्यान केले व सोपचार पूजा केली. तेव्हां त्या भक्तीने प्रसन्न होऊन ती मूर्ति जिवंत झाली व ' मी तुमचा पुत्र होऊन आलो, माझे रक्षण करा ' असे ह्मणाली. अर्थातच गणेश मायेने शिवास मोह झाला व मातेला पान्हा फुटला. पुढे जातकर्मादि संस्कार होऊन गणपति वयात आल्यावर विष्णूने आपली पुष्टिनामक मुलगी

देऊन गणपतीस जावई केले. लग्नसभारंभांत सर्व देव स्वस्वस्त्रियांसह आलेले होतेच. त्यांत शनिग्रह होता. त्याने गणेशस्तुति केली पण डोळे मिटून केली तो कांही केल्याने डोळे उघडीना. तेव्हां पार्वतीने 'असे कां?' ह्मणून विचारले शनीने सांगितले, 'मांतुश्री! एकदां मी सूर्याचे आवाहन करून त्याचे ध्यान करीत असतां माझी बायको तेथे आली व 'मला ऋतुदान द्या' असे ह्मणाली. मी ध्यानस्थ, डोळे मिटलेला, काही बोलत नाही, असे पाहून तिने शाप दिला की 'तूं मला ऋतु दान केले नाहीस. ह्मणून तुझी दृष्टि ज्याच्यावर पडेल त्याचे वाटोळे होईल' या शापाचा अनुभव आल्यापासून मी डोळेच उघडीत नाही. ह्मणुन आतांही मला आग्रह करूं नका.' पण पार्वती ह्मणाली की 'सर्व मंगलप्रद ब्रह्म येथे आहे, खुशाल डोळे उघड!' शनीने डोळे उघडून पाहिले तो क्षणैकांत विनायकाचे शिर दिसेनासे झाले! सर्व मंडळी घाबरली. पुढे नवस वगैरे करणार तो पुनः गणेशाचे शिर दिसू लागले. अर्थात् सर्व मंडळी आनंदली. शनीने गणनाथाची स्तुति केली. तेव्हां गणपति ह्मणाले: 'तूं ज्याकडे क्रूरदृष्टिने पाहशील, त्याचा मात्र नाश होईल.' नंतर शनीने गणेशयोग संपादिला व गणेशपूजन करून तो शांति मिळविता झाला. असो; एक दिवस गणेशदेवांनी शंकरास विचारले की 'तुह्मी सर्व देव वनांत कां राहतां?' नंतर शंकराने दुर्मति राक्षसाचा वृत्तांत सांगून आपल्यास वनवास कां प्राप्त झाला हेहि सांगितले. हे ऐकून पुष्टिकांतांनी युद्धाची तयारी करण्यास सांगून देवसैन्य दुर्मतीच्या नगरीवर पाठविले. सात दिवस घनघोर युद्ध झाले. शेवटी शेवटी गणेशाचा एक दांत दुर्मतीने उपटला होता, तोच दात घेऊन दुर्मतीच्या डोक्यात घातला व त्यास ठार

मारले. याप्रमाणे दैत्याचा पराभव झाला ते पाताळात निघून गेले. मग देवांनी मोठा उत्सव केला व ज्या क्षेत्रात शंकरभवानीला सिद्धि मिळाली त्याचे 'सिद्धाश्रम' असे नाव ठेविले व वैशाख पौर्णिमेस सर्व देव तेथे मोठा उत्सव करूं लागले-

अगस्त्यऋषि–राधांमदनिवारण–अगस्त्यकृत समुद्रपान–कपिलावतार–चिंतामणिहरण–गणासुर–प्रल्हादशापनिवारण

सूत :- मुनीहो ! अगस्त्य ऋषींनें वेदमंत्र म्हणून इल्वल राक्षसाचा नाश केला, ती कथा व वातापीचा नाश करण्यासाठी व श्राद्धास बोलावून देवब्राह्मणास आपल्या बंधूचे मांस खावयास घालणारा व नंतर मंत्रसामर्थ्यानें इल्वलास म्हणजे आपल्या भावास ब्राह्मणांची पोटें फोडून बाहेर येण्याचें सामर्थ्य देणाऱ्या वातापीचा आश्रय जो समुद्र, त्याचें शासन करण्यासाठी विघ्नहर्त्या गणपतींची आराधना केली ती कथा, तसेच, गोलोकांत राधाकृष्ण हे दांपत्य प्रेमसुखाचा अखंड अनुभव घेत असता उभयतांस गर्व झाला, राधेने कृष्णास 'तूं मनुष्यलोकी जन्म पावशील' असा, व कृष्णाने राधेस तसाच शाप दिला ती कथा, पुढे उभयता ध्यानावर येऊन त्यांनीं गणपतीचें आराधन केलें व मनुष्यलोकी गोकुळांत जन्म घेऊन अनेक प्रकारच्या क्रीडा केल्या, शेवटी उभयतांस शंभर वर्षे विरहदुःख भोगावे लागले व त्यांत त्यांनी गणेशभक्ति केली ह्मणून ते दंपत्य पुनः एकरूप झाले ती, ह्या सर्व कथा झाल्यावर ब्रह्मदेवाने अगस्त्याला गणेशस्वरूप सांगितले व 'वद्य चतुर्थीला उपास कर व गणेशपूजा कर' असें सांगून गणेशदीक्षा दिली व त्याने गणेशभक्ति करून समुद्रपानाचे ह्मणजे तो सगळाच्या

सगळा पिऊन वातापीला मारण्याचे सामर्थ्य मिळविले, ही कथा सांगून म्हणाले:— कर्दमदेवहूतीच्या उदरी विष्णूने 'कपिल' नावाने अवतार घेऊन सर्वत्र ज्ञानाचा उपदेश केला व गणेशमंत्राची दीक्षा देऊन माता पितरांस शांतियोगाची प्रक्रिया सांगितली व त्यांस गणेशमार्गास लाविले. पुढें, इंद्राने या कपिलमहामुनींला गणेशप्रिय जो 'चिंतामाणि' नांवाचा मणि तो दिला व तो विघ्नविनाशक आहे असे समजून कपिलाने गळ्यात बांधला. पुढे एकदा गणासुर नांवाचा दैत्य विश्रांतीकरता म्हणून त्या आश्रमात आला. कपिलाने त्याचा सत्कार करून गणासुराला भोजनाचे आमंत्रण दिले व 'आपल्या सैन्यासह या असे सांगितले. नंतर कपिलाने चिंतामणीची पूजा करून प्रार्थना केली; तेंव्हां षड्रस अन्न सर्वांस पुरुन उरेसे सिद्ध झाले. सर्वांची भोजने यथासांग झाली. हे पाहून गणासुराला आश्चर्य वाटले; ह्मणून त्याला कपिलाने चिंतामणीची गोष्ट सांगितली. ती ऐकून गणासुराला मण्याचा लोभ उत्पन्न झाला, व ऋषि देत नाही, असे पाहून तो राक्षस जबरीने तो मणि नेता झाला! 'असंगाशी संग व प्राणाशी गाठ' ह्मणतात ते खोटे नाही. असो; हा गणासुर अभिजित् नामक राजाचा मुलगा होता. हा ब्रह्मदेवाचा अंश होता. याने शुक्राच्या उपदेशानुसार शंकराची उग्र तपश्चर्या केली व त्रैलोक्याचे राज्य मिळेल व त्रिगुणी वस्तु तुला मारणार नाही' असा वर मिळवून त्रिलोकावर आपला अंमल बसविला. नंतर त्याने कपिलापासून मणि हिरावून नेला. इकडे भक्तोत्तम कपिलाने गणेशाराधन केले, त्यास प्रसन्न करून घेतले आणि अखंड भक्ति, स्मरणानंतर दर्शन व मणिप्राप्ति हे वर मागितले व मिळविले. एक दिवस अग्निहोत्रविधी संपवून कपिल गणेशध्यान करीत असता तेथे गजान-

नाची मूर्ति अवतीर्ण झाली; तेव्हा अनेक चिंतामणि कपिलाने पाहिले. ते पाहून त्यास उपरति झाली कां, देवाचे भूषणाची पूजा न करता आपण ते गळ्यात बांधले! ही चुकी केली ह्मणूनच ते देवभूषण नष्ट झाले. गंधपुष्पादि देवाचा निर्माल्य आपण घ्यावा, पण देवाचे अलंकारांचा आपण मानवांनी उपभोग घेऊ नये, हा नियम आहे. गणपतींनी सांगितले, 'आता दुःख करण्याचे कारण नाही. तुझा मणि तुला परत देतो.' इकडे गणासुराला स्वप्न पडले की, कपिलापासून हरण केलेल्या मण्याबद्दल आपले डोके फुटले! गणासुर रागावला व कपिलास शिक्षा करण्यासाठी त्याच्या आश्रमांत आला. त्याच्या सैन्याचे व देवीपुत्र 'लक्ष' यांचे युद्ध झाले. शेवटी, गणपतीनी गणासुराचा शिरच्छेद केला व तो मणि कपिलास आणून दिला. कपिलाने तो मणि विनायकाच्या गळ्यात बांधून ह्मटले की 'हा चिंतामणि आपला आहे. आजपासून आपलेही नांव चिंतामणि होवो! मला अखंड भक्तिसुख मिळो! आपल्यास सहस्रशः नमन करतो.' त्याने देवास अनेक साष्टांग नमस्कार घातले. त्यांचा स्वीकार करून व कपिलावर अनुग्रह करून चिंतामणि अंतर्धान पावले.

सूत :– याप्रमाणे अवतारकथा सांगून गृत्समदानें प्रल्हादास सांगितले की 'शक्ति, सूर्य, विष्णु व शंकर' हे गणेशाचे चार गौणावतार आहेत; मात्र तू भक्तिज्ञानपूर्वक गणपतीचे आराधन कर ह्मणजे दुष्ट सगतीमुळे जी बाधा तुला झाली आहे, तीचा नाश होईल व तुला शांति मिळेल.' प्रल्हादाने याप्रमाणे केले व तो शांतिसुख पावला. नंतर मुद्गलाने गणेशक्षेत्राचे माहात्म्य सांगितले. व तो विश्रांती घेण्यास गेला.

—०—

तृतीय खंड

--०--

महोदरचरित्र

सूर्य–बालखिल्यसंवाद–सूर्यसंजीवन–सूर्यवरप्रदान–कामचरित्र–स्कंदजन्म व तारकासुरवध–मोहासुरचरित्र–व गणेशकृत ज्ञानदान व मोहासुरशांति

सूत :– शौनकमुने ! दक्षाने मुद्गलास विनंति केली की, 'मला आणखी महोदराचे, गणपतीचे, चरित्र सांगा.' मुद्गलाने आनंदाने ही गोष्ट कबूल केली व सांगण्यास आरंभ केला. तो ह्मणालाः सूर्य रथांत बसून आपले पर्यटण करूं लागला ह्मणजे वालखिल्य ऋषि त्याचे आराधन करतात. एकदा त्यांच्या दृष्टीस पडले की, सूर्य हा स्वतः गणेशाचे कीर्तन भक्तीने करतो. सूर्य स्वभावतः कर्माधार व ज्ञानरूप असतांही त्याला गणपतीचे आराधन का करावे लागते, हे ऋषीस समजेना. तेव्हां त्यांनी सूर्याला 'गणेशस्वरूपाचा वृत्तांत विचारला.' नतर सूर्याने गणेशब्रह्माचे स्वरूप सांगितले व गणेशमहात्म्य सांगण्याला आरंभ केला तो असाः 'एकदा कश्यप मुनीने माझी तपश्चर्या करून मला प्रसन्न करून घेतले' व 'तुझा पुत्र मी होईन व तुझ्या सर्व इच्छा सफल होतील.' असा मी त्यास आशीर्वाद दिला. त्याच्या पत्नीचीही तपश्चर्या तशीच होती ह्मणून तिलाही तसाच वर दिला, पुढे त्यांच्या घरी माझा

जन्म झाला, व विश्वकर्म्याच्या 'संज्ञा' नामक मुलीशी माझा विवाह झाला. ब्रह्मदेवाने मला ज्योतिर्गणांचा व ग्रहांचा नायक केले. हा माझा गौरव व माझी विस्तीर्ण सत्ता, तसेच माझे विलक्षण ऐश्वर्य इत्यादि पाहून मला गर्व झाला की 'माझ्या आधारावर हे विश्वचक्र चालते, मला मात्र कोणाचा आधार नको. पर्जन्यस्वामीही मीच. सारांश, मीच सर्वश्रेष्ठ आहे.' या गर्वाचे कारण, मला गणपतीचे विस्मरण झाले, हे होय. विघ्नेशाचे विस्मरण ह्मणजे विघ्नांस आमंत्रणच! 'असो; पुढे, माली व सुमालिक या दैत्यांनी शंकराचे आराधन करून एक अति तेजस्वी विमान मिळविले व त्यांनी मला व माझ्या प्रकाशाला निरर्थक केले. मी निरुपयोगी झालो. तरी आमच्या तिघांच्या असह्य प्रकाशाने पृथ्वीवर हाहाकार झाला. शंकराने रागाने माझेच शिर तोडले! मी नाहीसा झालो, तेव्हां वेदकर्माचा लोप झाला. ह्मणून शंकराने गणपतीचे स्तवन केले. गणपतीनेही प्रसन्न होऊन मला सजीव केले. तेव्हां 'मलाही जिवंत करणारा निराळा कोणी आहे.' असे मला समजले! त्याच्या शोधार्थ मी जाणार तो ब्रह्मदेवाने मला सर्वाधार श्रीगणेशस्वरुप व शांतियोग यांचा उपदेश केला. नंतर माझे गर्वहरण झाले. 'गणेश' नामक ब्रह्माचाही उपदेश मला ब्रह्मदेवाने केला. नंतर मीं मंत्रपुरःसर गणेशाराधन केले व गणपतींस प्रसन्न करून त्यापाशी अखंडस्मरण व अखंडभक्ति ही मागितली व मिळविली. म्हणून सर्वाधार जो गणपति त्याचे मी रोज आराधन करतो. समजले?'

सूतः– गणेशभक्तानों ! नंतर सूर्याने वालखिल्यांस मोहासुराची कथा सांगितली, ती अशी : पूर्वी एकदा ब्रह्मदेवाने तारकासुर नावाच्या राक्षसाला अनेक विलक्षण वर दिले होते; कारण त्याची तपश्चर्याच

तशी कांही विलक्षण होती. ब्रह्मदेवाच्या वराने तारकासुर तिन्ही लोकांचा स्वामी झाला. त्याने देवास रानावनात घालवून दिले. पुढे नारदाने त्यांस सांगितले की, 'शिवपुत्राच्या हातून त्याचा मृत्यु आहे, ह्मणून शिवाचे आराधन कर व त्यास संतुष्ट कर.' त्यावेळी शिव तपश्चर्येसाठी वनात जाऊन राहिले होते. देवांस कळले ही स्वारी ध्यानस्थ! तेव्हां पार्वती अति मनोहर भिल्लीणीचा वेष घेऊन तेथे आली. तिने आपल्या स्वरूपाने त्या वनाला अत्यंत सौभाग्यश्री मिळवून दिली. शंकराने ध्यान आटपून डोळे उघडले तो हे सर्वांगसुंदर तरुणींचे अभिनव मनोहर स्वरुप विद्युत्तेजाने पुष्पवाटिकेत वावरत आहे, असे त्यास दिसले. तेव्हां शंकराचे ध्यान गडबडले व तो भिल्लिणीच्या मागे लागला. ती पुढें पळत आहे, मागून दिगंबर शंकर धावत आहे, याप्रमाणें कांही वेळ रंगण धरल्यावर ती अदृश्य झाली. पण शंकराचा कामोद्रेक असह्य होऊन त्याचे विर्य खाली पडले. त्यापासून एक चार हातांचा, उग्र स्वरुपाचा, जाड हाडापेरांचा, असा मोहनामक राक्षस उत्पन्न झाला. असो; खिन्न होऊन शकर स्वस्थानी गेला व विचार करता कामाचे हे सर्व चेष्टित आहे, असे जाणून क्रोधयुक्त होत्साता त्याने कामाला जाळून टाकिले. काम तेव्हांपासून अनंग झाला. पुढें शंकराच्या सांगण्यावरुन कामाने रतिसह नाशिकक्षेत्री गणपतीची आराधना केली. गणपति प्रसन्न झाले 'पण शिवाचे कृत्य मला नाहीसे करता येणार नाही' असे ह्मणून त्यांनी मदनाला सागितले की, 'यौवन, स्त्री, सुवासिक पुष्पे, मधुर गायन, कोकिलकूजित, वसंतऋतु, मंद व सुगंध वायु, मनोहर वस्त्रालंकार इत्यादि किंवा यांपैकी दोनतीन गोष्टी मिळाल्या की तुला देहप्राप्ति होईल

वं तूं शंकरादि सर्व देवांस, नारदादि महर्षीस व सर्व प्राणिमात्रांस मोह घालून वश करशील. तुला एकदा यादवकुलांत कृष्णाच्या उदरी प्रद्युम्न नावाने जन्म येऊन तूं सदेह होशील; हे खरे, पण पुढे तूं अनंगच राहशील.' हा वर प्राप्त करून घेऊनही स्वानंद-सुखार्थ कामाने तपश्चर्या केली व भक्तिने गणेश प्रसन्न होऊन त्यास अभीष्ट वर देते झाले. इकडे देवकार्यार्थ शंकरपार्वतीचा संयोग होऊन कार्तिकेयाचा जन्म विलक्षण प्रकाराने झाला. त्याला सहा तोंडे आहेत ह्मणून त्याला षडानन ह्मणतात. असो; ह्या षडाननाने गणेशभक्ति करून तारकासुराचा वध केला. इकडे शंकर-वीर्यापासून मोहासुर झाला होता, तो राक्षस शुक्राचार्याकडे जाऊन आपला वृत्तांत सांगता झाला. शुक्राला त्याची दया आली. त्याने त्याची मुंज, वेदाध्ययन, लग्न इत्यादि सर्व सस्कार केले. त्याच्या बायकोचे नाव मदिरा होते. असो; मोहासुराने ऊर्ध्वदृष्टि ठेऊन, सूर्यमंत्र जपून व निराहारी राहून एकनिष्ठेने सूर्यांचे आराधन केले. भक्तिला सूर्य प्रसन्न झाला. त्याने मागितले ते सर्व वर त्याला दिले. मग काय? राक्षसमंडळीत आनदीआनद झाला. मोहासुराचा राज्या-भिषेक, तत्कृतत्रैलोक्यविजय देवांचा वनवास, दैत्यांचा उन्माद, सत्क-र्मांचा लोप इत्यादि गोष्टी पद्धतशीर रीतीने झाल्या. मोहासुराला उग्र, क्रूर, मेधावी, शोचन व हरण असे पांच वीर्यशाली पुत्र झाले त्यास कैलास, वैकुंठ, सौरलोक, शक्तिलोक व सत्यलोक येथील राज्ये देऊन मोहासुर आपल्याकडे पृथ्वीचे राज्य ठेविता झाला. तथापि देव जिवंत होते ह्मणून त्याच्या चित्ताला चैन नव्हती. तेव्हा देवांस मारण्याचे जे मुख्य साधन, त्याचा त्याने आश्रय केला. ते साधन ह्मणजे सत्कर्मांचा विध्वंस होय. हा होऊं लागला तेव्हां देवांस

तळमळ लागली पण सकाळचा आत्मा व बुद्धिदाता जो सूर्य, त्याने देवांस सांगितले की, 'निर्गुण्य जो परमेश्वर गणपति, त्याला शरण जाऊं. तोच आमच्या दुःखाचा परिहार करील.' मग देवांनी शुद्धचित्ताने गणनाथाची तपश्चर्या केली, गणेश प्रकट झाले तेव्हां त्यांची स्तुति केली आणि ही सर्व ब्रह्मांडे ज्या जगजेठीच्या उदरी सांठविली आहेत, त्या महोदराशी अखंड भक्तिचा वर मागितला. 'मोहासुराचा वध करून ज्ञानप्रसार होईल व देवमानवाचे वास्तव्य अखंड ज्ञानामध्ये राहील, असे करा' असाही एक वर मागितला. देवांची याप्रमाणे तयारी चालली आहे तो नारदांनी देवांची बातमी दैत्यास दिली! नारदाने मोहासुराला त्याच्या शक्तिचे व्यर्थत्व, गणेशाचे स्वरुप व ब्रह्मप्राप्ति करून घेण्याचे साधन सांगून आपण अन्यत्र गेला. पण मोहासुराला उपरति झाल्याच्या आधी तो गेला नाही. मोहासुराचा निश्चय झाला की, गणेशभक्ति करावयाची. तो त्याप्रमाणे गणेशभक्ति करू लागला. त्याचा मोह नष्ट होऊं लागला. धर्मरक्षणतत्पर जो महोदर त्याने (गणपतीने) विष्णूला शिष्टाईकरता मोहासुराकडे पाठविले. तेव्हां मोहाने विष्णूचा उत्तम सत्कार केला. विष्णूनेही पुनः मोहासुराला महोदराचे स्वरुप कथन केले व 'ब्रह्माशी समझोता कर' असा उपदेश केला. मोहाला तो उपदेश मानवला, पण इतर दैत्यांस मानवला नाही ह्मणून ते पाताळांत गेले. इकडे मोहासुर हा आपल्या पुत्रपौत्रांसह गणेशास शरण गेला व भावपुरःसर त्यांचे स्तुतिस्तोत्र गाता झाला. महोदराने त्याला वर दिला की, 'माझ्या भक्तांस तूं मद्भक्तीचे प्रेम दे व यज्ञकर्मादि करून माझे स्मरण व पूजन जे करीत नाहीत, त्यांस विषयांचा मोह घाल. हा तुझा धर्म आहे. याप्रमाणे चालशील तर तुझे कल्याण होईल.' हा वर देऊन महोदर जाणार तो देवांनी त्याचे भजनस्तवनादिकांनी

पूजन केले व महोदर ' वर मागा ' असे ह्मणत असतांही ' मोहासुर ' शांत झाला, व धर्मसंस्थापना झाली. आता आह्मास तुझ्या अखंड भक्तिशिवाय काही नको ' असे विनयपूर्वक प्रार्थिले; वर देऊन महोदर अंतर्धान पावले; व शांत झालेला मोहासुर, संतुष्ट झालेले देव व सत्कार्यप्रचोदित ऋषी स्वस्वस्थानांप्रत आनंदाने निघून गेले.

नरनारायण–विष्णुसंवाद–मायाकालगति–युगधर्म–कलियुग वर्णन–आश्रमधर्म

सूत:-गणेशभक्तांनो ! सूर्य वालखिल्य ऋषींस आणखी कथा सांगत आहे, ती ऐका: मृकंडऋषींला मार्कंडेय नावाचा एक तेजस्वी मुलगा होता. मुंज झाल्यावर पुष्कळ वर्षे ब्रह्मचारी राहून त्याने गायत्री-पुरश्चरण केले. ते पाहून शंकर प्रसन्न होऊन भक्तिमुक्तिचे व ' दीर्घायुषी हो ' असे वर देता झाला. मार्कंडेयही शंकरभक्ति कायम ठेऊन तपश्चर्या करीत राहिला. त्याच्या आश्रमांत एक दिवस नरनारायण आले. हे नरनारायण ह्मणजे सूर्यपुत्र जो धर्म त्याने विष्णुभक्ति केली म्हणून विष्णूच धर्माच्या उदरी नरनारायणरूपाने अवतीर्ण झाला. यांत नर म्हणजे जीव व नारायण म्हणजे शिव होत. यांची जोडी हेंच वैष्णव ब्रम्ह आहे. यांनी वडिलांची आज्ञा घेऊन श्रेष्ठप्रतिची तपश्चर्या केली व विष्णूस प्रसन्न करून घेतले. प्रकट होऊन विष्णूने त्यांस गाणपत्य योगाचे रहस्य व मार्ग सांगितला. त्यांनीही एकनिष्ठ भक्ति करून गणपतीचा साक्षात्कार होईल अशी तपश्चर्या केली व देवापाशी अखंड भक्ति व शांति मागितली व मिळविली. नंतर ते कांही

दिवसांनी मार्कंडेयावर अनुग्रह करण्याचे इच्छेने त्याच्या आश्रमीं गेले व तत्कृत पूजेचा स्वीकार करून रघुकुलतिलक जो रामचंद्र त्याला ज्ञान कसे झाले, तो वृत्तांत सांगते झाले.

हा सांगण्याचे अगोदर त्यांनीं दुसऱ्या कांहीं स्मरणीय गोष्टी सांगितल्या. त्या अशा: ब्रम्ह्याचा पुत्र मरीचि, त्याचा कश्यप, त्याचा सूर्य, त्याचा वैवस्वतमनु, असा हा वंश आहे. हल्ली सातवा मनु आहे. ब्रम्हदेवाच्या एका दिवसांत म्हणजे चतुर्युगांच्या हजार चौकड्यांत, चौदा मनु होतात. प्रत्येक मन्वंतरांत मनु, देव, ऋषी, इंद्र व विष्णु, यांचे अवतार निरनिराळे होतात. प्रत्येक मन्वंतरांत ऋषींनी मुख्य तत्वे ध्यानांत ठेऊन व प्रत्यहीं नवीन ज्ञान संपादून मनुष्यांस ज्ञानाचा व कर्माचा उपदेश करावा, यज्ञयागादि कर्मे करावी व करवावी; वृष्टि वगैरे करून कर्मानुसार सर्वांचे परिपालन इंद्राने करावे; देवांनी आपआपले हविर्भाग ग्रहण करून कर्मकर्त्यास आदरपूर्वक स्वर्भोग द्यावे; विष्णूने अवतार घेऊन दैत्यांपासून इंद्रादि देवांचे रक्षण करावे; मनु-पुत्र-पौत्रांनी राजधर्म स्वीकारुन प्रजेचे पालन करावे; असा कार्यभाग नेमलेला आहे. एक मन्वंतर झाले म्हणजे लय होतो ब्रम्हदेवाचा एक दिवस झाला म्हणजे नैमित्तिक लय होतो व ब्रम्हदेवाचीं शंभर वर्षे भरलीं म्हणजे महाप्रलय होतो. याप्रमाणे त्रिगुणात्मक जे आहे ते जन्ममृत्युमय म्हणजे नाशवंत आहे. हीच माया होय. निमेष, काष्ठा (१५ निमेष), कला, मुहूर्त, दिवस, पक्ष, मास, ऋतु, अयन, संवत्सर, पंचसंवत्सर (१) संवत्सर, (२) परिवत्सर, (३) इडावत्सर

(४) अनुवत्सर व (५) वत्सर, अशी पांच वर्षांची निराळी नावे आहेत. सूर्यमास व चंद्रमास असे दोन प्रकारचे महिने आहेत. सक्रांतीने सूर्यमास व पौर्णिमेने किंवा अमावास्येने चांद्रमास मोजतात. मनुष्यांची ३३०० वर्षे म्हणजे एक सप्तर्षिसंवत्सर होतो व ९९०० वर्षे म्हणजे ध्रुवसंवत्सर होतो. तसेच देवांची ४००० वर्षे म्हणजे कृत, ३००० वर्षे म्हणजे त्रेता, २००० म्हणजे द्वापार आणि १००० वर्षे म्हणजे कलियुग अशी १०००० वर्षे व संधिकालाची २००० वर्षे मिळून १२००० वर्षे म्हणजे एक चौकडी होते. मुनिहो ! कृत युगांत ध्यान, त्रेतांत तप द्वापारांत पूजा व कलींत स्तुति (भजन) मुख्य असतात. कृतांत धर्म चतुष्पाद, त्रेतांत त्रिपाद, द्वापारांत द्विपाद व कलींत एक पाद असतो. कृतयुगांत ज्ञान, त्रेतांत सूर्य, द्वापारांत विष्णु व कलींत शंभु ही मुख्य दैवतें आहेत. चारी युगांत सर्वदेवाधीश गणपति आहे. कृतयुगांत त्याला ‘ विनायक ’ त्रेतांत ‘ मयुरेश, ’ द्वापारांत ‘ गजानन ’ व कलींत ‘ गणेश ’ म्हणतात. कृत युगांत आयुष्य १ लक्ष, त्रेतांत १० हजार, द्वापारांत १ हजार व कलींत शंभर वर्षे आहे. कृत युगांत प्रजा स्वधर्मनिष्ठ परोपकाररत, मत्सरशून्य व सदासुखी असते. त्रेतायुगांत परोपकार कमी, स्वार्थ जास्ती व लोभ मनस्वी असतो, द्वापारात स्वार्थप्रधान, कलहप्रिय, प्रजा होते. लोक बाहेरुन साधु पण आंतून कपटी असतात. कलि तर साक्षात् पापमूर्तीच आहे. या युगात स्वधर्म व परोपकार नष्ट होऊन कलह, मत्सर इत्यादि पूर्णत्वास जातात. सर्व प्रकारचे लोक दुष्टाचाररत होतात.

सूत :- मुनीहो ! दया, तप, शौच, आणि सत्य हे धर्माचे चार पाय आहेत. त्रेतायुगांत दया, द्वापारात दया व तप आणि कलियुगांत दया, तप आणि शौच लोपतात. कलियुगाच्या शेवटी गणेश 'ढुंढी' रूपाने अवतरून अधर्माचा नाश करतात व पुनः कृतयुगास सुरुवात होते. मुनिहो ! तुम्हांस ठाऊक आहे की, ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण व ब्रह्मचर्य, गृहस्थता, वानप्रस्थ व संन्यास असे चार आश्रम आहेत, क्षत्रिय व वैश्य यांस संन्यास नाही, शूद्रांना केवळ गृहस्थाश्रम आहे. ब्राह्मण मुलाची ५ वे किंवा ७ वे वर्षी मुंज करून त्यास वेदादिविद्याध्ययनासाठी गुरुगृही पाठवावे. तेथे त्याने दोन वेळ भिक्षा मागावी, गायत्रीजप करावा, त्रिकाल संध्या करावी, ॐकारयुक्त त्रिपदा गायत्रीचा जप न्यासपूर्वक करावा, भिक्षा गुरुस निवेदन करावी, ता देईल तेवढीच घ्यावी, दोन्ही वेळ अग्निसिद्ध करावा, गुरुगृहांतील जनांची सेवा करावी, श्मश्रु करु नये, स्त्रीसंगति ठेऊ नये, गुरु शिकवितील त्याचे अध्ययन करावे; याप्रमाणे विद्या संपूर्ण होईपर्यंत ब्रह्मचर्य धरुन वेदादिक कंठगत करावे, नंतर गुरुची पूजा करून व त्यास दक्षिणा देऊन विषयवासना असतील तर संसार करावा. व विषयी मन नसेल तर ब्रह्मचारी राहावे वा संन्यास घ्यावा. हा ब्रह्मचर्यविधी. याने उत्तम ज्ञानप्राप्ति होते गृहस्थाश्रम घेणाऱ्याने क्षौर करून घरी यावे व आईबाप, द्विज व देव यांच्या सेवेत तत्पर असावे. नंतर योग्य वधू पाहून लग्न करावे. ऋतुकाली मात्र भार्यासंगति असावी. यजन-याजन, दान-प्रतिग्रह, अध्ययन-अध्यापन ह्या षट्कर्मांचे नित्य आचरण करावे. स्नान, संध्या, जप, होम, देवपितृमुनितर्पण, अतिथिसेवा, देवतार्चन, स्वाध्याय, वैश्वदेव ही गृहस्थाची नित्यकर्मे आहेत दोन्ही चतुर्थ्या करून मग काय व्रते करणे असतील ती

करावी. नित्य शुचिर्भूत असावे. जे मिळेल त्यातील अर्धाभाग स्त्रीपुत्रांकडे, चतुर्थांश भाग मित्राकडे व दुसरा चतुर्थांश देवादिकांकडे उपयोजावा. आयुष्याच्या तिसऱ्या भागांत ह्मणजे पन्नाशी उलटल्यावर पुत्रकलत्रांस विचारून क्षेत्रवास किंवा वनवास पत्करावा. कंदमुळादिकांनी अग्निहोत्र, अतिथि, देव यांचे पूजन करुन शेष उरेल ते आपण भक्षावे. कोणतेही गृहस्थी भोगूं नयेत. जमल्यास पंचाग्निसाधन, जलवास, आकाशवास ऋतुमानाप्रमाणे करावा. हा वानप्रस्थाश्रमधर्म होय. शेवटच्या प्रहरांत ह्मणजे पाउणशे वर्षे झाल्यावर सर्वसंगपरित्याग करून संन्यास घ्यावा, ब्रह्मचिंतन करावे नित्य नव्या ठिकाणी वास करावा. करतलभिक्षा घ्यावी. सैन्यास त्रिदंडी (स्वधर्माचरण हा देहदंड. मौन हा वाग्दंड आणि आशाहीन मन हा मनोदंड होय.) किंवा कुटीचक (घरीच संन्यासव्रताने असणे) असावा. सदैव ' मी ब्रह्म आहे ' अशी भावना असावी. ' मला अमुक कर्तव्य करून अमुक मिळवायचे आहे ' अशी भावना नसावी; अथवा योगयुक्त असावे. लोकसंग्रह करावा. हा संन्यासाचा धर्म आहे. ब्राह्मणाचा धर्म ज्ञानसंग्रह करून त्याचा प्रसार करावा, यजन–याजन करावे हा आहे. त्याने अन्न उत्पन्न करणारा कोणताही धंदा करूं नये व भिक्षा मागू नये. क्षत्रियांनी सेवा करूं नये व संन्यास घेऊं नये. अग्निहोत्रादि विप्रांकडून करवावे. त्यांनी अध्ययन व यजन करावे व दान द्यावे वैश्यांनी क्रयविक्रय, कृषिकर्म व गोपालन करावे, अध्ययन, यजन व दान ही यांस विहित आहेत. अग्निकर्म, देवतार्चन, तर्पण हे त्यांनी ब्राह्मणद्वारा करावे, शूद्रांनी सेवा करावी, दान द्यावे, पुराणश्रवण करावे, वेद ऐकूं नयेत, नाममंत्राने पूजादिकर्मे करावी, पुराणोक्त मंत्रांनी श्राद्धादिकर्मे करावी सात वर्षांच्या आत मुलीचे लग्न करूं नये व दहा वर्षांच्या पुढे लग्न ढकलू नये. पति

हे स्त्रीचे मुख्य दैवत आहे. त्याची तिने एकनिष्ठ सेवा करावी. तो वानप्रस्थ झाला व आपल्यास लहान मुलेबाळे नसली तर पतीबरोबर वनांत जावे. तो संन्यास घेऊं लागला तर तिने त्यास अनुमति द्यावी ऋतुगामी तिनेही असावे. पति मेल्यावर एकभुक्त असावे; व्रतेवैकल्ये करून देह शोषवावा आणि ईश्वरचिंतन करावे. सर्वांनी श्राद्धपक्ष भक्तिने करावे. अमावास्या, व्यतिपात, वैधृतीला श्राद्ध इष्ट आहे. क्षेत्राचे ठिकाणी व मयुरपुरी श्राद्ध अवश्य करावे.

अंगरीष–मुचकुंद

सूत :- मुनिगणहो ! मनूला दहा पुत्र झाले. पण त्यात ज्येष्ठ जो सुद्युम्न तो गौरीवनांत गेल्यामुळे कन्या झाला. ! कारण त्या वनात जो कोणी शिरेल तो स्त्री होईल, असा शंकराने या वनाला शाप दिला होता. ही सुद्युम्ना ह्मणजे 'इला' यौवनभराने शोभू लागली. ती तेथे असता तिला चंद्रपुत्र बुध भेटला. दोघांचे मन जुळून त्यास पुरूरवा नावाचा पुत्र झाला. हा चंद्रवंशाचा मुळपुरुष होय. हा महापितृभक्त ह्मणून याच्या नावाचा श्राद्धांत उच्चार होतो. असो; पुढे सुद्युम्नाने तपद्वारा विनायक प्रसन्न करून पुनः पुरुषत्व प्राप्त करून घेतले. नंतर त्यास उत्कल, गय व विमित असे तीन पुत्र झाले. वृद्धपणी त्यांच्या हातात राज्यकारभार देऊन सुद्युम्न वनात गेला व गणेशभक्ति करून स्वानंदवासी झाला. सुद्युम्नाची इला झाली तेव्हा मनूने इक्ष्वाकूला राज्याभिषेक केला. त्याने सूर्याची तपश्चर्या केली, म्हणून याला सूर्यवंशाचा मूळपुरुष म्हणतात. गणेशवराने इक्ष्वाकूला 'विकुक्षि' झाला. त्याला राज्यभार देऊन इक्ष्वाकु

गणेशयोगाने स्वानंदवासी झाला. त्याचा पुत्र ककुत्स्थ हाही गणेशभक्त होता. नंतर पुत्रपौत्रपरंपरेने मांधाता उत्पन्न झाला. ह्याचे इंद्राने रक्षण केले होते. हाही महागणेशभक्त होता. ह्याचा नातु अंबरीष हा विष्णुभक्त व एकादशीव्रत चालविणारा होता. निर्जळी एकादशी करून द्वादशीला सूर्य उगवला नाही, तो हा पारणें सोडी. एकदा दुर्वासाने याचे सत्त्व पाहिले, ते असे:– एका द्वादशीस त्याला पारणे सोडण्यास बोलाविले, पण तो वेळेवर आला नाही म्हणून विष्णूतीर्थ मात्र घेऊन अंबरीषाने पारणे सोडले हे दुर्वासाला कळल्यावर त्याने राजाला शाप दिला व न जेवता तसाच गेला. राजा त्याची वाट पाहत तसाच उपाशी राहिला. एक वर्षभर त्याने उपवास केले. एक वर्षानंतर नारद तेथे आले व त्यांनी राजाला गणेशयोगाचा मार्ग सांगितला व षडक्षरी मंत्र देऊन त्याला तपश्चर्येला सिद्ध केले. त्याने उत्तम तपश्चर्या केली. तदनंतर दुर्वासऋषि आले व त्यांनी अंबरीषाची क्षमा मागून त्याबरोबर भोजन केले व त्यास व्रतमुक्त केले. अतिथीस बोलाविले असता तो आला नाही तर यजमानाने तो येईपर्यंत उपाशी राहावे हा नियम, हे व्रत, आहे. असो; पुढे अंबरीष गणेशपूजन करून मुक्त झाला. त्याचा मुलगा मुचकुंद होय. याने देवांचा पराभव करणाऱ्या दैत्यांशीं पुष्कळ वर्षे युद्ध करून त्यांचा पराभव केला. पण मुचकुंद या युद्धांत थकला होता त्याला विश्रांति हवी होती, म्हणून देवापाशी विश्रांति व ज्ञान त्याने मागितले. त्यांनी विश्रांतीसाठी मुचकुंदाला एक गुहा दिली व तेथे स्वस्थ नीज असे सांगितले. 'तुला जो जागा करील तो मरेल व तूं तेथे जागा होशिल तेंव्हा तुला वासुदेवरूपाने विष्णूचे दर्शन होईल व तो वासुदेव तुला ज्ञान देईल.' असा देवांनी वर दिला

व हा गंधमादन पर्वताच्या गुहेंत निजला. इकडे कृष्णावतारी कृष्णाने कंसाला मारले, जरासंधाचा सतरावेळ पराभव केला; पण यादवांचा पराभव करणाऱ्या कालयवनाला जरासंधाने मदतीस बोलाविले, तेव्हां यादवांस द्वारकेकडे हटून जाण्यास सांगून आपण स्वतः श्रीकृष्ण कालयवनाच्या समोरून पळत गेला कालयवन पाठीस लागला. याप्रमाणे पुष्कळवेळ हुलकवणी झाली. नंतर कृष्ण गंधमादन-पर्वतावरील गुहेंत जाऊन लपला. कालयवनाने तो निजलेला मुचकुंद पाहून हाच कृष्ण असे मानले, व लाथा मारून त्यास उठविले. त्याने कालयवनाकडे पाहतांच तो दग्ध झाला पुढे कृष्णदर्शन होऊन मुचकुंदाला कृष्णाने गणेशयोग सांगितला व आपण मथुरेला परत जाऊन यवनांचा व जरासंधाचा पराभव केला. मुचकुंदाने आमरण गणेशाराधन केले व शेवटी उत्तम लोकाप्रत गेला.

या मुचकुंदाच्या वंशात सगर ह्मणून एक राजा झाला. त्याच्या बायकोचे नांव भानुमती होते. त्या दोघांनी मिळून भृगुनामक योग्याची अराधाना केली. भृगुमुनि प्रसन्न होऊन त्यांस वर देता झाला कीं, 'तुह्मांस साठहजार पुत्र होतील; पण एक पुत्र मात्र वंशधर होईल. त्या वंशधराचे नांव असमंजस असे ठेवा.' हा असमंजस मोठा झाल्यावर त्याने आपल्या सर्व भावांस शरयू नदींत टाकले ह्मणून बापाने त्यास राज्याबाहेर हाकलून दिले' ह्या टाकून दिलेल्या साठहजार मुलांस राजाने योगबलाने बाहेर काढले. नंतर कांहीं दिवसांनी सगराने एकामागून एक असे नव्याण्णव अश्वमेध केले हे पाहून इंद्राला भय पडले व त्याने शंभराव्या अश्वमेधाच्यावेळी यज्ञाचा घोडा चोरला व पाताळांत कपिलमुनि तपश्चर्या करीत होते. त्यांच्याजवळ तो नेऊन ठेवला. सगराचे पुत्रही

महापराक्रमी होते. घोड्याच्या पावलांवरून त्याचा माग काढण्याकरिता ते पाताळापर्यंत भूमि खणीत गेले. ह्या खणलेल्या जागेतच महासागर उत्पन्न झाले. असो; सगराचे मुलगे पाताळात गेले व तेथे त्यांनी आपला घोडा पाहिला. जवळ कपिलऋषि होते. हांच चोर आहे असे समजून सगरपुत्रांनी कपिलास ठार मारण्याकरिता शस्त्रे उगारली. तो कपिलाच्या क्रोधाने ते सर्वच्यासर्व दग्ध झाले! नंतर नारदानी हे वर्तमान सगराचा नातू अंशुमान याला कळविले व 'पाताळांत जाऊन कपिलमुनीची स्तुतिपूर्वक पूजा कर ह्मणजे ते संतुष्ट होऊन यज्ञाचा अश्व परत देतील.' असे सांगितले. अंशुमानाने तसेच वागून कपिलमुनीकडून अश्व परत आणला व आपल्या आजाच्या ह्मणजे सगराच्या स्वाधीन केला. सगराने आनंदार्थ शंभरावा यज्ञ पूर्ण केला आणि नातवास राज्यावर बसवून आपण गणेशोपासनेसाठी अरण्यात गेला. त्याची अनन्य भक्ति पाहून श्रीगणपती प्रसन्न झाले व साक्षात्कार देऊन त्यास मुक्त केले. अंशुमान राजाही गणपतिभक्तच होता. त्याचा नातू राजा भगीरथ सद्धर्माने प्रजापालन करीत असता एकदा नारदमुनि तेथे आले व त्यानी कपिलक्रोधाने सगरपुत्र दग्ध झाले हा वृत्तांत सांगून भगीरथाला उपदेश केला की, 'स्वर्गातून गंगानदी खाली आणून तिच्या जलाने तुझ्या पूर्वजांची रक्षा भिजली तर मात्र त्यास उत्तम गति मिळेल. पितरांचा उद्धार करणे हे वंशजांचे कर्तव्य आहे, ह्मणून ऊठ आणि गंगानदी आणण्याची खटपट कर.' भगीरथास तो उपदेश मान्य झाला. त्याने शंभर वर्षे तपश्चर्या केली व गंगानदी प्रसन्न होऊन तिने भगिरथपितरांचा उद्धार करण्याचे कबूल केले; पण ती ह्मणाली 'मी ज्या वेगाने खाली येईन तो सहन करण्यास एक शंकर मात्र समर्थ आहे, तेंव्हा त्यास प्रसन्न करून घे.

भगीरथाची एकनिष्ठ तपश्चर्या पाहून शंकर प्रसन्न झाला व आपल्या मस्तकावर 'गंगानदीचा ओघ उतरूं दे' असा वर भगीरथास देता झाला. 'आपण सर्वश्रेष्ठ' असा गंगानदीला गर्व झाला होता, तो शंकराच्या अनंत जटाभारातून आपल्यास बाहेर येण्याचे सामर्थ्य नाही असे पाहून नाहीसा झाला व शंकराने तिला भूमिलोकावर जाण्याची परवानगी दिली. भूमीवर उतरून गंगानदी सगरपुत्रांकडे जावयास निघाली. वाटेत जन्हुराजा समाधि लावून बसला होता. तो वाट सोडीना म्हणून त्याला बुडविण्यासाठी त्याच्या अंगावरून ती गेली. तो त्या राजर्षीने सर्व गंगानदी प्राशन करून टाकली! नंतर भगीरथाने पुनः तपश्चर्या करून जन्हूस प्रसन्न करून घेतले व गंगानदीस मुक्त करा अशी प्रार्थना केली. संतुष्ट झालेल्या जन्हूने आपली मांडी फोडून तिला बाहेर काढली. यास्तव गंगेला जान्हवी म्हणतात असो, गंगानदीने दग्ध सगरपुत्रास स्नान घालून त्यांचा उद्धार केला. भगिरथाने गंगानदीला भूमिलोकावर आणली म्हणून तिला भागीरथी म्हणतात. राजा भगीरथ गणेशभक्त होता. उत्तम प्रकारची भक्ति करून तो मोक्षपद मिळविता झाला. त्याच्या वंशात राजा दशरथ हा कश्यपांशाने जन्म पावला. त्याला कौसल्या, कैकेयी व सुमित्रा अशा तीन भार्या होत्या. पुष्कळ दिवसपर्यंत त्याला पुत्रप्राप्ती झाली नाही. हे पाहून वसिष्ठाने दशरथाला गणेशाचा दशाक्षरी मंत्र जपण्यास सांगितले. वायुभक्षण करून दशरथाने शंभर वर्षे गणेशमंत्राचे पुरश्चरण केले. गणपती प्रसन्न झाले व त्यांनी वर दिला की, 'तुला अखंड भक्ति व उत्तम प्रकारची कीर्ती मिळविणारे चार पुत्र होतील.' रावणवधाकरिता गणपतीनी विष्णूस आज्ञा केली की, 'तुम्ही निरनिराळे चार देह

धारण करून दशरथांच्या उदरी या व राक्षसांचा नाश करून आणि सद्धर्मांची स्थापना करून देवास संतुष्ट करा.

सूत :- शौनकादिकहो ! तुम्हाला रामाचा जन्म, विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करून रामाने राक्षसांचा संहार केला, विश्वामित्रानी रामास अस्त्रविद्या दिली, शंकराचे धनुष्य सज्ज करून रामाने जानकी मिळविली, कैकयीने दशरथापासून वर घेऊन रामाला चौदा वर्षे वनवासास धाडले, दंडकारण्यांत सीतेसह व लक्ष्मणासह रामचंद्र राहत असता, मायावी रावणाने जानकीचे हरण केले; शिवांनी उपदेश केल्यावर रामाने गणेशयोगद्वारा गणपतीस प्रसन्न करून घेतले, व त्याच्यापासून असे वर मिळविले कीं, 'ज्यायोगें गणेशाची अखंड भक्ति राहील, मनास शांति मिळेल; नित्य स्मरण असेल व गेलेली जानकी परत मिळेल;' नंतर सुग्रीवहनुमानादिकांशी सख्य करून रामाने लंकेवर स्वारी केली; गणपतिस्मरण करून रामाने रावणादिकांचा वध केला, देवांची सुटका करून, बिभीषणास लंकेचे राज्य देऊन व वेदोक्तधर्माची स्थापना करून रामचंद्र सीतेसह अयोध्येस परत आला; आणि गणेशभक्तिकरून शांत मनानें निजधामास गेला; इत्यादि वृत्तांत तुम्हांस विदितच आहे. ऋषोहो ! मार्कंडेयऋर्षीच्या विनंतीवरून सूर्यानें, जन्ममरण देणारी, सुखदु:ख उत्पन्न करणारी व कामक्रोधादिकांस जन्म देणारी जी विलक्षण माया, तिचा प्रभाव मार्कंडेयास दाखविला आणि हेरंबमंत्राचें रहस्य सांगून गणपतिभजनपूजन करण्याकरिता त्याने मार्कंडेयास वनांत पाठवून दिले.

पुरूरवस आख्यान–नहुष

सूत :- मुनीहो ! अत्रिऋर्षींचा मुलगा जो चंद्र त्याने गणपतीचे आराधन केले आणि त्याच्या कृपेने तारकांचे, ब्राह्मणांचें व औषधींचें

आधिपत्य मिळविले; पण कांहीं कालाने तो गणपतीचे भजनपूजन विसरला, त्याला मोह प्राप्त झाला आणि तो विषयसेवनामध्ये निमग्न झाला. एकदां बृहस्पतीची भार्या तारा तीर्थावर स्नान करण्यास एकटीच आली आहे असे पाहून, ती नको नको असे ओरडत असतां, चंद्राने तिला हट्टाने नेले. चंद्रापासून तिला गर्भ राहिला. अशा स्थितींतही बृहस्पतीने आपली बायको परत मागितली. चंद्र तिला परत देईना. तिला घेऊन तो राक्षसगुरु जो शुक्र, यांच्याकडे गेला. राक्षसांनी चंद्राला आश्रय दिला. हे पाहून शंकरप्रमुख देवांनी राक्षसांच्या राज्यावर स्वारी केली. देव दैत्यांचे युद्ध जुंपले व ते अहोरात्र महिनाभर चालू राहिले. देवांचा व दैत्यांचा पुष्कळच संहार होत आहे हे पाहून बृहस्पतीला पश्चाताप झाला. ‘ आपण गणपतीस विसरलो, त्यायोगाने विघ्नें उत्पन्न होऊन बंधुविरोध झाला, देवदैत्यांचा नाश होत आहे, देवा ! आता पुढे काय होणार. मी तुला अनन्यभावाने शरण आलो, कृपा कर आणि या विघ्नांचा नाश कर,’ अशी त्याने गणपतीची प्रार्थना केली. चंद्रालाही पश्चात्ताप झाला आणि त्याने गणपतीपाशी तेच मागणे मागितले. दयाळू गणपतीनी तेथे ब्रह्मदेवास पाठविले. ब्रह्मदेवाने बृहस्पतीची बायको तारा बृहस्पतीस दिली. तारेच्या उदरीं जो गर्भ होता त्याने सांगितले की माझा जन्म चंद्रापासून आहे ! त्यावरून तो गर्भ ब्रह्मदेवाने चंद्राच्या स्वाधीन केला त्याच गर्भाचे नांव बुध हे होय. त्यालाच सौम्य असेही म्हणतात. ह्याच बुधाचा मुलगा पुरूरवा होता. त्याच्या जन्माची कथा मी तुम्हांस सांगितलीच आहे. हा राजा धर्मनीतीने पृथ्वीचे राज्य करीत होता. एकदा असे झाले कीं त्याच्या बागेंत उर्वशी नामक एक

अप्सरा हिंडत होती, तिला पाहून राजा मोहित झाला व माझी धर्मपत्नी हो ' असे त्याने तिला विनंती केली. तीं म्हणाली ' हे माझे दोन मेंढे आहेत, ह्यांचें उत्तम रक्षण करीन व दिगंबर स्थितींत तुला कधीही दिसणार नाही ' असे वचन देत असशील तर घृत मात्र भक्षण करून मी तुझ्या येथे राहीन.' राजाने ते सर्व कबूल केले आणि मुनिशापाने मृत्युलोकी आलेल्या उर्वशीस राजवाड्यांत नेले त्यांचा लग्नसमारंभ मोठ्या थाटाचा झाला. त्यांस आयु आदिकरून सहा मुलगे झाले. ह्याप्रमाणें ती उभयतां सुखाने नांदत होती पण इकडे स्वर्गलोकीं इंद्रास उर्वशीवांचून चैन पडेना; तेंव्हा त्याने विश्वावसुप्रमुख गंधर्व तिला आणण्यासाठी पाठविले. कपट करून त्यांनी ते उर्वशीचे दोन मेंढे उचलले व उर्वशीला जागी करून ते मेंढे घेऊन चालते झाले उर्वशी ओरडली व राजास उठवून त्याला मेंढ्याचे संरक्षण करण्यास सांगितले. लगबगीने दिगंबर राजा उठून धनुष्यबाण घेण्यास तातडीने निघाला, तो नीलाकाशांत विजेचा लख्ख प्रकाश पडून राजाची दिगंबर स्थिति उर्वशीने पाहिली. तिला राग आला आणि लागलीच ती गंधर्वांच्या पाठीमागे स्वर्गास निघून गेली. पाठीमागे हाय हाय करीत राजा धरणीवर मूर्छित पडला. काही वेळाने सावध झाला, पण त्यास अत्यंत शोक झाल्यामुळे तो भ्रमिष्ट झाला व उर्वशी ! ' ' उर्वशी ! ' असे दीनवाणींने ओरडत रानावनात हिंडू लागला. एक वर्षभर हा राजा वेड्यासारखा हिंडत होता. वर्षाच्या अखेरीस उर्वशी त्याच्या दृष्टीस पडली. तिचे त्याने आर्जव केले. व मागच्यासारखी चुकी पुन्हा करणार नाही; असे हात जोडून सांगितले. उर्वशी म्हणाली, मी गंधर्वांच्या स्वाधीन आहे, ह्मणून पितृयज्ञ करून तूं त्यांस संतुष्ट कर, ह्मणजे त्यांच्या कृपेने

तुला स्वर्गांत राहता येईल आणि तुझी माझी संगति घडेल एवढ्यानेही राजाचे समाधान होईना, तेव्हा प्रतिवर्षी एक दिवस मी येथे येत जाईन असे तिने वचन दिले. राजाने पितृयज्ञ करून पितृगणास संतुष्ट केले. त्यांनी पुरुरव राजास वर दिले की, ‘ उर्वशी अप्सरा तुला मिळेल आणि श्राद्धकाळी सर्व देवास ‘ पुरुरवसंज्ञक असे आव्हान केले असता मात्र ते श्राद्धभोजनास येतील. ’ याप्रमाणे वरप्राप्ति करून घेऊन राजा सुखाने राज्य करू लागला, आणि निधन पावल्यावर स्वर्गलोकी उर्वशीच्या समागमाचा त्यास लाभ झाला. पुढे विषयभोगांचा कंटाळा येईल असा नारदाने त्यास उपदेश केला, व राजाच्या विनंतीवरून त्याला गणेशयोगाची दीक्षा दिली. राजाने पुष्कळ वर्षे एकनिष्ठ गणेशोपासना केल्यावर गणपति प्रसन्न झाले आणि त्यास मुक्त करून स्वानंदवासी केले. या राजाचा नातू नहुश राजा होय. याने सर्वत्र अजिंक्यपत्रे घेऊन शंभर यज्ञ केले. इंद्र रागावला; पण धर्मनिष्ठ राजाला इंद्राच्या हातून कोणताही उपद्रव होऊं शकेना. पण याच वेळी अहल्येला भ्रष्ट करणाऱ्या इंद्राला गौतमाने ‘ सर्व भ्रष्ट होशील ’ असा शाप दिला होता. तो योग प्राप्त होऊन स्वर्गांतील देवांस ‘ राजा नाही ’ असे झाले, राक्षसांनी स्वर्गावर स्वारी केली. अर्थातच देव व देवर्षी घाबरले. तेव्हा बृहस्पतीने त्यास मंत्र सांगितला की, ‘ तुह्मी राजा नहुष यास इंद्र करा, तो तुमचे संकट निवारण करील. ’ याप्रमाणे राजा नहुषला इंद्रपद मिळाले. हे असह्य वैभव नहुष राजाला गर्वयुक्त करते झाले. तो भोगरत झाला. इंद्राची भार्या शची आपल्यास असावी असे त्यास वाटू लागले. गणेशभक्ति उत्तम केल्यामुळे इंद्राची शापमुक्त होण्याची वेळ येऊन पोंचली होती. इकडे बृहस्पतीने राजा नहुषास

सांगितले की, 'शचीची मर्जी सुप्रसन्न करण्याकरिता तूं आपल्या पालखीस ब्राह्मण भोई लावून तिच्याकडे जा ह्मणजे ती तुझी मनकामना पूर्ण करील. नहुषाने पालखी वाहण्यासाठी ब्राह्मण बोलावून आणले त्यात दुर्वांस होता. असो; पालखी लौकर लौकर चालविण्यासाठी उतावळा राजा 'सर्पध्वं (लौकर चला)' असा वारंवार ओरडत होता. ते ऐकून दुर्वांस ऋषि प्रकुप्त झाला. आणि 'सर्पो भव' (तू सर्प होशील)' असा त्याने शाप दिला. हा शाप ऐकल्याबरोबर राजाचा गर्व गेला आणि त्याने दुर्वांस ऋषींच्या पाया पडून 'मला उःशाप द्या' अशी करूण स्वराने याचना केली दुर्वांसासही दया आली. ते ह्मणाले 'तुझ्या वंशात युधिष्ठिर या नावाचा एक धर्ममूर्ति राजा होईल. त्याचे दर्शन तुला झाले, व त्याने तुला ज्ञानाचा उपदेश केला, ह्मणजे तुझी सर्पयोनि सुटेल व तू मुक्त होशील. राजा ! वेदधारण करणाऱ्या लोकांचा छळ झाला असता धर्म लोप होतो हे ध्यानात ठेव;' असे ह्मणून दुर्वांस निघून गेले. व राजा सर्प होऊन खाली पडला.

तथापि त्याची पूर्वपुण्याई मोठी होती म्हणून गणेशभजन पूजनाची बुद्धि त्यास झाली. त्याने गणेशउपासना केली. पुष्कळ वर्षांनीं पंडुपुत्र भीमसेन, हा सर्प रहात होता तेथे गेला, तेव्हां त्याने भीमास जखडून टाकले. त्याला सोडविण्यासाठी राजा युधिष्ठिर येथे धांवत आला. तेव्हां 'धर्मराजा ! नहुष, मी तुझा पूर्वज आहे; मला ज्ञान देऊन तूं माझा उद्धार कर,' 'बरे आहे' असे युधिष्ठिराने नमस्कारपूर्वक उत्तर दिले. नंतर नहुषाने सत्य म्हणजे काय इत्यादि प्रश्न विचारले, त्यांस धर्माने उत्तरें दिली. ती अशीः–' सत्य म्हणजे ब्रह्म; हे जगमायामय आहे, स्वधर्म हा उत्तम धर्म होय, स्वधर्मलोप हे

महापातक आहे, मी व माझें ' हें बंधन आहे, ही बंधनें नसणें हाच मोक्ष होय, चित्ताचा निरोध करणें हा योग आहे. निर्विषय मन असणें ह्याला ध्यान ह्मणावे, सत्कर्म हेच कर्म, ब्रह्माला अर्पण केलेलें कर्म बद्धक होत नाही, पापाचरणाला विकर्म म्हणतात; ' मीं ब्रह्म आहे ' ह्याला ज्ञान म्हणावे, शीतोष्ण, सुखदुःख, भयाभय, हीं द्वंद्वें जेथें समरुपाची झाली, तेथेच तपाचा मूर्तिमंत अवतार आहे असे पंडित म्हणतात, गणेश हे मुख्य दैवत होय, देवाचें भजन हे सार, आणि विषयांचे भजन हे असार होय; वेदसंमत ते मान्य, वेदविहीन ते अमान्य म्हणावे. आपल्या बुद्धीमध्ये राहून बुद्धीला चालना देणारा तो सर्वेश्वर होय ' ही उत्तरे ऐकून नहुषाचे समाधान झाले. इतक्यांत स्वर्गींहून नहुषाला घेऊन जाण्यास एक विमान आले आणि गणेशभजन करीत राजा स्वर्गास जाऊन अनंत सुख भोगता झाला.

ययातिचरित्रें

सूत म्हणतो :-मुनिहो ! नहुष कथेनंतर मुद्गलांनी ययाति राजाची कथा दक्षास सांगितली. ती अशीः- एकदा शुक्राची मुलगी देवयानी व राजा वृषपर्वा याची मुलगी शर्मिष्ठा, ह्या दोघीजणी क्रीडा करून स्नानासाठी पाण्यामध्ये उतरल्या. स्नान आटोपून शर्मिष्ठा प्रथम बाहेर आली आणि गडबडीने देवयानीचे वस्त्र नेसली. हे पाहून देवयानीने शर्मिष्ठेची पुष्कळ निर्भत्सना केली. शर्मिष्ठेनेही उत्तरास प्रत्युत्तर दिले व सखींच्या साहाय्याने देवयानीला विहिरींत ढकलून दिले. दैवयोगानें त्याच वेळी मृगया करून थकलेला राजा ययाति तेथे आला. देवयानी विहिरींत बुडत आहे असे पाहून कृपाळू राजाने तिचा हात धरून

तिला बाहेर काढले. नंतर, त्याचें सुंदर स्वरुप व उदार स्वभाव पाहून 'आपण मला हात धरून बाहेर काढली; व माझें पाणिग्रहण केले, म्हणून आपण माझें पाणिग्रहण करावे' अशी, तो ययातिराजा आहे असें समजल्यानंतर देवयानीने त्याची प्रार्थना केली. ययातीनेही तिच्या म्हणण्यास मान दिला; देवयानीला कोणीही ब्राह्मण वरणार नाही असा शाप होता. असो; बापाचे संमती घेण्याकरिता देवयानी ययातीस विचारून घरी गेली. घरी तिने आपल्या बापाजवळ सर्व हकीकत सांगितली. शुक्राने मुलीला लग्नाची परवानगी दिली, पण झालेला प्रकार ऐकून शुक्राला वाईट वाटलें. आणि 'माझी तुला गरज असेल तर शर्मिष्ठेला दासी करुन देवयानीबरोबर ययातीच्या घरी पाठव. जरुर नसेल तर मी निघून चालता होतो!' असे शुक्राने राजास दरडावून सांगितलें. राजासही ते मान्य करावेच लागलें. ह्याप्रमाणें शर्मिष्ठा देवयानीची दासी झाली व ययातीच्या घरी राहूं लागली. पुढे देवयानीला नकळत शर्मिष्ठेचा व ययातीचा गुप्तविवाह होऊन त्यापासून तिला अति सुंदर असे तीन पुत्र झाले. देवयानीला हा वृत्तांत कळल्यावर रागावून ती माहेरीं गेली. तिचे दुःख पाहून शुक्रमुनीने 'राजा वृद्ध होईल' असा ययातीला शाप दिला. ययाति वृद्ध झाला! पण विषयभोगाची इच्छा तृप्त झाली नव्हती म्हणून त्यास अतिशय वाईट वाटले. नतर तो पश्चात्तापयुक्त होऊन शुक्राकडे गेला, आणि 'देवयानी-शिवाय अन्य स्त्रीशीं मी संबंध ठेवणार नाही' अशी करुण स्वराने त्याने शपथ घेतली. नंतर शुक्राने राजास सांगितले की, 'तुझ्या मुलांपैकीं कोणी तुझें वार्धक्य घेऊन आपले तारुण्य तुला देण्यास कबूल असेल तर तू पुन्हा तरुण होशील.' तारुण्य-

प्राप्तीसाठी देवयानीस घेऊन राजा स्वनगरीस गेला व आपल्या मुलांजवळ तारुण्य मागू लागला. शर्मिष्ठेचा मुलगा पुरु याने मात्र बापाचे ह्मणणे कबूल केले. नंतर अनेक प्रकारचे भोग भोगून व पुष्कळ यज्ञ करून तो राजा ययाति स्वर्गास जाता झाला. जाताना पुरूला सार्वभौमत्व देऊन, ययाती पुत्राच्या ऋणांतून मुक्त झाला. स्वर्गास गेल्यावर ययातीने उत्तम प्रकारचे भोग भोगले. पण तेथे त्याला 'मी सर्व श्रेष्ठ आहे' असा गर्व झाला, तेव्हा इंद्राने त्यास स्वर्गांतून खाली ढकलून दिले; पण शिबी इत्यादि त्याच्या मुलीचे मुलगे होते. त्यांनी आपले पुण्य ययातीस दिले व तो पुन्हा स्वर्गास गेला तेथे नारदाचा उपदेश घेऊन त्याने गणेशभक्ति केली; आणि अंती गणेशलोकांस गेला.

कृतवीर्य चरित्र–सहस्त्रार्जुन व परशुराम

सूत :– पुरुराजाच्या वंशात कृतवीर्यनामक एक राजा झाला, त्याची कथा सांगतो ऐका : पूर्वी माहिष्मती नगरीमध्ये भीम या नावाचा पापी व द्रव्यलोभी अंत्यज रहात असे. तो वाटमाऱ्याचा धंदा करी व पशूंचे मांस विकित असे. एकदा माघ महिन्याची कृष्ण-चतुर्थी प्राप्त झाली. त्या दिवशी तो पुष्कळ हिंडला, पुष्कळ पर्वत व अरण्ये त्याने पालथी घातली, पण त्याला खाण्याचा किंवा पिण्याचा एकही पदार्थ मिळाला नाही. सहजच त्याला उपवास घडला. सूर्य-अस्त झाला तेंव्हा त्याने घरी जाण्याची तयारी केली व परत फिरला. वाटेत त्याला बारा ब्राह्मण भेटले त्यास ठार मारून व त्यांचे जवळ काय होते नव्हते, तेवढे लुबाडून तो चंद्रोदयी घरी परत आला. चंद्रोदयानंतर भोजन करताना त्याने आपल्या गणेश नावाच्या मुलास हाक मारली ! पुन्हा आणखी एका चतुर्थीचे वेळी त्याने तसेच पाप केले; पण त्या

चंद्रोदयाच्या वेळी तो मरण पावला. तेव्हा त्याला नेण्याकरता गणेशदूत विमान घेऊन आले. स्वर्गलोकी पुष्कळसे भोग भोगून तो मृत्युलोकी ययातीच्या वंशात कृतवीर्य या नावाने पुन्हा जन्मास आला. हा मोठा धार्मिक राजा होता. याने पुष्कळ दिवस उत्तम प्रकारचे राज्य करुन प्रजेस पुष्कळ सुख दिले. पण संतान नव्हते म्हणून राजा स्वतः अति दुःखी होता. पुढे प्रधानादिकावर राज्यभार सोपवून राजा कृतवर्मा स्त्रीसह अरण्यांत तपश्चर्या करण्याकरिता गेला. त्याने पुष्कळ दिवस उग्र तपश्चर्या केली; ती इतकी कीं, त्याचे शरीरावर केवळ अस्थि व चर्म मात्र शिल्लक राहिले. सर्वांस वाटले कीं, राजदंपत्याचा अंत लौकर होणार त्याचा बाप धनक हा स्वर्गामध्ये होता. ब्रह्मदेवाकडे जाऊन 'माझ्या मुलास पुत्रप्राप्ति लवकर कशी होईल याचा उपाय सांगा.' अशी त्याने विनंति केली. त्यावर ब्रह्मदेव म्हणाला, 'सर्व संकटांचा व सर्व पापांचा नाश करणारी जी संकष्टी–चतुर्थी तिचे उपवासपूर्वक व्रत तुझ्या मुलाने केले, व चतुर्थीच्या दिवशी पुण्याचरणच, जर केले तर तुझ्या मुलाचे मनोरथ पूर्ण होतील. तुझ्या मुलाने पूर्वजन्मी चतुर्थीच्या दिवशीच बारा ब्राह्मणांचा वध केला आहे ते पाप तुझ्या पुत्रास नडत आहे या पापाचा नाश केवळ चतुर्थी व्रताने मात्र होईल.' हें ऐकून धनकाने चतुर्थी व्रताचा उपदेश कृतवीर्याला स्वप्नामध्ये जाऊन केला. निर्जळ उपवास, गणेश व चंद्र यांस अर्घ्यप्रदान, चतुर्थीच्या दिवशीं सर्व दिवसभर गणेशस्मरण, चंद्रोदयीं पूजनपूर्वक ब्राह्मण–दंपत्य–भोजन हे मुख्य विधि होत. चतुर्थीचे रात्रीं गणेशकीर्तनही करावे. याप्रमाणें राजाने सर्व विधि पाळून गणपतीचे हे उत्तम व्रत निर्दोषरीतीने पाळले याप्रमाणे एक

वर्षभर व्रतपालन केल्यावर राजाचे सर्व पूर्वपाप नाहीसे झाले. नंतर त्याला एक पुत्र झाला. पण दुर्दैवाने तो पुत्र हस्तपाद शून्य होता. पण राजाला दत्ताने धीर दिला होता, म्हणून त्याने मोठा पुत्रोत्सव केला. बारा वर्षे लोटल्यावर दत्त योगी तेथे आला आणि त्या मुलास हस्तपदादि अवयव येतील म्हणून सांगितले पुढे कृतवीर्याने गणेशभक्ति उत्तम प्रकारची केली आणि तो गणेशलोकास गेला. कार्तवीर्यानेही एकनिष्ठ गणेशभजनपूजन केले, तेव्हा तो पूर्णांग झाला व त्याला सहस्र भुज प्राप्त झाले. तो महाबली, महावीर्यवान् आणि महातेजस्वी झाला.

सूतः- मुनिहो ! कार्तवीर्याने, पुष्कळ दिवस धर्माने व नीतीने राज्य केले व पृथ्वीवरील सर्व राजांचा पराभव करून सार्वभौमत्व संपादन केले सहस्रार्जुन हे नाव त्याला देवांनींच दिले होते. त्याचे सैन्य प्रचंड व तो स्वतः शूर होता म्हणून त्याचा देवादिकांस सुद्धां धाक वाटे. एक दिवस हा स्त्रीसहवर्तमान स्नान करण्याकरिता नर्मदेच्या कांठी गेला तेथे स्नान करीत असता सहज आपल्या हजार बाहूंनी नर्मदेच्या जलाचा ओघ त्याने लीलेने थांबवून धरला. इकडे रावण आपल्या भावांसह शंकराची पूजा करीत नर्मदेच्या वरच्या अंगास बसला होता तेथपर्यंत नर्मदेचे पाणी आले ! हा नर्मदचा ओघ कोणी अडविला हे पाहून रावण आपल्या भावांसह व सहा प्रधानांस बरोबर घेऊन कार्तवीर्याला मारण्याकरिता क्रोधाने धावला. उभयतांचे मोठे गदायुद्ध झाले. कार्तवीर्याने रावणाचे कवच फोडले, त्याला खाली पाडले घरी नेले आणि दहा तोंडांचे बाहुले म्हणून दिवाणखाण्यात खेळणे करून ठेवले ! काही दिवसांनी रावणास त्याच्या आजोबांनी सोडविले. असो; कार्तवीर्याने पुष्कळ यज्ञ केले.

भिक्षुक जी दक्षणा मागतील ती त्यास दिली. प्रजेस स्वधर्माने चालावयास लावले, आपण गणेशभक्ति केली, आणि इहलोकांचे सर्व सुख भोगले. पण दुर्दैवाने काही काळ गेल्यावर त्याला गर्व-मोहांचा विकार झाला. त्याचे गणेशभजन सुटले आणि तो पापकर्म करण्यास प्रवृत्त झाला. पुढे एके दिवशी, मृगया करीत करीत राजा जमदग्नीच्या आश्रमात सहज गेला. जमदग्नि व सहस्रार्जुन या उभय-तांनी एकमेकांचे कुशल विचारले, स्तुति केली आणि पूजा केली. मुनीच्या आग्रहावरून राजा सहस्रार्जुन आपल्या सैन्यासह भोजनास राहिला. जमदग्नीनें रेणुकेला म्हणजे आपल्या स्त्रीला कामधेनूची प्रार्थना करून सर्व सैन्यास पुरेल असें चारी प्रकारचे उत्तम अन्न उत्पन्न कर-ण्यास सांगितलें. कामधेनूच्या कृपेनें सर्वांचें समाधान होईल असें सुग्रास अन्न, उत्तम फळें, सुवासिक तांबूल इत्यादि सर्वांस मिळालें. जमदग्नीनें राजास पाठवणीचीं वस्त्रेंही दिलीं. हा सर्व प्रकार पाहून राजास अतिचमत्कार वाटला आणि 'मला ही कामधेनु द्या' अशी त्याने जमदग्नीस विनति केली. पण मुनि कामधेनु देईना. हें असें पाहून राजानें हट्टानें ती गाय नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां गाईच्या अंगापासून अनेक प्रकारचे वीर उत्पन्न झाले व लीलेनें त्यांनीं राजसैन्याचा पराभव केला. राजा पळून गेला व कामधेनु स्वर्गास निघून गेली. पुढें पुनः परत येऊन राजानें जमदग्नीस ठार मारलें व रेणुकेस एकवीस बाण मारून तिला विव्हल केलें. रेणुका रागावली आणि तिनें राजास शाप दिला कीं, 'तुझे हजार बाहू नाहींसे होऊन तू लवकरच मरशील.' हें ऐकून दुःखी झालेला राजा परत

फिरला. इकडे रेणुका पतीसाठी शोक करूं लागली. कांही वेळानें परशुरामाचें स्मरण तिनें केलें. परशुराम तेथें आनंदानें आला, पण मातापितरांची ती अवस्था पाहून त्याचें हृदय फुटलें व तो ओक्साबोक्शीं रडूं लागला. तेंव्हां आईने त्यास सांगितलें, 'तूं आह्मां दोघांची उत्तरक्रिया कर, कार्तवीर्याचे हात तोड, त्याला मारून टाक, त्याचें रक्त आपल्या वडिलांस समर्पण कर, म्हणजे त्यांचें समाधान होईल; आणि त्यानें मला एकवीस बाण मारले आहेत म्हणून एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी कर म्हणजे माझें समाधान होईल.' असें म्हणून ती स्वर्गास गेली. परशुरामानेंही आईनें सांगितल्याप्रमाणें उत्तर-क्रिया केली. रेणुका व जमदग्नि ह्यांनीं स्वर्गलोकीं श्रीगणेशाचें उत्तम आराधन केलें व त्यास प्रसन्न करून घेतलें. गणपतींनीं 'तूं सदा शांत राहशील' असा जमदग्नीस आशीर्वाद दिला, व 'रेणुके! तुला सर्व देव, देहयुक्त पाहतील' असा वर दिला व त्यांस पुन्हा मृत्युलोकीं सदेह पाठविलें. तीं उभयतां आश्रमांत आल्यावर परशुरानें वडिलांस सांगितले कीं, 'मी आतां, आईस वचन दिल्याप्रमाणे, कार्तवीर्याचा व क्षत्रियांचा नाश करण्यास जातो.' हिंसा करू नको' असा जमदग्नीने पुष्कळ उपदेश केला, पण परशुराम आपला आग्रह सोडीना; तेव्हां त्यास गणेशमंत्राची दीक्षा देऊन तपश्चर्या करण्यासाठी वनांत पाठविले. परशुरामाने एकानिष्ठ तपश्चर्या करून गणपतीस प्रसन्न करून घेतलें. गणपतींनी वर दिला कीं 'तूं कार्तवीर्यास मारशील, एकवींस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी करशील आणि

तुझा सर्वदा जय होईल.' हे वर देऊन गणपतींनीं आपला परशु जामदग्न्य रामास दिला. तो घेऊन रामाने कार्तवीर्याचे हात तोडले; त्याला ठार मारले; एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केली आणि आपल्या पूर्वजांस क्षत्रियांच्या रक्ताने तृप्त केले. पुढें रामानें अनेक यज्ञ करून सर्व पृथ्वी ब्राह्मणांस देऊन टाकली आणि समुद्राजवळून जमीन मागून घेऊन आपण तेथें राहिला. 'दक्षा!' मुद्गलऋषि सांगतात, 'अद्यापिही परशुराम तेथें गणपतींचें भजनपूजन करीत राहिला आहे!'

सूत:– ह्याच कार्तवीर्याच्या कुळांत भोजांचा व वृष्णींचा जन्म झाला. यादवकुळांत उग्रसेन, देवक, वसुदेव, इत्यादि मोठमोठाले पुरुष झाले. वसुदेवाच्या पत्नीचें नांव देवकी होय. ह्यांच्याच उदरीं श्रीजगद्गुरु वासुदेव अवतीर्ण झाला. हा विष्णूचा अवतार भूमीचा भार हरण करण्याकरितां व साधूंचे पालन करण्याकरितां विष्णूनें घेतला होता. वसुदेव आणि रोहिणी यांच्या उदरीं बलरामाचा जन्म झाला. असो!

सूत:–एकदां देवांनीं राक्षसांचा पराभव केल्यावर राक्षस पळून गेले. असें असतांही देवांनी पुन्हां त्यांच्यावर स्वारी केली. देव आलेसे पाहून राक्षस शुक्रपत्नीला शरण गेले. तिनें 'भिऊं नका' असा त्यांस धीर दिला. देव तेथें आले आणि भृगुपत्नी राक्षसांस आपल्याकडे ढकलून देत नाहीं असें पाहून विष्णूनें भृगुपत्नीस ठार केले. शुक्र घरी आले व आपली पत्नी विष्णूनें

मारली असे पाहून त्यास संताप आला आणि त्या भरात त्यानी विष्णूला शाप दिला की, 'तुला भूमिलोकांत मनुष्ययोनीमध्ये जन्म प्राप्त होईल आणि तुझे ज्ञान नष्ट होईल.' हा शाप ऐकून विष्णूला अति दुःख झाले. तो अरण्यात गेला व तेथे मनःसंयमन करून गणपतीची त्याने एक वर्षभर अत्युत्कृष्ट तपश्चर्या केली; गणपतीस प्रसन्न करून घेतले, आणि त्याच्यापासून वर संपादन केला की, 'आपले ज्ञान एका वेळेस मात्र नष्ट होईल.' गणपतीनी विष्णूस सांगितले की, मृत्युभूमीवर तूं अवतार घेतल्यानंतर तुला देवकार्य करतां येईल, तुला अतिशय कीर्ती प्राप्त होईल, लोक तुझी भक्ति करतील आणि शेवटी तुला शांति प्राप्त होऊन माझ्या लोकाला येशील.

सूत :– नंतर, मुद्गलांनी पुरुवंशाचा विस्तार थोडक्यात सांगून, शंतनूला गंगेच्या उदरी सर्व शास्त्रवेत्ता भीष्म झाला; व सत्यवतीच्या पोटी दोन पुत्र झाले व ते लौकर मेले ही हकीकत सांगितली. पुढे पंडु, धृतराष्ट्र व विदुर यांची उत्पत्ति सांगितली. मुनीहो! विदुर हा यमाचा अंश, पण एका शूद्रीच्या पोटी अवतीर्ण झाला. कारण असे झाले : यमाला मांडव्य ऋषीचा शाप होता, त्याची कथा ऐकः–

मांडव्यचरित्र

मांडव्य ऋषि एका आश्रमामध्ये तपश्चर्या करीत बसले होते; तेथे कांही चोरांनी नगरांतून लुटून आणलेले द्रव्य टाकले व आपण राजदूतांच्या भयाने पळून गेले. ऋषीजवळ चोरलेले द्रव्य पाहून राजदूत संतप्त झाले, मुनीला त्यांनी पकडले आणि सभोवतालच्या लोकांचे कांहीएक न ऐकता मौन धारण केलेल्या मुनीस मारीत

मारीत खनगराला घेऊन गेले चोरीची ही हकीकत समजल्यावर राजाही संतप्त झाला व मागचा पुढचा विचार न करतां ' ह्या मुनिवेश-धारी चोरास सुळावर चढवा ' असा त्याने हुकूम केला. सुळावर असतांनाच मांडव्याने आपल्या गुरुकडून गणेशदिक्षा घेऊन तदनुसार गणेशकवचाचा अनेकवेळा जप केला. त्यायोगाने मुनीला कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही. सुळावर असूनही मांडव्य ऋषि आनंदात आहे, असे पाहून राजाला चमत्कार वाटला. तो लागलीच मुनीजवळ जाऊन ' मी आपला विनाकारण छळ केला ' असे ह्मणून रडूं लागला. ' माझ्या प्राक्तनाचा भोग आहे, तुजकडे कांही दोष नाही ' असे सांगून मुनीने राजाचे सांत्वन केले. राजाने ऋषिला सुळावरून खाली उतरवले, पण मुनीच्या हातात सुळाचे एक टोक शिरले होते ते कांही केल्याने निघेना. पुढे, तसाच तो मुनि आपला दुखरा हात घेऊन यमधर्मांकडे गेला व क्रूर वाणींने ' मला एवढी घोर शिक्षा कशाबद्दल दिली ते सांग, नाहीतर तुला शाप देऊन भस्म करून टाकतो. ' असे मुनीने त्याला दरडावून सांगितले. यम ह्मणाला ' आपण लहान असता एका किड्याला काटा टोचून दुःख दिले. होते, त्याचे प्रायश्चित्त ह्मणजे हे शूलगत दुःख आहे. ' मांडव्य ह्मणाला ' यमा, एवढ्या मोठ्या स्थानावर तूं असून, तुला नीति अनीति कांही समजत नाही. माझा तुला असा शाप आहे की, मृत्यु लोकांमध्ये शंभर वर्षे तुला शूद्र जातीत रहावे लागेल. ध्यानात ठेव की, आठ वर्षांच्या वयाच्या आंतील मुलांच्या हातून जी कांहीं अज्ञानाने पापे होतील त्याबद्दल त्यांना शिक्षा करावयाची नाही, असा आज मी नियम करून ठेवितो. हा नियम मोडशील तर खबरदार ' नंतर मांडव्य ऋषि आपल्या आश्रमास निघून गेला. पुढे गणपतीच्या

एकाक्षरी मंत्राचा एकनिष्ठ जप करून त्याने गणपतीस प्रसन्न करून घेतले. थोड्याच दिवसात त्याच्या हाताचे दुखणे थांबले; व तो गणेशयोगी अखंड शांति पावला.

कृष्णयुधिष्ठिर संवाद–पूर्णानंदावतार–ब्रह्मयज्ञवर्णन–युधिष्ठिर चरित्र–

मुनींनो! शंतनुचा ज्येष्ठ नातु जो धृतराष्ट्र तो आंधळा होता म्हणून ब्राह्मणांच्या अनुज्ञेने पंडू राज्य करू लागला, त्याने प्रजेचे पालन प्रशंसनीय पद्धतीने केले. त्याला परमेश्वरकृपेने धर्मभीमार्जुनादि पाच पुत्र देवाच्या अंशाने झाले. धृतराष्ट्रालाही दुर्योधनादि शंभर पुत्र व एक कन्या अशी अपत्ये झाली. ही चुलतभावंडे मोठी झाल्यावर द्वेषबुद्धीने परस्परांशी भांडू लागली. दुर्योधनाने तर पंडुपुत्रांचा अतिशय छळ केला, पण पांडवांचे भाग्यच मोठे म्हणून ते जिवंत राहिले पुढे भीष्माच्या मध्यस्थीने पांडवास राज्याचा अर्धा वाटा मिळाला. पुढे कांही दिवसांनी भीमार्जुनाच्या पराक्रमाने पांडवांनी दिग्वीजय केला व यादवांचा व यदुनायक जो श्रीकृष्ण त्याचा स्नेह संपादन केला. दिग्वीजय झाल्यावर पांडवांनी जो अपूर्व राजसूययज्ञ केला आणि आपल्या पराक्रमाचे, यशाचे, वीर्यांचे व सामर्थ्यांचे जे अलौकिक प्रदर्शन केले ते सर्व पाहून दुर्योधनाला अत्यंत वाईट वाटले व मत्सर उत्पन्न झाला. त्यांचा नाश करण्याकरता द्यूत खेळण्याची युक्ति शकुनिमामाने काढली व पांडवास आपल्या नगरी बोलावून आणले, कपटद्युत खेळून त्यांच्या सर्व राज्यसंपत्तीचे हरण केले; ह्या द्यूतातील शेवटचा जो पण होता तो हरला तर पांडवास बारा वर्षे बनवास व एक वर्ष अज्ञातवास काढावा लागणार

होता. ह्या पण पांडव हरले, आणि त्यास वनवासास जावे लागले. वनवासात असतां कृष्णाने धर्मराजास गणेश उपासनेचे माहात्म्य सांगितले व वैकुंठवासी, विष्णु हा नित्य व अखंड गणेशभजन करीत असतो, ही गोष्ट धर्मराजास श्रुत केली. याचप्रमाणे गणपतीचे स्वरूप त्याची उपासना गणेशयोग आणि शेवटी मिळणारी अभंग शांति, यांचेही त्याने उत्तम वर्णन केले. आणखी सांगितले की, 'महालक्ष्मीने अत्यंत उग्र अशी तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतले.' परमेश्वर पसन्न झाल्यावर त्यांनी लक्ष्मीस सांगितले की, 'तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील. ज्ञानारि नामक असुराचा नाश करण्याकरिता, मी तुझ्या उदरी अवतार घेईन. तुला उत्तम प्रकारची शांति मिळेल, आणि तुझी कीर्ती अबाधित व सर्व काळ टिकेल. कृष्ण पुनः ह्मणतो. 'धर्मा! दुर्बुद्धि नामक दैत्याला शिवपुत्र जो विघ्नहर त्याने मारले, ही कथा तुला ठाऊकच आहे. त्याला ज्ञानारि नावाचा एक महापराक्रमी मुलगा होता. त्याला त्याच्या वृद्ध मंत्र्याने सांगितले कीं, 'तुझ्या बापास विघ्नहरानें ठार मारलें आहे.' म्हणून देवांचा सूड घेणें तुझें कर्तव्य आहे.' हें ऐकून ज्ञानारीला संताप आला व सूड उगवण्याचा त्यानें निश्चय केला. नंतर ज्ञानारी शुक्राश्रमी सर्व विद्या शिकला. त्यांतच त्यांनीं त्याला (ज्ञानारीला) शिवाच्या पचाक्षरी मंत्राची दीक्षा दिली. वायु भक्षण करून एक हजार वर्षेपर्यंत ह्या पंचाक्षरी मंत्राचा जप ज्ञानारीनें केला. शेवटी भोळा शंकर प्रसन्न झाला; आणि 'चराचरापासून तुला कोणतीही भीती नाहीं. तुझ्या सव इच्छा परिपूर्ण होतील आणि तुझी प्रकृति सदैव निरोगी राहील' असे वर दिले. ही वरप्राप्ति झाल्यावर शुक्रानें केलेला राज्याभिषेक, ज्ञानारीनें युद्ध करून मिळवलेलें सप्तद्वीपा पृथ्वीचें स्वामित्व, देवपराजय,

स्वर्गप्राप्ति, सत्यलोक, वैकुंठलोक व कैलासलोक येथें ज्ञानारीनें मिळ-वलेलें विजय, ब्रह्मविष्णुशंकरांचे पलायन इत्यादि गोष्टी एकामागून एक सहज होत गेल्या. ह्या अलौकिक पराक्रमानें ज्ञानारीची सत्ता सर्व त्रैलोक्यभर पसरली. पण ह्या सत्तेचा परिणाम कर्मविनाश होण्या-मध्यें झाला. स्वहा, स्वधा व षट्कार इत्यादि शब्द सुद्धां ऐकू येईनासे झाले. अशी पुष्कळ वर्षें लोटल्यावर व देवब्राह्मणांना अति ताप झाल्या-वर विष्णुप्रमुख देव विघ्नहर्त्या गणपतीला शरण गेले; व त्या दयाळू जगदीश्वरापासून जगतास सुखकारक असे वर मागून घेतले. पुढे लौकरच गणपतींनीं वैकुंठलोकीं लक्ष्मीच्या उदरीं अवतार घेतला. विष्णुलक्ष्मींनीं व भक्तजनांनी ह्या वेळीं अनेक प्रकारचीं गणपतिस्तोत्रें गाईलीं. जातकर्मादि मौंजीबंधनापर्यंतचे सर्व संस्कार झाल्यावर गणप-तीचें लग्न झाले. लक्ष्मीनें गणपतीची मोठ्या आनंदाने उत्तम सेवा केली.

इकडे ज्ञानारीला सुबोध नांवाचा एक मुलगा झाला. तो अखंड विघ्नेशचिंतन करणारा महा गणपतिभक्त होता. त्याचे लहानपणचे सुद्धां गणपतीच्या उपासनापर असत. ही सुबोधाची गणेशभक्ति एकदां ज्ञानारीचे दृष्टीस पडली, तेव्हा तो अतिशय रागावला आणि भार्येस सांगता झाला की, 'पुन्हां ह्या कार्ट्याचे असले हे भिकार ढंग माझ्या दृष्टीस पडले तर मी याला ठार मारून टाकीन!' हें ऐकून सुबोधची आई सावध झाली. तिला सुबोधची वृत्ति समजली होती. तेव्हा आपले बालक पतीच्या दृष्टीस पडणार नाही, अशी त्या माऊली-नें व्यवस्था केली. पाचव्या वर्षी सुबोधाची मुंज झाली- नंतर विद्याभ्यासासाठी सुबोध गुरुगृही गेला; पण तेथेही तो गणपतीचे भजन व गणपतीचे पूजन एक क्षणभरही विसरला नाही. गुरुगृही गेल्यावर सुबोधाने तेथील ब्राह्मणास गणपतीच्या स्वरुपाचे उत्तम

वर्णन करून सांगितले. ते ऐकून श्रोत्यास ह्या बाळाचे मोठे कौतुक वाटले प्रल्हादाने विचारल्यावरून ह्या बाळाने त्यास नैमिषारण्यामध्ये एक मोठा ब्रह्मयज्ञ झाला होता. त्याची गोष्ट सांगितली. हा ब्रह्मयज्ञ सिद्धीस नेण्यासाठी मरीचोकश्यपादि सर्व ऋषि, विष्णुशंकरादि सर्व देव, नाग. गंधर्व, चारण, सिद्ध, वसु, अप्सरा, सर्व देवी आणि सर्व कर्मनिष्ठ तपोनिष्ठ व ज्ञाननिष्ठ ब्राह्मण आले होते. ह्या अलौकिक सभेत 'सर्वांत कोणता देव मोठा !' ह्याविषयी मोठा कडाक्याचा वाद झाला, पण निकाल होईना. तेव्हा प्रत्यक्ष वेदांचेच स्मरण करून ते आल्यावर तद्वारा या प्रश्नाचा निकाल करावा, अशी विष्णूने युक्ति काढली, स्मरण करिताच वेद तेथे प्रत्यक्ष प्रगट झाले. त्यांनी उपनिषदांच्या आधारे ब्रह्मस्वरुपाचे वर्णन उत्तम प्रकाराचे केले. ह्या वर्णनाचा इत्यर्थ इतकाच होता की, श्रीगणेशभक्ति केली असता संसारमोक्षाचा व शांतिप्राप्तीचा प्रसार सुलभ होतो. हे रहस्य ऋग्वेदादि चारी वेदांनी व ओंकाराच्या प्रत्यक्ष मूर्तिमंत स्वरुपाने निरनिराळ्या पद्धतीनी प्रकट केले आहे. हे रहस्य ऐकून देवादि सर्वांसच आनंद झाला. त्यांनी वेदांची व ओंकाराची पूजा केली. ह्याप्रमाणे हा ब्रह्मयज्ञ आटोपल्यावर जमलेल्यांपैकी प्रत्येकजण गणेशभक्ति करावयास लागला. सुबोधाचे हे बोलणे ऐकून त्याच्या गुरुजींस फार आनंद झाला, पण ते ज्ञानारीस भित होते; म्हणून त्यांनी सुबोधास सांगितले की, 'तुझा बाप गणपतीचा व्देष करतो, म्हणून तूं त्याचे भजन टाकून दे.' हे ऐकून सुबोधाला वाईट वाटले आणि त्याने त्यास सांगितले की, 'काय वाटेल ते होवो, मी गणेशभजनाची माझी पद्धति सोडणार नाही.' पुढे लौकरच ज्ञानारीला हा वृत्तांत समजला आणि त्याने सुबोधास बोलावून आणून 'तूं गणपतीची भक्ति करूं नको, केलीस

तर तुला ठार मारीन' असे दरडावून सांगितले. मुलगा ऐकेना. तेंव्हा 'सुबोधाला ठार मारा' अशी आपल्या सेवकास ज्ञानारीने आज्ञा केली. त्यांनी अनेक शस्त्रांनी, पुष्कळ अस्त्रांनी, पर्वतावरून ढकलून देऊन, हत्तीच्या पायाखाली घालून, अग्नीमध्ये भाजून, समुद्रांत बुडवून, विष पाजून, त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला; पण सुबोधावर श्रीगणपतीचा उत्कृष्ट अनुग्रह होता, म्हणून त्याच्या जीवाला काहीएक धक्का लागला नाही. शेवटी ज्ञानारि रागाने वेडा होऊन गेला; व सुबोधाला मारण्याला स्वतः उद्युक्त झाला, तेंव्हांही सुबोधाने पित्याला बोध करावयास कमी केले नाही. मुलगा जितका शांत, तितका बाप रागावून वेडा झालेला होता. त्याने मुलाला हाती धरून ओढला आणि 'दाखव तुझा कोठे संरक्षण करणारा गणपति देव आहे तो. मला तो दिसेल तर मी त्याची भक्ति करनरी, न दिसेल तर तुला येथेच ठार मारीन' असे ओरडला. भक्ताचे हे सकट पाहून वैकुंठात अवतार घेतलेले श्रीगणपति तेथे एकदम प्रकट झाले. सुबोधाने त्यांचे स्वागतपूर्वक पूजन करून बापास सांगितले की, 'हा माझा देव पहा' ज्ञानारि क्रोधयुक्तच होता. त्याने गणपतीवर हात टाकला, तेंव्हा गणपतीने काय केले ते ऐका. त्याचा देह सुटल्याशिवाय ज्ञानारीला शांति मिळणार नाही, असे जाणून युद्ध न करताच त्याचा जीवभावच त्यांनी हरण केला. त्यांचे प्रेत एकदम जमिनीवर खाली पडले.

दैत्यांचा आधार नाहीसा झाला व ते पाताळातून पळून गेले. परमेश्वरचरित्र अवलोकन करण्याकरता जे देवमुनि जमले होते, त्यांनी गणपतीची नाना प्रकाराने स्तुति केली. तेंव्हा देव प्रसन्न

झाले, व सुबोधास व देवांस वर देऊन ते गुप्त झाले. ही कथा सांगून कृष्णाने धर्मास गणेशदीक्षा दिली. ती घेऊन पांडवांनी एकनिष्ठ भावाने गणेशपूजा केली. तिचे फळ हे झाले की, सूर्याने त्यांस थाळी दिली म्हणून त्यास अतिशय मोठे अन्न संतर्पण करता आले, पुढे वनवास व अज्ञातवास आटोपल्यावर कौरव–पांडव युद्ध झाले, युद्धात गणेशकृपेने पांडवांचा जय झाला व गणेशभक्तीने त्यास अखंड शक्ति मिळाली व शेवटी ते स्वानंदवासी झाले.

या दिवसापासून दक्षिणेमध्ये जे महोदराचे क्षेत्र आहे त्याचा महिमा अतिशय वाढला.

[तृतीय खंड समाप्त]

चतुर्थ खंड

—०—

[गजाननचरित्र]

वशिष्ठ–दशरथराजा–तिथी देवीची उत्पत्ति

सूत :– शौनकादिमुनींनो ! महोदरचरित्र ऐकल्यानंतर दक्षाने मुद्गलाला विनंती केली की, ब्रह्मरूप गणपति देहधारी कां झाला व त्याने आणखी अवतारकृत्ये कोणती केली त्यांच्या कथा मला सांगा. तेव्हां ती विनंति ऐकून मुद्गलाने प्रथमतः ब्रह्मस्वरुपाचे वर्णन केले व पुढे सांगितले की, पूर्वी सृष्टि उत्पन्न केल्यावर ब्रह्मदेवाने गणपतीचे चिंतन केले; त्याला गणेशब्रह्माची कीर्ती कशी वाढेल याची चिंता होती. तो एकदा ध्यानस्थ झाला असता त्याच्या शरीरापासून चतुष्पाद, चतुर्हस्त, चतुर्मुख व अति सुंदर अशी पराप्रकृतीची एक मूर्ति निर्माण झाली तिने ब्रह्मदेवास नमस्कार केला, अनेक स्तोत्रे म्हणून त्यास प्रसन्न करून घेतले आणि ‘ मला काय आज्ञा आहे ? मी कोठे राहूं ? व खाऊ काय हे सर्व मला सांगा ’ अशी विनंती केली. ब्रह्मदेवाने तिला सांगितले की, गणपतीची तपश्चर्या करून आश्चर्य उत्पन्न करणारी सृष्टि करण्यास प्रारंभ कर. ही आज्ञा घेऊन ती वनात गेली. तिने उग्र तपश्चर्येने गणपतींला प्रसन्न करून घेतले

व सृष्टिकर्तुत्व सामर्थ्य मिळविले. प्रसन्न झालेले गणपति तिला ह्मणाले, ' तूं मला चार प्रकारांनी प्रिय होशील. १) सर्व तिथींची तू माता होऊन तुला चतुर्थी ह्मणतील. २) तुझा डावा भाग काळा असेल व उजवा भाग पांढरा असेल. ३) चतुर्थी हीच माझी जन्मतिथि होईल आणि ४) जे लोक चतुर्थी व्रत करतील, त्यांचे मी पालन करीन. ' असे वर तिला देऊन गणपति अंतर्धान पावले. नंतर या परा (अर्धी शुक्ल व अर्धी कृष्ण) प्रकृतीने गणपतीचे ध्यान करून सृष्टिरचनेस आरंभ केला.

चतुर्थीव्रताचें माहात्म्य

प्रथमतः तिच्या शरीरापासून सर्व तिथी उत्पन्न झाल्या. या तिथींसंकट चतुर्थी तिथी गणपतीची तपश्चर्या करू लागली; व गणपति प्रसन्न झाल्यावर तिने वर मिळविला की, ' कृष्णचतुर्थी व शुक्लचतुर्थीच्या दिवशी उपवास करून माझी उपासना जे करतील त्यांस मी उत्तम प्रकारचे सुख देइन व त्यांच्या सर्व संकटांचे हरण करीन. त्या माझ्या भक्तांना येथील सर्व सुखांचा उपभोग मिळून अंती ते स्वानंदलोकाला जातील. हे चतुर्थी ! माझी कृष्ण-चतुर्थीला पूजा करून रात्री चंद्रोदय झाल्यावर पंक्तीला कांही ब्राह्मण घेऊन भोजन करावे. शुक्ल चतुर्थीला दुपारी माझी पूजा करून उपवास करावा व दुसरे दिवशी पारणे सोडावे. रात्री माझ्या कथा गाव्या. ही दोन्ही व्रते जे करतील ते माझे भक्त सर्व देवास मान्य होतील ' असे ह्मणून व दुसऱ्याही तिथीस योग्य-अयोग्य व्रते सांगून व त्यांची फळे सांगून गणपति अंतर्धान पावले.

चतुर्थीव्रताचा शास्त्रार्थ–चतुर्थीव्रतविधी

सूत :– मुनीहो; नंतर मुद्गल दक्षाला दशरथाची गोष्ट सांगताना ह्मणाले, दक्षा! दशरथराजाला पुष्कळ दिवस मूल झाले नाही, ही गोष्ट तुला माहीतच आहे. आपल्याला संतति नाही असे पाहून अति दुःखित झालेला राजा, वसिष्ट ऋषीला शरण गेला आणि 'मला पुत्रप्राप्ति होईल असा कोणता तरी एक उपाय सांगा.' अशी करुण स्वराने त्याने मुनीची प्रार्थना केली. वसिष्ठाने दशरथाला संकष्टी चतुर्थीचे व्रत, त्याचा विधि व त्याचे फल इत्यादि सर्व विस्ताराने सांगून शेवटी ह्मटले की, 'ह्या व्रताचे तू एकनिष्ठेने पालन केलेस तर तुझ्या सर्व कामना पूर्ण होतील.' त्यांनी दशरथाला चतुर्थीचा शास्त्रार्थ असा सांगितला की, चंद्रोदयाचे वेळी चतुर्थी तिथि नसेल तर, प्रदोषकाळी चतुर्थी असेल तो दिवस उपवासाचा समजावा. दोन्ही दिवस चंद्रोदयी चतुर्थी असेल तर कोणत्याही दिवशी उपवास केल्यास हरकत नाही. याचप्रमाणे जी शुक्लचतुर्थी मध्यान्हव्यापिनी असेल ती उपवासाची तिथि असे समजावे. असा शुक्लचतुर्थीच्या व्रताचा शास्त्रार्थ सांगून, 'हे व्रत पूर्वी विष्णुशंकरादि देवतांनी केले आहे, असे सांगितले. दशरथाने विचारले 'ब्रह्मादिकांनी चतुर्थी व्रत कसे केले ते मला कृपा करून सांगा.' राजाचा हा प्रश्न ऐकून वसिष्ठऋषि ह्मणाले 'एकदा सृष्टिप्रलय होऊन सर्व स्थावरजंगम पदार्थ ब्रह्मामध्ये लीन झाले असता व गणपति योगनिद्रा घेत असता, वेदमंत्रानी गणपतीस जागे केले, आणि त्यांनी सत्व, रज, तम, ह्या गुणांच्या साहाय्याने ब्रह्मा, विष्णु, शिव, शक्ति व सूर्य हे प्रमुख देव उत्पन्न केले. ह्या देवांनी एकाक्षरी मंत्राचा आश्रय घेऊन, उत्तम तपश्चर्या केली आणि

गणपतीस प्रसन्न करून घेऊन सर्वज्ञत्व प्राप्त करून घेतले. देवांनी कर्मभूमीवर स्वानंदनामक गणेशक्षेत्राचे ठिकाणी भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी मध्यान्हकाळी गणपतीचीं स्थापना केली व तेथेच आराधना करीत हे पांचही देव राहिले. पुढे माघ शुक्ल चतुर्थीला गजानन प्रकट झाले व देवांस वरप्रदान देते झाले, ह्मणून माघी शुक्ल चतुर्थीचे माहात्म्य पृथ्वीवर प्रकट झाले. तथापि भाद्रपद शुक्ल चतुर्थीचे व त्या दिवशी मंगळवार असेल तर त्या चतुर्थीचे माहात्म्य काही विलक्षण आहे. कमी अधिक मानाने वर्षांतोल बारा महिन्यांच्या तथापि सर्व चतुर्थ्या पुण्य दिवसच आहेत. संकष्टी चतुर्थीचेही माहात्म्य श्रवणीय आहे. जन्म, मृत्यु आदि तीन अवस्था व चवथे कर्मांपासून उत्पन्न होणारे फळ, ही चार संकटे जीवाला वेडावून सोडतात. ह्या संकटांचा कृष्ण चतुर्थी नाश करते ह्मणून तिला संकष्टी चतुर्थी ह्मणतात; मंगळवारी चतुर्थी आली तर तिचे माहात्म्य जास्तीच असते. कारण पृथ्वीच्या उदरी उत्पन्न झालेला भौम (मंगळ) याने, 'गणानां त्वां' या मंत्राने गणपतीची पूजा करून, रमणीय तपाचे आचरण शंभर वर्षेपर्यंत एकनिष्ठेने केले व गणपति प्रसन्न झाल्यावर त्यापाशी मागणे मागितले की 'मी मर्त्यदेहामध्ये उत्पन्न झालो आहे तरी मला अमृतपान करण्याची इच्छा आहे; ती पूर्ण करा; माझी ग्रहमंडलांत योजना करा; मंगल या नावाने माझी प्रसिद्धी होऊं द्या. सर्वांचे ऋण नाहीसे करण्याचे सामर्थ्य मला येऊं द्या व मंगळवारी जी चतुर्थी येईल तिचे माहात्म्य जास्त असूद्या.' हे ऐकून गणपतीस संतोष झाला व भौमाने ह्मणजे मंगळाने मागितलेले सर्व वर गणेशांनी त्यास दिले.

गणेशचतुर्थी आणि चंद्रदर्शन–चंद्रकृत गणपतीचा उपहास–गणपतिशाप व उःशाप

सूतः– मुनिहो ! भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन का घेऊ नये, याचे कारण व त्याची कथा वसिष्टांनी दशरथास सांगितली ती ऐका. ‘ एकदा देवासह मुनीनी असा निश्चय केला की, ज्याअर्थी गणपतीपासूनच ब्रह्मादि देवपंचक निर्माण झाले आहेत, त्याअर्थी त्या पंचकाचेही जर आपण भजन पूजन केले तर आपण कृतकृत्य होऊ. ’ असा अज्ञान बुद्धीने निश्चय करून ते भ्रमिष्ट झाले आणि आपल्या निश्चयाप्रमाणे आचरण करावयास लागले. हे मुनीचे व देवपंचकाचे अज्ञान नाहीसे करावे ह्मणून गणपतींनी एक अक्राळविक्राळ रूप धारण करून, शंकरादि देवपचकास, इतर देवांस व ऋषीस मूर्छित केले काही वेळाने सावध झाल्यावर व आपल्या मूर्छित स्वरुप ध्यानात आल्यावर शंकरादि देवपचक स्वतंत्र नाही, परतंत्र आहे; सर्व गणपतीच्या स्वाधीन आहे, असे त्यास व देवपंचकास ज्ञान झाले. नंतर त्यानी गणपतीचे स्तवन करण्यास आरंभ केला. त्यांचे हे स्तवन भक्तिपूर्वक आहे असे पाहून गणपति प्रसन्न झाले आणि त्यांचा भीतीचा नाश व्हावा म्हणून त्यांनी आपले विक्राळ स्वरूप सोडून देऊन सौम्य रूप धारण केले. देवांनीं पुन्हा गणपतीची पूजा केली आणि ब्रह्मदेवाने आपली कन्या सरस्वती, विष्णूने पुष्टि, शंकराने योगिनी, जमदंबिकेने मोहिनी व सूर्याने संजीवनी अशा आपआपल्या मानस कन्या गणपतीला अर्पण केल्या गणपतीने त्यांस उपदेश केला. देवहो ! तुम्ही माझे केवळ अंश आहांत. तुम्ही मत्तंत्र आहांत, स्वतंत्र नाही,

हे ध्यानांत ठेवा, गर्व करूं नका. मी तुमच्यासारखा देहधारी होतो तो केवळ भक्तांची संकटे दूर व्हावी म्हणून होतो; हे विसरूं नका. मी अनंत ब्रह्मांडाचा नायक आहे; माझी पूजा केली तर जगद्ब्रह्माची पूजा केली असे होईल, हे नीट समजून घ्या ' असे बोलून गणपति स्तब्ध झाले. देवांनी पश्चात्तापपूर्वक गणपतीला नमस्कार करून आपल्या अपराधाची क्षमा मिळविली. इतक्यात तेथे शंकराच्या भालप्रदेशी वास्तव्य करणारा चंद्र, हा गणपतीची ती त्रिद्रुप मुर्ति पाहून उन्मत्तपणाने हंसला व हे 'आपण हत्तीचे तोंड का धारण केले?' असे उपहासाने विचारू लागला! प्रथमतः गणपतीने त्याकडे लक्षच दिले नाहीं. पण तो अधिकच धिटाई करून पुनःपुनः तेच तेच विचारू लागला. तेंव्हा त्याला शुद्धीवर आणावा म्हणून गणपति रागावले; त्यांनी त्यास शाप दिला की; 'तुं ज्याच्या दृष्टीस पडशोल ते लोक पापी होतील व त्यांच्यावर अनेक संकटे येतील!' असा शाप देऊन गणपति अंतर्धान पावले. त्या दिवसापासून शंकरादि देवांचा अभिमान व अहंकार विगलित होऊन ते गणपति-भक्त झाले, पण खिन्नमनस्क चंद्र मात्र आपल्या बायकांसह अति दुःखी झाला. तो घरी आला व गणपतीचा 'मी विनाकारण उपहास केला' असा त्यालां पश्चात्ताप झाला. नंतर तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेण्याकरता व आपण त्याच्या केलेल्या अपराधाबद्दल क्षमा मिळविण्याकरता असे हे दोन संकल्प करून चंद्र गंगातीरी आला. तेथे त्याने अठरा अक्षरी गणपति-मंत्राचा जप केला व उत्तम प्रकारची तपश्चर्या केली. शंभर वर्षांनी गणपति प्रसन्न झाले. इकडे चंद्र नाहीसा झाल्यामुळे जगात सर्वत्र दुःखप्रसार झाला. सूर्याच्या तेजाने सर्व चराचर भाजून निघाले

आणि देवगणांसही अत्यंत भीति उत्पन्न झाली. ह्या संकटाचा परिहार करण्यासाठी देव उद्युक्त झाले, म्हणजे गणपतीला संतुष्ट करून, चंद्राला शापविमुक्त करण्याकरता सर्व देवांनी तपश्चर्या केली. चंद्राने व शंभुप्रमुख देवांनी शंभर वर्षे तपश्चर्या केली. तेंव्हा कोठे गणेशब्रह्म प्रसन्न झाले! गणपति प्रकट झाल्यावर 'अथर्वशीर्ष मंत्र' ह्मणून देवांनी परमेश्वराची स्तुति केली आणि मागणे मागितले की, 'कृपा कर आणि चंद्राला दोषमुक्त करा' हे ऐकून प्रसन्न झालेल्या गणपतींनी सांगितले की, 'भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा माझा आवडता दिवस आहे, त्या दिवशी मात्र चंद्राकडे कोणीही पाहता कामा नये. ज्या दिवशी चंद्राने माझा उपहास केला त्या दिवशी भाद्रपद शुद्ध चतुर्थीच होती, म्हणून त्या दिवशीही चंद्राचे अवलोकन करू नये. तुमची व त्याची तपश्चर्या पाहून मी संतुष्ट झालो आहे व त्याला जो मी शाप दिला होता, त्यापासून त्याला मुक्त केला आहे. कारण त्याला खरा खरा पश्चात्ताप झाला आहे. एक दिवस मात्र त्याचे दर्शन पापकारी होईल. ह्या वरून हे ध्यानात ठेवा की, तिरस्कारपूर्वक कोणाचाही उपहास कोणीही केला तरी, त्याला कर्मभूमीवर किंवा स्वर्गलोकी, या जन्मी किंवा दुसऱ्या जन्मी, प्रायश्चित्त मिळतेच मिळते. देवहो! हा उपदेश विसरूं नका. त्या वेळी चंद्रानेही भक्तिपूर्वक गणपतीची स्तुति केली. ती ऐकून गणपति प्रसन्न झाले. त्यांनी त्याला वर दिला की, 'तुला माझ्या भालप्रदेशी वसतिस्थान मिळेल, व प्रत्येक कृष्ण चतुर्थीला तुझे पूजन करून मग माझ्या व्रताची सांगता लोक करतील. याचप्रमाणे प्रत्येक शुद्ध द्वितीयेला संध्याकाळी लोक तुला नमस्कार करतील; कारण शुक्ल

द्वितीयेच्या संध्याकाळी तू माझी प्रसन्नता संपादन केली आहेस.' राजा! गणपतीला भालचंद्र का ह्मणतात त्याचे कारण तुला आता समजले असेलच. असो,

कृष्ण, गणेशचतुर्थीला चंद्र पाहतो–स्यमंतक मण्याची कथा–कृष्णजांबवंत मल्लयुद्ध–कृष्णाची खिन्नता–कृष्णकृत गणपत्युपासना–वरप्रदान

एकदा यादवकुलांत अवतीर्ण झालेल्या वासुदेवाने, भाद्रपद शुक्ल चतुर्थीला चंद्राचे दर्शन घेतले तेंव्हा त्याचे अंतर्ज्ञानच नाहीसे झाले व तो सांमान्य पुरुषासारखा एक पुरुष झाला. या चंद्रदर्शनाच्या पापाने त्याच्यावर एक संकट आले ते असे: यादवकुलामध्येच सत्राजित या नावाचा राजर्षि होता. त्याने शंभर वर्षे दारुण तपश्चर्या करून सूर्यास प्रसन्न करून घेतले होते व सूर्यापासून स्यमंतक या नावाचा एक मणि मिळविला होता तो मणि तेजाने प्रतिसूर्य होता व त्यापासून प्रतिदिवशी आठ मण सोने उत्पन्न होत असे! अर्थातच अशा मौल्यवान मण्याची तो रोज पूजा करीत असे व त्यास अतिशय जपत असे कांही दिवस गेल्यानंतर कृष्णाला या मण्याचा लोभ उत्पन्न झाला व सत्राजितास बोलावून 'हा तुमचा स्यमंतक मणि आम्हाला द्या' अशी मागणी केली. सत्राजित ह्मणाला, 'माझेजवळ तो मणि नाही माझा धाकटा भाऊ प्रसेन याच्याजवळ तो मणि असून तो मलाच देईनासा झाला आहे!' असे ह्मणून सत्राजित घरी गेला. कृष्णाच्या मनात मात्र ती गोष्ट राहिली. पुढे एकदा सर्व यादव मृगयेकरिता रानात गेले, त्याबरोबर प्रसेनही ते दिव्यरत्नाचे पदक गळ्यात बांधून शिकारीला गेला.

शिकार करीत असता प्रसेन सिंहाच्या मागून धावत एकटाच लांबवर गेला. तो एकटा आहे असे जाणून, सिंहाने किरण साधून त्याच्यावर उडी मारली व घोड्यासकट प्रसेनाला आपल्या गुहेत नेऊन ठार मारले; पण त्या सिंहाची रामअवतारातील जांबवानाशी गाठ पडून युद्ध झाल्यावर सिंह मेला, व जांबवानाने तो मणि घेऊन आपल्या मुलीस दिला. इकडे यादव संध्याकाळी परत आले, पण प्रसेन आला नाही; हे पाहून सत्राजिताला सशय आला की, मण्याच्या लोभाने कृष्णाने प्रसेनास मारले असावे. त्याचे म्हणणे ऐकून उग्रसेनादि यादवांसही वाटले की मण्याच्या लोभाने कृष्णाने प्रसेनास मारले असावे. पुढे सर्वच लोक कृष्णाची निंदा करू लागले. यामुळे कृष्णास काही सुचेना. शेवटी देहत्याग करण्याचा त्याने निश्चय केला; तथापि प्रसेनाचा एकदा शोध करावा असे त्यास कोणी सांगितल्यावरून स्वदेह त्यागाचा बेत मागे टाकून तो अरण्यात गेला. तेथे घोडा, प्रसेन व सिंह यांची प्रेते पाहून, परंतु मणि तेथे नाही व अस्वलाच्या पावलांच्या मार्गाने जांबवानाच्या भुयारापर्यंत गेला; आणि आंत प्रवेश करून बराच पुढे गेला. भूमीच्या पोटात ती गुहा पुष्कळ खोल असताही तेथे उत्तम प्रकारचा प्रकाश पाहून आपल्याला येथे हरवलेला मणी सांपडेल असे कृष्णास वाटले आणि तो पुढे गेला. तेव्हा त्याला दिसले की पाळण्यावर तो मणी टांगलेला आहे. मण्याचा शोध लागला हे पाहून कृष्णाला अतिशय आनंद झाला. इतक्यात तेथे जांबवानाची मुलगी बाहेर आली. तिने आपल्या घरात परका पुरुष शिरला हे पाहिले तेंव्हा ती भयाने ओरडावयास लागली. तिचा तो आक्रोश ऐकून जांबवान स्वत: बाहेर आला तो मुलीच्या ओरडण्याने रागावलेलाच होता. त्यात हा मनुष्यप्राणि

आपल्या बिळात न विचारता आला, हे पाहून त्याचा क्रोध जास्तच वाढला. कृष्णालाही मणि प्राप्तीसाठी जांबवानाशीं युद्ध करावयाचेच होते. झाले. दोघांचे युद्ध जुंपले. एकवीस दिवस घोर युद्ध झाले. इकडे एकवीस दिवस वासुदेव परत आला नाही म्हणून वसुदेवादि सर्व कृष्णपक्षाच्या यादवांस अतिशय दुःख झाले. सर्वांनी सत्राजितावर शिव्यांचा वर्षाव केला. इकडे एकवीस दिवस झाल्यावर जांबवानाने पाहिले की आपल्या हातून आपल्या प्रतिपक्षाचा पराभव होणे शक्य नाही. असा निश्चय झाल्यावर 'तूं कोण आहेस ?' असे त्याने कृष्णास विचारले. कृष्णाने उत्तर दिले. 'माझे नाव कृष्ण, व माझा जन्म यदुकुलांत झाला आहे.' हे उत्तर ऐकून जांबावनाला अति वाईट वाटले. त्याला पश्चाताप झाला. त्याने कृष्णाला साष्टांग नमस्कार घातला; आणि म्हणाला "भगवंता ! आपण प्रत्यक्ष विष्णूच आहांत. 'पुनः माझे कृष्णवतारी दर्शन होईल' असे रामानी मला सांगितलेले आता मला आठवते. मी आपला दास आहे. मला क्षमा करा. केवळ अज्ञानाने व शक्तीच्या गर्वाने मी आपल्याशी युद्ध केले ! प्रभो ! मला आपण क्षमा करा" पुढे त्याने कृष्णाची आणखी पुष्कळ स्तुति केली, पूजा केली आणि मण्याचा वृत्तांत ऐकल्यावर आपल्या कन्येसह तो स्यमंतक मणि कृष्णास अर्पण केला. पुढे लवकरच जांबवतीला घेऊन कृष्ण द्वारकेला परत आला; आाणि घडलेली हकीगत सांगून सर्व लोकांदेखत सत्राजिताला तो स्यमंतक मणि त्याने दिला. सत्राजितालाही कृष्णाच्या विरोधाचे भयच वाटत होते; म्हणून आपली कन्या सत्यभामा ही कृष्णाला अर्पण करून तिच्या बरोबर हा स्यमंतक मणि कृष्णाला

अर्पण केला. कृष्णाने तो मणि सत्यभामेजवळ ठेवावयास दिला, व ' हा माहेरींच ठेवीत जा. ' असे सांगितले. ही गोष्ट झाल्यानंतर दोन तीन दिवसांनी अशी बातमी आली की ' पांचही पांडवास पुरोचनाने लाक्षागृहामध्ये जाळून टाकले. हे ऐकून कृष्ण–बलरामास दुःख झाले व ते हास्तिनापुरास गेले, व पांडवांसाठी पुष्कळ शोक करून त्यांच्या मातृःश्रीचे–कुंतीचे, समाधान करण्यासाठी तेथेच राहिले. इकडे शतधन्वा, कृतवर्मा इत्यादि कांही यादवांनी विचार केला की, ' सत्राजितापाशी आम्ही सत्यभामेकरितां मागणी घातली असतांही आम्हांस टाकून त्याने कृष्णाला अर्पण केली. कृष्ण व बळराम हे दोघे हस्तिनापुरी शोक करीत पडले आहेत. आपण आता रात्री सत्राजिताला मारून सत्यभामेचा मणि घेऊन जाऊं या. ' त्याप्रमाणे त्यांनी वेळ साधून सत्राजिताला ठार मारले व ते तिघे तो मणि घेऊन गेले. हा वृत्तांत ऐकून कृष्ण परत आला. तेव्हां शतधन्व्यास व कृतवर्म्यास भीती उत्पन्न होऊन त्यांनी तो मणि अक्रूरापाशी ठेवण्यास दिला; व आपण पळून गेले. कृष्णाने त्यांचा पाठलाग केला व त्यांचा पराभव करून त्यास भूमीवर पाडले, त्यांचा झाडा घेतला; पण त्यांच्याजवळ ता मणि नव्हता ! असे पाहून कृष्णाला पुन्हा अतिशय दुःख झाले. बलराम तेथे आला तेंव्हा कृष्णाने त्यास मण्याची हकिगत सांगितली. बलराम ह्मणाला, ' कृष्णा, तूच हा मणि कोठे तरी लपवून ठेवला आहेस व मला तो मणि द्यावा लागेल ह्मणून स्यमंतक मणिच सापडत नाही अशी खोटीच ओरड करीत आहेस !' असे ह्मणून

व कृष्णाच्या शब्दाकडे लक्ष न देता बलराम निर्दय मन करून विदर्भ नगरीला निघून गेला. ह्या बंधुवियोगाने तर कृष्णास अतिशय खेद झाला. द्वारकेतील यादव, देशोदेशींचे राजे व लोक हे सर्व कृष्णाची निंदा करू लागले. हा सर्व तिरस्कार कृष्णास असह्य झाला. तो दिवसें दिवस खंगत चालला व त्याने देहत्यागाचा संकल्प केला. ही त्याची अवस्था ऐकून नारद तेथे आले. त्यांनी कृष्णाची हकीगत ऐकून त्यास सांगितले की 'भाद्रपद शुद्ध चतुर्थीला तु चंद्राचे दर्शन घेतलेस ह्मणून गणपतीचा राग तुझ्यावर झाला आहे व तू ह्या दुःखपरंपरेत सापडला आहेस. कृष्णा तूं! देहत्यागाची बुद्धी टाकून दे आणि संकष्टी चतुर्थीच्या व्रताने गणपतीला प्रसन्न कर. यायोगे तुझ्यावर आलेला खोटा अपवाद बंधूचा वियोग, व स्वजन निंदा, इत्यादि जी संकटे तुझ्यावर आली आहेत त्यांचा परिहार होईल.' हा उपदेश करून नारदाने कृष्णाला एकाक्षरी गणेशमंत्राची दीक्षा दिली. ह्या मंत्राने प्रत्यही गणपतीची पूजा करून संकष्टीचें व्रत धरून व रात्री गणपतीचे ध्यान करून, कृष्णाने गणपतीला प्रसन्न केले. प्रकट झाल्यावर गणपतींनी 'तुझ्या सर्व संकटांचा नाश होईल, तुझा स्यमंतक मणि तुला मिळेल. तुझे पूर्ण ज्ञान पुनः तुला प्राप्त होईल आणि तुझी अखंड कीर्ती होऊन अंती तूं माझ्या लोकाला येशील!' असे वर देऊन गणपति अंतर्धान पावले व कृष्णावरील आलेल्या विघ्नपरंपरेचा हळुहळू लय होत गेला. असो ह्याप्रमाणे ही चंद्रदर्शनाची कथा सांगतली.

चतुर्थीव्रताचे फल

सूत :– एकदा, वसिष्ठांनी दशरथास सांगितले की, ‘ पूर्वी शंकरादिदेवांनी, तसेंच स्वायुंभव मनूने व दुष्यंताचा मुलगा जो भरत त्याने, हे चतुर्थीचे व्रत करून उत्तम उत्तम फळे मिळविली आहेत. राजा ! दुष्यंताचा मुलगा भरत हा उत्तम प्रकारे पृथ्वीचे राज्य करींत असता अकस्मात त्याच्या राज्यात एक मोठा दुष्काळ पडला. त्याने पुष्कळ दैवी व मानवी उपाय केले, पण दुष्काळाचा जोर कमी होईना. भरत राजा अगदी निराश झाला व राज्य सोडून देण्याचा संकल्प केला. पण प्रभुकृपेने त्याची व कण्वमुनीची गाठ पडली. राजाने सांगितलेली कथा ऐकून मुनि ह्मणाले, ‘ तुझी प्रजा वर्णाश्रम धर्माने चलते, तूही स्वधर्माने वागून देव, गुरु, अतिथि व दीन ह्यांचा उत्तम सत्कार करतोस, हे सर्व ठीक आहे; पण तुझ्या राज्यावर सुदैवाचा अनुग्रह नाही. हे समजून घे आणि आपल्या राज्यांत चतुर्थीव्रताचा सर्वत्र विस्तार होईल अशी व्यवस्था कर. राजा ! मी पूर्वी पुष्कळ तपार्जन केले असताही मला शांति मिळेना ह्मणून मी क्रतूला शरण गेलो आणि ‘ शांति मिळविण्याचा उपाय मला सांगा ’ अशी त्याला विनंती केली. नंतर त्याने मला गणेश-ब्रह्माचे माहात्म्य सांगितले, क्रतूला हे ज्ञान ब्रह्मदेवाने दिले होते. क्रतूचा उपदेश ऐकून मी एकाक्षरी गणेशमंत्राचा जप केला व गणपतीचे ध्यान केले. तेंव्हा माझ्या चित्तभूमीची चंचलता व अनेकत्व नाहीशी होऊन माझे चित्त चिंतामणीचेठायी सायुज्यता पावले. पुढे कांही दिवसांनी मला गणपतीचा साक्षात्कार झाला. गणपतीनी मला सांगितले की, ‘ तू चतुर्थीव्रताचा स्वीकार कर ह्मणजे तुझ्या सर्व

संकटांचा परिहार होऊन तुला शांति मिळेल. राजा ! ह्याप्रमाणे मला आता शांति मिळाली आहे, तूही स्वनगरीस जा, व चतुर्थीव्रत यथासांग कर म्हणजे तुझ्या सर्व संकटांचा परिहार होऊन तुला शांति मिळेल.' हा उपदेश ऐकून राजाला मोठा आनंद झाला. परत स्वराज्यांत आल्यावर त्याने चतुर्थीव्रताचा स्वीकार केला व राज्यात सर्वत्र करविला. त्यायोगे पृथ्वीवरील सर्व संकटे अस्तंगत झाली आणि सर्वत्र शांतीचे राज्य झाले दशरथराजा ! भाद्रपद शुद्ध चतुर्थीला उपवास घडला असता काय फलप्राप्ति होते ती ऐक. पूर्वी द्राविड नगरामध्ये कोणी एक पापी चांडाळ राहात होता. त्याला कुष्ठरोग झाला होता, तरी त्याला परस्त्रीगमनाची इच्छा अनावर होत असे. एकदा असा चमत्कार झाला की, त्याला भाद्रपद शुद्ध चतुर्थीचे दिवशीच पहाटेच्यावेळीं सडकून ताप भरला. सगळा दिवस व सगळी रात्र त्याचा ताप निघाला नाही. अर्थातच त्याने त्या दिवशी खाणेपिणे काही केले नाही. पंचमी उजाडते न उजाडते तो त्याचे प्राणसंक्रमण झाले, म्हणजे तो पंचत्व पावला. आणि त्या पाप्याला नेण्याकरिता गणेशदूत विमान घेऊन आले व ते त्याला स्वानंदलोकास घेऊन गेले ! तेथे ह्या चांडाळाला ब्रह्मज्ञान झाले व तो ब्रह्म झाला. राजा ! केवळ अज्ञानाने चतुर्थीव्रत आपल्या हातून घडले म्हणून जर ब्रह्मलोक प्राप्ति होते तर या चतुर्थीव्रताचे विधियुक्त, ज्ञानपूर्वक आणि श्रद्धापूर्वक अनुपालन झाले असता आपल्या सर्व संकटांचा परिहार होऊन, आपल्या सर्व मनकामना पूर्ण होऊन आपल्यास स्वानंदलोकाचा अधिगम का होणार नाही ? राजा ! ह्याकरिता भाद्रपद शुद्ध चतुर्थीचे दिवशी मृण्मय गणेशमूर्ति करून प्राणप्रतिष्ठापूर्वक तिची स्थापना करावी. त्या दिवशी उपवास करावा

आणि दुसरे दिवशी चतुर्थीव्रताची सांगता करून ब्राह्मणांसह पारणा करावी. त्यायोगे सर्व संकटांचा परिहार होईल."

सूतः- मुनीहो ! ह्याप्रमाणे दशरथराजाला वसिष्ठांनी बारा महिन्यांच्या शुक्लचतुर्थीचे माहात्म्य सांगून प्रत्येक शुक्लचतुर्थीला उपवास घडला असता महापापी लोकांचासुद्धा उद्धार होऊन ते स्वानंदलोकाला जातात असे सांगितले, व मलमासाची ह्मणजे अधिक मासाची कथाही ह्याचप्रमाणे सांगून ह्या सर्व कथांच्याद्वारे चतुर्थी-व्रतावरील दशरथाची श्रद्धा दृढ केली. पुढे दशरथाने संकष्टीचतुर्थी व्रताचा इतिहास विचारला. तेंव्हा वसिष्ठ ह्मणाले, 'राजा ! गणपतीच्या चतुर्थीव्रताविषयींची ही तुझी श्रद्धा पाहून मला फार आनंद होतो. महात्मा श्रींगणेश ह्यांच्या कथेविषयीं आदर उत्पन्न होण्याला पूर्वपुण्याचा मोठाच संचय असावा लागतो. राजा ! तूं सर्व प्रकारे धन्य आहेस. कृष्णचतुर्थीसंबंधाने तुझा प्रश्न आहे. तदनुसार या महा-पुण्यकारक चतुर्थीव्रताचीं तुला कथा सांगतो. ऐक : सहस्राख्य नगरीमध्ये शूरसेन नांवाचा एक राजा होता. त्याला गायनशास्त्राचा अतिशय हव्यास होता. एके दिवशी सभेमध्ये त्याच्या समक्ष गायनशास्त्राची चर्चा चालली असता राजांगणामध्ये एक उज्वल व अति देदीप्यमान विमान एकदम खाली आलेले सभासदाच्या दृष्टीस पडले. जवळ जाऊन हा काय चमत्कार आहे हे पाहण्यासाठी आपल्या मंत्रीगणासह वर्तमान राजा सभेतून उठला, व विमान उतरले होते तेथे आला. सहस्राख्य नगरींतील सर्व नागरिकही त्या ठिकाणीं जमा झाले. राजा विमानाजवळ गेला तेंव्हा देवगणांसह देवाधिपति इंद्र विमानात बसून आला आहे असे त्यास दिसले. राजाने इंद्राला दंडवत् घातला आणि

उठून व हात जोडून इंद्राला मोठ्या विनयपूर्ण वाणीने म्हणाला, ‘ देवा ! धन्य मी की आपले दर्शन मला आज झाले ! माझ्या नगरीला आपल्या चरणांचा स्पर्श झाला व माझ्या प्रासादाने आपल्या चरण-रजाच्या संगतीचे सुख अनुभवले ह्यावरून मी खरोखर कृतकृत्य झालो आहे. हे प्रभो ! आपण आलात कोठून, जावयाचे कोणीकडे, आपले हे विमान खाली कसे आले इत्यादि गोष्टी आपण मला सांगाल काय ? आपण वाटेल ती आज्ञा ह्या दासाला करा, हा सेवक आपली इच्छा पूर्ण करण्याला सदैव सिद्धच आहे. महाराज ! कोणाच्या पापाने हे विमान खाली पडले हे मला कृपा करून सांगा.’ इंद्र ह्मणाला ‘राजा ! महापापी नावाच्या एका कैवर्तकाला एका गणेशभक्त ऋषीची गाठ पडली. त्याने त्या कैवर्तकाला गणेशभजनाची व गणेश-पूजनाची दीक्षा दिली. पुढे, त्या महापाप्यांने अनेक सहस्त्रवर्षे गणप-तीचे एकनिष्ठ आराधन केले ही त्याची अव्यभिचारिणी भक्ति पाहून गणेशब्रह्म प्रसन्न झाले आणि त्यांनी त्या पाप्याच्या सर्व पापांचा संहार करून त्याला ब्राह्मणत्व दिले, त्याला शुंडाधर केले व त्याचे नांव भृशुंडी असे ठेवून ‘ जगताचा उद्धार करण्याकरिता तूं येथे रहा अशी त्यास आज्ञा केली;’ ह्या आज्ञेप्रमाणे तो ह्या कर्मभूमींवर वास्तव्य करून राहिला आहे. त्याचे दर्शन झाले असता मनुष्य जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. मी आज ह्या माझ्या देवमित्रासहवर्तमान भृशुंडीचे दर्शन घेण्याकरिता गेलो होतो. तेथे जाऊन आह्मी त्याची पूजा केली व त्याचा निरोप घेऊन स्वर्लोकास जाण्याकरिता निघालो आहोत. आमचे विमान चालत असतां त्याच्यावर एका महापापी व रोगग्रस्त वैश्याचीं दृष्टि गेली आणि हे विमान खाली पडले ! राजा! तुझ्या राज्यात जर कोणी कृष्णचतुर्थीच्या महाव्रताचे सांगोपांग

अनुपालन करीत असेल व तो धन्य पुरुष आपले पुण्य आमच्याकरिता खर्ची घालण्यास तयार असेल तर मात्र हे विमान येथून हालविता येईल! व आमच्या विमानाला आमच्या लोकी जाण्याचे सामर्थ्य येईल. या विमानाला गती देण्याला चतुर्थीव्रताशिवाय दुसरे कोणतेही साधन समर्थ नाही.' इंद्राचे हे भाषण संपते न संपते तो दुसरे एक विमान तेथे येऊन दाखल झाले. त्यावर गणेशदूत बसले होते. ते एका अतिपापी, अंध, रोगयुक्त, दुर्गंधपूर्ण व मद्यपी चांडाळणीला नेण्याकरता आले होते. या चांडाळणीने पौष वद्य तृतीयेला मद्याचे अतिरिक्त पान केले होते. त्यामुळे तिला धुंदी येऊन ती जी एकदा लाकडासारखी निश्चेष्ट होऊन खाली पडली, ती दुसरे दिवशी म्हणजे कृष्ण चतुर्थीला चंद्रोदय झाल्यावर सावध झाली. तिला प्रखर क्षुधा लागली होती. क्षुधाशमनार्थ ती भिक्षा मागण्याकरिता निघाली आणि जे काय मिळाले त्याचे तिने भक्षण केले. वद्य पंचमीला ती पंचत्व पावली. तिला घेऊन जाण्याकरिता ते दुसरे मागाहून आलेले विमान आले होते. ते विमान त्या चांडाळणीला घेऊन जात असता इंद्राच्या विमाना जवळून गेले; तेव्हा इंद्रविमानालाही गति मिळून देवगणासह इंद्र स्वलोकी जाऊन सुखरुप पोचला. शूरसेनराजानेही त्या दिवसापासून संकष्टी चतुर्थीचे व्रत घेतले. पुढे काही दिवसांनी त्या राजाला ब्रह्मज्ञान होऊन तो अखंड शांतीचा अनुभव घेता झाला. त्याला घेऊन जाण्याकरता गणेशदूत विमान घेऊन आले व सर्व लोकासह स्वानंदलोकास जाण्याकरता राजा सिद्ध झाला पण कांही केल्याने विमान जागचे हलेना; तेंव्हा गणेशदूतांनी राजास सांगितले की, त्या वैश्य रोग्याला काढून टाकल्याशिवाय हे विमान जागचे हालणार नाही. हे ऐकून राजाने गणेशदूतास प्रश्न विचारले की,

'ह्या पापी वैश्याची दृष्ट पडल्यामुळे इंद्राचे विमान खाली पडले व आमचे विमान चालत नाही हे काय आहे? असे ह्याने कोणते महापातक केले आहे ते मला सांगा, ह्मणजे प्रायश्चित्त देऊन याला मी शुद्ध करीन आणि याच्यासह स्वानंदलोकाला जाईन.' गणेशदूतांनी सांगितले की, त्याने पूर्व जन्मी स्वस्त्रीत्याग, वेश्यागमन, चौरकर्म, पितृहत्त्या, मातृहत्यादि महापातके केली होती, आपल्या धर्मपत्नीला ठार मारले होते, गुरुपत्नीवर बलात्कार केला होता, तेव्हा यमलोकी याला अत्यंत यातना झाल्या; पुढे कर्मभूमीवर जन्म होऊन हा चांडाळ रोगाने ग्रासलेला आहे, तरी पापाचरण करण्यास कमी करीत नाही. अद्यापि ब्राह्मणहत्या, परस्त्रीगमन, इत्यादि महापातके ह्याच्या हातून घडतच आहेत. असो; ह्या पाप्याच्या दारुण पातकामुळे इंद्राचे विमान खाली पडले व आपले वर चढत नाही. राजा! ह्या चांडाळाचा त्याग कर. हा वृत्तांत ऐकून राजाला अतिशय वाईट वाटले, व अत्यंत करुणाही उत्पन्न झाली. त्याने गणेशदूतास पुन्हा नमस्कार केला व 'ज्याने हा पापी शुद्ध होईल असे प्रायश्चित्त सांगा.' अशी त्याने दूतास विनंती केली. ती ऐकून गणेशदूतांनाही मोठा संतोष झाला. ते ह्मणाले, 'हे शूरसेना! ह्या प्राण्याला ऐकू जाईल असा गजानन नावाचा गजर करा. गजानन हे नाव चारी वेदांचे सार आहे व ब्रह्मदेव आपल्या चारी मुखांनी ह्याच नावाचा जप करीत असतो. राजा! ह्याला गजानन हे नाव ऐकूदे ह्मणजे हा पातकापासून मुक्त होईल.' गणेशदूतांच्या उपदेशाप्रमाणे राजाने गणेश नावाचा गजर केला, पुढे, ह्या पापी वैश्यालाही अत्यंत पश्चात्ताप होऊन त्याने गजानन नावाचा जप, संकष्टी चतुर्थीचे व्रत, गणेशपूजन व गणेशध्यान करण्याचा दृढ संकल्प केला, व या संकल्पाप्रमाणे आचरण करून, स्वानंदलोक व अखंड शांति पावला.

सूत :- वसिष्ठाने दशरथाला फाल्गुनातील संकष्टी चतुर्थीचे माहात्म्य सांगितले. त्यात 'पुलस्यपुत्र रावण याने सुदारुण तपश्चर्या करून त्रैलोक्याचे राज्य मिळविले; नंतर, पुन्हा अरण्यांत जाऊन ज्ञानयोगाने वेदोक्त ब्रह्माचे एकनिष्ठ चिंतन केले. तथापि शांति मिळेना म्हणून नारदाच्या सांगण्यावरून रावणाने संकष्टी चतुर्थीच्या व्रताचे अनुपालन करण्यासाठी गणेशब्रह्माचे ज्ञान समजून घेतले व शांति मिळविली; पुढे पूर्वसंचित पापाने त्याला गणपतीचे विस्मरण झाले; त्याने गणपतिव्रताचा त्याग केला; अधर्माचे अवलंबन करून पापाचा फार मोठा संचय केला आणि राजा! दशरथा! तुझ्या पुत्राच्या हातून मरण पावण्याची आपली योग्यता करून घेतली इत्यादि' सर्व पूर्वकल्पातील कथा वसिष्ठांनी दशरथास सांगितली. अशाच बारा महिन्यांच्या बारा कथा दशरथास सांगून वसिष्ठांनी दशरथाची गणपतीवरील श्रद्धा दृढ केली. तसेच मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थीची कथा सांगत असता, 'अयोध्येचा राजा, सत्यव्रत, धर्मनिष्ठ आणि परोपकारी जो हरिश्चंद्र, त्याचा विश्वामित्राने छळ केला व सर्व राज्य हरण करून घेतले व राजा वनवासात असता मार्गशीर्ष वद्य चतुर्थीला काही खावयास मिळाले नाही, चंद्रोदयापर्यंत त्याला सहज उपवास घडला. चद्रोदय झाल्यावर यदृच्छेने खावयास मिळून चतुर्थीव्रताची सांगता झाली, या त्याच्या पुण्याने विश्वामित्राची छलबुद्धि नाहीशी होऊन राजावर अनुग्रह करावा अशी त्याला प्रेरणा झाली. हरिश्चंद्राने विचारल्यावरून चतुर्थीव्रताचे माहात्म्य ऋषीने राजास सांगितले व त्या दिवसापासून राजा गणेशभक्त झाला.' हीही कथा वसिष्ठांनी दशरथास सांगितली.

शमी वृक्षाचे माहात्म्य

सूत :– मुनिनो ! नंतर वसिष्ठ ऋषीनी राजास सांगितले: पांचाळ देशामध्ये कोणी एक अग्निहोत्रोत्पन्न ब्राह्मण राहात असे. तो बराच मोठा झाल्यावर त्याला कुष्ट झाले. त्याच्या अंगाला पुष्कळ भोके पडली. त्यांतच किडे पडले व तो अंध झाला ! ते पाहून त्याच्या दुःखी आईबापांनी अत्रिऋषीकडे जाऊन ही मुलांची वार्ता सांगितली आणि त्याला शरण जाऊन 'ह्या रोगावर काही उपाय असला तर कृपा करून सांगा' असे परोपरीने विनविले. अत्रि ऋषीने चतुर्थी-व्रताचा महिमा सांगून 'विधिपुरःसर संकष्टी चतुर्थी करा' व त्या मुलाला 'शमी वृक्षाच्या शेजारी नेऊन ठेवा' असे सांगितले. आईबापांनी त्याप्रमाणे केले व मुलाला गजानन नावाचा जप करण्यास सागितले. तो मुलगा कृष्णचतुर्थीच्या प्रातःकाळपासून रात्री चंद्रोदय होईपर्यंत उपवासव्रत करून गणपति नावाचा जप करीत शमी-वृक्षाखाली राहिला. याप्रमाणे काही चतुर्थ्या गेल्यावर बापाने मुलाला घरी आणून पाहिले तो त्याला दिसले की, मुलाची दृष्टि साफ झाली आहे,. त्याच्या जखमा भरून आल्या आहेत; कुष्ट नाहीसे होऊन सर्वांग स्वच्छ झाले आहे ! मुलगा सर्वथा बरा झाला असे पाहून आईबापाला अवर्णनीय आनंद झाला. तेव्हापासून त्यांनी निश्चय केला की, प्रत्येक कृष्णचतुर्थीला उपवास करून व गणपतीचे स्मरण करीत तो सर्व दिवस शमीतलाखाली घालवावयाचा. हा नियम त्या कुटुंबाने आमरणात पाळला व ते कुटुंब खूप सुखी झाले.

कोणत्या चतुर्थीला काय खावे ?

सूत :– शौनक ! स्वायुंभुव मनूला इक्ष्वाकु नावाचा एक धनेच्छु मुलगा होता. तो धाकटा होता ह्मणून त्याला राज्य मिळण्याचा संभव नव्हता. पुढे गुरुकृपेने त्याला गणपतिव्रताची दीक्षा मिळाली, व त्याने संकष्टी चतुर्थीचे व्रत घेतले. श्रावण कृष्णचतुर्थीला तो पंचखाद्याचे सात लाडू भक्षण करी. पंचखाद्य ह्मणजे द्राक्षे, साखर, खजूर, खोबरे व खसखस मिळून समप्रमाणाने जो पदार्थ सिद्ध होतो तो. भाद्रपद कृष्णचतुर्थीला दही, अश्विनी निर्जळी कार्तिकीला दूध, मार्गशीर्षीला जल, पौषीला गोमूत्र, माघीला पांढरे तीळ, फाल्गुनीला तूप-साखर, चैत्रीला पंचगव्य, वैशाखीला कमळाचे बी, ज्येष्ठीला गाईचे तूप, आषाढीला मध या पदार्थांचा गणपतीला नैवेद्य दाखवून. चंद्रोदयापर्यंत उपवास करून, व चंद्रोदयी गणेशपूजन करून वर सांगितलेले पदार्थ भक्षण करीत असे. ह्या व्रताच्या प्रभावाने असा चमत्कार झाला की, त्याचा थोरला भाऊ सुद्युम्न हा दैवयोगाने ' षला ' नामक स्त्री झाला व राज्य करण्यास अयोग्य झाला ! त्यामुळे मंत्र्यांनी व पुरोहितांनी सांगितल्यावरून मनूने इक्ष्वाकूला राज्यभिषेक केला. राजा ! ह्याप्रमाणे असाध्य गोष्टीसुद्धा धर्ममार्गाने साध्य करून देणे हा या व्रताचा प्रभाव आहे. राजा ! चतुर्थीव्रत तू करीत नाहीस किंवा तुझ्या राज्यांत कोणीही करीत नाही, ही गोष्ट चांगली नाही. याकरता गणेशव्रताची दीक्षा मी तुला देतो, ती घे. गणपतीची सेवा कर. चतुर्थीव्रत करावयास लाग. कृष्णचतुर्थी दिवशी चंद्रोदयापर्यंत तूं उपवास कर तुला निश्चयाने पुत्रप्राप्ति होईल.' हे ऐकून राजाला आनंद झाला. वसिष्ठाचा नमस्कारपूर्वक निरोप घेऊन तो स्वनगरीस गेला. नंतर

त्याने गणपतिव्रत करण्याला आणि करविण्याला आरंभ केला. या व्रताच्या प्रभावाने त्याला राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न या नांवाचे चार पुत्र झाले. प्रत्यक्ष वैकुंठवासी विष्णु पुत्ररूपाने राजाच्या घरी अवतरला होता. या चारी मुलांनी लहानपणीच दिगंत कीर्ती मिळविली. राजास अति आनंद झाला. शेवटी तो गणपतीच्या स्वानंदलोकाला जाता झाला. त्याच्या राज्यांत दुःखाचे, संकटाचे किंवा तापत्रयाचे नांवच राहिले नाही. मुनिहो ! ह्याप्रमाणे इहलोकी सुख व अंती मोक्षप्राप्ति हे फल हवे असेल तर दशरथाप्रमाणे गणपतीचे व्रत एकनिष्ठपणे केले पाहिजे. असो ! राजाला जसा परमेश्वर प्रसन्न झाला तसा तो सर्व गणेशभक्तांना प्रसन्न होईल असा निश्चय करून प्रत्येकाने गणपतिव्रत करीत राहावे.

चतुर्थीव्रताचे उद्यापन

सूतः– ही कथा झाल्यानंतर मुद्गलाने दक्षाला गणपतिव्रताचे उद्यापन करण्याचा विधि सांगितला. व्रताचे उद्यापन भाद्रपद शुक्ल चतुर्थीला अथवा माघी कृष्ण चतुर्थीला करावे. सामर्थ्य असेल त्या मानाने केळी वगैरे लावून सुशोभित मंडप तयार करावा, छत द्यावे, आरसे लावावे, चोहीकडे दिव्यांचा लखलखाट करावा. मणि, हिरे, मोती इत्यादि रत्नांचे अथवा लतापल्लवादिकांचे घोस व गुच्छ मंडपभर टांगून ठेवावे. शुक्लचतुर्थी असेल तर मध्यान्ह समयीं किंवा कृष्ण चतुर्थी असेल तर चंद्रोदयाचे वेळी मोठ्या समारंभाने रुप्याच्या अथवा मातीच्या मूर्तीला वस्त्रे नेसवून व सुवर्णकलशावर ठेविलेल्या ताम्हणात ठेवून षोडशोपचार पूजा करावी. ही मूर्ति सर्वावयवसंपूर्ण असून सर्व भूषणांनी विराजित असावी.

आचरण शुद्ध असे एकवीस ब्राह्मण मिळवून 'गणानां त्वा' या मंत्राचा जप व अथर्वशीर्षाचा अभिषेक करावा. अनेक प्रकारची वाद्ये वाजत असावी. वेदघोष, शास्त्रप्रवचन व पुराणप्रवचन त्या मंडपांत ठायी ठायी चालले असावे. होमहवन करावे. बलिदान देऊन एकवीस मोदकांची वायने ब्राह्मणांस द्यावी. एकवीस दंपत्ये सांगून त्यास विपुल दक्षणा द्यावी. सव्त्राष्णीस चोळया व ब्राह्मणास वस्त्रे द्यावी. गणपतीचे व चद्राचे पूजन करावे व त्याला अर्घ्यप्रदान द्यावे. शुक्ल चतुर्थीचे असेल तर पंचमीला व कृष्ण चतुर्थीला उद्यापन केले असेल तर चद्रोदयाचे वेळी, ब्राह्मणभोजन करावे. रात्री गणेशकथा करावी. गणपति प्रसन्न करण्याकरता दीन, दुबळे, आंधळेपांगळे, इत्यादिकास अन्नसमर्पण करावे ब्राह्मण-भोजन झाल्यावर आपण पूजा केलेली मूर्ति गुरूला दक्षणापूर्वक द्यावी व एकवीस ब्राह्मणास कलश द्यावे, व्रतोद्यापन झाल्यावरही, आमरणांत गणेशभजनपूजन सोडून देऊ नये गणेशभक्ताला केव्हांही दुःखप्राप्ति होत नाही. हा उद्यापनाचा विधि होय.

लोभासुराचा वृत्तांत–लोभासुरदिग्विजय–गणपतीचा अवतार–लोभासुराचा उद्धार

सूत :–पुढे मुद्गलाने दक्षाला लोभासुर नामक राक्षसाचा गणेशांनी वध केला, ती कथा सांगितली. एकदा पर्वतश्रेष्ठ कैलासावर पार्वतीसह शंकर आपल्या नंदिकेश्वरादि गणमंडळाच्या मध्ये बसून कित्येक ऋषीशी वादसंवाद करीत होता. तेथे अकस्मात स्वर्ग-निधीचा अध्यक्ष व उत्तरदिशेचा स्वामी, जो कुबेर तो शंकराचे दर्शन घेण्याकरिता आला. त्याने शंकरांला व गिरिजेला

नमस्कार करून शंकरावर चवरी ढाळीत तो उभा राहीला. पण त्याच्या दुर्दैवाने तो सर्वांगसुंदर झाला व रूपानें अप्रतिम अशी जी पर्वत कन्या पार्वती तिच्या अति सान्निध्य उभा राहीला असल्यामुळें त्याला मोह उत्पन्न झाला. तो कामातुर झाला. सकाम दृष्टीने त्याने पार्वतीकडे टक लावली. हे पार्वतीस दिसले तेव्हां ती संतापली, रागाने तिचे ओठ फुरफुरू लागले, डोळे लाल झाले, भिवया वक्र झाल्या व तिचा राग इतका अनावर झाला की, तिच्यानेत्रांतून ज्वालारूपाने बाहेर पडून तो राग कुबेराला भाजता झाला! कुबेरही दुःखशोकाने विव्हल झाला. आपल्या गात्रावरील त्याचे स्वामित्व नाहीसे झाले आणि तेथेच त्याचे स्वामित्व नाहीसे झाले आणि तेथेच त्याचे वीर्यस्खलन होऊन एक सुशोभित असा पुत्र उत्पन्न झाला. राजा! पार्वतीला कुबेराने नमस्कार केला, आणि ती प्रसन्न होईल अशी तिची स्तुती करू लागला. शंकरानींही तिचे समाधान केले. पुष्कळ विनवण्या ऐकून व 'पुनः असे करणार नाही' असे वचन मिळाल्यावर पार्वतीदेवीने कुबेराला क्षमा केली कणि तो त्या मुलाला घेऊन घरी गेला. ब्राह्मणांनी त्या मुलाचे लोभ असे नाव ठेवले. हा मुलगा आपल्या बापाच्या घरी असता त्याला तारासुराने चोरून नेले. हा तारासुर एक राक्षस होता. इंद्राने त्याचा पराभव केला होता म्हणून दुःखी असणाऱ्या या तारासुराला नारदाने सांगितले की, 'कुबेराला लोभ नावाचा एक पुत्र उत्पन्न झाला आहे, त्याचे तू हरण कर. या मुलाचे पालनपोषण तू उत्तम केलेस तर इंद्राचा पराभव होऊन तुझी सर्व मनकामना पूर्ण होईल.' तारासुराला हा उपदेश मानवला. नंतर आत्ताच सांगितल्याप्रमाणे तो लोभाला घेऊन आला आणि त्याचे त्याने प्रेमाने उत्तम लालनपालन केले. हा मुलगा भारी अचपळ! ह्याने लहानपणीच वृक्ष

समूळ उपटावे. हाताच्या चापटीने मोठमोठाले दगड फोडावे. अशी याची अति क्रीडा होती! हा त्याचा पराक्रम पाहून राक्षसांना अति आनंद झाला; आपण कृतकृत्य झालो असे त्यांस वाटू लागले. मुंज झाल्यावर शुक्राजवळ जाऊन वेदांचे अध्ययन, सर्वमोहकमायाविद्येचा अभ्यास, धनुर्विद्येचे संपादन या गोष्टी त्याने केल्या. नंतर पंचाक्षरी-मंत्राची दीक्षा घेऊन वनांत जाऊन त्याने शंकराची दहा हजार वर्षे कडकडीत तपश्चर्या केली की, तो सर्व दाता शंकर त्याला प्रसन्न झाला आणि वर देता झाला की, 'ज्यायोगे त्याला अपूर्व ऐश्व-मिळावे, त्याची प्रकृती निकोप असावी, मनाला आणि वाणीला जे गोचर आहे त्यापासून त्याला मृत्यु नसावा आणि तो सदा सुखी असावा.' हे वर मिळवून आनंदलेला लोभासुर घरी आला व आपल्या मातापितरांस, इष्टमित्रांस आणि सर्व राक्षसजातीस आपल्या वराची हकीगत सांगता झाला. ती ऐकून त्यांनाही अति आनंद झाला. त्रैलोक्याचे स्वामित्व आपण पुन्हा मिळवू अशी बळ-कट आशा उत्पन्न होऊन त्यांनी दैत्याच्या सिंहासनावर लोभासुराची स्थापना केली व शुक्राकडून त्यास राज्याभिषेक करविला. महिषासुराने तृष्णा नावाची आपली सुंदर कन्या लोभासुराला अर्पण केली. राज्या-भिषेक झाल्यावर पृथ्वीवरील सर्व राक्षस एकत्र झाले आणि सभा भर-वून तेथे त्रैलोक्यविजय करावयाचा हा सिद्धांत निश्चित केला. संख्या अगणित, जातीने बळकट शस्त्रास्त्रविद्येमध्ये प्रवीण अशी ती राक्षसा-ची सेना होती. त्यांनी हां हां म्हणतां पृथ्वीतील क्षत्रीयांचा पराभव करून तेथे आपले स्वामित्व स्थापन केले. पृथ्वीविजय झाल्यावर लोभाने स्वर्गावर स्वारी करण्याचा संकल्प ठरविला. लोभासुर स्वर्गावर स्वारी करणार ही वार्ता ऐकल्यावर 'देवांच्या हृदयांनी ठावच सोडला.

'मग काय? लोभासुर येण्याचे अगोदरच त्यांनी आपल्या स्थानाचा त्याग केला अर्थातच रक्ताचा एकही बिंदु न सांडता राक्षसांस स्वर्गलोकांचे स्वामित्व आयतेच मिळाले. बृहस्पतीसह इंद्रादि देव वैकुंठास गेल्यावर विष्णूने ब्रह्मदेवास व त्यांस धीर दिला. देवांचे रक्षण करण्यास विष्णू तत्पर असतो. तेंव्हां गरुडावर आरूढ होऊन विष्णूची स्वारी देवांसहवर्तमान अमरावतींवर स्वारी करती झाली. देवदानवांचे अतिघोर व अतिदारूण युद्ध अहोरात्र पांच दिवस झाले. अनेक द्वंद्व युद्धे झाली. विष्णूचे व लोभासुराचे द्वंद्व युद्ध झाले. विष्णू मूर्च्छित झाला आणि त्यास घेऊन सर्व देव पळून गेले. हा पराभव झाल्यानंतर देव शंकरास शरण गेले प्रसन्न होऊन 'भिऊं नका' असे शंकराने त्यांस आश्वासन दिले. इकडे लोभासुराने शिष्टाईसाठी शंकराकडे गजासुरास पाठविण्याचे ठरविले. लोभाने गजासुराबरोबर निरोप पाठविला तो असा. 'शंकरा, तुम्ही आम्हांस पूज्य आहात. आम्ही आपले भक्त आहोत. आमचा शत्रु विष्णू आपल्या पाठीशी घातला आहे, त्याला आमच्या स्वाधीन करा; नाहीतर आम्हास आपल्याशीं युद्ध करावे लागेल. यालाही कांही हरकत नाही. कर्माने आपण श्रेष्ठ झालाना? राक्षसावरही कर्माचा अनुग्रह आहे. श्रेष्ठ-कनिष्ठता कर्माने प्राप्त होते. आम्ही कर्मसमर्थ आहोत हे विसरू नका आणि विष्णू आम्हास परत द्या.' गजासुराने हा निरोप जशाचातसा शंकरास सांगितला. शंकराने विष्णूस राक्षसांच्या स्वाधीन करण्याचे नाकारले, पण सर्व देवास घेऊन तो कैलास सोडून पर्वताच्या दर्‍याखोर्‍यात राहूं लागला! असेही पुष्कळ दिवस लोटले.

इकडे त्रैलोक्यविजय केल्यांवर सर्व राक्षस गर्वाने उन्मत्त झाले व स्त्रिया, मांस व मदिरा इत्यादिकांच्या सेवनामध्ये गर्क होऊन गेले. त्यांची स्वत:ची नीती सुटली व त्रैलोक्यांत जे जे लोक त्यांच्या स्वाधीन झाले होते त्यांच्या नीतीचा या राक्षसांनी भ्रष्टाकार केला. यज्ञयागादि कर्मांचा लोप झाल्यामुळे देवादिकास आपआपले हविर्भाग मिळेनात. ह्यामुळेही बिचाऱ्या देवास वनवासापासून होणारे दुःख जास्तच दुणावले. ह्याप्रमाणे त्यांनी बरेच दिवस दु:ख भोगले; पुढे त्यांच्या प्रारब्ध उदयाची वेळ आली तेंव्हा 'रैभ्य' ऋषीचे दर्शन त्यास झाले. रैभ्याने देवांस गणेशब्रह्माचा महिमा, गणेश उपासनेचे महत्व, चतुर्थी व्रताचा प्रभाव इत्यादि विघ्नहारक उपायांच्या गोष्टी सांगून त्यास गणेशमंत्राची दीक्षा दिली. देवांनीही भक्तिभावाने एकनिष्ठ उत्तम प्रकारची तपश्चर्या करून गणपतीस प्रसन्न करून घेतले आणि त्याच्या कृपाप्रसादाने इष्ट वरांची प्राप्ति करून घेतली. 'लोभासुराला मारीन' असे गणपतीनी वचन दिले. नंतर गजाननाने शिष्टाई करण्यासाठी शंकराला दैत्यराज जो मोहासुर त्याकडे पाठविले. शंकराने लोभासुराला साम करण्याविषयी उपदेश करून 'गणेश-ब्रह्मापुढे तुझे काही चालावयाचे नाही' असे सांगितले उन्मत्त लोभासुराला हा उपदेश मानवला नाहीच. निरोप घेऊन शंकर परत आला व शिष्टाईचे काम सफल झाले नाही असे गणपतीस त्याने सांगितले. ते ऐकून गणपति क्रोधाविष्ट झाले आणि अग्न्यस्त्र सोडून गणपतीनी राक्षसांची राजधानी जाळण्यास प्रारंभ केला. राक्षसानी मेघास्त्र सोडले, परंतु त्याचा कांहीएक उपयोग झाला नाही; इतकेच नव्हे तर ते मेघोदक तैलरूप झाले आणि अग्नीच्या ज्वाळा जास्तच भडकल्या! लोभासुराचा रथही जळून खाक झाला. हा चमत्कार

पाहून व मनाला आणि वाणीला अगोचर असे हे गणेशब्रह्म आहे असे पाहून लोभासुराचा मद उतरला, त्याचे डोळे उघडले, त्याला पश्चात्ताप झाला, व आपण कर्मलोप व धर्म भ्रष्टकार केला असे समजून त्याला अतिशय दुःख झाले. परंतु शुक्राच्या उपदेशाने त्याला धीर आला. शुक्राने त्यास गणेशस्वरूप समजाविले व ' देवाला शरण गेला नाहीस तर खास मरशील ' असे निश्चयाने सांगितले. तेंव्हा मनाचा निश्चय करून व गणपतीच एक आधार आहे असा निश्चय झाल्यावर तो गणपतीला शरण गेला, भक्तिभावाने गणपतीची त्याने उत्तम स्तुति केली व गणेशाकडून ' गणपतिभक्तांशी तुझा स्नेह होईल. जे लोक कर्माच्या आरंभी माझे स्मरण किंवा पूजन करीत नाहीत त्या लोकांच्या पुण्य कर्मांचे फळ तूं हरण कर ' असे वर मिळविता झाला. हे वर घेऊन व गजाननाला साष्टांग नमस्कार करून शुक्रासहित लोभासुर राक्षस पाताळलोकी गेला. पुढे त्याने आपली उन्मत्तपणाची वागणूक सोडली आणि तो आपला मित्र झाला, हे महत्कृत्य केवळ गजाननाची कृपा म्हणून झाले, असे जाणून देवांनी गणपतीची दिव्य स्तुति केली. आणि पुढे गणपति संप्रदायाचा महिमा वाढवून अखंड भक्तीचा वर मागून घेतला. नतर देव आपआपल्या स्थानी गेले.

सिंदुरासुराचा जन्म-सिंदुरासुर पृथ्वीचा स्वामी होतो

सूतः- एकदां झोपेतून ब्रह्मदेव जागा झाला असता, त्याला एक जांभई आली. तिच्यापासून सुंदर, तेजस्वी, सुगंधयुक्त असा एक पुरुष उत्पन्न झाला. ब्रह्मदेवाने त्याला पुत्र असे मानले. त्याने त्याचे नांव सिंदुर असे ठेवून त्या मुलाला पुष्कळसे वरही दिले.

त्यामुळे तो सर्वगामी झाला. त्याला हजारो हत्तींची शक्ति प्राप्त झाली, आणि ज्याला तो आलिंगन देईल त्याला ठार मारण्याचेही सामर्थ्य सिंदुराला प्राप्त झाले. ब्रह्मदेवाने त्याला हे जे वर दिले त्याचे कारण, त्याची पूर्वजन्मींची तपश्चर्या हे होय असो, ब्रह्मदेवाचा आशीर्वाद घेऊन निघून जाणार इतक्यात 'कदाचित् आपल्या बापाने आपल्यास फसविले आहे की काय !' हे पाहण्यासाठी तो ब्रह्मदेवाला आलिंगन देण्याकरिता धांवला. तेव्हा आपल्यास मारण्याकरिता हा कृतघ्न पुत्राधम येत आहे असे पाहून ब्रह्मदेवास अनावर क्रोध प्राप्त झाला व त्याने त्याला शाप दिला की, 'शेवटी तुला एकदंताच्या हातून मृत्यु येईल.' हा शाप देऊन ब्रह्मदेव पळून वैकुंठाला निघून गेला. सिंदुरही त्याच्या मागोमाग वैकुंठास आला. वैकुंठवासी विष्णूने त्याचे ते भयंकर स्वरूप पाहून व त्याच्या विरुद्ध आपले काही चालणार नाही असे पाहून नम्र झाला व त्याला सांगितले की 'आम्ही तर तुझ्या स्वाधीन झालोच आहोंत. आमच्या हातून तुला कोणताही उपद्रव व्हायचा नाही ध्यानांत ठेव की, सर्व नाश करणारा शंकर आहे, त्याच्याविषयीं मात्र सावध रहा,' हे ऐकून भोळा सिंदुर कैलासाला गेला तेथे त्याने पाहिले की, शंकर दिगंबर असून ध्यानस्थ बसला आहे. याला मारण्यात काही जीव नाही, असा विचार करून सिंदुराने शंकराची अर्धांगी जी सुंदर पार्वती तिला मात्र घेऊन चालता झाला. पार्वती मूर्च्छित झाली. शिवगणांमध्ये हाःहाःकार झाला, तथापि शंकराचे ध्यान उतरले नाही. इकडे मूर्च्छेतून सावध झाल्यावर पार्वतीने गणेशाचे ध्यान करून त्याला करुणा येईल असे उत्तम स्तोत्र म्हटले. ध्यानातून उठल्यावर शंकरानेही गणपतीची संकट-

विमोचनाबद्दल प्रार्थना केली. या उभयतांच्या प्रार्थनांचा परिणाम असा झाला की, राक्षसाच्या हृदयाला एक मोठा धक्का बसला. त्याला तिरमिरी आली व तो खाली जमिनीवर पडण्याच्या बेतात आला. इतक्यात वाटेने एक ब्राह्मण चालला होता त्याने सिंदुराला हात देऊन उपदेश केला की 'तूं शक्तीला चोरून नेत आहेस. हा शंकर केंव्हा तरीं येऊन तुला गुप्त रूपाने ठार मारील. तू त्रैलोक्यविजयाला जा. शंकर तुझ्या ताब्यात येईल असे मी करतो.' सिंदुरास हा उपदेश पटला शंकरानेही सिंदुरदैत्याचे वर्चस्व कबूल केले. नंतर सिंदुरासुर भूलोकावर आला आणि सर्व क्षत्रियांचा पराभव करून पृथ्वीचा स्वामी झाला.

पार्वतीच्या मळापासून पाहरेकऱ्याची निर्मिती

इकडे 'ब्राह्मणरूपाने गणपति अवतीर्ण झाले. व त्यांनीच आपली सुटका केली' असे शंकर भवानीला ज्ञान होऊन दोघांनीही गणपतीचे स्तवन केले आणि अखंड भक्ति, व अभंग शांति हे वर मागून घेतले. तसेच ह्या उभयतांनी आणखी एक मागणे मागितले की, 'आमच्या येथे पुत्ररूपाने आपण अवतीर्ण व्हा' ही प्रार्थना ऐकून गणपतीस आनद झाला व त्यांनी 'तथास्तु' असे म्हटले. पुढे, एक दिवस पार्वती स्नानगृहामध्ये विवस्त्र होवून स्नान करीत असता शंकर एकदम तेथे आला. तेंव्हा ती भारी लज्जाकुल झाली. तिने त्या वेळी आपल्या लज्जेचे कसे तरी रक्षण केले. पुढे तिच्या सख्यांनी तिला सांगितले की, 'केवळ तुझी आज्ञा पाळील असा एक द्वारपाल येथे ठेऊन देऊ. म्हणजे पुन्हां असा त्रास होणार नाही.' पार्वतीला हे बोलणे खरे वाटले. नंतर तिने आपल्या अंगाची मळी

काढून त्याचा एक पुरुष केला आणि सजीव करून आज्ञा केली, की 'माझ्या परवानगीशिवाय आंत कोणालाही सोडू नको.' ह्याप्रमाणे हा नवीन पुरुष द्वारपाल झाला. त्याने बरेच दिवस शंकरास आंत जाऊ दिले नाही. शंकरानी त्याची आर्जवे केली, लांच देऊ केली, भय घालून पाहिले, परंतु काहीएक उपयोग झाला नाही. शेवटी युद्धावर पाळी येऊन शिवगणासह स्वर्गीचे सर्व देव या पार्वती-स्थापित पुरुषाला दारांतून काढून लावण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु व्यर्थ! कोणाचेही त्या पुरुषाविरूद्ध काही चालले नाही त्या पुरुषाचे आर्जव करून त्याला तेथून काढण्यासाठी ब्रह्मदेवाने पुष्कळ ब्राह्मण पाठविले; परंतु त्याचेही प्रयत्न विफल झाले. पुढे रागावलेल्या विष्णुशंकरानी त्याच्यावर नेटाने हल्ला केला व शंकराने त्याचे डोके उडविले. पण आपला पुरुष ह्या रीतीने मारला गेला असे पाहून पार्वती रागावली आणि त्रैलोक्याचे भस्म करण्यास सिद्ध झाली हे ऐकून शंकराने नारदादि देवर्षि मध्यस्थीकरिता पाठविले. तेव्हा असे ठरले की, 'त्या मृत पुरुषाला पुन्हा जिवंत करावा.' नतर त्या पुरुषाला जिवंत करण्याचा विधि सुरू झाला. पण शंकराने त्याचे डोके कापले होते ते कोठे सापडेना. तेव्हां निरुपाय होउन शंकराने आपल्या गणांस सांगितले की, 'तुम्हास जो कोणी प्राणी पहिल्या प्रथम दिसेल त्याला ठार मारून तुम्ही त्याचे मस्तक घेऊन या.' इतक्यांत तेथे एक गजासुर नावाचा राक्षस देवांस त्रास देण्या-करता आला होता, तोच शंकराच्या दृष्टीस प्रथम पडला. शंकराने गजासुराला मारले, व त्याचे डोके घेऊन पार्वतीकृत पुरुषाच्या धडावर ठेवले आणि त्या शरीरात प्राण घालण्यास प्रारंभ केला. सर्व देव, ब्रह्मा, विष्णु व शंकर यापैकी प्रत्येकाने व इतर सर्वांनी मंत्र म्हणून त्या

शरीरात प्राण घालण्याची पुष्कळ खटपट केली, तथापि यश ह्मणून कोणासही येईना. हा प्रकार झाला तेंव्हा मग सर्वांस विघ्नेश्वर गणपतीची आठवण झाली. त्यांनी गणपतिअथर्वशीर्षाचे पुष्कळच पाठ केले, व वेद मंत्र मोठमोठ्याने ह्मणून ओंकाराचे आवाहन केले, तेंव्हा गणपति प्रसादाने त्या शरीरात पंचप्राण प्रवेश करते झाले आणि तो पुरुष जिवंत झाला.

सूत :—नंतर मुद्गलाने दक्षाला आपल्या सती नामक कन्येच्या दुसऱ्या जन्माची कथा सांगितली. शिवाय असेही सांगितले की, पर्वताच्या उदरी जन्म घेतल्यावर पार्वतीने शंकरप्राप्तीकरींता मोठी उग्र तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न होईना. त्याला असे वाटले की, 'पूर्वजन्मी ह्मणजे पार्वती दक्षकन्या सती असतांना, तिने आपली आज्ञा मान्य केली नाही, तसाच ह्या जन्मीही हट्ट धरून बसेल तेंव्हा असली वायको आपण करू नये.' पुढे पार्वतीने बुद्धिदाता जो गणपति ह्याचे ध्यान एक वर्षभर केले व गणपति प्रसन्न झाल्यावर आपल्यास 'शंकरच पति असावा' असे मागणे मागितले. गणपतींनी 'तथास्तु' म्हटल्यावर त्यांच्या शक्तिप्रभावाने शंकराचे मन फिरले आणि पार्वतीस भार्या करण्याचे त्याने मान्य केले तसेच पार्वतीचे ते भस्मचर्चित, मलिन अंग पाहून तिच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेला शंकर म्हणाला, हे देवी' तुझ्या अंगाचा मळ सर्वत्र पूज्य होईल.' याच मळापासून पार्वतीने गजाननाचे शरीर निर्माण केले होते.

गणपतीने गजासुराचे मस्तक धारण करण्याचे कारण

गणपतीने गजासुराचे मस्तक धारण करण्याचे कारण असे आहे; एकदा महेश राजाच्या येथे गुरु बृहस्पति आले असता त्यांचा त्या राजाने अति उत्तम सत्कार केला व अनेक साष्टांग

नमस्कार घातले, म्हणून त्यांनी महेशाला आशीर्वाद दिला की, तुझे मस्तक सर्वत्र पूज्य होईल.' बृहस्पति गेल्यावर बरेच दिवसांनी राजाने नारदाचा अपमान केला म्हणून 'तूं असुर होऊन गजयोनींत तुला जन्म प्राप्त होईल' असा शाप दिला. हा राजा पुढे गजासुर झाला. याच्या तपश्चर्येला प्रसन्न होऊन त्याने मागितले ते वर शंकरानी त्याला दिले. एक मागणे असे होते की, 'मला शेवटी मोक्ष मिळावा व माझे मस्तक सर्वपूज्य व्हावे.' असो: गजासुराला मारून त्याचे मस्तक पार्वतीकृत पुरुषाच्या धडाला चिकटविले ह्मणून त्या पुरुषाला गजानन असे ह्मणतात. हा गणपतीचा अवतार होय.

गजानन–सिंदुरासुर युद्धात सिंदुरासुराचा अंत

मुनीहो! गणपति सर्व पूज्य ह्मणून त्याचे मस्तकही अर्थात पूज्य झाले. व शंकरवराचे सार्थक झाले. शंकराने एकदा गणपति-तपश्चर्या केली तेंव्हा गणपतींनी प्रसाद ह्मणून त्याला आपल्या मस्तकावरील निर्माल्य काढून दिला आणि सांगितले की, हा निर्माल्य ज्याच्या मस्तकावर असेल तो सर्वपूज्य होईल. शंकराने त्या निर्माल्याची पूजा केली, दुर्वासानेही केली. पण इंद्राने मात्र त्या निर्माल्याचा अपमान केला ह्मणून त्याचा संपत्तिदेवीने त्याग केला; तो सर्वभ्रष्ट झाला, त्याचा ऐरावत उन्मत्त झाला आणि इंद्राला कोणी विचारीनासे झाले. नंतर त्याचे डोळे उघडले, मद नाहीसा झाला आणि त्याने गणपतीच्या तपश्चर्येला आरंभ केला. तपश्चर्या सिद्ध झाल्यावर निर्माल्याचे माहात्म्य इंद्राला समजले व

निर्माल्याची पूजाच केली पाहिजे, केव्हांही त्याची अवहेलना करता कामा नये, ह्याचे ज्ञान त्यास झाले. पुढे पार्वतीस वर दिला होता त्यास अनुसरून गणपतींनी तिच्या उदरात जन्म घेतला. काही महिने लोटल्यावर सिंदुरासुराने त्या गर्भाच्या मस्तकाचा छेद करून ते मस्तक नर्मदानदीमध्ये टाकून दिले, म्हणून नर्मदेचे पाणी लालसर आहे व तेथील दगडही लाल असून पूजा करण्यास योग्य झाले आहेत. यालाच 'नर्मदे' गणपति म्हणतात. इकडे पूर्ण दिवस भरून पार्वती बाळंत झाली, पण बाळाला मस्तकच नव्हते! तेव्हां विष्णूने उन्मत्त झालेल्या इंद्राच्या ऐरावताचे डोके कापून ह्या बालकाला आणून लावले. असेही वृत्त कोणी ज्ञानी पुरुष सांगतात. असो; ते बालक सजीव झाले हे मागे सांगितलेच आहे. गजाननाचा जन्म होऊन काही दिवस लोटल्यावर एक दिवस नारद सिंदुरासुराच्या येथे गेला आणि 'तुला मारणाऱ्या गजाननाचा अवतार शंकराचे येथे झाला आहे, सावध रहा' असे सांगून नारद स्वकार्याला निघून गेला. हा वृत्तांत ऐकून सिंदुर क्रोधयुक्त झाला. स्वर्गात जाऊन त्याने तेथील देवांची ठाणी उठविली. ब्रह्मदेवाला, विष्णूला व शंकराला आपापल्या लोकांतून घालवून दिले आणि गजाननाशी युद्ध करण्यास तो राक्षस उभा राहिला. गजाननांनी विकट हास्य करून सिंदुराला मारण्यासाठी विराटरूप धारण केले. आपल्या हजारोंहजार हातांनी त्याला आपलेकडे ओढून घेऊन दोन तळहाताच्या चिकाटीने त्याला धरला, तथेच रगडून त्याला ठार केला व आपले सर्व अंग त्याच्या रक्ताने माखले. सिंदुर मेला असे पाहून देवांस खूप आनंद झाला. देवांनी परमेश्वराची

स्तुति केली व शंकराने मागणे मागितले की, ‘आमच्या घरी कैलास-लोकी आपले वास्तव्य सदैव असावे.’ ‘तथास्तु’ असे म्हणून व देवांच्या सर्व कामना पूर्ण करून गणपतींनी विराट् स्वरूपाचे विसर्जन केले.

विघ्नासुर गणपतीद्वारा पराभूत–विघ्नासुराला गणपतीचे अनेकवर

सूत म्हणतात:- मुनिहो ! गणेशांनी जो निर्माल्य शंकरास दिला होता त्यापासून पुष्कळ दिवसपर्यंत स्वर्गातील पुष्पें उत्पन्न होत होती. एकदां नारद इंद्रलोकाला गेला आणि इंद्रास सांगू लागला की, ‘हिमालय पर्वतावर अभिनंदन ह्या नांवाचा राजा एक यज्ञ करणार आहे; त्यांत त्याचा विचार तुझा हविर्भाग तुला देण्याचा नाही. असा यज्ञ करणारे पुष्कळसे ब्राह्मणही त्याने जबरदस्तीने मिळविले आहेत. आज उद्या यज्ञाला सुरुवात होईल’ हे ऐकून इंद्र फार रागावला आणि त्याने काळाचे स्मरण केले. लागलीच काळ तेथे उपस्थित झाला. नंतर इंद्राने काळाला त्या यज्ञाविषयी वृत्तांत सांगून आज्ञा केली की, ‘या यज्ञाचा नाश कर तुझ्या स्वाधीन सर्व जगत् आहे, म्हणून तुला हे सहज जमेल.’ काळने इंद्राची आज्ञा मान्य केली आणि विघ्नासुराचे स्वरूप घेऊन तो अभिनंदाच्या यज्ञमंडपांत गेला आणि त्याच्या यज्ञाचा विध्वंस केला, इतकेच नव्हे पण त्याने कर्मभूमीवरील सर्व वैदिककर्माचा लोप केला ! कर्मलोप झाला म्हणजे देवांस संकट पडते. ह्याही वेळी त्यांस प्राणसंकट उत्पन्न झाले, तेंव्हा त्यांनी तप करून, स्तोत्रे म्हणून व ध्यान करून

मोठ्या भक्तीने गणपतीस प्रसन्न करून घेतले. नंतर देवकार्य करण्यासाठी परमेश्वर पार्श्वपुत्र झाला. या पार्श्वाच्या बायकोचे नांव दीपवत्सला होते. त्या दोघांची तपश्चर्या विलक्षण होती म्हणून त्यांचे उदरी हा अवतार झाला हा बालक पांच वर्षांचा झाल्यावर शंकर प्रमुख सर्व देव पार्श्वांच्या येथे येऊन त्याचे त्यांनी अभिनंदन केले आणि 'विघ्नासुराला मारणे आहे, तुझ्या पुत्राला युद्ध करण्यास जाण्याची आज्ञा दे.' पार्श्वाला हे ऐकून गहिंवर आला, दुःख झाले, तो संतापला व 'माझ्या बाळास नेऊ नका' असे तो म्हणणार, इतक्यात गणपति तेथे आले आणि वडिलांची समजूत घालून व आज्ञा घेऊन त्यांनी देवांचे म्हणणे कबूल केले. नंतर गणपतीने विघ्नासुराला आपल्या अंकुशाने पकडून देवाच्या समोर त्याला ओढीत आणले; विघ्नासुर मायावी होता; त्याने अग्नि इत्यादि महाभूतांची रूपें धारण केली; तथापि मायेचा स्वामी जो गजानन, मायाधीश गजानन, राक्षसांच्या मायेचा अधिपत गजानन, त्याने अग्नि, वायु, आकाश, महाकाल, अहंकार, प्रधान या विघ्न-स्वरूपांचा नाश श्रेष्ठ-श्रेष्ठतर स्वरूपे घेऊन केला. शेवटी, 'आपले आता काही चालत नाही' असे पाहून विघ्नासुर गणपतीला शरण आला. त्याने भक्तिपूर्वक गणपतीचे स्तवन केले, 'मी आपलि आज्ञा सदैव पाळीत जाईन' असे वचन दिले, आणि 'आपल्या चरणकमळी माझी भक्ति अखंड असावी, माझे नाव आपण धारण करावे, असे मागणे मागितले. विघ्नाने जे जे मागितले ते गणपतीने त्यास दिले, त्याला आपल्या गणात घेतला, व 'माझे नाव विघ्नराज होईल व त्या नावाचा जप केला असता सर्व सिद्धी प्राप्त होतील.' असे सांगितले आणि शेवटी 'कार्यारंभ झाला असता जेथे माझे स्मरण होत नाही.

कर्म व त्याचे फळ यामध्ये तू विघ्ने आणित जा. शिवविष्णुप्रमुख सकळ देव, सर्व मुनि, सारांश, सर्व प्राणी यापैकी जर कोणी अहंकारयुक्त होईल तर त्यास स्वपदभ्रष्ट करून त्याचे भोग तू खुशाल भोगित जा. माझ्या भक्तास कोणत्याही प्रकारे त्रास देत जाऊं नको' असे आज्ञापूर्वक वर देते झाले.

गजानन अवतार समाप्ती

पुढे गजाननांनी मातापितरांचे समाधान करून व 'महाकार्यांचे वेळी माझे स्मरण केले असता मी सदैव सादर होईन' असे सांगून गणपतीनी आपला अवतार समाप्त केला. मुनिहो! नंतर मुद्गलऋषिने द्वीपाद्वीपामध्ये व खंडाखंडामध्ये जी गणेशक्षेत्रे आहेत त्यांचे स्थूल-मानाने वर्णन केले. नैऋत्यदिशेला भाद्रपद शुद्ध चतुर्थीला देवांनी मध्यान्हकाळी गणपतीची स्थापना केली आहे. ही देवस्थापितमूर्ति सुंदर आहे. सिद्धिबुद्धि ह्या मूर्तिच्या दोन्ही बाजूला आहेत. आठ दिशेला आठ सिद्धीची स्थापना केली आहे. अष्टभैरव व दशदिक्पाळ यांचीही स्थाने तेथे आहेत. शिवप्रमुख सर्व देव, काशीप्रमुख क्षेत्रे गंगादि नद्या, तेथे, गणपतीची सेवा करण्याकरिता, गणपतीचे पूजन अर्चन करण्याकरिता व गणपतीच्या कथा गाण्याकरता सदैव सिद्ध असतात. येथील तीर्थात जे स्नान करतील, या क्षेत्राची यात्रा जे करतील, या क्षेत्रात जे राहतील ते गणपतिभक्त कृतकृत्य होतील. गणपतीच्या कथांचे जो श्रवण करतो, त्याला ऐहिक भोगांची प्राप्ति होऊन अंती तो स्वानंदवासी होतो. असा गजाननचरित्राचा महिमा आहे.

(गजाननचरित्र समाप्त.)

पंचम खंड

[लंबोदरचरित्र]

असित नैध्रुव संवाद

सूत :–शौनका! दक्षप्रजापतीनें मुद्गलास पुनः अशी विनंती केली की, 'मला लंबोदराचे चरित्र कृपा करून सांग.' ही विनंति ऐकून मुद्गलऋषीलाही हर्ष झाला आणि त्याने असित व नैध्रुव यांचा जो संवाद झाला तो सांगण्यास सुरवात केली. पूर्वी नैध्रुव या नांवाचा एक महातपस्वी, हजार वर्षेपर्यंत तपश्चर्या करून एक दिवस त्याच्या येथे असित नांवाचा एक महायोगी प्राप्त झाला. कुशल प्रश्न झाल्यावर असिताने नैध्रुवाला विचारले. 'नैध्रुवा तू तपश्चर्या करून देहाला कां कष्टवीत आहेस? कृच्छ्र, चांद्रायण इत्यादि देहाला ताप देणारी व्रते म्हणजे तपश्चर्या नव्हे. हे केवळ बाह्य देहदंडन आहे. याने जन्ममरण चुकावयाचे नाही तसेच प्राणायाम करून व षट्चक्राचा (सहा चक्रांचा) भेद करून अंतर्ध्यानाने आपल्या मस्तकात जे 'सहस्रदलपद्म' आहे, तद्गत वायूचा रोध करावयाचा, त्रिकाल ज्ञान मिळवून अष्ट सिद्धि संपादन करून घ्यावयाच्या, इत्यादि योगाला तपश्चर्या म्हणतात; पण असले तपस्वीही जन्ममरणाच्या

चक्रांतून सुटत नाहीत. तपाचा एक तिसरा मार्ग आहे. ह्या मार्गाने मात्र चित्ताला एकाग्रता येते. सर्वत्र आत्मस्वरूप दिसू लागते. शमदमाची प्राप्ति होते. विषय वैराग्य सिद्ध होते. नंतर निरोधयोगाने चित्तरोध होऊन 'मी ब्रह्म आहे' असा प्रत्यय येतो व हा योगी नित्य संतुष्ट नित्य शांत असा होतो. हा योग ह्मणजे तपश्चर्या होय हा गणेश उपासनेच्या साधनाने मात्र सिद्ध होतो. एकदा मी ब्रह्मदेवाचे येथे जाऊन त्याला खऱ्या शांतीचा मार्ग विचारण्यास प्रारंभ करणार होतो. इतक्यांत तेथे वसिष्ठ व विश्वामित्र येऊन त्यांनी ब्रह्मदेवाला विचारले. 'आमच्यामध्ये श्रेष्ठ तपस्वी व श्रेष्ठ योगी कोण' दोघेही रागातच होते. हे पाहून ब्रह्मदेव ह्मणाला जोपर्यंत जीवाच्या अंतःकरणांत क्रोधाचा संचार आहे, शांतीचा पूर्ण संचार नाही, तोपर्यंत त्या जीवाला तपस्वी असे ह्मणताच यावयाचे नाही. तुह्मी उभयताही क्रोधवश झालेले आहात, ह्मणून तुह्मी तपस्वी नव्हेत. तुह्माला क्रोधाचा थोडासा वृत्तांत सांगतो ऐका.

भस्मासुराला शंकराच्या वराची प्राप्ती–विष्णुद्वारा भस्मासुराचा नाश

पूर्वी शकुनीला भस्मासुर या नावाचा मुलगा झाला. मुंज झाल्यावर शुक्राचार्यांच्या घरी जाऊन भस्मासुराने सर्व विद्या संपादन केली. तसेच गुरुजीपासून त्याने शिवपंचाक्षरी मंत्राची दीक्षा घेतली. नंतर तो अरण्यांत गेला आणि सर्वांगाला भस्म विलेपन करून त्याने हजारो वर्षे त्या शिवपंचाक्षरी मंत्राचा जप केला. ही त्याची तपश्चर्या पाहून शंकर प्रसन्न झाला आणि 'ज्याच्या मस्तकावर तूं आपला दक्षिण हस्त ठेवशील तो तत्काल प्राणाला मुकून

भस्मरूप होईल.' असा वर देता झाला, व आपण गणांसह कैलासाला निघून गेला. इकडे राक्षस आपल्या मनाशी विचार करीत राहिला की, नग्न, भांगट, दरिद्री व वृद्ध अशा ह्या शंकर वैराग्याला, अति लावण्यवति, सर्व विश्वाला सौंदर्य देणारे हे एक रत्न, जो जगदंबिका पार्वती, बायको मिळाली आहे! ही गोष्ट अन्यायाचो आहे ह्या जोगड्याला ही सुंदरी मुळीच योग्य नव्हे. हीला योग्य पति म्हणजे माझ्यासारखाच ऐश्वर्यवान, बलवान व बुद्धिवान नवरा असला पाहिजे चला तर आपण कैलासाला जाऊन पार्वतीचे हरण करू या. असा विचार करून तो कैलासाला गेला आणि आपला उजवा हात वर उचलून शंकराच्या मस्तकावर ठेवण्याकरता क्रोधाने धावतच सिंहासनापर्यंत गेला. हे संकट पाहून शंकर तेथून पळाला. त्याच्या मागे भस्मासुर लागला. पळत असता शंकराने व तेथेच हजर असलेल्या विष्णूने गणपतीची प्रार्थना करून आपल्यावर आलेले संकट निवारण्याची विनंती केली. ती प्रार्थना ऐकून गणपतीने विष्णूच्या अंतःकरणात शिरून त्याला मोहिनीचे स्त्रीस्वरूप धारण करण्याविषयी आज्ञा केली. लागलीच विष्णूने स्त्रीवेषधारण केला. विष्णु आपल्या सुंदर वेषाने व आपल्या मोहक स्वरूपाने भस्मासुराचे चित्त आकर्षिता झाला आणि मोहिनीपाशी जाऊन त्याने तिच्या अनेक विनवण्या केल्या. शेवटी ती ऐकत नाही असे पाहून 'सर्वस्वी मी तुझा दास आहे. तूं जे काय सांगशील ते काम करण्यास मी नेहमी सिद्ध असेन,' अशी दोन्ही हात जोडून विनंती केली. ही त्याची आर्जवे पाहून त्याला जास्तच मोहात घालण्याकरिता मंद स्मित करून मोहिनी त्याला म्हणाली 'सर्वांना मोह घालणारी मी मोहिनी आहे. माझ्या आज्ञेमध्ये निरंतर वागावयाचे, असे कबूल करीत असशील तर मी तुझ्या घरी येऊन राहीन. पण

आता तूं इतकेंच कर की, तुला संतुष्ट करण्याकरिता मी नृत्य करते, त्याप्रमाणे तूंही माझ्यासारखाच नाचावयास लाग. असा तूं नाचू लागलास तर मला साक्ष पटेल की, तू माझे ऐकशील.' वेडा झालेल्या राक्षसाने अर्थातच 'होय' म्हटले. मोहिनीने आपल्या नृत्यकौशल्याने भस्मासुराचे मन सर्वथा स्ववश केले, आणि आपण नाचताना 'जे जे हावभाव आपण करू तसे करण्यास हा सिद्ध झाला आहे' असे पाहून तिने कर्नाटकी नृत्य करण्यास आरंभ केला. नाच अगदी रंगात आल्यावर तिने आपला दक्षिण हस्त लीलेने स्वमस्तकावर ठेवला. तेंव्हा त्यानेही गणेशमायेने भ्रांत होऊन वेडापिसा झालेल्या त्या भस्मासुराने, तसेच केले आणि आपल्या हाताने आपणास जाळून घेतले! आता भस्मासुराने त्या महामोहक मोहिनीला पाहिले तसेच शंकरानेही पाहिले होते. भस्मासुर मेल्यावर शंकरही मोहिनीशी लाडीगोडी लावू लागला! शंकर मोहित झाला हे पाहून स्त्रीरूपी विष्णूने पलायन केले. शंकर पाठीमागे धावला. याप्रमाणे बराच वेळ धावपळ झाल्यावर, विष्णूने पाहिले की, शंकर आपणास धरणार, तेंव्हा त्याने स्वस्वरूप धारण केले. मोहिनी स्त्री नव्हे, विष्णु आहे हे समजल्यावर शंकर खिन्न झाला व त्याचे वीर्यही तत्क्षणीच स्खलन पावले. असो; नंतर विष्णूचे व गणपतीचे स्तवन करून शंकर कैलासाला गेला व इतर देव आपआपल्या स्थानाला गेले.

क्रोधासुराला सूर्यद्वारा वराची प्राप्ती–लंबोदराद्वारा क्रोधासुर गर्वपरिहार व त्यास शांतिप्राप्ती

सूत :– मुनीहो! ब्रह्मदेव पुढे सांगतात; 'त्या शंकरवीर्यापासून एक श्यामवर्ण व तांब्रनेत्र (तांबड्या डोळ्यांचा) प्रतापी राक्षस

उत्पन्न झाला. देव स्वस्थानाला गेल्यावर तो जन्मभूमीपासून निघाला व शुक्राकडे गेला. तेथे जाऊन ' माझे पालनपोषण करा, व मला विद्यादान द्या ' अशी त्या राक्षसाने शुक्राची विनयपुरःसर प्रार्थना केली. शुक्राने त्याचे नाव क्रोधासुर असे ठेविले. पुढे जातकर्मादि मौंजिबंधनापर्यंतचे सर्व संस्कार शास्त्रोक्त विधीने झाले. नंतर क्रोधासुराने सर्व विद्या संपादन केली. पुढे त्याचे लग्नही झाले. नंतर शुक्र गुरुजींच्या सांगण्यावरून त्याने एका पायावर उभे राहून व ऊर्ध्व दृष्टि ठेवून सूर्याचे ध्यान करीत सूर्यमंत्राचे पुरश्चरण केले. हजार वर्षे झाल्यावर सूर्य प्रसन्न झाला आणि ' जन्ममरणयुक्त जे देव किंवा इतर प्राणी आहेत त्यांपासून तुला भीति नाही. तू ब्रह्मांडावर आपली सत्ता स्थापन करशील. तुझ्यासारखा ऐश्वर्यवान कोणीही असणार नाही ' असे इष्ट वर क्रोधासुरास दिले. सूर्य स्वस्थानी गेल्यावर क्रोधासुर मोठ्या आनंदाने घरी आला व आपल्या तपश्चर्येचा व तपःसिद्धीचा वृत्तांत आपल्या इष्ट मित्रास सांगून त्यांसही आनंदविता झाला. कांही दिवस गेल्यावर शुक्रसंमति घेऊन क्रोधासुराने आवेशनामक एक शोभायमान नगरी निर्माण केली. तेथे दाही दिशांचे राक्षस आनंदाने रहावयास आले. पुढे शुक्रानी क्रोधासुरास राज्याभिषेक केला. नंतर क्रोधासुराने ब्रह्मांडविजयाचा संकल्प केला आणि चतुरंग सेना सिद्ध करून त्याने पृथ्वीभर दिग्विजय केला. पृथ्वीवर जेवढे जेवढे म्हणून राजे होते, तेवढ्या सगळ्यांनी त्याला प्रतिवर्षी करभार देण्याचे कबूल केले. याचप्रमाणे क्रोधासुराने पाताळातील नागलोकावरही आपली सत्ता स्थापित केली. नंतर, देवलोकावर क्रोधासुर स्वारी करणार हे ऐकूनच देवांनी आपापली स्थाने सोडली व अशा प्रकारे स्वर्गलोकीही क्रोधासुराचा

अंमल चालु झाला ! मग राहिले ब्रह्माविष्णुशंकारांचे सत्य, वैकुंठ व कैलासलोक. हेही जिंकून घ्यावे, असाच क्रोधासुराचा संकल्प होता. त्या त्या लोकांस गेल्यावर ब्रह्मादिदेवनायकांनीही आपापली स्थाने सोडली व अरण्यात गेले ! नंतर क्रोधासुराचे दैवत जो सूर्य त्याला देवकक्षेतून आपल्या पक्षात आणावा असा क्रोधाने संकल्प केला व सूर्याकडे त्यानें रावण या नांवाचा दूत शिष्टाईकरिता पाठविला. सूर्याला राक्षसांचे म्हणणे पसंत पडले नाही व तो रानांत निघून गेला. याप्रमाणे आपल्यास आता कोणी शत्रु उरला नाही व सर्व त्रैलोक्याची सत्ता आपल्या हातांत आली आहे असे पाहून क्रोधासुर विषयामध्ये दंग होऊन स्त्रीमांसमदिरादिकांचे अतिरिक्त सेवन करूं लागला. त्याच्या राज्यात वैदिक कर्माला स्थान मिळेनासे झाले. अर्थातच देव भयकंपित झाले. वसिष्ठाकडे जाऊन त्याला दीनवाणीने संकटाच्या उपशमनाचा मार्ग विचारू लागले. वसिष्ठांनी 'स्वानंदवासी जे मुख्य गणेशब्रह्म ते जन्ममरणशून्य आहे, त्याची सेवा करा म्हणजे तुमच्या सर्व विघ्नांचा परिहार होईल' असे सांगितले. देवांनी वसिष्ठाच्या उपदेशाप्रमाणे गणपतीची सेवा केली आणि त्यास प्रसन्न करून घेऊन 'क्रोधासुराचा वध करा. त्याने सर्व जगताला कर्मशून्य केले आहे. विश्वांत कोठेही धर्म राहिला नाही, तेंव्हा त्याचा वध करून आमचे कार्य करा' असे मागणे मागितले व मिळविले. नंतर 'लंबोदर क्रोधासुराचा वध करील' अशी आकाशवाणी क्रोधासुराने ऐकली. राक्षसमंडळीत गडबड झाली. त्यांनी पुनः अरण्यावर स्वारी करून देवांचा निःपात करण्याचा संकल्प केला. 'दैत्य आले' असे ऐकून देवांनी लंबोदराचे स्मरण केले, तेंव्हा पाशांकुशादि शस्त्रयुक्त, मुषकारूढ, त्रिनेत्र, असे लंबोदर प्रकट झाले.

लंबोदर आले असे राक्षसास कळले; तेंव्हा त्यांनी शुक्राचे स्मरण केले व शुक्रही तेथे सादर झाला. त्यांनी राक्षसास सांगितले की, 'लंबोदरापुढे तुमचे कांहीएक चालणार नाही. त्याला शरण जा; नाही तर तुमचा नाश होईल.' पण आपल्या बलावर ज्यांचा पूर्ण विश्वास अशा त्या राक्षसास शुक्रचार्यांचा उपदेश मान्य झाला नाही. त्यांनी देवावर हल्ला केला. देवांनी लंबोदराचे स्मरण करून युद्धास आरंभ केला. ह्या वेळी फार मोठे घनघोर युद्ध झाले. एक दोन वेळ देवांनी मोठ्या शिताफीने दानवांचा पराजय केला. पण शेवटी राक्षसांच्या बलाचा जोर होऊन त्यांनी देवसेनेस पळावयास लावले. देव पळतात असे पाहून लंबोदरांनी आपला अंकुश दैत्यमंडळावर फेकला. तसेच शुक्रासही त्याने एका गुहेत नेऊन कोंडून ठेवले. पुढे अंकुशसामर्थ्यांने सर्व दैत्यमंडळीत हलकल्लोळ उडाल्यावर लंबोदराची व क्रोधासुराची गांठ पडली लंबोदराचे असह्य तेज, प्रचंड विश्वरूप आणि अवर्णनीय प्रभाव पाहून अंतःकरणाने ठाव सोडलेला क्रोधासुर गडबडला. तो लंबोदरदेवाला शरण गेला. तेंव्हा 'शुक्राने माझे स्वरूप सांगितले तरी तूं ऐकले नाहीस; असो, मला देव आणि तुम्ही राक्षस दोन्ही सारखेच आहांत. दैत्यांस पाताळ, मनुष्यास भूलोक व देवांस स्वर्ग, असे लोक नेमून दिले आहेत. तेथे सर्व लोक आपापल्या धर्मांप्रमाणे चालत असले ह्मणजे स्वानंदामध्ये मी निमग्न असतो; पण अधर्म किंवा अन्याय किंवा भोगशक्ति यांचा प्रभाव झाला ह्मणजे मला देहधारण करून अन्यायाचा व अधर्मांचा उच्छेद करावा लागतो. जन्ममृत्यूचे चक्र माझे स्वाधीन आहे. मला शरण येण्याची बुद्धि तुला झाली आहे तसे कर; नाही तर तुला मी एका क्षणात नामशेष करीन.' ही गंभीर व

कृपापूर्ण वाणी ऐकून व लंबोदराचे ते गंभीर पण दयाळू स्वरूप पाहून क्रोधासुराच्या अंतःकरणांत निष्कामभक्ति उत्पन्न झाली. गणेशब्रह्माचे त्याला ज्ञान झाले. विषयावरील त्याची आसक्ति सर्वथा नष्ट झाली. तो लंबोदराला शरण गेला आणि त्याने त्यापाशी 'दृढभक्ति' मागितली. लंबोदरांनी त्याला वर दिला की, 'ज्या कार्यांत माझे स्मरण होत नाही त्या कार्यांत आपल्या आसुरस्वभावाने तूं विघ्ने उत्पन्न कर व ती कार्ये पुण्यकारी असतील तर त्यांपासून उत्पन्न होणारे ज्ञान व पुण्य या उभयतांचा उपयोग तूच घेत जा. पण माझे भक्त असतील त्यांना मात्र तूं कोणत्याही तऱ्हेचा उपद्रव देऊ नको' याप्रमाणे लंबोदरांनी क्रोधासुराला वर देऊन शांति दिली. क्रोधासुर शांत झाला हे पाहून बाकीचे दैत्य पाताळात निघून गेले व तो शांत झालेला क्रोध तेथेच लंबोदरभक्ति करीत राहिला. आता स्वस्थ झालेल्या देवांनीही परमेश्वराची स्तुति करून सर्वत्र शांति व अखंडभक्ति मागितली व ती देऊन लंबोदर अंतर्हित झाले. नंतर देवानी पश्चिमसमुद्राच्या तीरावर लंबोदराची मूर्ति स्थापन केली आणि लंबोदरभक्ति करीत ते अद्यापिही तेथेच राहिले आहेत.

ब्रह्मस्वरूपाचे वर्णन

सूतः– मुनिहो! ह्या प्रमाणे ब्रह्मदेवाने वसिष्ठविश्वामित्रास राक्षसरूपी क्रोधाचे चरित्र सांगितले. त्याचा परिणाम असा झाला की, उभयतांनींही आसुरी म्हणून क्रोध व स्पर्धा ह्यांचा त्याग करून शांतिचा स्वीकार केला व आपआपल्या स्थानी निघून गेले. असिताने ही वरील कथा नैध्रुवास सांगितल्यावर लंबोदरनामक ब्रह्मस्वरूपाचे वर्णन केले आणि शेवटी लंबोदराची स्तुति करून त्यांना

आपण प्रसन्न करून घेतल्याची व अखंडभक्ति मागितल्याची कथा सांगितली. नंतर नैधृवाने शमदमयुक्त होऊन लंबोदरप्रणीत योग-मार्गाने शांति प्राप्त करून घेतली आणि लंबोदराची अखंडसेवा करीत राहिला.

सृष्टीच्या आरंभकाळी सृष्टिविरचनेसाठी ईश्वरी प्रसाद मिळावा म्हणून ब्रह्मदेवाने व ब्रह्मगणांनी लंबोदराची भक्तिपूर्वक स्तुति केली. तेंव्हा शक्ति नामक देवीच्या स्वरूपाने लंबोदर प्रकट झाले आणि त्या ब्रह्मगणांच्या प्रार्थनेवरून त्यांस ज्ञान देते झाले. ही ज्ञानशक्ति प्राप्त झाल्यावर लंबोदराचे सामर्थ्य अवर्णनीय आहे असा त्यांचा निश्चय झाला. दक्षाने विचारल्यावरून मुद्गल ऋषि सांगतात की, सर्व शक्तिवंत जे ब्रह्म आहे त्याच्या ठिकाणी देहविकार व देहिविकार हे दोन्हीं असतात व नसतातही. ब्रह्मस्वरूप कसे आहे हे कोणालाही सांगता येत नाही. भोग, तप इत्यादिकाचा जो आरोप ब्रह्माचे ठिकाणी ब्रह्मोपदेशक करतात, तो केवळ शिष्याला समजेल असे सांगण्याकरता मात्र असतो, खरा नसतो; म्हणून ब्रह्म बोलले, त्याने भोग भोगिले, तपश्चर्या केली, ब्रह्माला आनंद झाला इत्यादि वाक्यांमध्ये कोणाच्याही प्रकारचा विरोध नाही. निर्गुणावर सगुणाचा आरोप करतात, तो सामान्य जीवांस ब्रह्मबोध व्हावा एतदर्थ होय.

महिषासुर व देवी युद्ध–गणेशकृपेने देवीद्वारा महिषासुर वध

सूतः– आता महिषासुराची कथा सांगतो. ती ऐका : हा राक्षस ब्रह्मदेवाच्या वराने त्रिभुवनाचा स्वामी झाला होता, हा अजिंक्य, दुष्टबुद्धीचा व क्रूरस्वभावाचा राक्षस त्रैलोक्याचे राज्य करीत

असतां व स्वर्गपाताळादि चतुर्दश भुवनात आपले हस्तक पाठवून तेथे अंमल करीत असता त्रैलोक्यात जिकडे तिकडे कर्माचा लोप झाला. कर्मलोपाने देवास उपास पडतात हे पाहून देवर्षीनी स्वानंदवासी जी सर्वशक्ति देवी तिची हजार वर्षे तपश्चर्या केली. देवी प्रसन्न झाली आणि 'मी महिषासुराचा वध करते' असे आश्वासन तिने ऋषीस दिले. 'पुरुषापासून तुला भीति नाही' असा महिषासुराला वर होता ह्मणून ऋषीनी देवीस्वरूपाने गणपतीचे आराधन केले. नंतर क्रुद्ध देवी सिंहावर आरूढ होऊन महिषासुराच्या नगरीला गेली. नगराजवळ गेल्यावर तिने मोहिनीचे रूप धरून अति सुस्वर गायन करण्यास प्रारंभ केला. ते ऐकून प्रल्हादादि राजसचिव बाहेर आले आणि तिच्या गाण्याने रंगून जाऊन व स्वरूपाने मोहित होऊन त्यानी तिची प्रार्थना केली की, 'महिषासुराची तूं स्त्री हो. तुझे कल्याण होईल.' ते ऐकून देवी अत्यंत प्रकुप्त झाली, तिने जे क्रोधयुक्त उत्तर दिले ते ऐकून राक्षस चवताळले व तिला जबरीने नगरांत नेण्याकरता ते तिच्यावर तुटून पडले. त्या वेळी तिच्या क्रोधज्वाला इतक्या प्रखर झाल्या की, कित्येक राक्षस ओरडत असताच जळून भस्म झाले. हा गलबला ऐकून महिषासुर बाहेर आला आणि ती देवी आपल्यास वश होत नाही असे पाहून व तिने पुष्कळसे राक्षस मारले आहेत हे जाणून तिच्याशी युद्ध करण्यास त्याने प्रारंभ केला. एक वर्षभर ते युद्ध चालले होते. पण देवीचा पराजय झाला. कारण तिला गणेशविस्मरण झाले होते. ते पाहून आपण 'शक्तिस्वरूप असताही महिषासुराचा पराभव करण्याची शक्ति आपणास नाही, यावरून काहीतरी मी चुकत आहे. विघ्नेश्वराचे पूजन व स्मरण मी केले

नाही ह्मणून या संकटात सापडल्ये ' असा विचार करून तिने एकाक्षरी मंत्राने कित्येक वर्षेपर्यंत विघ्नराजाची एकाग्र तपश्चर्या केली. व ही तिची निस्सीम भक्ति पाहून विघ्नेश प्रकट झाले आणि तिने केलेली स्तुति ऐकून ' महिषासुराला मारण्याचे सामर्थ्य तुला येईल. माझ्या ठिकाणी तुझी भक्ति अखंड राहील आणि तुला नित्य शांति मिळेल ' असे वर तिला देते झाले. विघ्नेश्वर अंतर्धान पावल्यावर वेदपारंगत ब्राह्मणांच्या साहाय्याने विघ्नेश्वरांचीं देवीने स्थापना केली व पूजा, अर्चा नित्य चालेल अशी व्यवस्था केला. नंतर महिषासुराच्या नगरीवर स्वारी करून त्याचा देवीने पराभव केला, त्यास ठार मारले आणि वेदोक्त कर्माचा पुनः प्रसार केला. हे सर्व करून देवी परत विघ्नेशक्षेत्राला आली आणि तेथे शांत मनाने विघ्नेश्वराचे भजन करीत राहिली.

लंबोदराद्वारे शिव व विष्णूचे गर्वहरण–गणेशाची पूजा सर्वप्रथम करतात त्यांचे कारण

सूत :– एकदा विंध्य देशातील गणपतिक्षेत्राची यात्रा करण्याकरता आलेले देव, एक दिवस सहज बोलत बसले असता तेथे असा प्रश्न निघाला कीं, ' सूर्य, शक्ति, विष्णु, शंकर व गणपति हे पांचही देव गुणांनी, तेजाने व शक्तिने सारखेच असतां गणपतीची पूजा सर्वांच्या आधीं का होते? व इतर चार देवांस गणपतीचीं पूजा कां करावी लागते? या प्रश्नांची चर्चा चालली असता, शक्ति ह्मणाली की, ' लंबोदर एकच देव आहे. ' असे श्रुति ह्मणते. त्याच्या उदरातून सर्व विश्व उत्पन्न झाले आहे. आपण सर्वजण

त्याचे अंश आहोत. तो सर्वांचा आईबाप व सर्वाधार आहे. त्याच्याविषयी संशय प्रकट करणे हे ठीक नव्हे ' हे बोलणे पुष्कळास रुचले, पण हे ऐकून शिवविष्णूस मात्र अनावर राग आला. शक्तिचे बोलणे त्यास मुळीच सहन झाले नाही. छातीला हात लावून त्यांनीं ' आपले सामर्थ्य दाखव. ' असे लंबोदरास मोठ्याने व त्रिवार आव्हान केले, व शक्तिस सांगितले की, ' आमच्यापेक्षा अधिक काही लंबोंदरामध्ये दिसेल तर मात्र आम्ही त्याची पूजा करू. ' असे ह्मणून शिवविष्णूंनी गणपतीचे आवाहन केले आणि त्याचेपुढे एक मोठा थोरला नैवेद्य त्याने खाण्याकरिता ठेवला. लंबोदर शिवविष्णूचे कपट जाणून होतेच. त्यानी त्या मोठ्या नैवेद्याचा एकच घास केला आणि ' भूक लागली आहे, आणखी कांही पाहिजे ' असे त्यास ह्मणाले. दोघेही जण सत्य संकल्पी होते, तेव्हा त्यांनी ' आणखी पुष्कळ अन्न तेथे उत्पन्न व्हावे ' असा संकल्प केला; पण तेथे एक शितही दिसेना ! हे पाहून दोघेही जण घाबरून गेले व आपल्यामध्ये खरे ईश्वरत्व नाही अशी त्यांची खातरी झाली, तेव्हा लंबोदराचा अपमान केला हे एक संकटच होते, इकडे ' आणखी खावयास ' मागणारे लंबोदर डोळे लाल करून त्यांच्याकडे बघत होते, हे निराळेच संकट होते. या विपत्तीमध्ये ते उभयताही शक्तिदेवीला शरण गेले, तेव्हा तिने लंबोदराची चित्त-शांति केली. शिवविष्णूस लंबोदराच्या पायावर घातले आणि आपण लंबोदराला दूर्वा वाहिल्या. ही तिची भक्ति पाहून गणपति प्रसन्न झाले. ' लंबोदराची पूजा आधी का करतात व देवांनीही त्याची पूजा का केली पाहिजे ' त्याचे उत्तर निश्चित रीतीने शिवविष्णूस समजले.

पुढे ते नित्य गणपतीची पूजाअर्चा करावयास लागले हे सांगावयास नकोच.

सुरथाला शांतियोगाचा लाभ

सूत :– पूर्वी सुरथ नावाचा एक राजर्षि होता. त्याने शक्तिची उत्तम तपश्चर्या केली ह्मणून त्याला पुढचा जन्म 'सावर्णिमनूचा' प्राप्त झाला. या जन्मातही त्याने शक्तिची उत्तम तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येला प्रसन्न होऊन शक्तिविनायक प्रकट झाले आणि त्याला शांतियोगाचा लाभ करून देते झाले.

मायाकराचा लंबोदराद्वारे वध

सूत :– सृष्टि करता करता ब्रह्मदेव एकदा मोहित झाला आणि 'हे सृष्टिरचनेचे काम अखंड कसे चालते!' याचा विचार करू लागला. त्यावेळी त्याच्या श्वासापासून एक पुरुष उत्पन्न झाला. हा पुरुष आपला पुत्र आहे असे ब्रह्मदेवास कळल्यावर त्याने त्याचे चुंबन घेतले व 'मायाकर' असे त्याचे नांव ठेवले, ह्या मायाकराने जे कांही मागितले; ते ते ब्रह्मदेवाने दिले आणि शेवटी सांगितले की, 'चार तत्वांपासून जी वस्तु उत्पन्न झाली आहे ती तुला वश होईल; आणि तिच्यापासून तुला कसलेही भय असणार नाही!' हे ऐकून मायाकराला हर्षातिरेक झाला. काय करावे हे त्याला सुचेना. असो; नंतर तो दैत्यमंडळीत गेला व आपल्याला मिळालेल्या वरांचा वृत्तांत त्याने 'विप्रचित' प्रमुख राक्षसांस सांगितला. तो वृत्तांत ऐकून त्यांसही आनंद झाला. त्यांनी मायाकराला उपदेश केला की, 'या वरांचा तू उपभोग घेशील तरच जन्माचे

सार्थक होईल, नाहीतर हेच वर तुझ्या उलट होतील !' मायाकराला हे बोलणे खरे वाटले आणि राक्षस सांगतील तसे करण्यास तो कबूल झाला नंतर शुक्रगृही विद्याभ्यास, शुक्रकृत राज्याभिषेक, विषयसेवन, स्वयंमन्यता, पृथ्वी–विजय, स्वर्गाधिपत्य, स्वर्गोपभोग कैलास, वैकुंठ इत्यादि लोकांवर प्रस्थापित केलेले स्वामित्व, सर्वत्र राक्षसहस्तकांची योजना, मृत्युभूमीवर राजधानीची प्रस्थापना, पातालविजय इत्यादि गोष्टी क्रमाक्रमाने होत गेल्या आणि मायाकरासुराम उन्मत्त व भोगासक्त करित्या झाल्या. पाताळलोकी जो शेष आहे, त्याच्या राज्यावर स्वारी झाली तेंव्हा त्याने गणपतीचे स्मरण केले. ह्यापूर्वीच शेषाने तपश्चर्या करून शंकरविष्णूची प्रसन्नता मिळवून घेतली होती व त्यामुळे त्यामध्ये विष्णूचे व शंकराचे दोघांचेही अंश होते. त्याला सहस्र शीर्षे आहेत, हा विष्णूचा अंश होय, तो मृत्युहीन आहे, अनंत आहे, सर्वांचा अंतक आहे, कारण तो शंकराचा अंश आहे. त्याने ब्रह्मांडाचे धारण केले आहे व तो नागांचा स्वामी आहे. ब्रह्मांडांचे धारण करण्याच्यापूर्वी तपश्चर्या करून त्याने गणपतीस प्रसन्न करून घेऊन व ब्रह्मांड धारणाची शक्ति, मुक्ति देणारी अखंडभक्ति, मृत्युशून्यता, उत्तम कीर्ती आणि दिक्पालत्व असे वर प्राप्त केले होते. विष्णूची तपश्चर्या करून त्याचे नित्य दर्शन व्हावे म्हणून त्याला शेषाने आपल्या शरीराची शय्या करून दिली. शंकराची तपश्चर्या करून नित्य दर्शन होण्यासाठी त्याच्या जटाभारावर स्वतःला राहण्याचं स्थान मिळविले तथापि शांति म्हणून त्याला प्राप्त झाली नाही. तेंव्हां 'शांति मिळविण्याला कोणता उपाय योजूं'! असे शंकराला विचारल्यावर त्याने शेषाला गणेशब्रह्माचे स्वरूप, त्याचे

ज्ञान होण्याची साधने, पंचचित्त भूमीच्या निरोधाचा प्रकार इत्यादि सर्व राजगुह्यांची व राजविद्येची दीक्षा दिली. त्या दीक्षेनुसार शेषाने स्वानंदवासी लंबोदराची तपश्चर्या केली; लंबोदर प्रकट होतील इतकी त्यांची प्रसन्नता मिळविली, सदा शांतीचे मागणे मागितले. 'माझ्या अंतःकरणात आपली वसति असावी' हा वर प्राप्त केला आणि 'आपण पुत्ररूपाने माझी सेवा घ्यावी.' असाही लाडिकपणाने एक वर मागितला व मिळविला. नंतर गणपति अतर्धान पावल्यावर त्याचे स्मरण करीत शेष आपल्या भुवनास गेला. गणपतीच्या नाभीच्या ठिकाणी शेषाची वस्ती आहे हे तुम्हास ठाऊकच आहे. योगशास्त्रकर्ता भगवान् पतञ्जलि हा जो शेषाचा अवतार याने सर्पस्वरूपाने गणेशयोगाचे रहस्य श्रीव्यासमुनीस सांगितले. तदनुसार व्यासानेही गणेशयोगाचे उत्तम आराधना केले, म्हणून पतंजलीच्या योगशास्त्रावर भाष्य करण्याचे सामर्थ्य व्यास ऋषीस प्राप्त झाले. असो; इकडे मायाकर राक्षसाच्या त्रासाने उद्विग्न होऊन शेष लंबोदराचे स्मरण करू लागला, हे आत च सांगितले आहे. यावेळी लंबोदर प्रकट झाले, ते त्याच्या हृदयांतून पुत्ररूपाने बाहेर आले! शेषाने हा अवतार पाहून आनंदाने स्तुति केली. पण लवकरच लंबोदरमायेने शेषाने व त्याचे पत्नीस मोह उत्पन्न झाला. त्यामुळे पांच वर्षेपर्यंत हा लंबोदरावतार आहे हे ती विसरली! बालकाचे लालनपोषण त्यांनी मोठ्या कौतुकाने केले. लंबोदर पांच वर्षांचे झाले तेंव्हा पृथ्वीवर कर्मांचा लोप होऊन कित्येक वर्षे झाली होती. देवांस उपवास पडत होते व स्वाहास्वधाकारांचे नांवही ऐकू येत नव्हते. या सर्व अरिष्टांचे शांतीप्रीत्यर्थ व बृहस्पतीच्या सांगण्यावरून सर्व देवांनी व देवर्षींनी लंबोदराची तपश्चर्या केली. लंबोदर प्रकट

झाल्यावर ते स्वतःच देवांस आश्वासन देते झाले की, भिऊं नका. मायाकराचा वध करण्याकरता शेषाच्या घरी मी अवतार घेतो. पण तुम्ही सर्वजण एक गोष्ट करा. ती ही की, तुमच्यामध्ये जे मुख्य चार देव आहेत त्यांच्या अंशाने माझे आरोहण करण्याचे वाहन सिद्ध करा. देवहो ! माझ्या ठिकाणी तुमची भक्ति अखंड राहील !' असे सांगून लंबोदर अदृश्य झाले. नंतर शंकराच्या सांगण्यावरून देवांनी असे ठरविले की, लंबोदराचे वेदविहित वाहन म्हणजे मूषक होय. ज्याप्रमाणे परमेश्वर जीवाच्या अंतःकरणात राहून जीवाच्या नकळत सर्व भोग चोरून आपणच भोगतो, व नकळत सर्व कर्म करवितो, त्याप्रमाणे सर्व भोग भोगणारा व सर्व कर्म करविणारा हा लंबोदराचा मूषक आहे. म्हणून स्वांशाने मूषक सिद्ध करण्याचे ठरवून नंतर चार देवांनी आपआपले अंश दिले व एक मूषक तयार केला आणि त्याला बरोबर घेऊन शेषाचे घरी देव, देवर्षि, पितर इत्यादि मंडळी मोठ्या समारंभाने आली. त्यांनी त्यांचे अभिनंदन केले व 'मायाकरासुराच्या नाशाकरता तुझ्या घरी हा लंबोदराचा अंश झाला आहे. तू धन्य आहेस. आता आमच्यावर कृपा करून आमच्या स्वाधीन लंबोदराला कर; म्हणजे, शेषराज ! तुझ्या कृपेने आम्ही जगत्कार्य करण्याला समर्थ होऊं हे मागणे शेषास अर्थातच पसंत पडले नाही. लंबोदरांनीच जेंव्हा त्याला चार विचारांच्या गोष्टी सांगितल्या तेव्हा त्याने लंबोदरास देवांचे स्वाधीन केले. लंबोदरानी आपले वाहन जे मूषक त्यास पाहिले व तत्कृत स्तुति ऐकिली, तेव्हा त्याचे समाधान झाले. नंतर देवांच्या लंबोदराच्या सांगण्यावरून ब्रह्मदेवाला मायाकराकडे साम करण्याकरता पाठविले; परंतु त्याचा काही उपयोग झाला

नाही. पुढे देवदैत्यांमध्ये ओघानेच लढाई सुरू झाली, ही लढाई कित्येक दिवसपर्यंत अहोरात्र चालली होती. उभयतांकडील हजारो वीर समरांगणांवर मरून पडले. रक्ताचा चिखल, प्रेतांची गर्दी इत्यादिकांनी ती जागा अतिशय भेसुर दिसत होती. पुष्कळ वेळ जय कोणास मिळेल हे कळेना. शेवटी मूषकवाहन लंबोदर आणि मायासुर यांची गांठ पडली, तेंव्हा सर्वांस आतां प्रलयकाल आला असे वाटले. लागलींच लंबोदरांनी बिंदुरूप व ज्योतीरूप असे आपले हातातले कमळ राक्षसाच्या अंगावर फेकले ते कमळ आपल्या हातात घेण्याचा मायासुराने प्रयत्न केला, पण ते त्याच्या हातात न येता गळ्याला चिकटले आणि त्याचा प्राण घेतल्यानंतर लंबोदराच्या हातात पुनः जाऊन बसले. हा राक्षस मेल्यावर स्वर्गातून पुष्पवृष्टि झाली. कृतज्ञभावाने देवांनीही लंबोदराची स्तुति केली व त्याच्याकडून अखंड भक्तीचा वर मिळविला. नंतर लंबोदर अंतर्धान पावले. शेषानेही गणपतीच्या मूर्तींची स्थापना करून गणपतिभक्तीचा संप्रदाय वाढविला.

सूताचे, गणेशभक्ति करणाऱ्यांना मार्गदर्शन

सूत :– मुनिहो ! गणपतिभक्त व्हावयाला गणपतीची खरी भक्ति, परान्नवर्जन, परस्त्रीगमननिषेध, क्रोधलोभत्याग, अभक्ष्यभक्षण-त्याग, द्रोह व मत्सरबुद्धि यांचा त्याग, इतकी साधने अवश्य हवीत. ही साधने तयार झाली म्हणजे उत्तम दिवस पाहून व गणपतिभक्तांची पूजा करून गणेशमंत्राची समारंभाने दीक्षा घ्यावी, आणि गणेश-मंत्राला साक्षीं ठेऊन यथाशक्ति गणेशमंत्राचे पुरश्चरण करावे. पूर्णाहुति झाल्यानंतर विघ्नेशनमनपूर्वक स्वगुरूची पूजा करावी

आणि ' भवसागर तरण्यासाठी आपण दिलेला मंत्र सिद्ध होऊं दे. ' अशी त्यांची प्रार्थना करावी. नंतर स्वतः आपण समंत्रक स्नान करून गुरुजींस स्नान घालावे. गणपतिभक्तास मोदकादि इष्टान्ने पोटभर व द्यावी आणि दीक्षेचा विधि पूर्ण करावा. स्नानांत प्रातर्विधि केल्याशिवाय गणपतिगृहांत केव्हांही जाऊं नये. आपली वस्त्रें नेहमी शुद्ध असावी. पूजा करतांना मौन असावे. देवाला नैवेद्य निवेदन केल्याशिवाय आपण कोणत्याही विषयाचा उपभोग घेऊं नये. आपले आहार-विहार योग्य असावे. याप्रमाणे ब्राह्मण गाणपत्यांचे आचरण असावे. क्षत्रिय गाणपत्य असेल तर त्याने होमहवनादि करू नये. त्याने मंत्राचा जप स्वतः करावा व शस्त्रादिकांचा त्याग करावा, तरच त्याला खरा गाणपत्य होता येईल वैश्याने स्ववृत्ति सोडली तर त्याला गणेशदीक्षा घेतां येईल शूद्रांनी हिंसादि कर्मे टाकली तर नाममंत्राने त्यांस गणेशदीक्षा घेता येईल. प्रातःस्नान, संध्यावंदन, पुराणोक्त व वेदोक्त पूजा, गणपतीचे ललाट-दक्षिणकर्ण आदि द्वादशांग पूजन, रक्तचंदन-विलेपन, शमीचीमाळ व मंदारपुष्पमालाग्रहण, शुद्धस्वभाव, मित्रशत्रु-शून्यता, चतुर्थीव्रतधारण, गणेशयात्रा, गणेशनामसंकीर्तन ही गाणपत्याची मुख्य चिन्हे आहेत.

शमी व मंदार ह्या वृक्षांचे माहात्म्य

सूतः— नंतर मुद्गलाने दक्षाला शमी व मंदार यांचे महात्म्य सांगितले, ते असे; पूर्वी और्व नामक स्वधर्माने चालणारा एक ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण होता. त्याला शमीका नांवाची सुरूप व मोठी गुणवान् अशी एक मुलगी होती और्वाने तिचे लग्न मंदार नांवाच्या

एका विद्वान् शौनकशिष्याशी लावले. पुढे शमीकेस घेऊन मंदार आपल्या घरी जात असता वाटेत गणपतिभक्त भृशुंडी यांच्या आश्रमात विश्रांति घेण्याकरता उतरला. भृशुंडीने या दंपत्याचे स्वागत व पाहुणचार मोठ्या भक्तीने केले. परंतु गणपति-प्रसादाने प्राप्त झालेली त्याची सोंड पाहून या तरुण दंपत्यास इतके अनावर हसे लोटले की, भृशुंडीयोग्याला त्यांच्या हसण्याचा संताप आला आणि 'हा माझा अपमान नव्हे, गणपतीच्या सोंडेचा अपमान तुम्ही केला आहे म्हणून तुह्मी दोघेही वृक्षाच्या योनीला जा' असा मी तुम्हांस शाप देतो.' असे म्हणाला आपल्या मूर्खपणाच्या हसण्याने हे आलेले संकट पाहून त्या दंपत्यास अतिशय वाईट वाटले. त्यांस पश्चात्ताप झाला. भृशुंडीच्या पायावर लोटांगण घालून 'क्षमा करा, जाणूनबुजून आह्मी हसलो नाही; कृपा करून प्रसन्न व्हा' अशी त्याची करुण स्वराने त्यांनी प्रार्थना केली. भृशुंडी दयाशीलच होता त्यास करुणा आली आणि 'गणपतीची प्रसन्नता झाली तर तुमचे कल्याण होईल. बरे करण्याचे माझ्या हातात नाही. तुमचे कल्याण असो' असे ह्मणून तो ध्यानस्थ झाला. शमीका आणि मंदार या दोघांसही वृक्षयोनि लागलीच प्राप्त झाली! इकडे शौनक गुरुजी मंदाराची काळजी करीत होता. बायकोला घेऊन मंदार आज उद्या येईल, अशी कल्पना करून वाट पाहून थकला. इकडे और्वाच्या घरीही या दंपत्याची वार्ता नव्हतीच. तेंव्हां और्व व शौनक हे दोघेही शोक करीत या नूतन दंपत्याचा जिकडेतिकडे शोध करू लागले. विचारतां विचारतां त्यांस असा पत्ता लागला की, भृशुंडीच्या शापाने ते दंपत्य 'वृक्षयोनिला' गेले आहे! मग ते और्व व शौनक

भृशुंडीच्या आश्रमात आले तेथे सर्व हकीगत ऐकल्यावर त्यांनी भृशुंडीची प्रार्थना करून त्यापासून गणेशदीक्षा घेतली आणि कडक तपश्चर्या करण्यास आरंभ केला कडकडोत उपास करून बारा वर्षे तपश्चर्या झाल्यावर त्यांस गणपति प्रसन्न व प्रकट झाले. या दोघां तपस्व्यांनी हात जोडून गणपतीची स्तुती केली, भ्रांति-विनाशक भक्ति मागितली व 'शमीका आणि मंदार यांस पुनः मनुष्ययोनीत आणा' असे मागणे मागितले. विघ्नहराने त्यांस अखंडभक्तीचा वर दिला, पण शमीमंदारांच्यासंबधाने ते ह्मणाले 'माझ्या भक्तांनी जे केले आहे, ते मला अन्यथा करता यावयाचे नाही. भृशुंडी अति शांत स्वभावाचा आहे, त्याला राग आला यावरून या दंपत्याचा अपराध फारच मोठा असला पाहिजे. ह्मणून मला या उभयतांस मनुष्यरूपात आणणे इष्टही वाटत नाही. तथापि तुमच्या भक्तीने मी संतुष्ट झालो आहे; ह्मणून असे करतो की, या पुढे शमीच्या व मंदाराच्या मुळाजवळ माझी वस्ती असत जाईल. हे वृक्ष सर्ववंद्य होतील. त्यांचे दर्शन-स्पर्शन झाले असता मोठमोठाली महापापे जळून भस्म होतील. शमीपत्राने माझी पूजा केली, मला एक मंदाराचे पुष्प वाहिले तर मला अतिशय आनंद होऊन मी माझ्या भक्तांच्या सर्व मनकामना पूर्ण करोन. मला दूर्वा जशा प्रिय आहेत तसेच एक शमीपत्र किंवा मंदारपुष्प मला प्रिय होईल. सारांश हे पाप-विनाशक वृक्ष होतील.' असे सांगून पुनः ह्मणाले की, 'जर माझी भक्ती तुह्माला प्रिय असेल तर मंदारवृक्षाची मूर्ति करून तिची यथाविधि पूजा करीत जा, शमी, दूर्वा व मंदारपुष्प हे मला वाहण्यास विसरू नका. पण मला तुळसी मात्र वाहात जाऊ नका' असे ह्मणून गणपति अंतर्धान पावले, दोघांही ऋषींस आनंद

होऊन ते आपआपल्या घरी गेले व गणपतीनी सांगितल्याप्रमाणे त्याची भक्ति व पूजा करू लागले.

शूद्राला स्वानंदवासी लोकाची प्राप्ती

सुतः–मुनिहो ! द्रविड देशांमध्ये एक महापापी शूद्र होता. तो शिकारीकरिता रानांत गेला असतां वाघाच्या तडाक्यात सापडून मरण पावला पण त्याला वाघाने मारले तेथे एक शमीचे पत्र पडले होते. त्याच्या प्रभावाने त्या पाप्याला स्वानंदवासी लोकांत जावयास मिळाले ! तेथे गणेश दूत व यमदूत यांचा तंटा होणार होता, पण यमाने आपल्या दूताची समजूत घालून त्यांस आज्ञापिले की 'ज्या कोणास शमी, दूर्वा, मंदारपुष्प यांचा स्पर्श झाला असेल, जे निरनिराळ्या नांवांनी गणपतीचे अखंड स्मरण करीत असतील; त्याच्यावर तुम्ही आपला अंमल बिलकूल चालवू नये.'

गणपतीला दूर्वा प्रिय का ?

सुत :–नंतर मुद्गलाने दूर्वेचे चरीत्र सांगितले ते असे ब्रह्मदेवाने चराचर सृष्टि उत्पन्न केली तेंव्हां, त्याच्या 'खाण्यापिण्याची काय व्यवस्था करवी ?' अशी चिंता त्याला उत्पन्न झाली. या चिंतेच्या प्रशमनासाठी तो गणपतिचे ध्यान करू लागला. कांही वेळाने त्याच्या अंगातून पुष्कळ हातपाय, पुष्कळ तोंडे, पुष्कळ डोळे इत्यादि इंद्रियावय आहेत अशी एक शोभायमान देवी उत्पन्न झाली. तिला पाहून 'अन्न देऊन सर्वांचे पोषण करण्याचे सामर्थ्य या देवीला आहे,' असे ब्रह्मदेवाला समजले व तो मोठा आनंदित झाला. देवीने ब्रह्मदेवाला नमस्कार केला, आणि 'काय आज्ञा आहे

असे नम्रतेने विचारले. तेंव्हा 'तप कर व नतर सर्वांचे अन्न तू हो, तुला दुर्वा हे नाव मिळेल' असे ब्रह्मदेव आशीर्वाद-पूर्वक ह्मणाले. ते ऐकून ती देवी अरण्यात गेली आणि एकाक्षरी मंत्राचा जप करून निराहारपूर्वक व गणेशध्यानपूर्वक हजार वर्षे तिने तपश्चर्या केली. गणपतो प्रकट झाल्यावर तिने त्यांची अथर्वशीर्ष मंत्रानी स्तुति केली. नंतर 'सर्व सृष्टीचे पोषण करणारी तू होशील व सर्व वंद्य होशील' असा तिला आशीर्वाद देऊन गणपति निजधामास गेले. मुनिहो! ह्या दूर्वा देवीच्या मस्तकापासून षड्रसांनी युक्त असे स्वर्गान्न उत्पन्न होते. तिच्या उदरातून जे सुरस अन्न उत्पन्न होते, ते पृथ्वीवरील जीवांचे पोषण करते; आणि तिच्या पायापासून उत्पन्न होणारे अन्न पातालवासीयास उपयोगी पडते. याप्रमाणे आपण उत्पन्न केलेल्या जीवास अन्न पुरविण्याची दूर्वा देवोने कामगिरी घेतली, व सर्व जीव धष्टपुष्ट झाले. असे पाहून ब्रह्मदेवाला आनंद झाला, आणि 'तू अन्नाची अधिपति होशील.' असा आशीर्वाद देऊन तिच्यावर ब्राह्मणाकरवी ब्रह्मदेवाने अभिषेक केला. पुढे काही कालाने ह्या ऐश्वर्यवती देवीला गर्व झाला. गणपति विस्मरण झाले ह्मणून तिच्या सुखाचा नाश करणारो विघ्नेही उत्पन्न झालो. पार्वतीचे व तिचे भांडण होण्याचे कारण नसताही दूर्वादेवी ताठ्याने ह्मणू लागलो की, 'अन्नस्वरुप मी आहे ह्मणून मी अन्नपूर्णा आहे; जगदंबा नव्हे!' असे भरसमाजात ती उन्मत्तपणाने बडबडू लागली पार्वतीने बराच वेळ ही निंदा सहन केली. पण पुढे दुर्वादेवीचे बोलणे जास्त टोचणारे होऊन असह्य झाल्यावर 'तू पृथ्वीवर तृणरूप होऊन रहा' असा जगदंबिकेने तिला शाप दिला. या शापाने दूर्वादेवीचा मद उतरला.

ती पुन: गणेशनामाचा जप करू लागली. तिने तपश्चर्या केली आणि गणपतीस प्रसन्न करून घेऊन त्यापाशी दृढभक्तिचे मागणे मागितले. शेवटी अशीही प्रार्थना केली की, 'पार्वतीने मला जो शाप दिला आहे, त्यापासून माझे रक्षण करा.' गजाननानी आशीर्वाद दिला की, 'अंशरूपाने मात्र तू पृथ्वीवर तृणरूप घेऊन अवतरशील व पार्वतीचा शाप खरा होईल. पण मुख्य स्वरूपाने स्वर्गात पूर्वीप्रमाणे तू वास करशील. पृथ्वीवर तू शतमूल (शंभर मूळे आहेत अशी) व शतांकुरा होऊन अमृतरूप धारण करशील. याचप्रमाणे तूं सर्वमान्य, सर्वपूज्य व मंगलदायिनी होशील. तुझे पत्र मला अर्पण केले असता मला अतिशय संतोष होईल. माझ्या ठिकाणी तुझी भक्ति दृढ राहील.' असे म्हणून गणपति अंतर्धान पावले व देवी गणपतिभक्त झाली. गणपतीला दूर्वा कां प्रिय आहेत त्याचा असा हा इतिहास आहे.

पिशुनाची कथा

एकदा दंडकारण्यात राहणारा पिशुन नावाचा एक दुर्बुद्धि व पापी असा अंत्यज होता. पंचमहापातकांपैकी कोणतेही पाप करण्यास त्याला यत्किंचितही शंका येत नसे. हा एकदा ब्रह्महत्त्या करण्यास प्रवृत्त झाला असता तेथे काही शस्त्रधारण केलेले क्षत्रिय आले व मारामारी करून ब्राह्मणास मुक्त करते झाले. या मारामारीत पिशुन मारला गेला. पुढे यमलोकी जाउन तो आपल्या पापाचे फळ भोगीत असता पांचव्या दिवशी ज्या रसरशीत कढईत त्याला ठेवला होता, ती कढई एकदम शांत झाली. हा चमत्कार काय आहे, हे पाहण्याकरिता यमधर्म ध्यानस्थ झाला. तेंव्हा त्यास कळले की, या

पिशुनाच्या शरीरावर एका गाणपत्यांच्या मस्तकावरील दूर्वा पडली तिचा हा प्रभाव आहे !

जनकाचे गर्वहरण व त्रिशिरा ब्राह्मणास गणेशाचा आशिर्वाद

एकदा जनकाला आपल्या कर्तृत्वाविषयी व दातृत्वाविषयी अतिशय गर्व झाला होता. त्याचा नाश करण्यासाठी एका आजारी ब्राह्मणाचे स्वरूप धारण करून 'मला भूक लागली आहे, कांही खावयास दे' असे राजा जनकाच्या येथे जाऊन गणपति त्याला ह्मणाले. 'आपल्या येथून ब्राह्मण अतिथि विन्मुख होऊन जाणारच नाही,' असा गर्व वाहणाऱ्या जनकाने ब्राह्मणाला उत्तम प्रकारचे अन्न तयार करून वाढविले. ते संपले; व ब्राह्मणाने आणखी अन्न मागितले, याप्रमाणे अनेक वेळ झाल्यावर राजाच्या येथील शिजविलेले अन्न संपले, कोरड्या अन्नांनेही ब्राह्मणाचे पोट भरेना, तेंव्हां नगरींतील घरांत शिजवलेले व कोरडे अन्न ब्राह्मणास वाढले, तरी सर्वभक्षक अग्नीप्रमाणे सर्वभक्षक ब्राह्मणाचे समाधान होईना. जवळच्या गांवांहून होते नव्हते तेवढे अन्न आणले परंतु 'मला आणखी वाढ' असे ब्राह्मणाचे ओरडणे संपेना. आतां हा ब्राह्मण राजासच खाऊन टाकतो की काय, असा प्रसंग निर्माण झाला! राजास कळले की, आपला कर्तुत्वाचा व दातृत्वाचा अभिमान व्यर्थ आहे. इकडे गणपति घरोघर हिंडून 'मला खावयास द्या' 'मला खावयास द्या' असे ओरडत हिंडत राहिले. कशानेंही त्यांचे समाधान होईना. ही ओरड अति दरिद्री त्रिशिरा नामक ब्राह्मणांने ऐकली. त्याने गणपति पूजनासाठी आणलेल्या दूर्वांपैकी एक दूर्वा

पुढे करून 'एवढेच काय ते मजपाशी देण्यासारखे आहे ते मी भक्तिपूर्वक आपणास अर्पण करतो. कृपा करून याचा स्वीकार करावा' ही भक्ति व विनय पाहून गणपति आनंदित झाले व ही महाभक्तीने समर्पण केलेली दूर्वा घेऊन गणपतीची क्षुधा शांत झाली. प्रसन्न होऊन त्यांनी आपले स्वरूप प्रकट केले. तो दरिद्री ब्राह्मण व त्याची स्त्री ह्यांनी केलेल्या स्तोत्राचा देवांनी स्वीकार केला आणि अखंडभक्ति देऊन 'तुह्मांस मोक्ष मिळेल.' असा आशीर्वाद दिला. ह्या आशीर्वादाबरोबरच लक्ष्मीसान्निध्याचा लाभही ह्या दरिद्री कुटुंबास झाला. राजा जनकाला हा वृत्तांत कळल्यावर तोही स्वगर्वांचा त्याग करून गणेशभक्त झाला.

जनक व नऊ योगी संवाद. नऊ योग्याचे जनकाच्या प्रश्नास उत्तरे

एकदां त्याच्या येथे नऊ योगी आले. ते दिगंबर वृत्तीने रहात असत. त्यांचे वैराग्य, त्यांची भक्ति ही सर्व विलक्षण असत. ते मोठे गणेशभक्त होते. राजाने त्यांचा योग्य सत्कार केला आणि त्यांचे चरणसंवाहन करीत असतां जनकाने त्यास प्रश्न केला की 'मोक्ष मिळविण्याकरितां जीवाने काय करावे? तेंव्हां नऊ योग्या-पैकी 'कवि' ह्मणाला जीवाने स्वधर्म पाळून सात्विक वृत्तीने सर्व श्रौत व स्मार्त कर्मे करावी, व ती सर्व गणपतीस निष्का-मत्वाने समर्पण करावी. सर्व काल गणपतीचे ध्यान करावे. एकाक्षरी मंत्राचा जप करावा ह्मणजे सर्व विघ्नांचा नाश होऊन शांतियोगाचा लाभ होईल. सारांश गणपतीचे भजन हाच मुख्य उपाय आहे.'

जनकाने विचारले, चिंतामणीचे स्वरूप काय? या प्रश्नाला 'हरीने' उत्तर दिले 'क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र, निरोधक असे जे चित्ताचे पाच प्रकार आहेत त्यास प्रकाशित करणारा तो चिंतामणि होय. या चिंतामणिचे भजन केले पाहिजे. या गणपति-भजनाने चित्ताचा, चित्तपंचकांचा नाश केला ह्मणजे चिंतामणीचा व शांतीचा पूर्ण लाभ मिळतो

जनक :– असा सर्व प्रकाशक ह्मणजे ज्ञानरूप जो चिंतामणि आहे त्याला शरीरप्राप्ति कशी होते? 'अंतरिक्षाने' उत्तर दिले : 'मानेच्या खाली जो शरिराचा भाग आहे त्याच्या डाव्या भागात राजसगुण, उजव्यात तामस व मध्ये सात्विक, असे शरीरभाग असून या सर्वांचा योग, हा या शरीराचा चवथा भाग आहे. तेथे अहंकार धारण करणारा निराकृति गणनायक असतो. आणखी ज्यापासून सर्व उत्पन्न होते व जेथे सर्वांचा लय होतो, पण जे स्वतः कधी उत्पन्न होत नाही व कधी पावत नाही, ते 'गज' नावाचे ब्रह्म वेदामध्ये सांगितले आहे. ग ह्मणजे ज्यामध्ये सर्वांचा प्रलय होतो ते, ज्यामध्ये सर्वांस जाऊन लीन व्हावे लागते ते तत्व होय. 'ज' ह्मणजे ज्याच्यापासुन सर्वांचा जन्म होतो ते तत्व होय. हे असे 'गज' नामक ब्रह्म आहे. हे गजरूपी ब्रह्मच गणेशाचे मस्तक असते. आतां सांगितलेला चार प्रकारचा देह व गजरूपी मस्तक ह्या दोघांचा योग झाला म्हणजे गणपति साकार होतो. नराकृति 'संप्रज्ञातमय,' व गजाकृति शिर 'असंप्रज्ञातरूप'

आहे. यांचा योग म्हणजे गणपति शरीरि होणे हे होय. याचा अवतार व हे शरीरधारणा केवळ भक्तीच्या भोगाकरताच होते!

जनक :– माया म्हणजे काय? प्रबुद्ध :– गणपतीच्या वामांगी सिद्धि आहे, व दक्षिणभागाला बुद्धि आहे. सिद्धिचा पुत्र लक्ष व बुद्धीचा पुत्र लाभ, या दोघांचा खेळ सुरू झाला म्हणजे जीवास जो मोह पडतो तो मायाकृत असतो. पुण्यपापाकडे लक्ष असेल तर सुख-दुःखाचा लाभ होतो. ब्रह्माकडे लक्ष असेल तर योगलाभ होतो. सिद्धि ही भ्रांति उत्पन्न करणारी आहे. निष्काम बुद्धीने मोह निवृत्त होतो. पण सकाम बुद्धी मात्र जास्तच मोह उत्पन्न करते. हीच माया! आपण पूर्ण असताही 'पूर्ण नाही' असे वाटणे, याचे नाव माया आहे.

जनक :– गणेश जर भक्तिप्रिय आहे तर भक्तांना मोह कसा होतो? पिप्पलायन म्हणाला, राजा, गणपतीने हे मायामय जग क्रीडा करण्यासाठीं उत्पन्न केले आहे. हे दोन प्रकारचे आहे. एक स्वार्थाने मोहित झालेले जग आणि दुसरे योगमार्गाचे ज्ञान होऊन शांति देणारे जग. योगमार्गाने गणेशब्रह्माचे ज्ञान करून घेऊन अनन्यभावाने परमभक्ति केली असता तो जीव मुक्त होतो. संसारात पडलेले स्वार्थ-युक्त जीव मायेची बाहुली होऊन गणेशसाक्षीने गणपतीच्या आज्ञे-नुसार कर्म करणाऱ्या मायेचे दास होतात.

जनक :– कर्म म्हणजे काय ते मला उलगडून सांगा. आवि-र्होत्र म्हणाला :– स्वधर्मयुक्त देहसौख्य व जन्ममृत्यु देणारे विधियुक्त

कर्म त्याला कर्म म्हणावे. स्वधर्मशून्य व विधिशून्य जे पापरूप कर्म त्याला विकर्म म्हणावे हे कर्म देहाला दुःख व दुर्गति देणारे असते; परंतु ब्रम्हार्पण स्वरूपाने मुक्ति हा हेतु धरून जे नित्य सत्कर्म होते, मोक्ष देणारे असते, त्याला अकर्म अथवा कर्मशून्यता असे म्हणावे. नैष्कर्म्याची स्थिति प्राप्त झालेले लोक शुक्ल मार्गाने जातात हे सर्व विश्व कर्मयोगमय आहे. हा कर्मयोग सगुणात्मक अथवा निर्गुणात्मक असतो. कर्म न करणे याला अकर्म म्हणत नाहीत सत्कर्म करून ते ब्रम्हार्पण करणे आणि कर्तृत्वाचा अभिमान न धरणे याला मोक्ष देणारे नैष्कर्म्य अथवा अकर्म म्हणतात. ह्या नैष्कर्म्याचे आचरण विधिपूर्वक करणे हाच वेदप्रणीत कर्मयोग आहे. याहून इतर जी कर्मे आहेत ती संसारात ढकलणारी म्हणून निर्गुणात्मक नव्हेत.

जनक :– ज्ञान म्हणजे काय ते मला सांगा.

द्रमिल :– अंतःकरणामध्ये जे स्फुरण होत असते, त्याला ज्ञान म्हणतात. स्फुर्ति उत्पन्न करणारे ब्रम्ह तेथे असते हे नामरूप-शून्य, अनाद्यनन्त व नित्य चिरंजीव ब्रम्ह ज्ञानरूपच आहे; व ब्रम्हा-नुभव देणारे हे ज्ञान जाणणे हाच ज्याचा स्वभाव झाला म्हणजे ज्याची ज्ञानदृष्टि झाली तो इतर सर्व ज्ञानाचा लय या सत्य व स्वानंदरूप ब्रम्हज्ञानामध्ये करतो.

जनक :– आनंद म्हणजे काय, सहजाचे स्वरूप काय व ब्रम्हभूयत्व म्हणजे काय ते सांगा.

चमत्त :– बाह्यांतर भेद नाहीसा झाला म्हणजे सर्वत्र सम-स्थिती प्राप्त होऊन नाना द्वंद्वामध्ये, (ह्या विश्वामध्ये,) समवृत्तीने असणारा सत्यासत्यमय व स्वानंदवासी जो आत्माराम तोच आनंदरूप आहे, तोच आनंद आहे, यालाच परमानंद अथवा ब्रम्हानंद म्हणतात हे समजणे हा गणेशयोग आहे. हा योग कठिण पण मोक्षदायी आहे. योगसाधनाने ज्यांची समवृति झाली त्यांसच हा आनंद मिळतो. द्वंद्वबुद्धि असली म्हणजे मोह उत्पन्न होतो; कर्म, ज्ञान आणि समवृत्ति ह्यांच्यापासून उत्पन्न होणारे मोह ज्या स्वरूपात नसतात, वेद ज्याच्यासंबंधे नेति नेति असे म्हणतात ते सहज ब्रम्ह आहे, ते स्वच्छंद, स्वतंत्र आणि सनातन आहे. आता ब्रह्मयुक्त ह्मणजे काय ते सांगतो: जे स्वतंत्र नाही किंवा परतंत्र नाही, जे त्रिविध मोहांनी युक्त नाही किंवा मोहशून्य नाही, जेथे ब्रह्म आणि जगत यांचा संयोग होतो, जेथे जीव स्वसंवेद्यमय ह्मणजे ब्रह्ममय होतो, जेथे भिन्न बुद्धि उत्पन्न होण्याला कारणच नसते, सारांश जेथे संयोगी माया व अयोगी गणेश यामधील भेद ह्मणजे मायासंयोग व मायावियोग या दोहोंच्या मधील भिन्न भाव नाहीसा होऊन दोघांसही सत्ता देणाऱ्या गणेशाचे स्वरूप प्राप्त होते, याला ब्रह्मभूयत्व ह्मणावे. गकार हा संयोगवाचक आहे व णकार हा अयोग्यवाचक आहे, ह्या संयोग व वियोग नामक गणाचा अधीश, स्वामी, जो गणेश, तो संयोगायोगवर्जित आहे, ह्मणजे तेथे संयोग नाही व अयोग नाही, तसेच उभयतामध्ये भेद नाही, अशी स्थिति आहे. त्याचे स्वरूपज्ञान ह्मणजे ब्रह्मभूयत्व होय.

जनक :– आता मला भक्तिचे स्वरूप सांगा.

करभाजन :– हृदयांत आनंद उत्पन्न करणारी भक्ति नऊ प्रकारची आहे. (१) गणेशगुणांची चर्चा भक्तिने व आनंदाने ऐकणे, याला **श्रवण** ह्मणतात. ज्याला श्रवणभक्ति प्राप्त झाली तो योगी श्रेष्ठ, गणेशगुणसंकीर्तन भक्तिने करण्याला अधिकारी होतो. गणेशाचे एक क्षणभरही विस्मरण न होणे म्हणजे अखंड स्मरण असणे, याला **स्मरण** म्हणतात. गणेशचरणकमल हेच शाश्वत आहे असे समजून ते मिळविण्याचा प्रयत्न करणे याला **पादसेवन** असे म्हणतात. गणपतीचे उत्सव व अर्चन नित्य करणे ह्याला **अर्चन** म्हणावे. गणेशापेक्षा श्रेष्ठ काही नाही असे भक्तिपूर्वक मानणे व त्याच्या आज्ञेविरहित एक पाऊलही न टाकणे याला **वंदन** असे नाव दिले आहे. गणेशचिन्हे धारण करणे हे **दास्य.** आपण जे काय मानसिक व शारिरिक कर्म करतो ते तदाश्रयाने व त्याच्या संतोषासाठी करतो, हे **सख्य.** गणेशापासून मी भिन्न नाही असे चित्तशुद्धिपूर्वक मानणे हे **आत्मनिवेदन.** अशी ही नऊ प्रकारची भक्ति आहे. संसारात जे सुख मिळत नाही, मोक्षाला ज्या सुखाचा पत्ता नाही, ते सुख आपल्याला निष्काम भक्तिसामर्थ्याने संपादन करता येते. वेदप्रणित गणेशस्वरूपावर निष्काम व निर्बोध विश्वास जेव्हा उत्पन्न होतो, तेंव्हा भक्तिसुखाचा रस आपल्याला चाखावयास मिळतो.

सूतः– याप्रमाणे या नऊ योग्यांनी जनकाच्या नऊ प्रश्नाला समर्पक उत्तरे दिल्यानंतर जनकाचा निरोप घेऊन ते निघून गेले. या दिवसापासून जनकराजाही अनन्य गणेशभक्त झाला आणि स्वतःचा, स्वकुलाचा आणि स्वजातीचा उद्धार करून अंती स्वानंदवासी झाला.

गणपतीला तुलसीपत्र वर्ज कां ?

सूत :– दक्षाने विचारले की, गणपतीला तुलसीपत्र कां वर्ज आहे ? मुद्गल ह्मणाले : पूर्वी एकदां एक धर्मनिष्ठ दाता, मान्य व सर्वसद्गुणी असा धर्मध्वज या नावाचा राजा पृथ्वीचे पालन करीत होता. त्याला रूपलावण्ययुक्त अशी वृन्दा नावाची एक मुलगी होती, ती उपवर झाली तेंव्हा तिने आपल्या पित्यास सांगितले की, 'वैकुंठवासी विष्णुशिवाय मी कोणाचीही भार्या होणार नाही.' असे सांगून ती अरण्यात गेली आणि विष्णुध्यानपूर्वक विष्णूची तपश्चर्या करू लागली. पुष्कळ वर्षे तिने तपश्चर्या केली, पण विष्णु प्रसन्न होईना. तथापि तिच्या उग्र तपाचा एक परिणाम असा झाला की, दिव्यदृष्टि येऊन तिला अंतर्ज्ञान प्राप्त झाले; त्यामुळे केंव्हा केंव्हा तिच्या ध्यानामध्ये श्रीगजानन येत असत. त्याचे ते स्वरूप पाहून व विष्णुशिवआदिब्रह्मांमध्ये गणेशब्रह्म श्रेष्ठ आहे असे जाणून ती त्या सुंदर (गणेशब्रह्माच्या) स्वरूपाला मोहित झाली आणि ह्याचाच अंश विष्णु आहे, तेंव्हा गणपतीशी लग्न करण्यात जनाची किंवा मनाची कोणतीच हरकत नाही असा तिने विचार केला. पुढे गणेशाच्या अंशाने महागणपति तपश्चर्या करीत होते, तेथे ती गेली व हा योगी प्रसन्न व्हावा म्हणून तिने साध्य तेवढे सगळे उपाय केले; परंतु तिला यशोलाभ झाला नाही. 'महागणपतींनी तिला एकच उत्तर दिले :– 'तूं सकाम आहेस, म्हणून कोणातरी सकाम पुरुषाला तूं वर; मी तुझा अंगीकार करणार नाही.' असे सांगितले असतांही वृंदा ज्यास्तच लगट करूं लागली व आता अंगावर हात टाकणार असे पाहून गणेशांनी तिला शाप दिला की, 'तुझ्या अंतःकरणांत राक्षसीभाव शिरला आहे. तूं दैत्यग्रस्त होशील व मला विवश करण्याचा

प्रयत्न केलास म्हणून तुला वृक्षयोनी प्राप्त होईल.' हा भयंकर शाप ऐकून तिच्या सर्वांगात कापरे भरले; ती रडावयास लागली व गणपतीच्या पाया पडली. ही तिची दीन स्थिति पाहून महागणपतीला दया आली. आणि त्यांनी तिला उ:शाप दिला की, 'तुला काही दिवस राक्षसांची संगति घडेल, पत्नीव्रताने तूं चालत असतां विष्णु तुझ्या पातिव्रत्याचा भंग करील, पुढे तूं अग्निप्रवेश करशील. नंतर तुला वृक्षस्वरूप प्राप्त होईल आणि ज्या विष्णूचे तू आता आराधन करीत आहेस, तो विष्णु शालिग्राम स्वरूपाने तुझ्या जवळ नित्य राहून तुला सुख देईल. तू सर्वांना पूज्य होशील. तुझ्या लाकडाच्या माळा करून लोक आपल्या गळ्यात घालतील. देवही तुझी पूजा करतील, पण माझी पूजा मात्र तुझ्या पत्राने किंवा मंजरीने साध्य होणार नाही.' हा उःशाप ऐकून वृंदेला थोडासा आनद झाला; तरीपण गणपतीला आपण प्रिय नाही, हा विचार तिला त्रास देत होता, म्हणून ती पुनः अरण्यात गेली आणि पूर्ण भक्तीने गणपतीचे एकनिष्ठ आराधन करू लागली. तपश्चर्येची सांगता झाल्यावर गणपतींनी तिला वर दिला की, 'भाद्रपद शुक्ल चतुर्थीला जे माझे भक्त मला एकवीस पत्र्या वाहतील, त्यांत तुळशीपत्राचाही समावेश होत जाईल. त्या दिवशी मात्र मी तुझा अंगीकार करीन. अन्य दिवशी मला जो कोणी तुळसीपत्र वाहील त्याला माझा भक्त असे मी कधी मानणार नाही. इतकेच नव्हे तर त्यास रवरव नरकामध्ये कुचंबत रहावे लागेल, व वंशहानि, लक्ष्मीनाश, रोगप्राप्ति ही विघ्ने त्याला मृत्युलोकी रडावयास लावतील.' असे बोलून गणपती अंतर्धान पावले.

गृत्समदाचा जन्म : गृत्समद्वारा ब्रह्मणस्पति सूक्ताचा जप

सूत :– शौनका ! आता तुम्हास गणपति पूजनाचा विधि सांगतो: पूर्वी वाचन्कवि या नावाचा एक तपोनिष्ठ व ब्रह्मज्ञ ब्राह्मण गृहस्थाश्रमांत रहात असे. त्याला मुकुंदा या नावाची तरुण व रूपसंपन्न भार्या होती. ती दोघेही वनातच रहात असत. एकदा रुक्मांगद या नावाचा राजा पाणी पिण्याकरता त्या आश्रमात यदृच्छेने आला. त्यावेळी वाचन्कवि मध्यान्ह संध्या करण्याकरता नदीवर गेला होता. सुंदर पुरुष पाहून ती कामबलाने एकदम वेडी झाली व स्त्री मर्यादेचा त्याग करून राजास अडवू लागली. राजा रुक्मांगद हा पवित्र क्षत्रिय व गणेशभक्त होता. त्याने 'माता' ह्मणून तिला नमस्कार केला; तथापि तिची समजूत पडेना. मग मात्र राजाने तिची निर्भत्सना केली आणि तो निघून गेला. पण त्याला त्या निर्लज्ज पापीणीने 'तू कुष्टि होशील. माझ्यासारख्या स्त्रियेचा अपमान करून तू जातो आहेस, तुला कोड भरेल.' असे ती ह्मणाली व त्याक्षणीच त्याच्या अंगावर कोड उठले! राजाला परमदुःख झाले, त्याने आपल्या इष्टदेवतेचे, गणपतीचे, स्मरण केले. तेव्हा राजाच्या सुदैवाने तेथे नारदमुनि आले आणि त्यांनी त्याला उपदेश केला की 'चिंतामणि क्षेत्रात जाऊन तू स्नान कर ह्मणजे तुझ्या या दुःखाचा परिहार होईल. राजाने त्या क्षेत्रीं जाऊन स्नान केले; व त्याची अंगकांति दिव्य झाली. त्या सत्वधीर राजाला घेऊन जाण्याकरता स्वर्गाचे विमानही आले. रुक्मांगदाने आपल्या मातापितरांसही चिंतामणि क्षेत्राचे दर्शन करविले आणि त्याचा व

सर्व प्रजेचा उद्धार केला. इकडे राजा गेल्यावर मुकुंदा कामविव्हल होऊन मूर्छित झाली. त्याच स्थितीत तिला झोपही लागली. ती निद्रित असतां देवांचा स्वामी इंद्र हा रूक्मांगदाचे स्वरूप घेऊन तेथे आला, आणि तिची कामशांति करून निघून गेला. त्या दिवशी मुकुंदेच्या उदरांत गर्भ राहिला. हा वृत्तांत बिचाऱ्या मुनीला कांही माहित नव्हता. पुढे मुकुंदा बाळंतीण होउन तिला मुलगा झाला. त्या मुलाचे नांव गृत्समद असे ठेवले. मुंज झाल्यावर वेदाचे साग्र अध्ययन गृत्समदाने अत्यल्पकाळांत केले. वाचक्नवि मुनिने आपल्या 'गणानां त्वा' या ऋग्वेदी मंत्रांची दीक्षा दिली व मुलानेही गणपति प्रसन्न होईल एवढे मंत्रपुरश्चरण केले. पुढे एकदां मगध राजाच्या येथे पितृ श्राद्धाचे वेळी गृत्समदाने क्षण घेतला होता. श्राद्धकर्म आटपून जेवणखाण झाल्यावर कांही वेळाने शास्त्राची चर्चा सुरू झाली. तेव्हां 'तूं क्षत्रिय रूक्मांगदाच्या पोटचा आहेस, शास्त्रीय पण विज्ञान शून्य भाषण करतो आहेस. तू आमच्या पंक्तीस बसण्यास योग्य नाहीस! चल येथून चालता हो.' असे अत्रि ऋषीने त्यास फर्मावले. हा अपमान गृत्समदास सहन झाला नाही. तो घरी गेला. तेथे आईकडून खरा वृतांत समजून घेतल्या-वर आईला त्याने शाप दिला की 'तूं काट्याने भरलेली व अतिशय तिखट फळे येणारी एक वेली होशील, व तुझी सर्व लोक निंदा कर-तील.' तिनेही मुलाला शाप दिला की, 'तुझ्या पासून एक दुष्ट राक्षस उत्पन्न होऊन जगाला त्रास देईल. 'जगाला ताप देणारा पुत्र उत्पन्न करण्यापेक्षां आपण स्वतः देहत्याग करणे हे उत्तम आहे' असा तो निश्चय करणार तोच आकाशवाणी झाली की, 'तू जीव देऊं नकोस. तू जे गणपतीचे भजनपूजन करतोस ते जास्त नेटाने कर म्हणजे

तुला उत्तम प्रकारचे ऐहिक व परमार्थिक सुखप्राप्त होईल.' नंतर त्याने ब्राह्मणत्व प्राप्त करून घेण्याकरतां ब्रह्मणस्पति सूक्ताने जप केला आणि तो जप सफलही झाला.

ब्रह्मणस्पति सूक्ताचा विधि गृत्समदाला गणेशाच्या वराची प्राप्ती

ह्या सूक्तांचा विधि असा आहे: 'गणानां त्वा' या मंत्राने षोडश अंगांचा न्यास करावा. एकवीस एकवीस ह्मणजे (४४१ वेळ) 'ब्रह्मणस्पति' सूक्ताची आवृत्ति करून अभिषेक व जप करावा. अशा आवृत्त्या एकवीस वेळ झाल्या ह्मणजे एक मंडल होते, गृत्समदाने सुक्तांचे एक महामंडल केले. तसेच तो प्रत्येक दिवशी एकशे एकवीस वेळ (गणानां त्वा) या मंत्राचा जप एकाग्र मनाने व नासाग्र दृष्टि ठेऊन करीत असे. असे हजार वर्षे त्याने हे व्रत चालविले. तेव्हा गणपति स्वतः प्रकट झाले. त्यांनी मोठ्या संतोषाने गृत्समदाच्या स्तोत्राचा स्वीकार केला, आणि 'तू ब्रह्मभूतामध्ये श्रेष्ठ असा ब्राह्मण होशील. 'गणानां त्वा' या मंत्राचा द्रष्टा होशील. यज्ञामध्ये तुझे प्रथम स्मरण करतील, व नंतर देवतांचे करतील. तू सर्वपूज्य होशील व माझे ठायी तुझी भक्ति दृढ होईल.' असे वर देऊन गणपति अदृश्य झाले. आपण तपश्चर्या केली होती तेथे गृत्समदाने ब्रह्मणस्पति या नावाचे क्षेत्र स्थापन करून, तेथेच तो गणपतीची अंतर्बाह्य पूजा करीत राहिला. अंतर्पूजा ह्मणजे मानसपूजा, या पूजेत एक अंगुष्ठमात्र आकाराची चतुर्भुज पाशांकुशधर अशी निर्विकारमूर्ति, आपल्या मस्तकांत जे सहस्रदल पद्म आहे तेथे ठेऊन त्या मूर्तिची मानसिक

राजोपचाराने पूजा करावयाची असते, ती होय. बाह्य पूजा ह्मणजे वेदप्रणीत, स्मृतिप्रणीत व पुराणप्रणीत पूजा होय. मानसपूजा स्थिर चित्ताने करणे अति श्रेयकर होते.

गणेशलोकाचे वर्णन

सूत :– शौनका ! आता गणेशलोकाचे मी स्थूल वर्णन करतो. 'ज्याला स्वानंदलोक असे ह्मणतात तो पूर्णज्ञानाने किंवा पूर्ण गणेशभक्तिने मात्र प्राप्त होतो. तो लोक सर्वांपेक्षा श्रेष्ठ, वर्तुलाकार, स्वतःच्या आधाराने राहणारा व तेजाचे तेज, असा आहे. तेथे सगुण नाही किंवा निर्गुण नाही. तेथील लोक पुरुष नव्हेत, स्त्रिया नव्हेत किंवा नपुंसकही नव्हेत. चारी प्रकारचे जे भाव आहेत, त्यामध्ये नित्य राहणारा व स्वसंवेद्य (स्वतः मात्र जाणतां येण्यासारखा) असा हा लोक आहे. हा मायाशून्य लोक मायेच्या चारी प्रकारचा आधार असून तो साक्षीरूपाने असतो. हा अंखड व सर्वश्रेष्ठ आहे. या लोकांत क्षुधा, तृषादि कांही नाही. येथील आनंद सहज आहे, कृत्रीम नाही. या लोकांत सगुण, निर्गुण या प्रत्येकापासून होणारे सुख भोगावयास मिळते येथे अहंभाव नाही नहंभावही नाही. येथे सिद्धि आणि बुद्धि दासीस्वरूपाने असतात, इत्यादि लक्षणे गणेशलोकाची आहेत. येथे गणेशभक्त मात्र जातात. यालोकाला जाण्यासाठी शक्ति लोक, सौर, वैष्णव शांकर इत्यादि लोकास मागे टाकून जावे लागते. शांकरलोकापुढे एक मोठा अंधकाराचा प्रदेश आहे. त्या अंधकारातून जात असतां वाटेत भ्रामरिका देवी जन्ममृत्युप्रमुखभयांनी विमानस्थ पांथांस भिववीत असते. या भ्रामरिका देवीला 'आधार शक्ति' असे ह्मणतात. शरीरांत जीवात्मा आणि परमात्मा अशी स्वरूपे परब्रह्मास ध्यावयास

लावणे हे मायेचे काम आहे. तिचे अतिक्रमण केल्यावर ज्योतीरूपा शक्तीचा प्रांत प्रकट होतो. ही शक्ति जीवाच्या इच्छा पूर्ण करणारी आहे. ही 'असि' (आहेस) रूप आहे. मागे भ्रामरी म्हणून जी माया सांगितली ती 'त्वं' स्वरूप आहे. ज्योतीरूप शक्तीच्या मस्तकावर स्वानदलोक आहे. येथे आलेल्या जीवाला पुनः भ्रांति म्हणून उत्पन्न होत नाही. जे गणेशभक्त स्वानदवासी होतात, त्यांना जन्ममरण चक्राचा उपसर्ग कालत्रयींही लागत नाही. हेच 'तत्' रूप होय.

गणपतीचा कपिलास उपदेश

सूत :– हे विश्व नानाभावयुक्त झाले आहे म्हणजे नाना प्रकारचे जीव येथे आहेत. हे सर्व गणेशब्रह्माचे भक्त नसले तरी, पर्यायाने ते ब्रह्मभक्तिच करतात. शिवाय परमेश्वरी माया अशी कांही विलक्षण आहे की, तिचा निरास करून गणेशब्रह्माचे परमार्थस्वरूप समजून घेणे असेल तर गणेशब्रह्माचा प्रसादच झाला पाहिजे. शिवाय जीवांचे स्वभाव भिन्न असतात, याचे कारण त्यांचे भिन्न भिन्न पूर्वकर्म हे आहे. याप्रमाणे हौस, अज्ञान व पूर्वकर्म या तीन कारणांमुळे सर्व जीव गणेशब्रह्माचीच उपासना करतात असे नाही. कृतयुगांत गणेशब्रह्माची मात्र उपासना होत असे; त्रेतायुगांत पंचायतनपूजेचा (सूर्य, विष्णू, शंकर, गणपति आणि शक्ति मिळून पंचायतन होते.) उद्भव झाला व पांचही देव समानच आहेत अशी समजूत प्रचलित झाली. द्वापारयुगात गणपति हा शंकराचा मुलगा आहे, अशी न्यूनत्वताबोधक समजूत झाली आहे, आणि कलियुगात तर गौरीने आपल्या अंगच्या मळाने गजाननाला उत्पन्न केले, असा हीनतासूचक विचार प्रसिद्ध झाला आहे. याचा परिणाम

विश्वावर अनेक प्रकारची संकटे उत्पन्न होणे हा होतो; तेंव्हा 'प्रत्येक कल्याणेच्छु जीवाने वेदप्रणीत गणेशब्रह्माचे ज्ञान करून घ्यावे, शास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्याची उपासना करावी आणि स्वधर्मानुसार आपले आचरण ठेवावे' असा गणपतीनी कपिलास उपदेश केला तोच मुद्गलाने राजा दक्षास सांगितला.

पंचायतन, पूजा–मांडणी इत्यादिबाबत मार्गदर्शन

सूत :– पंचायतनपूजा व अग्निसेवा ही ब्राह्मणाची अवश्य कर्मे आहेत. प्रापंचिक व पारमार्थिक विघ्नांच्या नाशाकरता गणपतीचे पूजन, विद्येसाठी शंकराचे, यशासाठी विष्णूचे, आरोग्यार्थ सूर्याचे आणि सौभाग्यप्रीत्यर्थ देवीचे पूजन करावे, ह्या पंचायतन पूजेने विघ्ननाश, विद्या, यश, आरोग्य आणि सौभाग्य ही प्राप्त होतात. अग्निपूजा ही कर्मसिद्धीचे कारण आहे; पंचायतनपूजा व अग्निपूजा निष्कामभावनेने केल्या असता विशेष कल्याण होते. पंचायतनपूजेत गणपति मध्यस्थानी ठेऊन ईशान्येला विष्णु, आग्नेयीला शंकर, नैऋत्येला जगदंबा व वायव्येला सूर्य ठेवून पंचायतन सिद्ध करावे. कोणास शंकरपंचायतन किंवा विष्णुपंचायतन जास्त प्रिय असल्या-मुळे त्याने आपल्यास इष्ट अशी पंचायतनाचीं मांडणी केली तरी, येथे सर्व मुख्य देव आहेत ह्मणून पचायतनपूजा सर्व देवास व देवेश्वरास प्राप्त होते. पंचायतनातील ह्या मूर्ति त्या त्या देवतेची चिन्हे मात्र आहेत. येथे शैवांनी विष्णूची, किंवा वैष्णवांनी गाणपत्याची निंदा करण्याचे कारण नाही. गणपति हे सिद्धिबुद्धियुक्त असल्या-मुळे व सिद्धिच्या हाती धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हे चारो पुरषार्थ असतात म्हणून व बुद्धिच्या आधीन राहून कर्ता कर्म करतो

म्हणून, प्रत्येक जीवाने स्वधर्म पाळून गणेशपूजन करणे हे अत्यंत अवश्य आहे.

गणेशभक्ति करणाऱ्या साधकांना मार्गदर्शन

सूत :–ग.णेशअथर्वशीर्षामध्ये जे गणपतीचे ध्यान विहित केले आहे, ते ध्यान साधकाने दृढ करून नेहमी त्याचेच चिंतन करीत असावे. रोज शमोपत्र, मंदार पुष्पे व दूर्वा ह्यांच्यासह गणपतीची षोडशोपचार पूजा करावी. सर्व पूजेची द्रव्ये परमेश्वराला वाहत असता गणेशमंत्राची योजना करावी. दूर्वा वाहावयाचे वेळी इष्ट असेल तर 'काडात् कांडात्' हा मंत्र ह्मणावा. शमी, दुर्वा, मंदारपुष्प ही द्रव्यसाधने झाडावरून काढताना 'गणपतिपूजनाकरतां ही मी पूजाद्रव्ये सिद्ध करीत आहे' असे ह्मणावे. रोज निदान एकविस दूर्वा तरी वाहाव्या. 'गणानां त्वा' हा मंत्र ह्मणावयाचा तो ऋषि, छंद, देवता, बीज व न्यास यांच्यासह ह्मणावा. गणपतीचे ध्यानातील रूप प्रकाशमय असावे. हे सर्व साधकाने ध्यानात ठेवून त्याप्रमाणे आचरण करावे.

हे गणेशव्रत यथाविधि केले असता सर्व ऐहिक व पारमार्थिक कल्याणांचा अधिगम होऊन अंती मोक्षप्राप्ती होते.

[लंबोदरचरित्र समाप्त.]

षष्ठ खंड

—०—

[विकट चरित्र]

ब्रह्मपंचकाचें स्वरूपवर्णन

सूत :– मुनिहो ! दक्षाने विचारल्यावर मुद्गलाने कल्याणकारक असे विकटचरित्र सांगितले. ते असेः एकदां आदिमाया आपल्या महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती इत्यादि देवीसख्यांशी बोलत बसली असतां महाकालीप्रमुख मुख्य देवींनीं आदिमायेस विचारले 'धर्मार्थादि चारी पुरषार्थ देणारी सर्वरूप व सर्वप्रकाशिनी अशी तूं सर्वशक्तीची मूल प्रकृती असतां, तू नेहमी गणपतीचे ध्यान करतेस, त्याची पूजा करतेस व त्याची नांवे घेतेस, याचे रहस्य काय? कृपा करून तूं आम्हांस उपदेश कर, म्हणजे आम्हींही गणेशांची उपासना करण्याचा निश्चय करू. **आदिदेवी** :– सख्यानों ! आम्हां चौघांची उत्पत्ति गणपतिपासून झाली आहे. (१) मी स्वतः, जे सर्व नामरूपात्मक आहे त्यामध्ये वास्तव्य करते. नामरूपात्मकाला जन्ममृत्यु आहे; 'मला असत स्वानंदमय' ब्रह्म म्हणतात. (२) ह्या उत्पत्ति–विनाश पावणाऱ्या नामरूपात्मक वस्तूंची जी अभिमानी देवता, जी आधार देवता

आहे, ती सूर्य होय. तिला सत्यात्मक अथवा 'सद्ब्रह्म' ह्मणतात. (३) वरील असद्ब्रह्म सद्ब्रह्म यांची जी साम्यावस्था तो विष्णु होय. यालाच 'साम्यरूप' असे म्हणतात. नामरूपे अनंत असतात, पण त्यांचा अभिमानी एकच असतो. या दोघांची ह्मणजे सदसतांची जी साम्यावस्था ती आनंदमय आहे. हेच विष्णूचे स्वरूप आहे. सद सतांचा जो अभेद तो विष्णु होय. (४) या सत्, असत् व सम यापैकी कोणतेही रूप नसणे ते 'नेति' रूप आहे. हे शिवाचे स्वरूप आहे. सत्, असत् व सम या तिन्हीचे अंतर्यामी तुर्य ह्मणजे चतुर्थ ब्रह्म आहे. हे शिवरूप, मागील तिन्ही रूपापेक्षा श्रेष्ठ आहे. या चौघांचा जो संयोग ह्मणजे सत्, असत्, सम व नेति या चारी ब्रह्मामधील जो भेद आहे त्याचा नाश ज्याने होतो तो संयोग 'स्वानंद ब्रह्म' आहे. हा स्वानंद स्वसंवेद्य आहे, हा दाखविता येणार नाही, किंवा सांगूनही समजणार नाही, हे स्वानंदी ब्रह्म, एक योगसेवा केली तरच प्राप्त होईल.

संयोग–वियोग

(१) येथे त्वंपद, तत्पद व असिपद यांची व्यवस्था अशी आहेः 'असि' पदामध्ये असत्, सत्, सम, नेति व स्वानंद ह्या सर्वांत स्वसंवेद्य व स्वानंद ब्रह्मांचा निवास असतो. 'तत्' पदामध्ये जागृत, स्वप्न, सुषुप्ति यांची निमित्तमात्र असणारी निर्गुण आत्मस्वरूपी ब्रह्मे आहेत. 'त्वं' पदाचे ठिकाणी जागृत, स्वप्न, सुषुप्ति, तुरीय, यामध्ये अभेद स्वरुपाने असणारी सगुण आत्मरूप ब्रह्मे आहेत. या प्रकारे हा सर्व आत्ममूलक विस्तार आहे. येथे असदादि ब्रम्हांचा संयोग पूर्ण व स्वसवेद्य होतो. तोच स्वानंदस्वरूपी

पांचवे ब्रह्म आहे. या स्वसंवेद्य ब्रह्माची प्राप्ति अस्तिस्वरूपी संप्रज्ञात समेने मात्र व्हावयाची असते. आता वर जी पांच ब्रह्मांची मालिका सांगितली आहे व ज्यावरच ब्रह्माचा आरोप केला आहे, त्या ब्रह्मापासून (ह्मणजे सर्व पांची ब्रह्मापासून) निर्विकारी आत्मा एकीकडे काढला म्हणजे अयोग सिद्ध होतो. नंतर वर सांगितलेला संयोग व आता सांगितलेला अयोग यांचा योग केला म्हण.जे आत्मा ब्रह्मामध्ये लय पावतो. हाच गणेशयोग आहे. ‘ हा आत्मा ब्रह्म आहे ’ ही श्रुति येथे प्रमाण आहे. ‘ तूंच प्रत्यक्ष तत्त्व आहेस ’ अथर्व श्रुति ‘ सर्वत्र अभेद आहे, जगत् जीव आणि ब्रह्म यांच्यामध्ये अभेद आहे ’ असे सिद्ध करते.

सिद्धिबुद्धिस्वरूप वर्णन

(२) पुनः, अनेक प्रकारची भ्रांति उत्पन्न करणारी जी माया तिचे नांव सिद्धी आहे; आणि भ्रांतिचा नाश करणारी जी शक्ति त्या मायेचे नाव बुद्धि असे आहे. ह्या सिद्धिबुद्धीचा स्वामी श्रीगणेश स्वानंद नगरीमध्ये राहतो. तो शांतिमय आहे. त्याला सिद्धीपासून लक्ष व बुद्धीपासून लाभ असे दोन पुत्र आहेत.

चित्तपंचक वर्णन

(३) चित्ताच्या पांच वृत्ति आहेत. त्यांची नावे क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र आणि निरोध अशी होत. हेच चित्तभूमिपंचक होय. (अ) संसारामध्ये व व्यवहारामध्ये चित्त रममाण झाले म्हणजे त्याला क्षिप्त असे म्हणावे. हे योगाच्या बिलकुल उपयोगी नाही; पण याचा चालक जो चिंतामणि तो योगोपयोगी आहे. (आ) भ्रमिष्ट लोक

ज्याच्यायोगाने पिशाच्चासारखे आचरण करतात, त्या चित्ताला मूढ असे ह्मणावे. याचाही उपयोग योगाभ्यासाला नाही, तथापि त्याच्या अंतर्यामी राहणारा चिंतामणि उपयोगी आहे. (इ) ज्याच्यायोगाने संसाराचा वीट आल्यामुळे दुःख होते. पण ब्रह्मानुभव आल्यावर मिळणारे जीवनमुक्ताचे सुख प्राप्त होत नाही, त्याला विक्षिप्तचित्त असे म्हणावे. याचाही योगाभ्यासाला उपयोग नाही. पण त्याच्या अंतर्यामी असणाऱ्या चिंतामणीचे मात्र ध्यान करावे. (ई) श्रुतीच्या अभ्यासाने ' अन्न हे ब्रह्म आहे ' असे ज्या वितर्कांच्या अनुगत असणाऱ्या योगाने स्थूल ब्रह्माचे ज्ञान होते, तो योग संप्रज्ञात समाधीच्या साह्याने प्राप्त होतो. याला **वितर्कानुगत** योग म्हणावे. दुसरा **विचारानुगत** संप्रज्ञात योग आहे. ज्या श्रुतीच्या अभ्यासाने ' प्राण ब्रह्म आहे, मन ब्रह्म आहे, विज्ञान ब्रह्म आहे, ' अशा विचाराने सूक्ष्म ब्रह्माचे ज्ञान कळते तो विचारानुगत (विचारानंतर उत्पन्न होणारा) संप्रज्ञात योग आहे. आनंदानुगत संप्रज्ञात योग हा तिसरा योग आहे याचा अनुभव सुषुप्तीमध्ये (गाढ निद्रेमध्ये) आनंदरूपाने येतो. याच्याही पलीकडे जी तुरीया अवस्था आहे, तिचा ज्ञाता जो अहंभाव (अहंभृति, स्वज्ञान) त्याच्या रूपाने ब्रह्म प्रकट होते. ह्या चार वितर्कानुगत, विचारानुगत, आनंदानुगत व अस्मितानुगत नामक ब्रह्मज्ञानाच्या चारी अवस्थांमध्ये चैतन्य स्वरूपाने राहणारा जो आत्मा तोच वर सांगितलेला चिंतामणि आहे. (उ) ह्या चारी अवस्थांमध्ये एकाग्र चित्त झालेले जे ज्ञान त्याच्या ठिकाणी पूर्ण अभेद उत्पन्न झाला म्हणजे त्याला चित्तनिरोध असे म्हणावे. ही अवस्था प्राप्त होऊन येथे स्थित असणाऱ्या चिंतामणीचें ज्ञान योगमार्गाने झाले म्हणजे मोठे कार्य होते. असो. ' ग ' या अक्षराने सर्व पांची

ब्रह्मांचा संयोग प्रकट होतो व 'ण' या अक्षराने त्यांचा अयोग स्पष्ट होतो. या संयोगायोगांचा योग गणपति आहे; आम्ही चारही देव त्याचे केवळ दास आहोत. म्हणून मी गणपतीचे नित्य ध्यान करून त्याचे भजन, पूजन करत्ये. हे योग वर्णन ऐकून महाकाली-आदि देवींना अति आश्चर्य वाटले. त्यांनी पूज्यभावाने आदिशक्तीला नमस्कार केला; आणि तिला विचारले की, आम्ही 'कोणत्या रीतीने गणेशउपासना केली असतां, आमच्या अंतःकरणातील विषयेच्छा व बुभुक्षा, यांचा नाश होईल?'

जलंधराची उत्पत्ति. शंकरद्वारा जलंधराचा नाश

आदिशक्ति म्हणाली, ऐकः एकदां पार्वतीची थट्टा करावी या हेतूने कैलासपति शंकराने राक्षसाचे स्वरूप धारण केले. राक्षस पाहून पार्वती घाबरली; पण शंकरदर्शनाला आलेल्या महेंद्राने तिला धीर दिला व त्या राक्षसावर आपले वज्र सोडले. शंकराने तो वज्र-प्रहार सहजासहजी निष्फल केला; आणि इंद्राला शिक्षा करण्यासाठी, आपल्या तिसऱ्या डोळ्यांतून अग्नि उत्पन्न केला. इतक्यात तेथे देव-गुरू बृहस्पति आले आणि त्याने सर्वांची गैरसमजूत नाहीशी केली पण शंकराने उत्पन्न केलेल्या अग्नीचे काय करावे हे कोणासही कांही सुचेना. शेवटी शंकराने त्याला सांगितले की, 'तुला मी समुद्रांत फेकून देतो. तेथे तुला असुरयोनि प्राप्त होईल. तूं जगद्विजयी होशील, पण तू धर्मलोप करशील. तुला कोणताही प्राणी मारू शकणार नाही. मुला! तुला वृंदा या नांवाची स्त्री मिळेल. ध्यानांत ठेव की, तिचे पातिव्रत्य नाहीसे झाले म्हणजे तुझा नाश मी करीन.' असे बोलून व त्या मुलास फेकून देऊन, शंकर ध्यानस्थ झाला.

याप्रमाणे शंकराने समुद्रांत फेकलेल्या अग्नीने जलंधर या नावाने आपणास प्रकट केले. त्याचे सर्व संस्कार समुद्राने मोठ्या प्रेमाने केले. पुढें जलंधराने ब्रह्मांड विजय करून वृन्देशी लग्न लावले. त्याच्या राज्यांत कर्मलोप व धर्मलोप पूर्ण झाला. विषयासक्त होऊन जलंधर उन्मत्तपणे कालक्रमणा करू लागला. पुढे एके दिवशी नारदाने पार्वतीच्या स्वरूपाचे वर्णन जलंधरापाशी केले. ते ऐकून पार्वती-प्राप्तीसाठी, जलंधराने कैलासावर स्वारी केली. या युद्धात देवांचा पराभव झाला व ते रानावनांत निघून गेले. तेथे त्यांनीं गणेशाचे आराधन सुरू केले. शंकर व विष्णु मात्र लढत होते. हे युद्ध चालले असतां विष्णुने जलंधराचे रूप धारण केले आणि वृन्देचे पातिव्रत्य हरण करण्याचा यत्न केला पण तो सिद्धीस गेला नाही. उलट, वृन्देने त्याला शाप दिला की, 'तुला दगडाची स्थिती प्राप्त होईल! म्हणून विष्णुही गणपतीचे आराधन करू लागला युद्धांत पराभव पावल्यावर शंकरही तेच करीत होता. प्रसन्न होऊन गणपतीनीं शंकराला जलंधरवधासाठी सुदर्शन चक्र दिले व विष्णूला सांगितले की, 'वृन्देविषयीचा तुझा प्रयत्न आतां सिद्धीला जाईल. तू तिकडे जा. तुला तिच्या शापामुळे शालिग्राम रूप आल्यावर तुझी सर्व लोक भक्तिने पूजा करतील.' हे ऐकून शंकर व विष्णु हे स्वकार्याला निघाले. पुढे वृन्देचे पातिव्रत्य भ्रष्ट झाल्याबरोबर, शंकराने जलंधराचा वध केला इकडे, 'विष्णूने आपल्याला फसवून स्वसुखार्थ नीतीभ्रष्ट केले आणि आपल्या पतीचा वध करविला' हे समजल्यावर वृन्देने अग्निकाष्टे भक्षण केली. वृन्दा मेल्यामुळे विष्णूला अनावर वियोग-दुःख झाले. तेंव्हा देवांनी मध्यस्थी करून पुनः जिवंत झालेली वृन्दा व विष्णु यांचा विवाह घडवून आणला.

पुढे दोघेही आनंदाने कालक्रमणा करीत राहिली. शिळारूपी विष्णु व तुळसीरूपी वृन्दा यांचे लग्न प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीला आपण सर्वजण अजूनपर्यंतही लावतो; त्याचे कारण हे असे आहे.

कामासुर राक्षसाची उत्पत्ति • त्रिगुणात्मक चराचराची परंपरा • गणेशयोग

जेव्हां वृन्देचा विरह विष्णूला झाला होतां तेंव्हा दुःखातिशय होउन त्याचे वीर्य स्खलन झाले व त्यापासून एक राक्षस उत्पन्न झाला. त्याचे नाव कामासुर ठेवले. त्याने यजुर्वेदीय रुद्र मंत्रानी शंकराची उत्कृष्ट तपश्चर्या केली आणि शंकर प्रसन्न झाल्यावर 'विश्व-विजय व जीवाच्या हातून मृत्यूचा अभाव' हे वर मागून घेतले. पुढे कामासुराने राक्षसांची सेना तयार करून, जगद्विजयाला निघण्याच्या अगोदर आपणास राज्याभिषेक करून घेतला. नंतर पृथ्वीवर आपली सत्ता स्थापन करून, स्वर्गलोकी इंद्रादि देवांचा पराभव केला त्यांस त्याने स्थानभ्रष्ट केले. पाताळलोकीही कामासुराचे राज्य प्रस्थापित झाले. पुढे सत्य, वैकुंठ व कैलास या लोकांवर स्वाऱ्या करून ब्रह्मादि देवांस त्याने अरण्यात पाठविले. असा हा ब्रह्मांडविजय पूर्ण झाल्यावर, कामासुर विषयभोगामध्ये दंग होऊन गेला. त्याच्या राज्यात धर्मांचा लोप व अधर्माचा विजय झाला. या प्रमाणे कर्मलोप झाल्यावर, देवांची योगक्षेमासबधाने तारांबळ झाली. 'आता पुढे काय करावे' ही चिंता देवास पडली. तेंव्हा तेथे मुद्गलनामक एक महा गणेशभक्त आला त्याने 'स्वानंदवासी गणपतीचे ध्यान करण्यास व एकाक्षरी मंत्राचा जप करून गणपतीचे आराधन करण्यास लागा' असा देवास उपदेश केला. देवांनी

दंडकारण्यांत जाऊन, मयूरेश नामक क्षेत्र आहे, तेथे तपश्चर्या करण्यास आरंभ केला. हे क्षेत्र प्रलयकालीसुद्धा नाहीसे होत नाही. प्रलयकाली या क्षेत्रात स्वानदवासी विघ्नेश्वर योगनिद्रा घेतात. गणपतीच्या निःश्वासापासून प्रकृतिपुरूषादि त्रिगुणात्मक नानातत्त्वांचा जन्म, विराटस्वरूप, पंचमहाभूतांची उत्पत्ति, जीवांची उत्पत्ती, नाभीपासून ब्रह्मदेवाची, मुखापासून विष्णूची, नेत्रापासून शंकराची, दक्षिण अंगापासून सूर्याची व माझी उत्पत्ति झाली, अशी सर्व त्रिगुणात्मक चराचराची परंपरा उत्पन्न झाली. आह्मी सगळ्यांनी ज्ञान मिळविण्यासाठी पुष्कळ वर्षे तपश्चर्या केली. तेंव्हा शेवटी आमच्या प्रत्येकाच्या हृदयात नर-गजरूपी आकृति प्रकट झाली. हा काय साक्षात्कार आहे, हे आह्मास समजेना. तेंव्हा आकाशवाणी झाली की, ‘तुह्मी सर्वांनी भृशुंडीनामक भक्ताकडे जावे, त्याकडून गणेशयोगाची दीक्षा घ्यावी व नंतर ब्रह्मज्ञान समजून घ्यावे.’ मग आह्मी भृशुंडीला शरण गेलो; आणि त्यापासून गणेशयोगाचे व गणेशब्रह्माचे ज्ञान करून घेतले. आह्मास त्याने पुष्कळच गोष्टी सांगितल्या. त्यात भक्तांच्या संरक्षणासाठी भक्तवत्सल गणपति देहधारी होतो, हे वृत्त ऐकून आह्मास फार संतोष झाला. कारण कामासुराचा वध होऊन आम्ही आमच्या स्वस्थानी जाऊं अशी श्रद्धा आमच्या अंतःकरणात उत्पन्न झाली. भृशुंडीने आह्मास सांगितले की, गणपतीची तिन्ही लोकांत तीन स्थाने आहेत, स्वर्गात कैलास, पाताळात शेषमंदिर आणि पृथ्वीवर मयूरपुरी, ही मुख्य गणेशक्षेत्रे आहेत. प्रकृति (ज़डजगत) व आत्मानामक पुरुष या दोघांचा संयोग ज्यामध्ये होतो तेथे स्वानंदवासी गणेश रहातो. त्याचे ज्ञान केवळ गणेशयोगानेच स्वतःला प्रकट ज्ञात होते.

क्षेत्राच्या द्वारांचे वर्णन

आता क्षेत्रांची द्वारे सांगतो:- या क्षेत्राच्या पश्चिमअंगापासून शक्तिरूपी 'असत् ब्रह्म' उत्पन्न झाले. तेच रति आणि काम (भोग्य आणि भोक्ता) याच्या ऐक्याचे स्थान असणारे, पहिले द्वार होय. भोग्य आणि भोक्ता यांचे मोहशून्य (शास्त्रीय पद्धतीने) ज्ञान प्राप्त झाले असतां 'असत्' ब्रह्माची ओळख व प्राप्ति होते. या द्वाराने आंत शिरल्यावर उत्तरांग द्वाराचा लाभ योगी करून घेतात. या उत्तरांगापासून 'सत्' वाचक सौर ब्रह्म उत्पन्न झाले आहे. हे ज्ञान आणि कर्म, या रूपाने प्रकट होते. ह्या सर्व जगताला कर्मांचा आधार आहे, व कर्मांनीच या सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय ही कार्ये होतात. कर्मरूपा (संज्ञा) ही सूर्याची भार्या आहे. ही आसक्ति उत्पन्न करणारी आहे पण ज्ञान हे या 'सत्' ब्रह्माचे दुसरे अंग आहे. हे ज्ञान वराहरूपी असून कर्मांशी संग मुळीच ठेवत नाही. तथापि ह्या ज्ञानात अभिमानाचा पुष्कळ अंश असतो म्हणून साधकांने कर्मांपासून व ज्ञानापासून उत्पन्न होणारा जो मोह याचा त्याग करून ज्ञान व कर्म यांची ऐक्यता करावी म्हणजे सद्रूप रविवाचक ब्रह्माला प्रसन्न करून घेऊन त्याची प्राप्ति करून घ्यावी, हे दुसरे द्वार होय. याला उत्तरांग द्वार म्हणतात. हे द्वार प्राप्त करून घेऊन ते ओलांडून गेल्यानंतर पूर्वांगापासून निघालेला आनंदमय (पूर्ण आणि समभाग प्रकाशक) असा जो विष्णु त्याचे दर्शन होते. हे वैष्णव ब्रह्म समरूपाने सत्य, असत्य, या सत्यासत्यात्मक (सत् ब्रह्म व असत् ब्रह्म यांच्या) योगाचे ठायीं राहते. हे दोन प्रकारचे असते. लक्ष्मीमय शोभात्मिकारूप व यशोरूप, हे ते प्रकार होत. शोभेने मोहित झालेले असत् ब्रह्म व त्या असत् ब्रह्माचा आधार जे सत् ब्रह्म ही

स्वशोभेने जीवास मोह घालतात. जेथे लक्ष्मी तेथेच यशाही राहते. या लक्ष्मीचा चालक जो विष्णु तो साम्यावस्था उत्पन्न करतो. तो आनंदभोक्ता व सद् असदाचा संयोग करणारा आहे. त्यालाच वैष्णव ब्रह्म असे म्हणतात. हे आनंददायकद्वार गणपतीच्या पूर्वांगाला आहे. या द्वाराची प्राप्ति करून घेऊन मुमुक्ष (मोक्ष मार्गाचा मार्ग) पुढे चालूं लागला म्हणजे दक्षिण अंगातून निघालेले 'अव्यक्त' नामक श्रेष्ठ नेतिरूपक, जे शैव ब्रह्म ते दृग्गोचर होते. 'सत्, असत् व सदसत् ही तिन्हींही ब्रह्में मुख्य ब्रह्माचे स्वरूप नाहींत' असे प्रतिपादन करणारे हे 'अव्यक्तरूप' शांकर ब्रह्म आहे. हेही माया संसर्गाने दोन प्रकारचे होते. (१) पार्वती नामक महामाया आणि (२) मोहशून्य शंकर ही ती दोन रूपें होत. या दोघांचा संयोग करणे (मोहरूपी माया व मोहशून्य शंकर या दोघांचा संयोग करून भेदनाश करणे) याला महेशान (शांकर) ब्रह्म म्हणतात. हे अव्यक्त स्वरूपाचे असून दक्षिण द्वाराचे अधिष्ठात् आहे या द्वाराचाही अधिगम करुन मोक्षार्थी मार्ग पुढे गेला म्हणजे मागे सांगितलेल्या चारी ब्रह्माचा (असत रूपशक्तिब्रह्म, सद्रूप सौरब्रह्म, सद असत साम्यभावस्वरूप वैष्णव ब्रह्म व सद्-असत भेदाभाव-रूप शांकर ब्रह्म या सर्वांचा) भेदनाश करून मग एकरूपाने संयोग उत्पन्न करणे हा स्वानद ब्रह्माचा स्वभाव आहे. हे ब्रह्म स्वसंवेद्य आहे; व या सर्वश्रेष्ठ ब्रह्माचे ज्ञानविज्ञान गणेश-योगाने मात्र होते. हेच गणपतीचे चतुर्द्वायुक्त व सर्व सिद्धि देणारे स्वानंद नावाचे ब्रह्म आहे.

सूत :– शौनका ! पूर्व द्वारावर राहणारे लक्ष्मीनारायण यांनी आपल्याला राहण्यासाठी अनेक क्षेत्रे गणेशसाक्षित्वाने उत्पन्न केली

आहेत. याचप्रमाणे दक्षिण द्वारस्थ शक्तिशिवांनी, पश्चिम द्वारस्थ रतिकामांनी, उत्तर द्वारस्थ महीवराहांनी आपापल्या संप्रदायांसाठी गणेशसाक्षित्वाने व गणेशाच्या अनुज्ञेने पुष्कळ क्षेत्रे निर्माण केली आहेत. ही क्षेत्रे धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे पुरुषार्थ गणेशानुज्ञेने सिद्ध करतात. यांतील कांही क्षेत्रे तात्काळ फळ देतात व कांही क्रम योगाने पुरूषार्थ साध्य करून देतात गणपतीच्या मयूरक्षेत्रामध्ये सर्व सिद्धिदाता गणपति हा शुंडाधर, चतुर्भुज, लबोदर, विशालाक्ष, त्रिनेत्र, पाशांकुशधर, नाभिशेष (नाभीच्या ठिकाणी शेषनाग आहे ज्याच्या तो), शूर्पकर्ण. हा असा आपल्या तेजस्वी ऐश्वर्याने स्थित आहे. याच्या डाव्या अंगाला सिद्धि दोन्ही हातानी चवरी घेऊन गणपतीची सेवा करते उजव्या अंगाला ज्ञानरूपी बुद्धि सुगंधि वस्तु परमेश्वराला अर्पण करीत असते. गणपतीच्या समोर मूषक व मयूर उभे असतात. पाठीमागे प्रमोद, मोदकादि गण असतात. हे गणपतीचे सांगोपांग स्वरूप मुख्य आहे. पूर्वद्वारावरील लक्ष्मीनारायण हे गणेशाचे मानस पुत्र आहेत. यांचे ज्ञान करून घेऊन गणेश-ब्रह्माप्रमाणेच यांचीही पूजा करावी.

द्वारयात्रा व त्यापासून प्राप्ती

भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून द्वारयात्रेला आरंभ होतो. पहिल्या दिवशी पूर्वद्वार यात्रा करावीं. येथे लक्ष्मीनारायण राहतात. यांच्या पूजनाने धर्मनामक पुरुषार्थ साध्य होतो. दुसऱ्या दिवशी दक्षिण-द्वारयात्रा करावी. येथे पार्वतीशंकर हे गणेशाचे मानसपुत्र राहतात. यांच्या पूजनाने सर्व अर्थ साध्य होतात. तिसऱ्या दिवशी पश्चिमयात्रा करावी. तेथे रति आणि काम हे गणेशमानसपुत्र राहतात. यांची पूजा केली असता काम नामक पुरुषार्थ सिद्ध होतो. चवथ्या दिवशी

म्हणजे चतुर्थीला उत्तरद्वारावर महीवराह नामक (पृथ्वी व सूर्य) मानस पुत्र राहतात. त्यांचीही पूजा विधिपूर्वक करावी. या पूजेने मोक्षनामक पुरुषार्थ साध्य होतो. ह्या चारही दिवस उपोषण करावें. माघ शुक्ल पक्षांत किंवा जमल्यास, प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षात द्वारयात्रा करावी. किंवा इष्ट वाटतील त्या चार दिवस द्वारयात्रा करावी. अगदीच सामर्थ्य नसेल तर स्वतः अथवा ब्राह्मणाद्वारा एक दिवस तरी ही द्वारयात्रा करावी. येथे हे ध्यानात ठेवले पाहिजे की, धर्म हा सर्व सिद्धि देणारा पुरुषार्थ आहे. अर्थ हा पुरुषार्थ सामर्थ्य देतो. काम नामक पुरुषार्थ सौख्य देतो आणि मुक्ति अत्यंत आनंदावाप्ति देते व दुःखाचा नाश करते. धर्म नामक पुरुषार्थ समान स्थिति उत्पन्न करणाऱ्या विष्णूच्या स्वाधीन आहे. धर्म असेल तरच पुढचे सर्व पुरषार्थ साध्य होतील. अर्थ हा पुरुषार्थ सर्व सामर्थ्य देणाऱ्या शास्त्रप्रसिद्ध शंकराचे स्वाधीन आहे. धर्मनिष्ठेने उत्पन्न झालेले सामर्थ्य कांही विलक्षण असते. काम नामक पुरषार्थ मदनाचे स्वाधीन आहे. धर्मनिष्ठ पुरुषाला सामर्थ्य प्राप्त झाल्यानंतर तो दुसऱ्यास दुःख न देतां आपल्यास सुख देणाऱ्या सात्विक विषयांचा मात्र योग्य भोग घेतो. मोक्षनामक पुरुषार्थ शुक्ल गतीनें (देवयानमार्गाने) प्राप्त होतो. शुक्लगतीचे आधिपत्य सूर्याकडे आहे, म्हणून मोक्षाचा अधिपति जो आत्मा तो सूर्यरूप आहे. धर्मनिष्ठ पुरुष समर्थ होऊन मग आपल्या सात्विक इच्छा परिपूर्ण करतो व नंतर तृष्णाशून्य होतो. तृष्णाशून्य झाल्यावर ज्ञान होते, व मुक्ति मिळते. अशी या द्वारांच्या अधिपतींची व्यवस्था आहे. हे मयूरक्षेत्र प्रलय झाला तरी नाशहीन (अक्षर) स्वरूपाने राहते, हे मागे तुह्मांस सांगितलेंच आहे. या क्षेत्रांत सर्व देव, सर्व देवता, सर्व मुनि, सर्व सिद्ध, सर्व क्षेत्रे सर्व

पर्वे यांची वसति असते; ह्मणून या क्षेत्रांत साधकाचे नित्य वास्तव्य झाले तर निदान कांही दिवस, किमानपक्ष एक दिवस तरी वास्तव्य झाले तर, व द्वारयात्रापूर्वक गणेशपूजन विधिपूर्वक झाले तर, साधकाच्या सर्व मांगलिक इच्छा तृप्त होतात, इतकेच नव्हे तर अतिपापी पुरुषाने नकळत या क्षेत्रांत येऊन एक द्वारयात्रा जरी सिद्ध केली, तरी त्याच्या सर्व पापांचा नाश होऊन तो ज्ञानमार्गाला लागतो. या क्षेत्रांत कोणत्याही शहाण्या पुरुषाने कोणत्याही प्रकारचे निषिद्ध आचरण करू नये. कारण येथे केलेल्या पापाला नष्ट करणारे व पाप्याला प्रायश्चित देणारे दुसरे क्षेत्र नाही, किंवा दुसरा मार्गही नाही.

मयूरक्षेत्र व दंडकारण्य ही नांवे पडण्याची कारणे

सूत :– श्रोतेहो! या क्षेत्राला मयूरक्षेत्र असे नांव पडण्याचे कारण इतकेच आहे की, येथे गणेशमूर्ति प्रकट झाली ती मयूरारूढ होऊन प्रकट झाली. मयूरक्षेत्र ज्यांत आहे अशा या अरण्याला दंडकारण्य हे नांव पडण्याचे कारण असे आहे की, येथे दंडाच्या ह्मणजे कर्मविपाकाचा अरण्य ह्मणजे अभाव असतो. कारण येथे गणेशब्रह्माची वसति आहे. दंडाचा अभाव येथे ह्मणून याला दंडकारण्य म्हणातत. या अरण्याने मूर्त स्वरूप घेऊन गणेशाची पूजा केली ह्मणून गणपतीने येथे या अरण्यात राहण्याचे आश्वासन दिले. म्हणून येथे गणेशब्रम्हाची नित्य वसति आहे.

मयूरक्षेत्री उपासना केलेल्यांचे अनुभव चार द्वारांची यात्रा व फलश्रुति

सूत :– एकदा एका अरण्यात एका ब्राम्हणाच्या बायकोला कांही दुष्ट लोकांनी अडविले असता, आपल्याला त्यांच्या हातून सुटण्याचा कांही उपाय नाही असे पाहून, त्या दुष्टांस ती दुर्दैवी स्त्री म्हणाली की, 'आजपासून पांच दिवसांनी मी तुमची इच्छा परिपूर्ण करीन. आता मला जाऊं द्या.' ह्याप्रमाणें वचन देऊन ती त्यावेळी सुटून आली. मग तेथून ती रडत रडत मयूरेशक्षेत्राला गेली. तेथे गणेशतिर्थात स्नान करून व गणपतीची पूजा करून, पूर्वद्वारावरील शक्ति देवीची तिने पूजा केली. नंतर पुनः मयूरेशाची तिने अर्चा केली आणि गणेशस्मरण करींत पांचव्या दिवशी घरीं गेली. कारण तिने त्या दुष्टास वचन दिले होते. ते लोक पांचव्या दिवशी येतात न येतात तो ते अग्नीने जळून खाक झाले! नंतर तिची गणपतीवर दृढ निष्ठा बसली आणि शेवटीं ती पतिव्रता आपल्या पतीबरोबर स्वानंदवासी झाली. याचप्रमाणे मद्र देशाच्या राजाला त्याच्या शत्रूंनी अत्यंत पीडा दिली, तेंव्हा त्याने मयूरक्षेत्री दक्षिणद्वाराची यात्रा भक्तिपूर्वक केली आणि स्वनगरीत जाऊन सर्वसंकटमुक्त झाला. तशीच पश्चिमद्वाराची यात्रा केल्यावर एक वैश्य संकटविमुक्त झाला व एक शूद्र उत्तरद्वाराची यात्रा करून मोक्ष मिळविता झाला. चार द्वारांची यात्रा करून एक अत्यंजही मुक्त झाला! या क्षेत्रांत भैरवदर्शनाने अंगात संचार करीत असलेली भुते निघून जाणे, नीलकंठदर्शनाने विविधबाधा नाहीशी

होणे, कृत्तिवासाच्या (सांबाच्या) दर्शनाने राक्षसांचा संहार करता येणे आणि रोग नाहीसे होणे इत्यादि अनेक संकटांचा नाश मयूरेश-कृपेने व त्याच्या अनुग्रहाने तेथे राहणाऱ्या देवांच्या दर्शनाने होतो. याचप्रमाणे गर्भागाराच्या (गाभाऱ्याच्या) चारी द्वारांची यात्रा सिद्ध झाली असता, बुद्धिप्राप्ति, पापविमोचन, गेलेली संपत्ति पुनः मिळणे सहज व लीलेने साध्य होतात.

मयूरक्षेत्र माहात्म्य वर्णन

सूत :– भृशुंडी मुनींने देवास सांगितले :- जे लोक सकाम भक्ति करतात त्यांना गणेशाच्या स्वानंदनगरींत जाता येत नाहीं. पुण्य-संचय पुष्कळच केला असेल, तर सकामभक्तास कैलास, वैकुंठादि लोक मिळतात; पण पुण्यसंचय संपला ह्मणजे त्यास पुनः कर्मभूमीवर यावे लागते.

सूत :– या मयूरक्षेत्राच्या बाहेर चारी दिशांस जी भूमि आहे, तिला देवभूमि असे ह्मणतात. त्या भूमिचासुद्धा इतका पुण्यप्रभाव आहे की, तेथे कितीही मोठा पापी पुरूष गेला आणि दैवयोगाने मरण पावला, तर तो सर्वपापविमुक्त होतो; इतकेच काय, पशुपक्षींसुद्धा जर या भूमीत पंचत्व पावले, तर पुढच्या जन्मी श्रेष्ठ मनुष्यकुलांत जन्म पावून गणेशभक्त होतात आणि अती मुक्त होतात. या क्षेत्रात सिद्धि, बुद्धि, सरस्वति, लक्ष, लाभ, भ्रामरी इत्यादि देवता, तसेच मयूर, मूषक प्रमोदादि गण, तसेच पूर्व दिशेला धर्मप्रवर्तक विष्णु. दाक्षिण दिशेला अर्थ देणारा शंकर, पश्चिम दिशेला कामना पूर्ण करणारी शक्ति,

उत्तरेला मुक्ति देणारा सूर्य, हे चार मुख्य देव व मुद्गलशुकादि महा-भक्त, हे गणेशसेवनामध्ये एकनिष्ठपणाने रममाण होऊन गेले आहेत, अष्टविनायक, अष्टमाता, शुक्ल व कृष्णचतुर्थी, शमी मंदार, दूर्वा व सर्व दिक्पाल हेही मयूरेशसेवेमध्ये आपल्यास धन्य मानून घेत आहेत. विदर्भातील वक्रतुंड, पेल्ली नगरस्थ बल्लाळ, विद्यापुरस्थ हेरंब, पारिनेरस्थ विघ्नेश, गंगातटस्थ भालचंद्र, स्थावरक्षेत्रस्थ चिंतामणि, सिद्धिक्षेत्रस्थ सिद्धिविनायक, मणिपुरक्षेत्रां-तील महागणपति, याचप्रमाणे सर्व आर्यावर्तातील गणपति, या मयूरेशक्षेत्राच्या गर्भागारांत राहून, भक्तांचे इष्टकाम पूर्ण करीत असतात. तसेंच, देवागारांतही (देवघरांतही) सर्व देव आपापल्या क्षेत्रांसहवर्तमान येथे रहात असतात. याचप्रमाणे राम, लक्ष्मण, व्यास, नरहरि, वामन, मत्स्य, बुद्ध, हयग्रीव, कूर्म, परशुराम, कपिल, नारद, कार्तवीर्य, ऋषभ इत्यादि अनंतदेव व अनंतभक्त गणेशाची पूजा करीत असतात हे सर्व पुण्य पुरुष आहेत, म्हणून सामान्य भक्तांनी यांचीही पूजा करावी. या क्षेत्रांत जी गणेशकुंडे आहेत, तेथे भारतवर्षांतील सर्व नद्या आपल्या मुख्य स्वरूपाने राहतात. चंद्रासह सर्व ग्रह व नक्षत्रें वासुकीप्रमुखनाग हेही येथे वस्ती करून राहिले आहेत. ग्रहांची पूजा त्या त्या ग्रहाच्या वारी (दिवशी), पौर्णिमेला राहू, अमावस्येला केतु, अष्टमीला भैरव (भूतप्रेताचा नाश करणारा), दशमीला चोरादिकांचे भय नाहीसे करणारे दशदिक्पाल, पंचमीला सर्व व्याधि, आणि संकटांचा नाश करणारे नाग, एका-दशीला द्रव्य देणारा कुबेर, त्रयोदशीला धर्मवृद्धि करणारा यमधर्म ह्यांची पूजा विहित आहे. असो; असे येथे अनंतदेव, अनंतऋषि, अनंतभुवनातील अनंत सिद्ध, अष्टवसु, एकादशरुद्र व द्वादशमित्र

हे गणेशअर्चा करीत असतात. त्यांचे वर्णन किती करावे. सर्व क्षेत्र देवदेवींच्या विभूतींनी तन्मय झाले आहे; म्हणून येथे राहणाऱ्या पुरुषांनी कोणत्याही प्रकारचे पातक करता उपयोगी नाही. एका ब्राह्मणाने यःकिंचित् अगदी लहान पाप येथे केले होते तर त्याला क्षेत्रस्थ भैरवांनी शंभर वर्षेपर्यंत अग्निचक्रांत जळत ठेवला होता! अन्यक्षेत्रांमध्ये केलेले पाप मयूरक्षेत्रामध्ये नाहीसे होते; पण या क्षेत्रांत केलेले पाप नाहीसे करण्याला साधन नाही.

धर्मध्वज वैश्याची गोष्ट

सूत :- पूर्वी धर्मध्वज या नावाचा एक धनलोभी वैश्य होता. त्याने द्रव्यलोभाने आपल्या बापासही विष घालून मारले होते! तो एकदां यदृच्छेने मयूरक्षेत्री आला. क्षेत्रभूमीत त्याने प्रवेश केला, तेंव्हा त्याच्या पापांस त्याचे शरीर सोडून क्षेत्राबाहेरच रहावे लागले. ती पापें हा वैश्य बाहेर येण्याची वाट पहात होती. पण दैवयोग असा विचित्र की, मयूरक्षेत्रात असतांना या वैश्याने कोणत्याही तऱ्हेचे पातक केले नाही व गणेशयात्रा पूर्ण करून तो बाहेर गेला, तेंव्हा त्याची वाट पहात असलेल्या पापांस त्याला स्पर्श करता येईना. त्यांनी विचार केला की, याला थोडेसे विघ्न उत्पन्न केले म्हणजे हा लहान पाप करील आणि मग आपण याच्या शरीरामध्ये प्रवेश करू. या वैश्याने काही मार्ग आक्रमण केल्यानंतर त्याला चोरांनी गाठून त्याचे द्रव्य हिरावून नेले. द्रव्य गेलेले पाहून त्या वैश्याला पाप करण्याची बुद्धि उत्पन्न झाली. पण त्याच्या सुदैवाने त्याला एका ब्राह्मणाची गाठ पडली. ब्राह्मणाने त्याला सांगितले की, तुझी पूर्व पापे तुला पुनः पापमार्गात ढकलणार आहेत तेंव्हा आपल्या

बायकामुलांस घेऊन तूं मयूरेशपुरीला जा म्हणजे तू दुःखशून्य होशील. वैश्यास हा उपदेश चांगला वाटून त्याने त्याप्रमाणे केले.. तेंव्हांही क्षेत्राबाहेर त्याची वाट पाहत असलेली पापे भोक्त्याच्या अभावाने नाहीशी झाली आणि तो वैश्य दुःखमुक्त झाला, एवढेच नाहीतर अंती तो ब्रह्मभूत झाला.

धर्मनिष्ठ व देवप्रिय ब्राह्मणाची कथा

सूत : – अंगिरसकुलांत धर्मनिष्ठ असा देवप्रिय या नांवाचा एक गणपतिभक्त मोक्ष मिळावा या हेतूने सर्व कर्मे विधिपूर्वक करीत असे. निष्काम कर्माचरणाने चित्तशुद्धि होते यासाठी ब्रह्मज्ञानाचे श्रवण करण्याला प्रारंभ करण्यापूर्वी चित्तशुद्धि होण्याकरतां साधकाने निष्काम कर्म करावे. असो; हा देवप्रिय ब्राह्मण चित्तशुद्धीप्रीत्यर्थ यात्रा करण्यास निघाला. त्याने अनेक यात्रा केल्या. एक मयूर क्षेत्राची मात्र त्याची यात्रा राहिली होती तीही पूर्ण करण्याचा त्याने संकल्प केला; पण दैवयोगे त्याचवेळी त्याचे द्रव्य चोरांनी लुटून नेले; तथापि त्याने आपला संकल्प सोडला नाही. भिक्षावृत्ति पत्करून यात्रा संपादन करण्याचा त्याने निश्चय केला. तरी दुर्दैवाने त्याची पाठ सोडली नाही. तो तापाने आजारी झाला. तथापि संकल्पाला एकनिष्ठ राहून अगात ताप असताही भिक्षा मागत मागत मयूरक्षेत्री हा द्विज आला. हा ब्राह्मण आपल्या संकल्पापासून ढळत नाही असे पाहून विघ्नेशांनी त्याचा ताप नाहीसा केला व त्याला पुष्कळ द्रव्य दिले. हे सर्व देवाचे करणे आहे असे समजून तो भक्तिने आपली क्षेत्रयात्रा संपादिता झाला आणि गणेशभजन अखंड ठेवल्यामुळे स्वानंदवासी झाला.

सुलभ नावाच्या क्षत्रीयाची कथा गणेशाच्या एकाक्षरी तारक मंत्राचे वर्णन

आणखी एक गोष्ट सांगतो, ऐका: कोणे एकेकाळी सुलभ या नावाचा क्षत्रिय अंगदेशावर राज्य करीत होता. त्याला कोणी एकदा मयूरक्षेत्राचे माहात्म्य सांगितले, तेंव्हा ती यात्रा करण्याचा त्याने निश्चय केला आणि तो यथाशास्त्र पारही पाडला. पुढे दर वर्षास तो या क्षेत्राची वारी करीत असे. पुढे कांही काळानंतर त्याला अशी बुद्धि उत्पन्न झाली की, खरोखर पाहता सर्व क्षेत्रास काशीक्षेत्र हे मुख्य आहे. ते शंकराचे क्षेत्र आहे. अर्थातच हे कमी योग्यतेचे असले पाहिजे. असा विचार करून त्याने मयूरक्षेत्राच्या वारीचा नियम सोडून दिला व काशीयात्रेला निघाला. दैवयोगाने रोग उत्पन्न होऊन वाटेतच त्याचा अंत झाला; पण पूर्वपुण्य मोठे होते ह्मणून त्याला काशीक्षेत्रातच ब्राह्मणाचा जन्म प्राप्त झाला. या जन्मांतही त्याने पुण्यसंचय मात्र केला. शेवटी ह्मणजे अंतःकाळी विश्वेश्वराने त्याला गणेशविषयक एकाक्षरी तारक मंत्राचा उपदेश केला. भूदेवहो! हा तारकमंत्र कसा आहे तें तुम्हास सांगतो, महद्ब्रह्म ह्मणजे ब्रह्मदेव याचे स्वरूप बिंदुमात्र आहे. तो ब्रह्मदेव 'ग' या अक्षरामध्ये 'ग्' हे जे व्यंजन आहे तत्स्वरुप आहे. सर्वप्रवर्तक विष्णु हा ब्रह्मदेवाचा पालक 'अ' या आकाराने 'ग' या अक्षरात राहतो. या दोघांचाही संहारकर्ता जो शंकर तो अनुस्वार रूपाने या मंत्रात स्थित झाला आहे. या सर्वांच्या आत्म्यात असणारा सूर्य अनुनासिक रूपाने ह्या मंत्रात वास्तव्य करतो आणि या चौघांस देहरूप करणारी जी शक्ति तो ॐकार स्वरूपाने 'गं' या मंत्राक्षराच्या आधी असते.

या सर्वांचा जो एक भाव, एक सत्ता, त्याला वेदामध्ये गणेश असे ह्मणतात. ह्या 'ॐ गं' तारक मंत्रापासून इतर सर्व मंत्राची उत्पत्ति आहे. ह्या मंत्राची दीक्षा स्वतः शंकर काशीत राहणाऱ्या पुण्यवान पुरुषास देतो. मुनिहो ! हा तारक मंत्र ब्रह्मभूयत्व प्राप्त करून देतो. मुनिहो ! मनुष्याला काशीत मरण प्राप्त झाले तरी सर्वांसच मुक्ति मिळते असा भाग नाही. नेहमी उत्तम, मध्यम, अधम आणि अधमाधम अशा प्रतीचे लोक प्रत्येक शिष्यसंप्रदायात असतात. (१) यांत विषयासक्त, पापी, केवळ विषयोपभोगाकरता कर्म करणारे, जे शिष्य असतात, त्यांना अधमाधम ह्मणतात. त्यांना अर्थातच त्यांच्या कर्माचे फल ह्मणजे सुख फारच थोडे मिळते; पण हेच पाहून त्या लोकांची पुण्यकर्म प्रवृत्तिच नाहीशी होते ! ही पुण्य कर्मप्रवृत्ती जिवंत रहावी ह्मणून (स्वरूप) पुण्यात्मक कर्मांचे फळ एकच प्रकारचे ह्मणजे मुक्तिरूप असते असे करुणाघन शास्त्र सांगते. शास्त्राचा हेतु हा की, मोक्षासारखे फल मिळत आहे ह्मणून तरी सामान्य लोकांची प्रवृत्ति पुण्यमार्गाकडे वळावी. (२) समाजलज्जेस्तव किंवा राजदंडाच्या भयासाठी मात्र जे लोक सत्कर्म करतात त्यांना अधम ह्मणतात, पण त्यास अधमाधमापेक्षा सत्कर्माचे जास्त फल मिळते. (४) सकाम बुद्धीने पुण्य कर्म करणारे लोकास मध्यम शिष्य ह्मणतात, त्यांच्या कर्माप्रमाणे त्यास फळ मिळते. निष्काम बुद्धीने सत्कर्म करणारे लोक उत्तम शिष्य होत. त्यांना शेवटी मोक्षप्राप्तिच होते. कृतयुगांत केलेल्या कर्माचे फल तत्काळ मिळते. त्रेतायुगांत (अन्य कर्म बाधक नसेल तर) कांही कालाने कर्मफल मिळते. द्वापरामध्ये पूर्व कर्माने प्रस्तुत कर्माचा बाध होत नसेल तर ह्या लोकी किंवा

परलोकी सत्कर्मांचे फल काही काळाने मिळते. कलियुगांत परलोका-मध्ये किंवा अन्यजन्मामध्ये केलेल्या कर्मांचे समग्र फल मिळत असते. म्हणून लोकांच्या अंतःकरणांत रुचि उत्पन्न व्हावी यासाठी विचित्र फलांची योजना केलेली असते. कृतयुगामध्ये जितके कर्म तितके फल मिळते. त्रेतामध्ये दुप्पट. द्वापारामध्ये तिप्पट व कलीमध्ये चौपट फलप्राप्ति होते. ध्यानांत ठेवा की, ज्याला आत्म्याचा अनुभव प्राप्त झाला नाही, त्याला कधीही मोक्षप्राप्ति व्हावयाची नाही. जसे सगळे अमर असलेले देव ब्रह्मदेवाचा दिवस संपला म्हणजे मृत्युयुक्त होतात तरी पण मनुष्यांच्या दृष्टीने अमरच असतात; तसेच शास्त्रांत जे पाच देव ईश्वर सांगितले आहेत ते त्रिगुणयुक्त असल्यामुळे त्यांचाही अंत महा-प्रलयाच्या वेळी होतो! अर्थातच त्यांनी दिलेली मुक्तिही तशीच असावयाची! मुक्ति जर हवी असेल तर एक स्वानंद देणाऱ्या गणपतीची प्राप्ति करून घेण्यासाठी तारक मंत्राची दीक्षा घेतली पाहिजे. तारक मंत्राचे ज्ञान झाल्यावर आपल्या अंतःकरणात योग-बुद्धि उत्पन्न होते, योगाने शांति मिळते आणि अंती तो पुरुष मोक्षाला जातो. असो, असा हा तारक मंत्र शंकराने काशीक्षेत्रात मेलेल्या त्या ब्राह्मणाला अंतकाळी दिला. त्या पुण्याने तो कैलास लीन झाला तेंव्हा हा ब्राह्मण मयूरक्षेत्रांत जन्मास आला. तेथे त्याने अखंड भक्ति केली, त्याने पुष्कळ संकटे आली तरी मयूरक्षेत्र सोडले नाही. क्षेत्र न सोडणे याला क्षेत्रसंन्यास म्हणतात. हा त्याचा क्षेत्रसन्यास व मयूरेशभक्ति पाहून गणपति प्रसन्न झाले आणि त्याला त्यांनी स्वानंदसुखाचा लाभ दिला.

मयूरेश क्षेत्र माहात्म्य व तेथे उपासना करणाऱ्यांचे अनुभव

सूत :– द्विजहो ! हे मयूरेश क्षेत्र ब्रह्ममय आहे. ज्याप्रमाणे सर्व विश्व पंचविध (पांच प्रकारचे) आहे. त्याप्रमाणे, या क्षेत्रांत पाच तीर्थें उत्पन्न झाली आहेत. गणेशकुंड, ब्रह्मकमंडलूंतून उत्पन्न झालेली तुरीया, भागीरथी, सरस्वतीं व यमुना हींही पांच तीर्थें आहेत. पहिल्या दर्शनाने, मुक्ती व भुक्ति (भोग) देणारे, दुसरे स्नानाने मुक्ति देणारे, तिसरे स्नान करून स्वर्गसुख देणारे, चवथे तीन दिवस स्नान केल्यानंतर स्वर्ग सुख देणारे, अशी ही पाच भिन्न फले देणारी तीर्थें आहेत. असो; एकदां गणपतीच्या दर्शनाकरता आलेला ब्रह्मदेव महाकुंडांत स्नान करून गणपतींचे स्तोत्र म्हणू लागला. स्तोत्र समाप्त झाल्यावर गणपतीची त्याने आनंदाने पूजा केली, पण प्रदक्षिणा घालतांना त्याचा एका कमंडलूला पाय लागला. ती नदी पुनः कमंडलूमध्ये भरून ब्रह्मदेव घेऊन चालला, तेंव्हा गणपतीनी सांगितले, ‘ माझ्या प्रभावाने ही नदी उत्पन्न झाली आहे. ही नदी येथेच राहूं दे. त्यांतील एक कमंडलुभर पाणी घेऊन तूं जा.’ यावरून तेथे गणेशाच्या प्रसादाने ही नदी उत्पन्न झाली आहे हे कळते. ब्रह्मदेवाने त्याप्रमाणे केले व निघून गेला. तुम्हाला ठाऊकच आहे की, एकदा ब्रह्मदेवाने आपली कन्या जी सरस्वती तिच्याकडे वाईट दृष्टीने पाहिले. तेंव्हा सरस्वतीने गणेशाचे स्मरण केल्यामुळे ब्रह्मदेवाच्या बुद्धीत धर्माचा प्रकाश पडला. त्याला पश्चात्ताप झाला आणि आपल्यास भ्रष्ट मार्गाने जाण्याची प्रेरणा करणारा जो काम त्याला ‘ शंकर तुला अग्नीमध्ये जाळून टाकील.’ असा ब्रह्मदेवाने शाप दिला. पुढे आपल्यास शुद्ध करून घ्यावे म्हणून

ब्रह्मदेवाने प्रमुख देव आणि प्रमुख ऋषी यांस बोलाविले व त्यांस सर्व हकीकत सांगितली. नंतर सर्वांनी मिळून साडेतीन कोटी क्षेत्रे उत्पन्न केली ! या प्रत्येक क्षेत्रांत ब्रह्मदेवाने स्नान केले, परंतु ब्रह्मदेव शुद्ध झाला नाही. याच कार्यासाठी सूर्याने स्वदेहापासून यमुनेला, आदिमायेने सरस्वतीला, शंकराने नर्मदेला व विष्णूने भागीरथीला निर्माण केले. या प्रत्येक नदीत ब्रह्मदेवाने स्नान केले, परंतु ब्रह्मदेव कांही शुध्द झाला नाही. नंतर देव पुनः चिंतामग्न झाले. पुढे त्यांनी स्तुति केल्यामुळे त्रिगुणांचे बीजरूप जे तुरीय ते क्षेत्र उत्पन्न झाले. त्याची ब्रह्मदेवासह सर्व देवांनी स्तुति केली व प्रसन्न होऊन त्या तुरीय तीर्थाने ब्रह्मदेवास पवित्र केले; आणि ते तुरीय-क्षेत्र गणपतीची सेवा करीत तेथेच राहिले. यालाच तीर्थराज असे ह्मणतात. या तीर्थाची देवांनी उत्तम तऱ्हेने स्तुति केली तेंव्हा ते तीर्थ मूर्तिमंत प्रकट होऊन देवास इष्ट असे वर देते झाले व देवानीही त्या तीर्थाचे नाव सर्वतीर्थ असे ठेवले. या तीर्थात स्नान केले ह्मणून एका ब्राह्मणाचा मूर्ख मुलगा बुद्धिमान झाला. सुरथ नांवाचा मालवी राजा राज्य करीत असता त्याच्या नगरीवर विदर्भराजाने स्वारी केली आणि त्याचा पराभव केला. सुरथाने अन्य राजांचे साह्य मिळवून विदर्भराजाचा पराभव करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो विफल झाला. तेंव्हा सुरथाला वनवासाचा प्रसंग आला. पुढे ब्राह्मणांच्या सांगण्यावरुन तो मयूरक्षेत्राला आला आणि सर्व तीर्थामध्ये भक्तिपूवक स्नान करून शंकराचे व गणपतीचे पूजन करून व प्रसाद घेऊन परत गेला. त्याने पुनः सैन्य जमविले, तेंव्हा गणेशप्रसादाने त्याला विदर्भांचा पराभव करता आला आणि पुनः तो राजा स्वराज्याचा स्वामी झाला. पुढे त्याने गणेशभक्ति अखंड ठेवली

म्हणून तो स्वानंदवासाचा अधिकारी झाला. असाच अनुभव वैश्य-शूद्रास, फार तर काय, पण चांडाळासमुद्धा आलेला आहे सर्व पापांचा नाश करून पुण्याचा संचय करणारे तीर्थ जर कोठे असेल. तर ते मयूरक्षेत्रातील सर्वतीर्थ हेच होय. धनप्रिय नावाचा एक मनुष्य होता. त्याने द्रव्यासाठी मातृपितृहत्या, ब्रह्महत्या अशी अनेक पापें केली होती. विष घालून त्याने हजारो लोकांचा जीव घेतला होता. त्याचे भाषण मधुर व रूप साधूचे असे, म्हणून सर्व लोक त्याला फसत. पुढे त्याची सर्व पापे उदयास आली, तेव्हा राजाने त्याचे घरदार लुटून त्याला दडकारण्यात पाठवून दिले. तेथे आल्यावरही त्याने लोकांस फसविण्याचा आपला धंदा सुरू केला. एकदा पाळत ठेऊन एका श्रीमंत वैश्यास लुटण्याचा त्याने बेत केला वाणी पुढे व हा मागे असे मार्गक्रमण सुरू झाले. वाटेत त्यांना ती तीर्थमयी महानदी लागली. तेथे स्नान करून ते दोघेही पुढे गेले. पुढे वाण्यास गाठून धनप्रियाने त्याला विष घालून ठार मारले. धनप्रियही काही काळाने मरण पावला दोघांनाही सर्वतीर्थाचे स्नान झाले होते म्हणून स्वानंद लोकाला जाण्याचा मार्ग प्रकट झाला, व व अंती ते शुद्धचित्त होऊन व ज्ञान प्राप्त करून मोकळे झाले.

मयूरक्षेत्रातील पंचतीर्थे

सूत:- ऋषिहो! या मयूरक्षेत्रात पंचतीर्थे मुख्य आहेत. मध्यभागी गणेशतीर्थ आहे. नंतर ज्ञान देणारे कपिलतीर्थ, अज्ञान नाहीसे करणारे व्यासतीर्थ, भीमतीर्थ (येथे पांडव जो भीम त्याने तपश्चर्या करून वर मिळविला होता व भीमासुराला मारण्याचे सामर्थ्य मिळविले होते.) व स्वधर्म प्राप्त करून देणारे ऋषितीर्थ,

अशी ही पांच तीर्थे आहेत. या तीर्थांत स्नाने केली असता (गणेश, भीम, ऋषि, व्यास, कपिल) गाणेशब्रह्मप्राप्ति होते. दक्षिणेकडील शिवशक्तितीर्थ, उत्तरेकडील लक्ष्मीनारायणतीर्थ, हीही तीर्थे उत्तमच आहेत. याचप्रमाणे उत्तरेकडील सूर्य-संज्ञा-तीर्थ व दक्षिणेकडील प्रकृति-पुरूष-तीर्थ हीही तीर्थे इच्छिलेले मनोरथ पूर्ण करणारी आहेत. याचप्रमाणे सिद्धिबुद्धि, लक्ष, लाभ, मूषक, मयूर, मौद्गल, गार्त्समद, शुक, दत्तात्रय, अशी अनेक महत्वाची तीर्थे येथे आहेत. सारांश पृथ्वीवर असे कोणतेही तीर्थ नाही की ज्याचे मुख्य स्वरूप मयूरक्षेत्रामध्ये वसति करून राहिले नाही. या सर्वांचा विस्तार स्कंद पुराणामध्ये उत्तम प्रकारे केलेला आहे ह्मणून येथे संक्षेप केला आहे.

देवद्वार गणेशाची विधियुक्त पूजा-देवकृत गणेश स्तुति -गणेशद्वारा कामाचे वाटप

सूत :- येथील नित्य यात्रेचा प्रकार असा आहे:- प्रथम मयूरेशाची सहपरिवार पूजा करून नंतर अष्टगण, शमी, मंदार, दूर्वा, मुद्गल, शुक योगी, नंतर शक्ति, सूर्य, विष्णु, शंकर अशा क्रमाने या सर्वांची पूजा करावी. नंतर पुराणश्रवण करून गणपतीला नमस्कार करावा आणि मग घरी जावे गर्भागारातील जी देवाची स्थाने आहेत, तेथे जाऊन प्रत्येक गणपतिभक्तांने बल्लाळ, कपिल ढुंढी, वक्रतुंड, महोदर, हेरंब, गणनाथ, विघ्नेश, विघ्नहारक, भालचंद्र, शूर्पकर्ण, ज्येष्ठराज, गजानन आणि महोत्कट ह्या चवदा गणपतीच्या विभूति आहेत. यांचीही पूजा करावी. याप्रमाणे दक्षिण, उत्तर, पश्चिम या दिशावर गणपतीच्या विभूति आहेत, त्यांचे ज्ञान

करून घेऊन त्यांची यथासांग पूजा करावी. तसेच पुलहादि मुख्यमुख्य ऋषि आहेत, त्यांचीही पूजा करावी. याप्रमाणे सांगून भृशुंडीने मयूरक्षेत्राचे वर्णन संपविले आणि आपण स्तब्ध राहिला. नंतर देवांनी गणपतीची स्तुति केली, तेंव्हा प्रत्यक्ष वेद प्रकट होऊन त्यांनी देवास तेजस्वी व ब्रह्ममय असे मयूरक्षेत्र प्रत्यक्ष नेऊन दाखविले तेंव्हा देवांनी विधियुक्त पूजा करून गणपतीविषयीची आपली भक्ति प्रकट केली. त्यांनी गणपतीची स्थापना भाद्रपद शुद्धचतुर्थीचे दिवशी मध्यान्हकाळी केली. त्याच दिवशी सोमवार व स्वातीनक्षत्र होते. माघ शुक्ल अंगारकी चतुर्थीला देवांनी स्थापन केलेल्या मूर्तीमधून चतुर्भुज, मयुरारूढ, सिद्धिबुद्धियुक्त, भालचंद्र, महोदर, पाशांकुशधर, शूर्पकर्ण, गजवदन, एकदंत अशा स्वरूपाने गणपति प्रकट झाले. तेंव्हा देवांनी परमेश्वराची स्तुति केली ती अशी : ' हे अनादिरूपा ! मयूरारूढा ! स्वानंदनाथा ! सकल प्रकाशका ! मन व वाणी ही नसतानाही, मन व वाणी यांच्यामध्ये राहणाऱ्या, गणनाथा ! तू स्तुतिस योग्य आहेस. आम्ही तुला नमस्कार करतो. तू अज, पुराण, सर्वपूज्य, सर्वगामी, आनंदरूप, हृदयस्थ, चारी ब्रह्मांचा चालक, व सद्रूप असा आहेस. तुला आम्ही नमस्कार करतो. तू आपल्या स्वतःच्या बुद्धिने प्रेरित होऊन ही सृष्टि उत्पन्न केली आहेस. आणि या जगात त्वंपदरूपी सगुण ब्रह्मे आहेत, त्या सर्वांचा स्वामी जो तू व निर्गुणरूपाने सर्वव्यापी जो तू, अशा या स्वसंवेद्य तुला आम्ही नमस्कार करतो. तू नित्य सुखस्वरूप आहेस. सगुण-निर्गुण-शून्य आहेस. समाधीमध्यें प्रकट होणारा आहेस. अयोगरूपाने मायाशून्य आहेस. त्या तुला आमचा नमस्कार असो. तूं प्रभु, भक्तांस सुख देणारा व शांति देणारा, गजवदन, चतुर्भुज

एकदंत, त्रिनेत्र, महोदर, पाशधर, सिद्धिदाता, सर्वव्यापी, सत्यसंकल्प, शूर्पकर्ण, सृष्टिकर्ता, सृष्टिपिता, सृष्टिहंता, दीनवत्सल, शक्ति-धर, सर्वरूप, हेरंब, मयूरेश, मयूरध्वज, विघ्नेश आहेस. आम्ही तुला नमस्कार करतो. तू ब्रह्मांचे ब्रह्म आहेस. तुझी आम्ही स्तुति काय करावी! वारंवार नमस्कार करणे हेच काय ते आमचे कर्तव्य आहे. आम्ही तुझे भक्त आहोत, आमचे रक्षण कर.' गणपतिने स्तोत्र ऐकून त्यास दृढ भक्ति दिली. ब्रह्मदेवाकडे सृष्टि उत्पन्न करण्याचे काम, विष्णूकडे पालनाचे काम, शंकराकडे सृष्टिसंहाराचे काम दिले. या सर्वांस त्यांनी सांगितले की, 'तुम्ही सर्वांनी नित्य माझे स्मरण करीत असावे.' तसेच शक्तीला भिन्न भिन्न पदार्थ उत्पन्न करून जीवाला मोहात पाडण्याचे व त्याच्याकडून कर्म करविण्याचे काम करण्याला व कर्मांचा आधार जो सूर्यरूपी आत्मा त्याला चराचर सृष्टि धारण करण्याचे काम सांगून त्यासही माझे विस्मरण होऊ देऊ नका, असे प्रभुने सांगितले. आणि प्रत्येकास त्याच्या कार्याला लागणारे सामर्थ्य, शक्ति, स्थाने, आयुधे, व वाहने इत्यादि देऊन आपण अंतर्धान पावले. देवांनीही गणपतीची पूजा करून आपापल्या कार्यास जाण्यास संकल्प केला व आपल्या सर्वांशांनी मयूरेशाची सेवा करून आपापले कर्म करण्यास गेले. शंकराने मात्र तेथे कांही दिवस राहून तपश्चर्या केली आणि तो गणपतीच्या अनुज्ञेने महादेव हें पद मिळविता झाला.

गणपतीद्वारा कामासुराला शांतियोगाची दीक्षा

सूत :– शौनकादि ऋषिंनो! कामासुराचे पुढे काय झाले हे आदिदेवीला विचारल्यावरून, महाकाली इत्यादि देवींस ती सांगू

लागली ते ऐका : मुद्गलाने उपदेश केल्याप्रमाणे शिवप्रमुख देव मयूर-क्षेत्राला गेले. विधियुक्त यात्रा करून गणपतीची त्यांनी तपश्चर्या केली, त्याचे भजन केले आणि एकाक्षरी मंत्राचा जप केला. देवांच्या भक्तीचे स्वरूप पाहून विनायक संतुष्ट झाले आणि मयूरावर आरूढ होऊन देवास प्रसन्न झाले. देवांनी केलेली स्तुति 'ऐकल्यावर कामासुराला मी शांत करतो, काळजी करूं नका, लौकरच मी कर्माचा संप्रदाय प्रस्थापित करतो.' असे वर गणपतींनी दिले. गणपति अंतर्धान पावल्यावरही देवांनी एकनिष्ठेने गणपतीचे भजन चालू ठेवले. इकडे देवांस वर मिळाल्याची बातमी आकाशवाणीमुळे कामासुराला कळली; तेंव्हा राक्षसमंडळात असा निश्चय झाला की, 'सर्व देवांस ठार मारून नाहीसे केले ह्मणजे गणपतीचा अवतार होण्याचे कारणच राहणार नाही. याकरिता गिरिकंदरात जाऊन वनवासी देवांचा संहार करावा.' याप्रमाणे निश्चय ठरल्यावर कुंभकर्णप्रमुख राक्षस अरण्यात गेले व देवांस धरून मारहाण करू लागले. देवांनी गणपतीला दीन वाणीने हाक मारली, तेंव्हा मूषकध्वज, मयूरारूढ, पाशांकुशधर व तेजस्वी अशा रूपाने हेरंब प्रकट झाले. सर्व देव स्तोत्रे गातगात गणपतीच्या पाया पडले, तेंव्हा 'माझे नांव विकट आहे या नावाने माझे भजन करा. मी कामहीन आहे, हे ध्यानात ठेवा. मायेच्या सुखापेक्षा विकटाचे प्रेम संपादन करून घ्या, ह्मणजे माझे रूप पाहण्यास तुम्ही समर्थ व्हाल.' असा त्यांनी देवांस उपदेश केला

नंतर देव निष्काम होऊन शुद्धचित्त झाले पहा की देहपोषण किंवा यश ह्या हेतूनी जी भक्ति होते, ती सकाम भक्ति होय. आणि स्वधर्म साधनाकरिता जी देवाची सेवा, हिला निष्काम भक्ति असे

म्हणाले. देवांनी गणपतीला प्रार्थना केली, त्याचे तात्पर्य हे होते की, 'कामासुराच्या प्राबल्याने आम्हास आमचे कर्तव्यकर्म करवत नाही व आमचा धर्म आम्हास पाळता येत नाही.' देवास त्यांनी धीर दिला आणि कामासुराबरोबर युद्ध करण्यास सिद्ध व्हा अशी आज्ञा केली.' नंतर शस्त्रे घेऊन देवांनी युद्ध करण्यास सुरुवात केली. अर्थातच भयंकर युद्ध सुरु झाले. देवांच्या मारापुढे कुंभकर्णाचे किंवा त्याच्या सेनेचे काही चालले नाही. ते पळून कामासुराकडे गेले व तेजोरूपी विकट आपल्यावर चालून आल्याचा वृत्तांत सांगू लागले. ते ऐकून कामासुराने प्रतिज्ञा केली की 'मी मारीन किंवा मरेन पण आज शत्रूशी दोन हात करेन.' कुंभकर्णाला विकट दिसला असेल तर उत्पत्तीनाशमुक्त असलाच पाहिजे. तेंव्हा मला मरणाची भीति मुळीच नाही. चला, आपली सर्व सेना घेऊन देवांचा समाचार घेऊंया.' शुक्रासुराने राक्षसांस पुष्कळ बोध केला; परंतु त्याचा कांही उपयोग झाला नाही आणि राक्षससेना देवांचा पराभव करण्याकरिता शस्त्रास्त्रे सज्ज करून मोठ्या समारंभाने बाहेर निघाली. कामासुराला पाहिल्यावर देवांना आपल्या जीवाची भीती वाटली; परंतु गजाननानी त्यांस धीर दिल्यावर त्यांची सर्व भीती नष्ट झाली, इतकेच नव्हे तर शस्त्रास्त्रे सज्ज करून राक्षससैन्यावर ते सर्व इतक्या त्वेषाने तुटून पडले की, ती सर्व विजयी म्हणवून घेणारी राक्षससेना रणांगणातून पळून जाऊं लागली; तथापि बलिप्रमुख दैत्यसचिवांनी आपल्या वाणीने राक्षसांस एकत्र केल्यावर त्यांचा हल्ला देवांस हटविता आला नाही. शिवाय दैत्यांकडे संजीवनी देउन पुनः जिवंत करणारा शुक्र असल्यामुळे दैत्य पुनः पुनः जिवंत होत आणि देवास सतावून सोडीत. विष्णु, शंकर यांनी या युद्धांत विलक्षण पराक्रम केले. शेवटी गणेशाचा अवतार जे विकट

महाराज त्यांच्या तेजस्वी पराक्रमाने दैत्यसैन्याचा सर्वस्वी पराभव झाला. कामासुराचे पुत्र मारले गेले आणि सर्व दैत्यसैन्यांत जिकडे तिकडे हाहाःकार सुरू झाला. कामासुराने त्या दिवशी सर्वांस आश्चर्य उत्पन्न करणारा पराक्रम करून शंकरविष्णूस धरणीतळावर मूर्च्छित पाडले, आणि सिंहनाद करून आपल्या सैन्यास पुनः युद्धास प्रवृत्त केले. दुःष्पुर, बळी इत्यादि सचिवांस देवसैन्याचा समाचार घ्यावयास सांगून कामासुर हा गणपतीशी द्वंद्वयुद्ध खेळण्याकरिता समोर येऊन उभा राहिला; परंतु गणपतीचे दिव्य ऐश्वर्य, असह्य तेज, नजर ठरणार नाही अशी अंगकांति, मन हरण करून घेणारे नेत्रयुगुल हे पाहून व त्याची गंभीर वाणी ऐकून कामासुर धैर्य विगलित झाला आणि ज्यावेळो गणपतीनी आपले स्वरूप प्रगट केले, त्याला आपली ईश्वरी व्यवस्था समजून दिली, धर्मनाश करून अधर्माचा प्रभाव त्याच्या राज्यांत भयंकर झाल्यामुळे एकंदर विश्वाची केवढी प्रचंड हानि झाली हे त्याला कठोर वाणीने सांगितले आणि शेवटी त्याचे अज्ञान, त्याची अल्पशक्तिही त्याच्या नजरेस आणली, त्यावेळी तो धैर्यशून्य झाला इतकेच नव्हे पण हतप्रभ, गर्वशून्य, विनम्र होऊन गणपतीच्या पायांवर गडबडा लोळू लागला. त्याने करुणा भाकली आणि भक्तिपूर्वक एक स्तोत्र म्हणून गणेशास प्रसन्न करून घेतले. गणपतीनी त्याला अखंडस्मरण व दृढभक्ति हे दोन वर देऊन 'सकाम कर्म करणाऱ्या सत्कर्मी पुरुषांच्या कर्मांचे फल तूं उपभोगीत जा आणि माझ्या भक्तांना माझीच आठवण नित्य होईल असे कर' अशी आज्ञा करून गणपतीनी कामासुराला शांतियोगाची दीक्षा दिली व स्वस्थानी पाठवून दिले. नंतर शंकर, विष्णुप्रमुख देवांनी परमेश्वराची एकनिष्ठेने भक्तियुक्त स्तुति करून

परमेश्वराचे आशीर्वाद स्वीकृत केले. गणेशानेही देवांस धर्मरहस्य सांगितले आणि आपण अंतर्हित झाले. पुढे देवांनी व देवर्षीनी गणपतीची मूर्ति स्थापन करून भजन–पूजन, कीर्तन आणि प्रवचन इत्यादिकांच्या साहाय्याने गणेशसंप्रदाय वाढविला. असो; ह्या मूर्तीची स्थापना भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मध्यान्हकाळी झाली म्हणून गणपतीचे वार्षिक उत्सवही भाद्रपद शुध्द चतुर्थीलाच होतात.

गणेशाचा गुणेश अवतार

सुत :– शौनकादि ऋषिनो ! ही कथा सांगितल्यावर आदिशक्तिने देवीस चक्रपाणि नामक गंडकी नगरीच्या राजाची गोष्ट सांगितली. हा राजा धर्मशील, दाता, नीतीपरायण, शुर व ऐश्वर्यवंत असा होता. अपत्य नाही हीच त्याला एक मोठी चिंता होती. पुढे सूर्यदेवतेची आराधना करून त्या देवतेस राजाने आपल्या उग्रा नामक पत्नीसह तप करून प्रसन्न करून घेतले. पुढे उग्रा गर्भधारण करती झाली. नंतर कांही दिवसांनी त्या गर्भाचे तेज सहन करण्याचे सामर्थ्य उग्रेला नाहीसे होऊन तिचा तो गर्भ जलाशयात पडला समुद्राने त्या गर्भाचे पालनपोषण केले आणि जन्म झाल्यावर समुद्राने ब्राह्मणाचे रूप घेऊन त्या मुलास राजाच्या हवाली केले. ब्राह्मणांनी त्या मुलाचे नांव सिंधु असे ठेवले. हा मुलगा मोठा झाल्यावर बापाची आज्ञा घेऊन वनांत गेला व एका पायावर उभे राहून त्याने सूर्याची दोन हजार वर्षे उग्र तपश्चर्या केली. आणि सूर्य प्रसन्न झाल्यावर त्रैलोक्यविजय, नित्य अमृतपान हे दोन वर देऊन सूर्याने त्यास असे सांगितले की, ' ज्यावेळी त्रिगुणशून्य परमात्मा देह धारण करील व तुझ्याजवळील अमृताचे भांडे काढून घेईल, तेंव्हा तुला

मृत्यु प्राप्त होईल.' ही वरप्राप्ति करून घेऊन सिंधु घरी परत आला व सर्वांस आपल्या तपश्चर्येच्या सफलतेचा वृत्तांत त्याने सांगितला. हा वृत्तांत ऐकून आईबापास, इष्टमित्रांस व सर्व लोकांस अतिशय आनंद झाला. पुढे पुत्रावर राज्यकारभार सोपवून चक्रपाणि आपल्या पत्नीसह देहाचे सार्थक करण्यासाठी वनांतरी गेला. सिंधुराजाने लवकरच सर्व राक्षस मंडळी गोळा करून त्रैलोक्यविजय, वेदोक्तकर्मांचा लोप इत्यादि सर्व आसुरी कृत्ये करून आपण स्वतः विषयाच्या आसुरी उपभोगामध्ये निमग्न आणि उन्मत्तपणाने सर्व सद्गोष्टींचा तिरस्कार करीत राहिला. यामुळे सर्व त्रैलोक्यभर अर्थातच हाहाःकार झाला. अधर्माचा नाश करण्यासाठी व धर्माची संस्थापना करण्यासाठी परमेश्वरास साधूंच्या प्रार्थनेवरून जन्म घेणे भाग पडले, या न्यायाने गणपतीनी पार्वतीच्या उदरी गुणेश या नावाने अवतार घेतला. सिंधुच्या दूतांनी ही बातमी सिंधूस सांगितली. शिवाय त्यालाही पुष्कळ दुश्चिन्हांनी असे भविष्य सुचवून ठेवले होते की, 'तुझा अंत लवकरच होणार.' ही आपत्ति टाळण्यासाठी त्याने हजारो राक्षस गुणेशाचा नाश करण्याकरता पाठविले, पण गुणेशाने त्या सर्वांस यमलोकी पाठवून दिले. एक दिवस मरीचिनामक महायोगी गुणेशाच्या दर्शनाकरिता कैलासलोकी आले. तेव्हा पार्वती मायामोहित झाल्यामुळे मरीचीची आर्जवे करून त्यास म्हणाली की, ह्या 'मुलावर नित्यशः अनेक संकटे येतात, तेंव्हा त्यांच्या प्रशमनासाठी एखादा मंत्र देऊन ठेवा.' तेव्हा मरीचि ऋषिने हा परमेश्वराचा अवतार असे समजूनही तो त्या मुलाला गणेशकवच शिकविता झाला! एकदा पार्वतीने पार्थिवलिंग तयार करून त्याची पूजा करण्यास आरंभ केला,

इतक्यात 'आई मला भूक लागली, खायला दे' असे बोबडे बोल बोलत व दुडुदुडु धावत गुणेश तेथे आला व लडिवाळपणाने आईचा हात आपल्याकडे ओढू लागला. 'ही देवपूजा आटपते आणि तुला घेते' असे पार्वतीने सांगितले, तरी मुलाची समजूत पडेना. त्याने जास्तच हट्ट धरला, बुक्की मारून ते शिवलिंग खाली पाडले आणि फोडून टाकले! तेव्हा पार्वतीने त्याच्या तोंडात मारली. पण गुणेश आईच्या हाताला इतके कडकावून चावला की, त्यांतून भडभडा रक्त वाहू लागले. हे पाहून व मार बसेल असे जाणून गुणेश तेथून पळून गेला. इकडे लिंगभंग झाले हे पाहून पार्वतीला खूप वाईट वाटले. 'असले पोर झाले नसते तरी बरे' असे कपाळ पिटून ती म्हणू लागली व देहत्याग करण्याचा तिने निश्चय केला; इतक्यात धावत धावत मुलगा तिच्या जवळ आला, त्याला धरून ती आता काठीने मार देणार तो, गुणेशाने शंकरस्वरूप धारण केले. शंकराला पाहताच पार्वतीने हातातील काठी टाकून दिली. तोच गुणेशाने आपले स्वरूप प्रकट केले व पळू लागला! पार्वती त्याला मारण्याकरिता पाठीमागे धावूं लागली. याच वेळी कर्दम नावाचा राक्षस द्विजरूपाने पुढे येऊन त्याने गुणेशास गिळून टाकले. पार्वती तेथे आल्यावर त्याने तिला सांगितले की, शिवाशपथ तुझा मुलगा मी पाहिला नाही. पण नाही या शब्दाबरोबरच त्याच्या तोंडातून गुणेशाने उडी मारली आणि त्याला अशी एक वज्रमुष्टि लगावली की, त्याच्यायोगाने तो तत्क्षणी मरण पावला. याप्रमाणे गुणेशाने अनेक प्रकारच्या बालक्रिडा करून आईबापास रमविले. हा गुणेश गौतमादि मुनींच्या मुलांबरोबर खेळावयास जाई, पण तेथे अतिशय खोड्या करीत असे. विष्णु, शंकर इत्यादि

देवांनीही तेथेच मुनींची मुले होऊन गुणेशसंगतीत सुखाचा अनुभव घेतला. ह्या बालवयातच गुणेशाने अनेक राक्षसांचा वध केला. इकडे सिंधु राक्षस जास्तच उन्मत्त होऊन त्याने इंद्र, चंद्र, वरुण, ब्रह्मा, विष्णु इत्यादि देवास कारागृहात टाकले. शंकराला नेण्याकरता सिंधूने कमलासुराला पाठवले, तेव्हा गुणेशाने युद्ध करून कमलासुराला ठार मारले. या गुणेशाचे सत्व पाहण्याकरिता इंद्राने पर्जन्य पाडून, ब्रह्मदेवाने त्याच्या खेळगड्यांस लपवून ठेवून व शंकरदर्शनाला आला असता गुणेशाला नमस्कार न करून गुणेशाला त्रास देण्यासाठी पुष्कळ खटपट केली, पण गुणेशाने आपल्या अमोघ शक्तिसामर्थ्याने पर्जन्यास हटविले, आपणच आपल्या संवगड्यांची रूपें घेतली इतकेच नव्हे, तर सर्व चराचर स्वरूप झाला आणि श्वासाच्या प्रवाहाबरोबर ब्रह्मदेवास अनंत ब्रह्मांडे दाखविता झाला. अशा अनेक लीलांनी गुणेशाने (मयूरेशाने) आपल्या ठिकाणी सर्वांची भक्ति निर्माण होईल असे केले. घेतली. शिक्षा करावयास पाठविलेल्या शिवगणांस श्वासाने ढकलून देऊन त्याने शंकरालाही दाखवून दिले की, ‘ तू केवळ पराधीन आहेस.’ पुढे लवकरच गुणेशाने सिंधु राक्षसाचा वध करून सर्व विश्वाची पीडा नाहीशी केली. नंतर मयूरेशाचा सिद्धिबुद्धीशी गांधर्व पद्धतिने विवाह झाला.

विकट अवतार समाप्ति

सूत :– नंतर आदिशक्तीने देवीस सांगितले की, एकदा सूर्याने अरुणाला त्याच्या विनंतीवरून गणेश दीक्षा दिली, तेंव्हा त्याला समजले की, हे सर्व विश्व व या विश्वांतील देवदेवता केवळ गणेशाधार आहेत व गणेशाश्रय आहेत. हे समजल्यावर त्याने

गणपतीची मूर्ति स्थापन केली आणि भक्ति करीत मुख्यांशाने तेथे राहून आपल्या अल्पांशांनी सूर्याचे सारथ्य करू लागला. एकदां तामिस्रासुर या नांवाचा एक राक्षस सूर्याचा ग्रास करून त्याला गिळण्याकरता आला. हा राक्षस सूर्य व छाया यांच्यापासूनच उत्पन्न झाला होता. त्याला सूर्याने अनेक वर दिले. त्याचाच प्रभाव म्हणजे आसुरी मुलाने बापास गिळणे हा होय! पुढे सूर्याने गणपतीचे स्मरण केल्याबरोबर तो प्रकट झाला आणि तामिस्राचा नाश करून सूर्यास व सर्व जगतास सुख देता झाला,

(विकटचरित्र समाप्त)

सप्तम खंड

—०—

[विघ्नराजचरित्र]

मरुतांचा अवतार व इंद्राचे कपट

सूतः– हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु यांचा विष्णूने संहार केला. तेंव्हा दितीला अतिशय दुःख झाले. या दुःखाचा उपशम करण्यासाठी तिने आपल्या पतीची सेवा एकनिष्ठपणाने केली. कश्यप ऋषि (दितीचा पति) प्रसन्न झाल्यावर तिने त्याच्यापाशी असा वर मागितला की, ' मला इंद्रघ्न (इंद्राला मारील असा) पुत्र आपल्यापासून प्राप्त

गणपतीची मूर्ति स्थापन केली आणि भक्ति करीत मुख्यांशाने तेथे राहून आपल्या अल्पांशांनी सूर्याचे सारथ्य करू लागला. एकदां [illegible]सुर या नांवाचा एक राक्षस सूर्याचा ग्रास करून त्याला गिळण्याकरता आला. हा राक्षस सूर्य व छाया यांच्यापासूनच उत्पन्न झाला होता. त्याला सूर्याने अनेक वर दिले. त्याचाच प्रभाव म्हणजे आसुरी मुलाने बापास गिळणे हा होय! पुढे सूर्याने गणपतीचे स्मरण केल्याबरोबर तो प्रकट झाला आणि तामिस्राचा नाश करून सूर्यास व सर्व जगतास सुख देता झाला,

(विकटचरित्र समाप्त)

सप्तम खंड

—०—

[विघ्नराजचरित्र]

मरुतांचा अवतार व इंद्राचे कपट

सूतः– हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु यांचा विष्णूने संहार केला. तेव्हा दितीला अतिशय दुःख झाले. या दुःखाचा उपशम करण्या-साठी तिने आपल्या पतीची सेवा एकनिष्ठपणाने केली. कश्यप ऋषि (दितीचा पति) प्रसन्न झाल्यावर तिने त्याच्यापाशी असा वर मागितला की, ' मला इंद्रघ्न (इंद्राला मारील असा) पुत्र आपल्यापासून प्राप्त

व्हावा !' हे मागणे ऐकून ऋषि फार खिन्न झाला. 'आपला धर्माने चालणारा आणि गुणयुक्त मुलगा जो इंद्र त्याला मारणारा मुलगा ही त्याची सावत्र आई मागते. किती दुष्ट आहे ही!' असा विचार करून त्याने गणपतीचे स्मरण केले 'एक वर्षभर व्रतस्थ रहा म्हणजे तुला हवा तसा मुलगा प्राप्त होईल, व्रतात मात्र कोणत्याही प्रकारे खंड पडूं देऊं नको.' असे त्याने दितीस सांगितले. दितीला गर्भ राहिला. तिनेही आपले व्रत मोठ्या भक्तिने चालविले. इकडे हा कश्यपदितीमधील संभाषणाचा ओघ नारदमुखाने इंद्राला कळला. इंद्राने गणेशाचे स्मरण केले, व आपली सावत्र आई दिति तिची सेवा करण्याकरितां सादर झाला. हेतु हा की, कोठे तरी आपल्यास दितीच्या व्रतांतील छिद्र सांपडावे आणि आपणास या गर्भाची वाट लावतां यावी; नऊ महिनेपर्यंत दितीने आपल्या व्रतांत एकही छिद्र उत्पन्न होऊ दिले नाही. पण तिच्या दुर्दैवाने तिला असा गर्व झाला की, 'माझी सर्व इच्छा बहुतेक सफल झाली. मला नवीन इंद्राची आई होण्याची संधि लवकरच प्राप्त होईल.' या मोहाने ती आपल्यास धन्य मानू लागली. एकदां तिला दिवसाच निद्रेने घेरल्यामुळे तीने दोन्ही गुडघ्यामध्ये डोके ठेऊन घोरत पडली. (आपल्या दोन गुडघ्यामध्ये डोके ठेवणे हे एक व्रतभंगाचे लक्षण आहे.) व्रतस्थ असतांना दिवसा कधीही झोप घेता उपयोगी नाही; झोप घेतली तर व्रतभंग होतो. ही छिद्रे पाहून इंद्राला संधि मिळाली, तो दितीच्या उदरांत शिरला व तेथे जो गर्भ होता तो हातांत घेऊन त्याचे आपल्या वज्राने सात तुकडे केले; तथापि दितीचे तप अति उग्र म्हणून त्या गर्भाचा जीव गेला नाही. तो मोठ्याने आंत ओरडावयास लागला. तेंव्हा इंद्राने पुनः सात सात तुकडे करून त्या गर्भाचे

एकोणपन्नास तुकडे केले; तथापि त्या गर्भाच्या जीवाला धक्का पोहोचला नाही! तो गर्भ ओरडत राहिला व इंद्राला म्हणाला, 'आपण सर्वजण भाऊ ना? आपण परस्परांचे वैर करून एकमेकांचे नुकसान करणे ठीक नाही.' ते वचन ऐकून इंद्र ह्मणाला 'मी वैरभाव टाकून देतो आणि स्वर्गलोकास रहावयास येतो' अशी शपथ वाहा ह्मणजे मी तुह्मास मारणार नाही.' 'ठीक आहे' असे वचन घेऊन इंद्र उदराचे बाहेर आला. त्याचवेळी दितीच्या उदरांतून एकोणपन्नास बालके बाहेर आली. तेंव्हा दितीला आश्चर्य वाटले आणि 'मी एकच मुलगा मागितला. मला इतके जास्त कसे झाले?' असे ती इंद्रास विचारू लागली, इंद्राने उत्तर दिले 'आई तुझे मनोगत जाणूनच मी तुझ्या उदरांत शिरलो आणि या गर्भाचे एकोणपन्नास तुकडे केले, आता मी यांना घेऊन आपल्या लोकात जातो. आई, आपली आज्ञा मला पाहिजे.' हे इंद्राचे सत्य भाषण ऐकून दितीला फार आनंद झाला; आणि तिने त्याला हे त्याचे एकोणपन्नास भाऊ ह्मणजे मरुत यांना घेऊन जाण्याची परवानगी दिली; व ही सर्व हकीकत आपल्या पतीला ह्मणजे कश्यपाला कळवली. कश्यपाने तिला पुष्कळ बोध केला; परंतु कांही एक उपयोग झाला नाही. ऋषीने संसाराच्या दुःखमय स्वरूपाची पुनः ओळख करून दिली. 'तेव्हा चित्ताला शांति कोणत्या उपायाने मिळेल तो उपाय मला सांगा,' अशी तिने पतीला प्रार्थना केली.

ममासुराचे गर्वहरण

कश्यप ह्मणाले, 'शंकर हा नित्य गणपतिभक्त आहे. एकदा विघ्नेश्वराचे स्मरण करून शंकराने द्विजवेश धारण केला आणि

हिमाचल पर्वतावर आला. नानाप्रकारच्या विद्या व कला यांचे प्रदर्शन करून शंकराने हिमाचलाला संतुष्ट केले आणि 'तुझी उमा नावाची मुलगी मला दे' अशी मागणी घातली. पर्वताला वाईट वाटले. 'ही मागणी करणारा हा ब्राह्मण अगदी वेडा आहे' असे वाटून हिमाचल रागावलाही. पण उमेने त्या द्विजाचे खरे स्वरूप ओळखले होते. बापालाही तिने शंकरस्वरूपाची ओळख करून दिली. तेंव्हा हिमाचलास फार आनंद झाला आणि शंकराला जांवई करण्याचे त्याने आनंदाने कबूल केले. असो; हे लग्न मोठ्या थाटाचे झाले. पुढे कांही काळ गणपतीची भक्ति केल्यावर पार्वतीला स्कंद या नावाचा एक महापराक्रमी व महागणेशभक्त असा मुलगा झाला. त्याने लौकरच तारकासुराचा वध केला. याप्रमाणे शिव व पार्वती संसारसुखाचा पूर्ण अनुभव पुष्कळ दिवस घेत राहिली. पुढे पार्वतीला असे वाटले की, आपल्यासारखी धन्य स्त्री कोणी नाही. कारण आपला पति (शंकर) सर्वस्वी आपल्या स्वाधीन आहे. तिच्या सख्याही तिचे कौतुक करीत. एकदा हे असेच भाषण चालले असता पार्वतीला हसूं आले. ह्या हंसण्यापासून कामासारखा सुंदर आणि भीमासारखा बळकट असा एक पुरुष निर्माण होऊन त्याने पार्वतीला नमस्कार केला. तूं कोण आहेस असे विचारता 'मी तुझ्या हंसण्यापासून उत्पन्न झालेला तुझा मुलगा आहे. काय करूं ते मला सांग' पार्वतीने त्याचे 'मम' असे नाव ठेविले आणि त्याला सांगितले की, 'तूं गणेशभजन कर. तुझी ख्याति सर्व विश्वभर होईल व तुझ्या सर्व इच्छा परिपूर्ण होतील.' नंतर तिने त्याला गणेशमंत्राची दीक्षा दिली. ममाने आईचा निरोप घेऊन तपश्चर्या करण्यासाठी अरण्यवास पत्करला. तेथे त्याची व शंबरासुराची गांठ पडली; तेंव्हा शंबराने

त्याला सर्व आसुरी विद्या शिकविल्या आणि त्याला सांगितले की, 'पार्वतीने दिलेल्या मंत्राने गणेशाचे आराधन कर. गणपतीपासून ब्रह्मांडाचे राज्य व तत्त्वे किंवा तत्त्वकार्यें यापासून मृत्यूचा अभाव, हे दोन वर मागून घे आणि मला येऊन भेट.' शंबराच्या उपदेशा-प्रमाणे ममासुराने तपश्चर्या केली. गणेशाची प्रसन्नता मिळविली आणि शंबराने सांगितलेले सर्व वरही मागून घेतले. वरप्राप्ति झाल्यावर ममासुर शंबराला नमस्कार करण्याकरता गेला व त्याला त्याने सर्व वृत्तांत सांगितला. तें ऐकून शंबराला हर्ष झाला व त्याने मोहिनी नावाची आपली मुलगी त्याला दिली. नंतर शुक्रसमागम, राज्याभिषेक, राक्षससंमेलन, पृथ्वीविजय, धर्म व अधर्म या नावाच्या दोन पुत्रांची प्राप्ति, इत्यादि सर्व गोष्टी जशा व्हावयाच्या तशा झाल्या. शुक्राने मात्र त्याला उपदेश केला होता की, 'तूं केंव्हाही विघ्नेश्वराचा द्वेष करू नको.' या उपदेशाचा फारसा उपयोग झाला नाही. पृथ्वीमध्ये आपली सत्ता प्रस्थापित केल्यावर ममासुराने, पाताळ व स्वर्ग यांच्यावरही आपली सत्ता स्थापन केली, स्वर्गातील देवांचा पराभव करण्याचे काम लहानसहान नव्हते. शिव, विष्णु, भैरव, सूर्य, स्कंद, वीरभद्र, यम, वरुण इत्यादि देवांनी या युद्धांत अपूर्व पराक्रम केला पण ममासुराच्या सन्मुख ज्या वेळेला शंकरविष्णूंस उभे रहावे लागले, तेंव्हा ममासुराने त्यांचा पराजय केला आणि त्यांस अरण्यांत घालवून दिले. याप्रमाणे त्याने स्वर्गावर आपला अंमल बसविला. पुढे तो स्त्री, मांस व मदिरा यांमध्ये आसक्त झाला, तो इतका की, 'आपण मर्त्य आहो, हे तो विसरला मांसमदिरांचे अतिरिक्त सेवन व स्त्रियांची अमर्याद संगति या क्षीण करणाऱ्या व्यसनापासूनही आपल्या देहाला काही एक इजा होणार नाही, ही समजूत त्याने

दृढ करून घेतली. पुढे त्रैलोक्यात दैवी संपत्तीचा क्षय व आसुरी संपत्ति, आसुरी व्यसने व आसुरी तपश्चर्या यांचा उदय झाला हे सांगण्याचे कारणच नाही. अधर्माचा पूर्ण मध्यान्हकाळ आला ह्मणजे धर्मसंस्थापक, परमेश्वराचा अवतार होण्याचा दिवस उगवतो हे केव्हांही विसरता कामा नये. इकडे वनवासांत राहून देवांनी केलेल्या गणेशपूजेने गणपती प्रसन्न झाले. आणि नगरांत राहून राक्षसांनी केलेली विषयसेवा गणपतीच्या क्रोधाला कारण झाली. देवांस गणपति प्रसन्न झाले आणि 'भिऊ नका, ममासुराचा मी वध करतो.' असे देवांस त्यांनी वचन दिले. ही सगळी बातमी ममासुराला दुसऱ्या दिवशी कळली. ममासुराने आपली राक्षसमंडळी जमविली आणि तेथे ठरविले की 'देवांसह गणपतीचा नाश करावयाचा.' राक्षससेना निघणार त्याच्या आदल्या दिवशीच समझौता करण्याकरिता गणपतीने नारदास ममासुराकडे पाठविले.

नारदाने ममासुराला परमेश्वराचे अघटित कर्म–कर्तृत्व, इतर जीवांचे कर्मदासत्व ह्या गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. 'गर्व सोड' ह्मणून सांगितले. गणेशब्रह्मस्वरूपाचे रहस्य व गणेशब्रह्म मिळण्याचे साधन जो गणेशयोग, तो स्पष्ट व स्वच्छपणे सांगण्याचा प्रयत्न केला, पण कांही एक उपयोग झाला नाही. पुढे आकाशवाणीनेही नारदाच्या उपदेशाचे समर्थन केले; तथापि दैत्यांस उमज पडला नाही, याचे मुख्य कारण हे की, त्यांचा युद्धकंडू अद्यापि उपशम पावला नव्हता. असो, दैत्यदानवांचे ह्या वेळीही मोठे युद्ध झाले. शेवटी गणपतीनी आपल्या हातांतील कमल राक्षससैन्यावर फेकले आणि त्याचा जसजसा सुवास सर्वत्र पसरला तसतसे गणेशशत्रु नष्ट व्हावे आणि गणेशमित्र सुखरूप असावे

असा चमत्कार त्या कमळाने घडवून आणला. देवांच्या कमळापुढे आपल्या वज्रप्राय शस्त्राचे काही चालत नाही हे पाहून, ममासुराचा गर्व नाहीसा झाला. त्याला पश्चात्ताप झाला, त्याच्या अंतःकरणांत गणेशभक्ति उत्पन्न झाली, आणि त्याला शांति हवीशी वाटूं लागली. नंतर त्याने एक करुणापर स्तोत्र मोठ्या भक्तिने साष्टांग प्रणिपात करून म्हटले आणि त्यांनी दिलेले वर घेऊन तो शांत झाला. गणपतीनी त्याला प्रसन्न झाल्यावर आज्ञापिले की, जेथे आरंभी ' माझे भजन किंवा पूजन होत नाही तेथे तुला विघ्ने उत्पन्न करण्याची पूर्ण मोकळीक आहे. माझ्या भक्तांना मात्र तूं कोणत्याही प्रकारचा त्रास देऊं नको. ' ही आज्ञा पाळण्याचे कबूल करून ममासुर स्वस्थानी गेला, राक्षस पाताळांत गेले आणि परमेश्वराची स्तुति करून देवही आपापल्या स्थानी जाण्यास निघाले. जाण्यापूर्वी हिमाचलावर उत्तरेकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी सांग व सपरिवार गणेशमूर्ति स्थापन करून नित्य भजनपूजन चालू राहील आणि वार्षिक यात्रा व वार्षिक उत्सव निर्विघ्नपणाने चालतील अशी व्यवस्था केली व मग आपण निघून गेले.

गणेश हेच सर्वश्रेष्ठ ब्रह्म

सूत :- नंतर कश्यपाने असत्, सत्, सदसत्, सद्सद्भाव इत्यादि ब्रह्मांची स्वरूप रचना व स्थूल आणि सूक्ष्म सृष्टीची रचना समजेल अशा रीतोने सांगितली. हीच व्यवस्था पूर्वी विष्णुरूपी गणेशाने सृष्टीची रचना करणाऱ्या देवांस सांगून त्यांच्या अंतःकरणात आनंदाची वृत्ति उत्पन्न केली होती. कश्यप म्हणाला, हे देवी ! एकदा विष्वक्सेनाने विष्णु हाच श्रेष्ठ देव आहे अशी

कल्पना करून विष्णूची उग्र व दीर्घ तपश्चर्या पुष्कळ वर्षे केली. तपश्चर्या सफल झाली, तेव्हां विष्वक्सेन विष्णूचे ध्यान करीत होता, तरी लक्ष्मीसहित गणपतीचे दर्शन त्याला होऊं लागले. याप्रमाणे बराच वेळ झाल्यावर गणपति हेच सर्वश्रेष्ठ ब्रह्म आहे असा त्याचा निश्चय झाला आणि तो यावज्जन्म विष्णुसंगतीने गणेशभक्ति करीत राहिला. गणपतीच्या अनुग्रहाने मात्र विष्णूला मधुकैटभाचा वध करता आला.

श्रीदत्त योगींद्राचा उपदेश

सूत :– पूर्वी धर्मघ्न या नावाच्या पुरूषाला यज्ञधृग नावाचा एक राक्षसी मुलगा होता. त्याने शंकरआराधन करून ‘मूर्त किंवा अमूर्त वस्तूपासून मला मरण नको’ असा वर मागितला आणि मिळविला. पुढे सर्व त्रैलोक्यभर आपली सत्ता प्रस्थापित केल्यावर त्याने यज्ञकर्मांचा लोप करण्याचे व्रत स्वीकारले. यज्ञ द्रव्ये व याज्ञिक ब्राह्मण या सर्वांचा नाश करण्याचा त्याने सपाटा लावला. पुढे यज्ञपति व यज्ञभोक्ता जो विष्णु त्याने गणपतीची तपश्चर्या केली ह्या तपानुसार गणपतीनी शूर्पकर्णाचा अवतार घेऊन यज्ञधृगाचा नाश केला आणि स्वधर्माची स्थापना केली. पहा की, माती असलेल्या धान्यातील माती जशी आपण सुपाने नाहीशी करून धान्य स्वच्छ करतो, त्याप्रमाणे मायायुक्त जे आपण त्या आपली माया नाहीशी करून चित्तशुद्धि करण्यासाठी आपण शूर्पकर्णाची ह्मणजे गणपतीची आराधना केली पाहिजे. कश्यप पुढें सांगतो : ‘हे देवी ! एकदा माघ मासामध्ये प्रयागास माघस्नान करण्याकरिता मोठी थोरली यात्रा जमली होती. त्यांत सर्व तीर्थे, सर्व देव व सर्व ब्राह्मण उपस्थित होते. त्यावेळी अवधूत मार्गाचा प्रकाशक दत्त

योगींद्रही तेथे उपस्थित होऊन 'ॐकार' गणनाथाचे रमणीय स्तोत्र म्हणू लागला. त्याने सर्वांस 'गणेश ब्रह्म, सर्वव्यापी आहे' हे तत्त्व, समजून सांगितले; आणि पुनः असे म्हणाला कीं, अन्नादि मूर्त पदार्थांत दिसणारे स्थूल ब्रह्म यांत अन्नरूपमय माया आहे, प्राणब्रह्मांत माया प्राणाकार आहे, मनोब्रह्मात माया मनोमय आहे, विज्ञानब्रह्मात माया विज्ञानमय आहे, आनंदब्रह्मांत आनंदरूप, चैतन्यब्रह्मांत चैतन्यरूप, बिंदुब्रह्मांत बिंदुरूप, सोहंब्रह्मांत सोहंप्रकाशित, बोधब्रह्मांत बोधाकार, विदेहब्रह्मांत देहशून्याकार, कर्मब्रह्मांत कर्माकार, ज्ञानब्रह्मांत ज्ञानाकार, समब्रह्मांत समरूप, सहजरूपांत सहजरूप, असद्‌ब्रह्मांत असन्माया, सद्‌ब्रह्मांत सदाकारमाया, सदसन्मयब्रह्मांत सदसद्रूपमाया, अव्यक्तब्रह्मांत अव्यक्तमाया, स्वसंवेद्यब्रह्मांत स्वानंदमाया. सारांश आपल्या समजुतीसाठी जे जे म्हणून नाव जीवाकडून ब्रह्माला प्राप्त होते त्या त्या नावाने दाखविल्या जाणाऱ्या पदार्थाने (मायेने) युक्त असे ते ते ब्रह्म असते. या सर्व वेदकथित ब्रह्मांचा जो स्वामी तो ब्रह्मणस्पति, नित्य स्वरूपामध्ये नित्य स्थिर असतो. हाच गणेश होय. यालाच गणाध्यक्ष म्हणतात. योगसाधन करून या गणेशाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. तसेच चित्तपंचक, चित्तप्रकाशक चिंतामणि, सिद्धिबुद्धी, त्यांची स्वरूपें व कर्मे याचा उपदेश पूर्वी गणपतींनी तुह्मांस केला आहे, तो ध्यानांत ठेवून गणपतियोगाचा अभ्यास केलात तरच कल्याण होईल. गणेश हा सर्व ब्रह्मांची रचना करणारा पति आहे, म्हणून त्याला ब्रह्मणस्पति म्हणतात. हा शुद्ध आहे. येथे मायेचा मुळीच संबंध नाही. नारदाने दत्तयोगींद्राला विचारले, "तूं गणेशब्रह्मामध्ये आहेस, तदाकार आहेस, कारण 'तें तू आहेस' हे जे ब्रह्मवाक्य याचा अनुभव तुला

आहे. हे जर खरे आहे तर, 'हा मी दत्त व हा गणेश हे द्वैत कोठून येते' जर तुझ्यामध्ये व गणेशामध्ये भिन्नभाव नाही तर तूं कोणाची उपासना करतोस? व भिन्नभाव असेल तर सर्व एकच आहे हे म्हणणे काय उपयोगाचे?"

दत्तयोगींद्र :– हा माझा नरसत्तायुक्त देह नामरूपादि विकाराला वश आहे म्हणून मी शुभाशुभ देहधर्म नित्य करतो. ब्रह्म तर सर्वत्र पसरलेले आहे. त्याची सत्ता सर्वत्र आहे. त्याच्या व्यतिरिक्त एक रेणू इतकीसुद्धां जागा रिकामी असत नाही. तथापि मायेच्या अनुकूल प्रतिकूल स्थितीने ब्रह्मसत्ता कमी जास्त भासत असते. पहा की, ब्रह्मणस्पति या शद्बाची सत्ता एका गणपतिमध्येच आहे, इतर देवांमध्ये नाही, म्हणुन अंतःकरणामध्ये प्रत्यक्ष असणाऱ्या विघ्नेशनामक ब्रह्माला जाणूनही ब्रह्मार्थी पुरूष ब्रह्माची आराधना करणार नाही असे कसे होईल? नारदा! जोपर्यंत देहादिमायेने विशिष्ट असा देहादि धारण करणारा जीव असतो तोपर्यंत त्याने गणेशेश्वराचें भजन केलेंच पाहिजे. कर्म करणे हें देहाचे काम आहे व चिंतन करणे हें चित्ताचे (सर्व जीवांचे) काम आहे, म्हणून माझा देह व माझे चित्त ही उभयता गणपतीचे आराधन करतात. त्या उभयतांचा प्रकाशक जो आत्मा तो गजाननरूपच आहे, म्हणून त्याला गजाननाची भक्ति करण्याचे कांहीं कारण नाही. देह व चित्त ही उभयतां आपल्या प्रकाशकाचे भजन करतात. आत्मस्वरूपाने मी गणेशाहून भिन्न नाही; तथापि देहसाहाय्याने भक्षणादि क्रिया जशा मी देहपोषणाच्या गोष्टी आदराने करतो, तसेच

देहाच्या साहाय्याने देहप्रकाशक जो गणपति त्याचे भजनपूजन मी स्वकल्याणार्थच करतो. अशा प्रकारचे गणेशयोगरहस्य ऐकून देवांनी दत्ताची प्रेमाने स्तुति केली आणि ते स्वैरविहार करणारे योगी निघून गेल्यावर शिवप्रमुख देव व वसिष्ठप्रमुख ऋषि आपापल्या स्थानी गेले.

दितीच्या पोटी गणेशावतार

सूत :– हे सर्व प्रवचन ऐकल्यावर दितीला गणपतीच्या ठिकाणी अत्यंत भक्ति उत्पन्न झाली. तिने आपला आसुरी स्वभाव सोडला. पुढे गणपतीची आराधना एकनिष्ठपणाने तिने केली आणि केवळ भक्तिसुखार्थ त्यास प्रसन्न करून घेतले. गणपतींनींही तिला वर दिला की, ' मी तुझ्या उदरी येऊन तुझे मनोरथ पुरवीन. ' पुढे एकदा माघ शुद्ध चतुर्थीला रविवारी नित्य नियमाप्रमाणे ती पूजा करीत असतां गणेशमूर्तीमधून अतितेजस्वी गणेशावतार प्रकट झाला. त्या तेजोगोलास पाहून दिति भयाभीत झाली व गणेशाचे स्मरण करू लागली. तेव्हां त्या सर्व मंगलदायक प्रभूने सौम्य रूप धारण केले आणि दिति व कश्यपाच्या ठिकाणी मोह उत्पन्न करून त्यांस अशी भ्रांति उत्पत्ति केली की, हा आपलाच पुत्र आहे. त्यांनी या बालकाचे जातसंस्कार मोठ्या प्रेमाने केले. मुद्गलाने सांगितले ' हा बालक देवांची स्वर्गामध्ये, मनुष्यांची पृथ्वीमध्ये व असुर नाग इत्यादिकांची पाताळामध्ये स्थापना करून चोवीस तत्वांची चालना करील. हे बाल दोन वर्षांचे झाले तेव्हा देवदानवामध्ये अति भयंकर युद्ध चालले होते. देवांनी राक्षसांचा पाठलाग पाताळापर्यंत करून त्यांस 'त्राहि त्राहि ' करून सोडले होते. मग ते आपल्या आईला म्हणजे

दितीला शरण गेले. दितीने हे वृत्त गणपतीस सांगितले, तेंव्हा राक्षसांचा समूल संहार करण्याची इच्छा करणाऱ्या देवांवर परशु सोडून गणपतीने त्यांचा पराभव केला. पुढे ते देव स्वर्गात गेले तरी त्यांच्या मागचा परशु सुटेना आणि मरण चुकेना. तेंव्हा ते गणपतीस शरण गेले आणि त्यांनी असे मागणे मागितलें की, 'दैत्यांच्या त्रासातून आम्ही सुटूं असा आम्हाला वर दे.' चतुर्भुजाने देवांस स्वर्ग, राक्षसास पाताळ आणि मनुष्यास भूलोक देऊन सांगितले की, 'सर्वांनी आपापल्या स्वधर्माप्रमाणे चालावे. उन्मत्त होऊन जो कोणी आपली नियमित कक्षा सोडेल त्यास मी चतुर्भुज दंड करीन. देव सात्विक, तेव्हा त्यांनी हा उपदेश मान्य केला. पण कांही दिवस गेल्यानंतर राक्षसांनी आपली मर्यादा सोडली. तेंव्हा दिति देवपक्षाकडे जाऊन गणपतीची अखंड भक्ति करूं लागली.

सूत :— सकाम भक्ति यथाविधि झाली तरी ती आसुरी फल उत्पन्न करते. विधियुक्त निष्काम कर्म हे नेहमी मोक्ष देणारे असते. मुनिहो ! हेंच तात्पर्य आपण सर्वांनी लक्षात ठेऊन धर्म, अर्थ, काम व मोक्ष साध्य करणारे जे गणेशचरित्र आहे त्याचे श्रवण एकनिष्ठ भक्तिने करावे असा दक्षास उपदेश करून मुद्गलमुनि विश्रांति घेण्याकरिता गेले.

[इति विघ्नराजचरित्र समाप्त]

अष्टम खंड

धूम्रवर्णचरित्र

महावाक्याचे उध्दाटन ० अहं राक्षसाचा गणेशद्वारा पराभव

सुत :– एकदां शेषाने शंकराला नमस्कार करून विचारले 'तुम्हीं परात्पर देव असूनही नित्य कोणत्यातरी देवाचे ध्यान व उपासना करता तें कां?' तेंव्हा शंकराने उत्तर दिले: 'अहंब्रह्मास्मि (मी ब्रह्म आहे) या महावाक्यांत ब्रह्म व अहंवृत्ति ही दोन्ही एकाच ठिकाणी एकस्वरूपी होतात. अशी वृत्ति होऊन अहंवृत्तिचा व ब्रह्माचा लय ज्या परब्रह्मामध्ये होतो ते परब्रह्म. 'मी' नाही व ब्रह्म नाही, असे ज्ञान ज्या योगाने होतें तें हें महावाक्य आहे आणि त्याचे चिंतन मी रोज करतो.' शेषास शंकराच्या बोलण्यावरून कांहीं बोध झाला नाहीं म्हणून शंकराने त्याला पुढील कथा सांगितली. 'एकदां कर्मस्वामी जो सूर्य त्याला गर्व झाला की, मी कर्मकर्ता, माझ्यापासूनच ब्रह्मा, विष्णु, शंकरादिकांची उत्पत्ति, ईश्वरासकट सर्व जगत् कर्माधीन, म्हणून मी सर्व श्रेष्ठ आहे.' गर्वाचे घर खाली! तेंव्हा असा चमत्कार झाला की. त्याला एक शिंक आली व तिच्यापासून महाकाय, विशालनयन व बलयुक्त असा एक सर्वांग-

सुंदर पुरुष उत्पन्न झाला. शुक्र तेथेच होता त्याने त्याचे 'अहं' असे नाव ठेवून त्याला गणेशमत्राची दिक्षा दिली; आणि 'अहं' ला तपश्चर्या करावयास सांगून आपण स्वाश्रमीं निघून गेला. 'अहं' ने ह्या मंत्राचा जप करून तपश्चर्या केली आणि गणपतीस प्रसन्न करून घेऊन या वशचैतन्यापासून मला मृत्यु नसावा, त्रैलोक्याचे राज्य असावे, आरोग्य असावे व माझे अस्त्र अमोघ (नित्य जय देणारे) असावे.' असे वर मागितले. मग 'तथास्तु' असे विघ्नराजाने म्हटल्यावर 'अहंला' अति आनंद झाला; आणि गणपति अंतर्धान पावल्यावर 'अहं' शुक्राचार्यांकडे गेला आणि त्याला सर्व वृत्तांत सांगून त्याने त्यांच्याकडून शाबासकी मिळवली. पुढे लवकरच त्रैलोक्यांतील सर्व राक्षस एकत्र केले आणि विषयप्रियनामक नगरीत राज्याभिषेक करवून घेऊन ममता नामक एका सुंदर कुमारीशी लग्न केले. कांही काळ लोटल्यावर चतुरंग सेना सिद्ध करून त्याने पृथ्वीतील क्षत्रियांचा पराभव केला व तेथील सर्व राजांस आपले मांडलिक केले. नंतर स्वर्ग व पाताळ या लोकांत जाऊन व तेथील अधिपतींचा पराभव करून ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, देवी यांस अहंने आपल्या अमोघ अग्निअस्त्राने भाजून काढले व सर्वत्र त्याने आपली सत्ता प्रस्थापित केली. अर्थातच देवांस वनवासाचा व कंदमुळे भक्षण करण्याचा प्रसंग प्राप्त झाला. अहंने या पळून गेलेल्या देवांच्या स्थानांवर आपले हस्तक नेमले आणि भूलोकी आपण सर्व प्रकारच्या धर्मविहित व धर्मनिषिद्ध व्यसनांमध्ये सर्वथा आसक्त झाला; इतकेच नव्हे तर सर्व भूलोकावर राहणाऱ्या जीवांच्या हातून होणाऱ्या सत्कर्मांचा लोप करून यज्ञयाग, स्वाहा, स्वधाकार यांस नामशेष करिता झाला. झाला. बिचारे देव! ते अनाथनाथ आणि दीनवत्सल

जो धूम्रवर्ण त्याला अनन्यभावाने शरण जाऊन हजार वर्षे त्याची एकनिष्ठ तपश्चर्या केली. या त्यांच्या जगत्कल्याणकारी तपश्चर्येमुळे परमेश्वराला संकट पडून तो प्रसन्न झाला, आणि गणपति धूम्रवर्णरूपाने (धुरासारखा आहे वर्ण ज्याचा असा) प्रकट झाला आणि देवांचे इच्छित मनोरथ पूर्ण करण्याचे अभिवचन त्यांस त्याने दिले. इकडे अहं राक्षसाला अनेक प्रकारचे अपशकून त्रास देऊं लागले. वृद्धांचे बोलणे त्यास आवडेना. नारदमुनीच्या उपदेशाचा त्याने धिःकार केला; आणि देवांवर व देवेश्वरावर हल्ला करण्याकरता प्रथम आंपणच स्वसैन्यासह बाहेर पडला. धूम्रवर्णाने प्रकट होऊन आपले पाशनामक अस्त्र दैत्यांवर सोडले, तेव्हा काय विचारतां! हजारो राक्षस त्या अस्त्राला बळी पडले त्याचे मोटमोठाले सचित्र पाशाच्या तेजाने दग्ध झाले आणि अहंचे जे अमोघ अग्न्यस्त्र त्यालाही पाशास्त्राने जाळून भस्म केले. हे पाहून मात्र अहं राक्षस भ्याला. तो पळून आपल्या नगरीमध्ये जाऊन बसला आणि शुक्रास बोलावून आणून. ‘माझे अमोघ अस्त्र आज मोघ (व्यर्थ) झाले!’ असे ह्मणून शोक करूं लागला. शुक्राने त्याला गणेशब्रह्माचे, त्याच्या स्वरूपाचे, त्याच्या मायेचे आणि त्याच्या योगाचे ज्ञान सांगून पुढे म्हणाला की ‘तूं त्याला शरण जा, म्हणजे तुझे कल्याण होईल, जीव आपापल्या धर्माने जोपर्यंत चालतात तोपर्यंत त्याचे कल्याणच होत असते. अधर्माने मात्र केव्हांही पाहिले तरी अव्यवस्थाच उत्पन्न होते आणि ती मोडण्याकरता परमेश्वराला अंशावतार अथवा पूर्णावतार घ्यावा लागतो. तेव्हां स्वतःचे कल्याण तुला हवे असेल तर तूं परमेश्वराला शरण जा.’ हा उपदेश ‘अहं’ असुराला आवडला. लागलीच ‘ॐश्री’ या ब्रह्मवाचक अक्षरांनी प्रारंभ केला आहे अशा

गणेशमंत्राची शुक्रगुरूंकडून दीक्षा घेऊन त्याने अत्युग्र तपश्चर्या केली; आणि गणपतीला प्रसन्न करून त्यापाशी अखंड 'भक्ति' मागितली शेवटी विघ्नेशाने त्याला आज्ञा केली, 'सकाम कर्म करणाऱ्या जीवाच्या अंतःकरणांत अहं व ममता या स्वरूपाने रहात जा आणि माझी जे निष्कामभक्ति करणारे माझे भक्त आहेत त्यास बिलकुल त्रास देऊं नको.' ही विघ्नराजाची आज्ञा घेऊन गणपतीचा त्याने नमस्कारपूर्वक निरोप घेतला. इकडे 'अहं' च्या त्रासापासून मुक्त झालेल्या देवांनी परमेश्वराची पुष्कळच स्तुति केली; परमभक्तीने त्याचे भजनपूजन केले आणि 'आता स्वधर्म स्थापना झाली आहे, आमचे व विश्वाचे कल्याण करवून दाखविण्याचा समय प्राप्त झाला आहे, आणि वर्णाश्रमाची पुनः संस्थापना झाली आहे. ही सर्व स्थिति अशीच नित्य राहो.' असे त्यांनी देवाजवळ मागणे मागितले. विघ्नराज अंतर्धान पावल्यावर देवांनी त्याची कुरुक्षेत्रामध्ये मूर्ति स्थापन केली, आणि त्याचा भक्तिसंप्रदाय वाढविला. मयूरक्षेत्राप्रमाणेच सर्व देवदेवता, तीर्थे व सर्व सिद्ध येथे राहतात. येथे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला वार्षिक उत्सव होतो

अहंता व माया

सूत :– शौनकादि ऋषिनो ! तुम्हांस मागे सांगितलेच आहे की, शंकर, विष्णु, ब्रह्मदेव इत्यादि सर्व ब्रम्हे परमेश्वराचेच म्हणजे धूम्रवर्णाचेच सर्व अंशावतार आहेत. या सर्वांत व सर्व जीवांत अहंचा (मीपणाचा), ममतेचा जो अभिमान असतो त्याचा नाश करावयाचा असतो, शिवाय ही गोष्ट लक्षांत ठेवावयाची आहे की, सर्व जीव व जीवेश्वर शिव हे स्वतःच्या संबंधाने सर्वथा शक्तिशून्य

आहेत. कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथाकर्तुम्, सामर्थ्य एका गणेशरूपी परमेश्वरामध्येच आहे, हे रहस्य जाणावे. माया ही तीन प्रकारची आहे. तिच्यावर जय मिळवावयाचा असेल तर तुरीय (चतुर्थ) जे गणेशब्रह्म त्याच्या आश्रयास गेले पाहिजे, हा सिद्धांत समजला तेंव्हां शंकराला ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेला जो त्रिपुरासुर त्याचा वध करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले.

बाणासुराचा श्रीकृष्णद्वारा पराभव

सूत :– मुनिहो, ऐका: बलिपुत्र बाण हा परम धार्मिक असून शिवभक्त होता. त्याने तपश्चर्या करून शंकराकडून आपल्याला सहस्त्र बाहु मागून घेतले होते; पुढे त्याने सर्व विष्णुप्रमुख देवांचा पराभव केला हे खरे. पण वर्णाश्रमधर्म कायम ठेवून देव, मनुष्य, राक्षस या त्रिवर्गात स्वधर्माने चालण्यास उत्तेजन देऊन त्यांच्या त्यांच्या लोकांत कायम ठेवले, असो; शंकराची पूजा करण्याकरता बाणासुर नित्य कैलासाला जात असे, शंकरही त्याच्याकडे कव्हां केंव्हां त्याच्या नगरांत रहावयास जात असे. बाणासुर स्वतः कट्टर शंकरभक्त होता, तेंव्हां आपल्यास सर्वथा पूज्य जो शंकर त्याला सोडून 'मी केव्हांही गणपतीची किंवा अन्य देवांची भक्ति करणार नाही' असा त्याने निश्चय केला. देवपंचायतन माहीत असूनही तो केवळ शंकराची भक्ति करी. 'आपण मोठे बलवान आहो' असाही गर्व त्याला झाला होता. पुढे एकदा शंकरांनी त्याला 'वर माग' म्हटले, तेंव्हा 'माझ्या हजार बाहुंशी युद्ध करणारा एखादा योद्धा उत्पन्न कर' असा वर मागितला; तेंव्हां शंकर रागावला आणि 'तूं राज्यभ्रष्ट होशील व तुझे हजार बाहु यादव कुलोत्पन्न वासुदेव तोडेल,'

असा शाप देऊन शंकर कैलासाला निघून गेला. यामुळे खिन्न झालेल्या बाणासुरास उपदेश करून शुक्राने त्याकडून गणेशाची भक्ति करविली, आणि त्याने पुनः 'राज्यावर प्रस्थापित होशील' असा गणपतीकडून वर मागून घेतला. त्या दिवसापासून तो गणेशस्मरणपूर्वक शंकराची उपासना करीत असे. बाणासुराला उषा या नांवाची एक कन्या होती. तिला अनिरुद्ध नामक कृष्णाच्या नातवाने तिच्या स्वप्नात येऊन वरले होते. त्याच अनिरुद्धाला चित्रलेखा नामक उषेच्या सखीने तिच्या मंदिरात आणून तिचा व अनिरुद्धाचा गांधर्वविवाह लावला होता. प्रद्युम्नाला ह्मणजे अनिरुद्धाच्या बापाला हे अनिरुद्धाचे प्रयाण नारदाने कळविले. तेंव्हा सर्व द्वारकेतील यादवास राग आला. त्यांनी गणेशस्मरण करून बाणाच्या शोणित नगरीवर हल्ला करण्याचा व अनिरुद्धास सोडविण्याचा संकल्प करून स्वारी केली; या युद्धांत कृष्णाने बाणासुराचा पराभव करून त्याचे हात तोडले. शेवटी त्याचे संरक्षण करण्यासाठी शंकर धावून आला, तेंव्हां कृष्णाने त्यावर झोप येणारे अस्त्र टाकून शंकराला मोहित केले. इकडे बाणाचे दोन हात मात्र शिल्लक राहिले. कृष्णालाही ते हात तोडता येईनात. कारण गणपतीच्या वराने ते दोन्ही हात सुरक्षित होते. शंकरावरील मोहिनी काढून घेतल्यावर कृष्णाने शंकरास आलिंगन दिले आणि उषा अनिरुद्ध यांचे विधिपूर्वक लग्न लावून व बाणास शोणित नगरीचे राज्य देऊन कृष्ण आपल्या पुत्रपौत्रांसह द्वारकेला परत गेला.

गणपतीला तांबडा रंगच प्रिय कां ?

सूत :- शौनका ! 'गणपतीला तांबडा रंगच कां प्रिय असतो ? तो सर्वव्यापी असतां आणि सर्ववर्णपूर्ण व सर्ववर्णशून्य असतां, त्याला

एकच रंग कां संमत होतो ? ' असा जो तुम्हीं प्रश्न विचारला, त्याचें उत्तर हे कीं, पूर्वी पांढरा, काळा, तांबडा, पिंवळा, निळा हेच कायते मुख्य रंग होते. यांच्यात भेदाभेद करून व संमीलन (मिसळणे) करून अनंत रंग उत्पन्न होतात. या सर्वांनी ' आमच्या स्वरूपाचे परमेश्वराने असावे, त्याला आमचा रंग असावा ' असा संकल्प करून या सर्व रंगांनी तपश्चर्या केली व परमेश्वरास प्रसन्न करून घेऊन इष्ट वर प्राप्त करूनही घेतले. परमेश्वराने सर्व चराचरातील वस्तूंना भिन्न भिन्न रंग असतील असे केले. व आपणही कश्यपपुत्र असता निळा, मयूरेश अवतारात पांढरा, वरेण्यसुत होता तेंव्हां तांबडा, धूम्रवर्ण असता श्याम इत्यादि भिन्न वर्णांचे अवतार घेतले. पुढे एकट्या रक्तवर्णाने परमेश्वराची आणखी तपश्चर्या केली आणि ' आपण नेहमी रक्तवर्ण आणि रक्तप्रिय अशा वर्णांचे असावे, म्हणजे मी सर्व रंगांत श्रेष्ठ होईन ' असा वर मागून घेतला व मिळविला.

कलियुग वर्णन

सूत :– शौंनकादिमुनिहो ! द्वापार युग संपल्यानंतर पाप ज्यांत अत्यंत असते, अशा या कलियुगाला आरंभ होतो. ह्या वेळी विष्णु हा बुद्धाचा अवतार घेऊन गणपतीचे चिंतन करीत राहतो. बौद्ध शास्त्र हे वर्णाश्रमधर्माला नाहीसे करणारे आहे, हे तुम्ही जाणता. या युगांत बुद्धिपति गणपति देवांच्या व ब्रह्माच्या अंतःकरणांत राहून चित्तपंचकास प्रवृत्त करतो, म्हणून त्याला विनायक म्हणतात विनायक म्हणजे नायकशून्य अथवा स्वेच्छाचारी परमेश्वर होय. या देवाचे ज्ञान झाले असता जीव मोहशून्य होतो. या युगात शरीराला कष्ट देऊन बुद्धिला संताप देणारे कर्म करण्याचे कारण

नाही. 'मी ब्रह्म आहे. असे ध्यान मात्र निरंतर असावे. जीवहिंसा व वृक्षहिंसा करू नये. मनःपूत शुद्ध मनाला शुद्ध वाटेल असे आचरण करावे. हे आचरण खरोखर पाहतां अवधूताचे म्हणजे संसाराचा परित्याग करून शुद्ध चित्त झालेल्या मुमुक्षूचे, संन्याशाचे अथवा विरक्ताचे आहे, असे विहित असतांही या कलियुगात बुद्धिप्रेरित मोहाने हे आचरण सामान्य व संसारी जनांनीही स्वीकृत केले आहे. कारण येथे धर्माधर्मानें होणारा त्रास चुकविण्याची सर्वांची प्रवृत्ति आहे. या अधर्म प्रभावाचा नाश करण्याकरितां व पापनिवृत्ति करण्याकरिता देवदेवेश्वर गणपति हे देवांच्या विनंतीवरून अवतार घेणार आहेत व जीवांच्या अंतःकरणांत जी पापवृत्ति असते तिचाही नाश करणार आहेत.

चार युगांचे वर्णन

सूत :– मुनिहो! तुरीय देहांत राहणारे ब्रह्म ते कृतयुग, सुषुप्तीच्या देहांतील त्रेता, स्वप्न देहांत राहणारे द्वापार आणि जागृत देहांत राहणारे ब्रह्म हे कलियुग अशी युगव्यवस्था व जीवस्थिति यांची सांगड आहे, पण येथे सर्व देहांतरी असणारा आत्मा एकच आहे माया मात्र देहभिन्नतेने निरनिराळ्या स्वरूपाची असल्यामुळे तिचे स्वरूप निरनिराळे असते, असे कांहीं तत्त्वज्ञ ह्मणतात. तसेच ध्यान हे कृतयुग, यज्ञ त्रेता, आचार द्वापार आणि देहविषय हा कलि असे दुसरे तत्त्वज्ञ म्हणतात. यांच्या मते ज्ञान आणि ध्यान हे म्हणजे कृत व त्रेतायुगे चालू असतां येथे म्हणजे त्या युगांत एकच वर्ण आणि एकच आश्रम असतात. यज्ञकालांत मात्र भिन्नभिन्न वर्णाश्रमांची व्यवस्था सुरू होते. पण वस्तुस्थिति अशी आहे की,

कृतयुगांत सात्विक स्वधर्माला योग्य आणि जीवाला मोक्षदायी असेच आचरण होते. त्रेतायुगात भुक्ति (भोग) व मुक्ति या उभयतांची व या प्राप्त करून देणाऱ्या कर्मांची आवड जीवास असते. द्वापारात धर्माचरण करून विषयसौख्य मिळवावे हीच काय ती आवड जीवास असते आणि कलियुगांत पापपुण्याचा विचार न करता केवळ देहसुखार्थच कर्म करण्याची प्रीति असते. कृत युगात लक्षजीवांत एक पापी, त्रेतामध्ये लक्ष जीवांत शंभर पापी, द्वापारामध्ये लक्षजीवात दहा हजार पापी आणि कलियुगात सर्वच पापी अशी व्यवस्था आहे व असावयाची. कलियुगात धर्माधर्म विचार केवळ मोहकृत असतो. कृतयुग चालू असता बाकीची सर्व युगें कृताच्या ताब्यात असतात व त्याची जशी आज्ञा असेल त्याप्रमाणे वर्तन करतात. अशीच प्रत्येक युगकालांत बाकीच्या सर्व युगांची व्यवस्था आहे. म्हणजे कलियुगकाली बाकीची सर्व युगें कलीच्या स्वाधीन असतात. असो; कलियुगामध्ये जर सिद्धि प्राप्त करून घ्यावयाची असेल तर विहित आचाराला प्रारंभ करावयाच्यापूर्वी जीवाने गायत्रीचा जप केला पाहिजे. हविष्यान्नाचे सेवन करून एकमुक्ति, ब्रह्मचर्य, सत्य-भाषण, मनःसंयमन, अंतर्बाह्यशुद्धि अशा व्यवस्थेने जर विहित कर्म केले तर कर्मसिद्धि प्राप्त होईल, इतकेच नव्हे तर चौपट फळ प्राप्त होईल.

वज्रपंजर मंत्र रहस्य

सूत :– मुनिहो ! वर्षाच्या बारा महिन्यात जी जी विहितकर्मे आपण करतो, ती आदित्याच्या साक्षीने व ब्रह्मार्पण बुद्धीने केली तर उत्तम प्रकारची सिद्धि जीवास प्राप्त होते. मळमासांत (अधिक

मासात) संक्रांत नसते म्हणून त्या महिन्याची देवता गणपती असते. ह्या मासांतील कर्म गणेशसाक्षीने व गणेशार्पणबुद्धिने केले असता ते कर्म, इतर महिन्यात न मिळणारी उत्तम उत्तम फले देणारे होते. प्रत्येक महिन्यात मुमुक्षुने अरुणोदयकाली स्नान, संध्या, ब्रह्मयज्ञादि कर्मे, गणेशपूजा, हविष्यान्नभक्षण, एकभुक्ति (एक वेळ भोजन करणे), सत्यभाषण इत्यादि कर्मे आंपापल्या अधिकाराप्रमाणे केली तर उत्तम प्रकारची सिद्धि प्राप्त होते. गणेशभक्तांनी शमीमंदिरांची पूजा करणे (त्यांना पाणि घालणे, प्रदक्षिणा घालणे, गाईची शुश्रूषा करणे इत्यादि) अवश्य आहे. मत्स्यरूप घेऊन विष्णूस शंखासुर मारता आला त्याचे मुख्य कारण हे होते की, विष्णूने बदरिकाश्रमी कार्तिकमासी व्रतस्थ राहून गणेशाचे आराधन केले होते. याचप्रमाणे सोमदत्त नावाचा ब्राह्मण गणेशभक्ति करीत असता व मौन धारण करून गणेशसेवा करीत असता एकदा त्याच्या पूजाद्रव्यांतून दूर्वा, शमी व मंदारपुष्पे अकस्मात् नाहीशी झाली ! तेंव्हा तो आपल्या अंगाची त्वचा व शिखा परमेश्वरास अर्पण करण्याच्या बुद्धिने स्वशिरच्छेद करण्यास तयार झाला, तेंव्हा गणपति प्रसन्न होऊन त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण करते झाले. सोमदत्ताला गणेशदर्शन झाले ते कार्तिक महिन्यात झाले. अशी सिद्धि केवळ ब्राह्मणांसच प्राप्त होते असे नाही, तर कोणत्याही वर्णातील व कोणत्यांही आश्रमांतील जीवाने व्रतस्थ राहून वरीलप्रमाणे गणेशपंचकाचा स्वीकार केला आणि गणेशभक्ति केली तर सर्व प्रकारची सिद्धि प्राप्त होते. शंकराला अंधकासुराचा वध करता आला तो केवळ त्याने मार्गशीर्ष मासांत गणेशपंचकपूर्वक गणपतीची आराधना केली होती म्हणून होय. त्यावेळी गणपतीनी शंकराला ‘ वज्रपंजरा ’ चे रहस्य सांगितले

होते. ते असेः- ' 'हृदयात राहणारा बिंदुरूप वक्रतुंड माझ्या चार देहांचे संरक्षण करो, सोहंस्वरूपी एकदंताने देहमोहयुक्त जो मी त्या माझे रक्षण करावे; बोधानंदरूप महोदर हा, माझ्या ज्ञानाचे संरक्षण करो, सांख्येश गजानन माझ्या सांख्यज्ञानाचे रक्षण करो, लंबोदर हा असन्मायेमध्ये राहणारा जो मी त्या माझे रक्षण करो, परात्परविकट हा सद्वस्तूमध्ये राहणारा जो मी त्या माझे रक्षण करो, समात्मक विघ्नराज आनंदामध्ये राहणारा जो मी त्या माझे रक्षण करो, सुखरूप धूम्रवर्ण हा अव्यक्ताच्या मोहात राहणारा जो मी त्या माझे रक्षण करो, स्वरूपधारी गणेश स्वसंवेद्याच्या मोहात राहणारा जो मी त्या माझे रक्षण करो, निवृत्तिरूप गणेश्वर हा अयोगाच्या मोहांत राहणारा जो मी त्या माझें रक्षण करो, सिद्धिबुद्धियुक्त गणाधीश हा, योगाच्या मोहांत राहणारा जो मी त्या माझें रक्षण करो, याचप्रमाणे दशदिशांस राहणाऱ्या ज्या गणपतीच्या विभूति आहेत त्या माझे संरक्षण करोत!' असा मंत्र मार्गशीर्षमासांत नित्य म्हटला म्हणजे गणेशरूपी वज्रपंजर सिद्ध होऊन तो सर्व विघ्नांचे सर्व बाजूंनी निवारण करतो. हा वज्रपंजररूपी मंत्र गणपतींनीं शंकराला अंधकारासुराच्या वधापूर्वी सांगितला होता तसेच एका साधु नांवाच्या भारद्वाजकुलोत्पन्न ब्राह्मणानें मार्गशीर्ष मासीं व्रतस्थ राहून गणेशाची विधियुक्त आराधना केली. एके दिवशी साधु हा एका ब्राह्मणास इच्छा भोजन घालीत असतां कितीही अन्न वाढले तरी त्याचे समाधान होईना, म्हणून त्याला दूर्वारस गणपतीचे स्मरण करून वाढता झाला आणि तो ब्राह्मण तृप्त झाला. त्याच वेळी गणपतीचा साक्षात्कार होऊन त्या साधु ब्राह्मणाचे सर्व मनोरथ पूर्ण झाले. याचप्रमाणे माघ मासात विष्णुप्रमुख

देवांनी व देवलप्रमुख सर्व ऋषींनी गणेशाचे आराधन केले, म्हणून विष्णूला सूर्यवरप्रदानाने उन्मत्त झालेल्या विरोचनाचा वध मोहिनीचे रूप घेऊन करतां आला. हा वध करणे अवघड होते. कारण सूर्याने विरोचनाला आपला मुकुट देऊन असे सांगितले होते की, हा मुकुट जोपर्यंत तुझ्या मस्तकावर आहे तोपर्यंत तुला मृत्युचे भय नाही असो; गणेशाराधन करून मोहिनीरूपी विष्णूने विरोचनाला स्वसौंदर्याने इतके मोहित केले की, मोहिनीने विनंति केल्याबरोबर मस्तकाला सुवासिक तैलाभ्यंग करण्यासाठी आपल्या मस्तकावरील मुकुट काढून ठेवण्याची परवानगी दिली. नंतर एका क्षणात विरोचनासुर हा विष्णुहस्ताने मृत्यु पावला हे सांगावयास नकोच. याच व्रताच्या पुण्याईने विश्वसहनामक एका गणेशभक्ताने माघ महिन्यात एका नष्ट व पापी राक्षसिणीचा उद्धार केला.

वैशाख, श्रावण व मलमासात सिद्ध झालेल्या गणेशव्रताचे माहात्म्य

सूत :– वैशाख, श्रावण व मलमास या महिन्यात सिद्ध झालेल्या गणपतिव्रताने इंद्राला वृत्रासुराचा वध करता आला. श्रावण महिन्यांत सिद्ध झालेल्या व्रताने रामचंद्राला लवणासुराचा वध व वैशाख मासांत सिद्ध झालेल्या व्रताने शंकराला जालंधराचा वध करता आला आणि मलमासांत सिद्ध झालेल्या व्रताने विष्णुप्रमुख देवांना गणपतीस प्रसन्न करून घेतां येऊन कलियुगांत अधर्मांचा नाश करता झाला.

शास्त्रांचे रहस्य

सूत :– एकदां नैमिषारण्यामध्ये वसिष्ठ मुनि यज्ञ करीत असतां तेथे सर्व देवेंद्र, विप्रेंद्र व नानावर्णाश्रमांतील मुख्य जमा झाले होते.

महायोगी शुकही वसिष्ठयज्ञ पाहण्यासाठी आला होता सर्व प्रेक्षकांनी विनति केल्यावरून त्याने जमलेल्या सर्व देवदिकांस शास्त्रांचे रहस्य सांगितले. तें असेः– अन्नब्रह्म नावाचा रजोगुणी अन्नमय कोश हा स्थूलस्वरूपी व जागृतिविकारयुक्त आहे प्राणकोशाचे प्रकाशक प्राणब्रह्म, मनःकोशाचे प्रकाशक मनोब्रह्म, विज्ञानकोशाचे प्रकाशक विज्ञानब्रह्म, ही सूक्ष्मतर व सूक्ष्मतम असून स्वप्नरूप असतात. ही अंतःकरणांत राहतात. ही ब्रह्में म्हणजे सूक्ष्म देह व स्वप्नस्थिती यांची दर्शक होत. आनंदकोशात राहणारे आनंदब्रह्म दोन्ही ठिकाणी (स्थूलसूक्ष्मांत) समभावाने राहून सुषुप्तिरूप व कारणरूप असते. आत्मप्रत्यय देणारे चेतनासस्थ ब्रह्म चैतन्य नावाचे असते. याची अवस्था तुर्या आहे. हिला अस्मिता म्हणतात. हे नाददेहाचे प्रकाशक आहे. जीवाला जे चार देह (स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असे) आहेत, त्यांच्या संयोगामध्ये देहात्मक धारक जे (१) बिंदुमय ब्रह्म आहे तें 'त्वं' पदाच्या आश्रयाने राहते असे म्हणतात. कारण येथे उत्पति, स्थिति व नाश यांच्या संयोगवियोगाने उत्पन्न होणारे जे चार प्रकारचे देह असतात, त्यांच्या आश्रयाने म्हणजे देहाश्रयाने अथवा त्वंपदाच्या आश्रयाने हे ब्रह्म असते, म्हणून याला त्वंपदाश्रित म्हणतात. (२) आतां सांगितलेल्या चार देहांच्यामध्ये विद्यमान असणारा, उत्पति, स्थिति, नाश विहीन असणारा चो सद्रूपी देही (शरीरी) असतो त्याला सोहं पदाचा (तो मी आहे या वृत्तीचा) आश्रय असतो. हा बिंदूच्या (ह्मणजे प्रकृतीच्या) मोहाने नानाप्रकरचा दिसतो, पण भ्रांति-नाश झल्यावर अभेदरूपी ह्मणजे एकरूपी, एकच असतो त्याला 'तत्पदाश्रय' अशी संज्ञा आहे. तात्पर्य, देहाभिमान असणे ही

जीवदशा (त्वंपदस्थिति) आहे आणि देहाभिमान शून्य असणे ही परमात्मस्थिति (तत्पदस्थिति) आहे. असो, या त्वंपदाख्य (चतुर्विध देह धारण करणाऱ्या) ब्रह्माचा आणि तत्पदाख्य (चारी प्रकारचे देह अथवा तद्‌गुण नसणाऱ्या) ब्रह्मांचा संयोग होणे म्हणजे अभेद होणे याला 'असिपद योग' असे म्हणतात. हा केवळ ज्ञानरूप आहे. हा बाह्य नाहीं, अंतरंगांतील नाही, सम, नाही, अस्मिता नाही, बिंदु नव्हे, सोहंकाररूप नव्हें, व अभेदरूपही नव्हे. सारांश, हा बोध किंवा हे ज्ञानरूप 'नेति रूपानेच' दाखवितां येणार आणि ज्ञानरूपानेच कळणार. हा जेव्हां प्रकृतिपुरुषसंयोगरूपाने उत्पन्न होणाऱ्या सुखाचा ज्ञाता असतो व या उभयतांस उत्पन्नही करणारा होतो; म्हणजे हे दोन प्रकार (वस्तु आणि वस्तुज्ञान) म्हणजे द्वैत उत्पन्न करून तेथे क्रीडा करणारा हा परमात्मा असतो. हा परमात्मरूपी 'बोध' (संप्रज्ञात योग) स्वतःस स्वतःच्या क्रीडेसाठी स्वतःपासून निराळा करतो म्हणून याला 'स्वतः उत्थानक' असे ह्मणतात याच्या पलीकडे क्रीडाशून्य व बोधनाशयोगाने प्राप्त होणारे (असंप्रज्ञात योगाने प्राप्त होणारे) जे ब्रह्म त्याला 'विबोध' हे नांव आहे हे अवर्णनीय आहे. हे देह आणि देही यांच्यामधील जे अभेदात्मक ब्रह्म ह्मणजे सदात्मक ब्रह्म (स्वत उत्थान ब्रह्म) असते, ह्मणजे त्यांत देह आणि देही यांच्या अभेदाचे ज्ञान आहे, तथापि या ज्ञानात देह आणि देही यांचे व्दैत ज्ञानही असते.) त्याच्या पलीकडचे जे अनुभव ज्ञान त्याला विबोधात्मक ब्रह्म (पर उत्थानक ब्रह्म) म्हणतात. विषयापासून (विषयभ्रमापासून) उत्पन्न होणारा जो बोध त्याचा नाश झाला अथवा विषयज्ञानात्मक ब्रह्माचा लय झाल्यानंतर विबोधाख्य ब्रह्माचा (निःसंगब्रह्माचा) उद्भव होतो. येथे शुद्ध आनदाचा अतिशय

आहे. हा स्वसंवेद्य आहे, येथे सर्व ब्रह्मांचा संयोग आहे; ह्मणजे येथे सर्व ब्रह्मे एकरूप होतात. हे संयोगाख्य ब्रह्म स्वरूपात्मक आहे म्हणून तें 'स्वतः उत्थान शून्य व परत उत्थान शून्य' असते, म्हणजे तें आपल्या स्वतःच्या मोठेपणामध्ये मात्र स्थित असते. याच स्वानंदवाचक ब्रह्माचे असत्, सत्, सम, नेति, स्वानंद असे पांच प्रकार आहेत. या पांच प्रकाराचे विवेचन आत्ताच तुम्हाला सांगितले आहे. या पांच प्रकारात योग्यांना जो भिन्न भिन्न अनुभव येतो तें तें त्या त्या प्रकाराचे नाव होते. अन्नब्रह्म हे सर्वकनिष्ठ आहे. येथे समाधि लागून अन्नब्रह्माच्या अनुभवाचा त्याग झाला म्हणजे जीवाला प्राणब्रह्माचा अधिगम होतो. याचप्रमाणे समाधि लावून मनोब्रह्म, विज्ञानब्रह्म व आनंदब्रह्म यांचा उत्तरोत्तर अधिगम होत जातो; आणि शेवटी सर्व नामरूपांचा व उपाधींचा लय होऊन मायाशून्य अशा परब्रह्माची प्राप्ति होते. (मुक्ति मिळते.) मायेचा नाश केवळ एक गणेशयोगामुळेच होतो. या योगाचे रहस्य तुम्हास मागे सांगितलेच आहे. श्रोत्यांनो! तुम्हास नित्य शांति हवी असेल तर गणेशयोगाची आराधना करून तो प्राप्त करून घ्या. गणेशयोगाच्या साहाय्याने मात्र ब्रह्मप्राप्ति म्हणजे शांति-प्राप्ति होते.

श्रीगणेशभक्तिचे माहात्म्य

सूत :– पूर्वी एकदां गालव नावाचा तेजस्वीं व शापानुग्रहसमर्थ (शाप देण्यास व कृपा करण्यास समर्थ) एक ऋषिने पृथ्वीवरील सर्व तीर्थांची यात्रा केली व शेवटी आपला गुरु जो विश्वामित्र त्याच्या आश्रमात येऊन यात्रा पूर्ण केली. कांहीं दिवस तेथे राहिल्यावर त्याला विश्वामित्राने गणेशब्रह्माचे, गणेशस्वरूपाचे

व गणेशयोगाचे रहस्य सांगितले; आणि ' शक्ति, सूर्य, विष्णु, शंकर हे ईश्वर-स्वरूपी आहेत, तथापि ते सगुण आहेत म्हणून महा-प्रलयाच्या वेळी ब्रह्मामध्ये लय पावतात. पण सगुण असून निर्गुण, निर्गुण असून सगुण आणि सगुणनिर्गुणशून्य असा स्वानंदवासी नित्यशांत जो गणपति त्याचा केव्हांही नाश होत नाही. त्याला केव्हाही जन्म प्राप्त होत नाही. असा तो आहे म्हणून त्याला ' ज्येष्ठराज ' असे नाव आहे ' असे गणेशब्रह्माचे महत्वही सांगितले. पुढे गालवाला गणेशप्राप्ति व्हावी म्हणून विश्वामित्राने त्याला एकाक्षरी गणेशमंत्र दिला; आणि श्रावण महिन्यांत गालवाने हे पुरश्चरण केले म्हणून त्याला मयूरक्षेत्रांत राहून क्षेत्रसंन्यास घेण्याची बुद्धि झाली व तो महागणपतिभक्त झाला. श्रावण महिन्यांतील गणपतीच्या पूजनाचे माहात्म्य इतके आहे की, ब्रह्महत्त्यादि महापातके करणाऱ्या चांडाळांनी श्रावण महिन्यांत गणेशभक्ति केली तर त्यांची पापवृत्ति हळूहळू कमी होत जाऊन शेवटी ती नष्ट होते आणि पुण्यसंचय मोठा मोठा होत जाऊन शेवटी ते निष्कामकर्म व निष्कामभक्ति यांच्या साहाय्याने पूर्ण ज्ञान मिळवून घेऊन अंती स्वानंदवासी होतात.

कली व गणेशपूजन

सुत :– मुनिहो ! कलियुगामध्ये तर कलिराजा आपले सर्व पापसैन्य बरोबर घेऊन मूर्तिमंत अवतीर्ण होतो. या कलीचा पराभव आपापल्या सामर्थ्याप्रमाणे कित्येक देव करतात, पण कलियुगाला गणपतीचा आश्रय आहे म्हणून कलीचा संपूर्ण नाश केव्हांही होत नाही हा कलिवृक्ष तोडला तरी पुनः वाढतच राहतो. या युगांत ज्या वेळी स्त्रिया दहाव्या वर्षी गर्भधारण करतील, मनुष्याचे तीस

वर्षेच आयुष्य होईल आणि सर्वत्र वर्णसंकर होईल, तेंव्हा कल्की अवतार धरून विष्णु कलीचा पराभव करील व धर्मसंस्थापना करील. पण जेव्हां पांचव्या वर्षी नारीला गर्भ राहील आणि सोळावे वर्ष हीच आयुष्याची मर्यादा होईल; तेव्हा शिवविष्णुप्रमुख देवांस अशक्य असा जो कलिनाश तो एक धूम्रवर्ण गणपतिच करूं शकतो. मलमासामध्ये विष्णूने गणेशपूजन केले ह्मणून त्याला कलीचा पराभव करता आला. धौम्यऋषीनेही शंकराजवळ जाऊन त्याच्याकडून गणेशस्वरूपाचे स्पष्टिकरण करून घेतले आणि मलमासात गणपतीचे यथाविधि पूजन केले. अर्थातच त्याला शांतियोगाची प्राप्ति झाली. मलमासांत गणेशपूजन केले असतां कोणत्याही वर्णांतील जीवाचे पापविमोचन होते, इतकेच नव्हे तर पूर्वजन्मकृत पापांचे विनाशन होऊन शिवाय प्रारब्धकर्माने पिशाच्चयोनि प्राप्त झाली असेल तर तिचाही नाश होतो.

नलराजाद्वारे गणेशपंचकपूर्वक द्वारयात्रेचे व गणेशव्रताचे अनुपालन

सूत :– निषध देशांतील नलराजाने श्रावण महिन्यांत प्रतिपदेपासून चार दिवसपर्यंत गणेशपंचकपूर्वक द्वारयात्रेचे व गणेशव्रताचे यथासांग अनुपालन केले व बारा ब्राह्मणाच्याद्वारा होमहवनयुक्त पुरश्चरण केले. सवाष्णींस व ब्राह्मणास विपुल दक्षणा दिली व वस्त्रालंकारही दिले म्हणून त्याला गणेशकृपेने वाटेल तेथे जाण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. शिवाय स्वानुभवी गणपतिभक्त असेही सांगतात की, गणेशध्यानपूर्वक गणेशव्रताचे एक अंग जरी सांगोपांग सिद्ध झाले तरी पुष्कळ कार्य होते आणि शेवटी शेवटी आपल्याला समग्र गणेशव्रताचे अनुपालन करता येते.

इंद्राला लोमशऋषिचा उपदेश

सुत :– एकदां इंद्राने विश्वकर्म्याला आज्ञा केली की, उत्तम प्रकारचा व सर्वांगसुंदर असा एक प्रासाद माझ्यासाठी निर्माण कर. तसेच तेथे मागेपुढे पुष्कळ उद्यानेही असावी; व जलसचय असावा नंतर विश्वकर्म्याने वाटेल तितकी खटपट केली, पण इंद्राच्या पसतीला तो प्रासाद उतरेना. तेंव्हा विश्वकर्म्याने गणपतीचे स्मरण करून 'मला या तापत्रयांतून सोडव' अशी त्याची प्रार्थना केली त्याच दिवशी इंद्राच्या सभेत लोमशऋषि उपस्थित झाला. त्याने इंद्राला 'देहाच्या नश्वरत्वाविषयी व भोगाच्या दुःखपरिणामाविषयी' पुष्कळसे प्रवचन करून इंद्राची खात्री केली की, या विषयसुखापासून कोणत्याही प्रकारचे स्वार्थकल्याण होत नाही व परमार्थसाधनही सिद्ध होत नाही. नतर लोमशाने इंद्राला चातुर्मासांत केलेल्या गणशव्रताचे माहात्म्य, रहस्य व विधि ही सर्व सांगून त्याला गणेशभक्त केले आणि त्याच्याकडून चातुर्मासांमध्ये गणेशभक्ति करवून त्याला स्वानंदवासी केले. ऋषिहो! ध्यानांत ठेवा की, स्वर्गवासी देवांना ज्या वेळी मुक्तीची इच्छा असते, त्यावेळी ते 'कर्मभूमी' वर येऊन चित्तशुद्धि करणारी कर्में व मोक्ष देणारे गणेशब्रह्माचे ज्ञान ही संपादन करून घेतात आणि मुक्तिला वरतात.

दृढभक्त बल्लाळची कथा

सुत :– सिंधु देशामध्ये पल्ली या नावाचे एक नगर होते. तेथे 'कल्याण' नामक वैश्य आपल्या इंदुमती पत्नीसह सुखाने राहात होता. हे दंपत्य स्वधर्माने वागणारे होते. त्यास बल्लाळ या नावाचा एक लहान मुलगा होता. बल्लाळ हा नेहमी गणनाथाचे ध्यान करीत

असे. त्याला तहानभुकेचीही मुळीच आठवण होत नसे. तो दुग्ध पानाकरिता केव्हांही रडला नाही. त्याचे अखंड चिंतन गणपति-विषयक असे. हा बाळ रांगावयास लागला तेंव्हां आपणच मातीचा गणपति करून त्याला मातीचाच गंध, पुष्प, नैवेद्य दाखवी, हा मुलगा बोबडे बोलावयास लागला तेंव्हा प्रथम पासूनच 'विघ्नेशाचा जय असो' असे मोठ्या प्रेमाने म्हणत असे. त्याचे खेळावयाचे दिवस आले तेंव्हा आपल्या बरोबरीच्या मुलास खेळूं न देतां आपल्याबरोबरच त्यांस गणेशपूजा करावयास लावी. पुढे आपल्या पूजेपासून लोकांस त्रास होतो हे जाणून मुलांस घेऊन तो गांवाजवळ असणाऱ्या पर्वतावर जाई आणि तेथे पाषाणाची मूर्ति होती तिचे रानातील पत्र, फल व पुष्पांनी त्रिकाल पूजन करी. असा बरेच दिवस प्रकार चालला होता. पुढे बऱ्याच मुलांच्या आईबापांनी आपल्या मुलांस वनांत न जाण्याविषयी धाक दाखवून व मार देऊन पुष्कळ उपदेश केला; पण त्या मुलांनी काही ऐकले नाही. तेंव्हा सर्व आईबाप बल्लाळाचा बाप जो कल्याण त्याच्याकडे गेले व आपल्या तक्रारी सांगितल्या. 'आमची मुले तुझ्या मुलाच्या नादाने बिघडली ती उपवासाने दिवसें दिवस कृश होत चालली आहेत' ही त्यांची मुख्य तक्रार होती. 'आपल्या पोरास संभाळ, नाहीतर आम्ही त्याला मार देऊं' अशी धमकीही त्यांनी कल्याणास दिली. सर्व गांवांतील लोक आपल्याविरुद्ध रागावले आहेत असे पाहून कल्याण त्रासला आणि हातात काठी घेऊन मुलास मारण्याच्या हेतूने मुले जमत असत त्या जागी गेला. तेथे जाऊन पाहतो तो गवत व काटक्या यांनी चित्रविचित्र झालेले, अनेक प्रकारच्या रंगांनी सुशोभित झालेले गणपतीचे देवालय त्याचे दृष्टीस पडले. काही मुले

देवाला प्रदक्षिणा घालतात, काही नामसंकीर्तन करतात; कित्येक ध्याननिष्ठ बसले आहेत; कित्येक तपाचरण करत बसले आहेत; कोणी. पुराण वाचत आहेत; कोणी नृत्य करत आहेत; असा भक्तीचा सुंदर देखावा त्याच्या दृष्टीस पडला. त्याचा मुलगा बल्लाळ हा गणपतीच्या पुढे ध्यानस्थ बसला होता. हा देखावा पाहून कोणाही पुरुषाला कौतुक वाटले असते; पण कल्याण क्रोधवश झाला होता. तो देवालयाजवळ गेला आणि त्याने आपल्या काठीने देवालयाचा भंग केला. तें पाहून तो लहान बालके भिऊन पळून गेली एक बल्लाळ मात्र आपल्या आसनावरून ढळला नाही. त्याच्या बापाने त्याला हातात धरून ओढले, अंगांतून रक्ताच्या चिळकांड्या निघेपर्यंत काठीने त्याला झोडपले. तथापि त्याने आपल्या अंतःकरणांत जी गणेशमूर्ति स्थापन केली होती, तिला सोडून दिले नाही. त्याने गणपतीचे स्मरण अखंड ठेवले होते. कल्याणाने देवाची मूर्ति फेकून दिली आणि तेथें कांही वेलींचे दोर पडले होते त्यांनी मुलाचे हातपाय बांधून टाकले आणि त्याला म्हणाला 'मूर्खा! माझे न ऐकता तूं रोज देवाची पूजा करतोस त्याचे फळ भोग! लोक मला नित्य नावे ठेवतात आणि म्हणतात की, 'ह्या असल्या दुष्कीर्ती मिळविणाऱ्या पोराला मारून टाक.' आता तूं येथेच मर आणि विघ्नेश्वराकडे जाऊन काय तुझे कल्याण करून घ्यायचे तें करून घे.' असे बोलून त्या मुलाला दुष्ट कल्याणाने तेथेच टाकले आणि आपण घरी आला. पण घरी येंतांना त्याला महारोग झाला. तो आंधळा, बहिरा, मुका व आठ ठिकाणी वांकडा झाला. ही त्याची स्थिती पाहून बायकोला व त्याला अत्यंत खेद झाला, पण

तो मुका व बहिरा असल्याकारणाने त्याला विचारले तर कांही समजेना व बोलावयासही येईना. पुढे त्याच्या बायकोला इतर लोकांनी बनांतला वृत्तांत सांगितला, तेंव्हा मुलाला पाहण्याकरतां ती इंदुमती अरण्यांत गेली. इकडे तो बल्लाळ बापाने बांधून ठेवला होता तसाच होता. तो गणपतींचे स्मरण करीत आणि 'माझ्या भक्तिला असे विघ्न कां उत्पन्न झाले,' असे स्वतःस विचारीत पडला होता. 'प्राण गेला तरी गणपतींचे स्मरण विसरायचे नाही' असा त्याचा निश्चय होता. आपल्या देवाचा आपल्या बापाने अतिशय अपमान केला हीं गोष्ट मात्र त्याला सहन झाली नाहीं. या रागाच्या आवेशांत तो म्हणाला: 'माझा बाप कुष्ठयुक्त, आंधळा, बांकडा, मुका व बहिरा होवो आणि मला मात्र बंधमुक्त कर.' हें त्याचे म्हणणे शब्दशः खरें झालें. ब्राह्मणाचे स्वरूप घेऊन गणपति तेथे आले आणि त्यानी त्याची सुटका केली. नंतर त्याने 'परमेश्वराची भक्ति असावी व गजाननाची भक्ति न करणाऱ्या पुरूषाविषयीं अनादर असावा' एवढे दोन वर मागितले. गणपतीनी त्याचे सर्व मनोरथ पूर्ण केले आणि त्याने जेथे पूजा केली होती, तेथेच आपण मूर्तिमंत राहून बल्लाळाच्या नावाचा स्वींकार केला. इतक्यांत मुलाचा शोध करीत व रडतच इंदुमती तेथे आली. पण आपला मुलगा सुखरूप आहे असें पाहून तिला फार आश्चर्य वाटले. बल्लाळाने आपल्या मातोश्रीस नमस्कार केला; परंतु तिला सांगितले की, 'गणेशद्वेषी जो माझा बाप आहे त्याचे दर्शन मी केव्हांही घेणार नाही.' त्याचा हा निश्चय पाहून

ती बिचारी घरी परत गेली आणि पतीची सेवा करीत घरी राहिली. बल्लाळ हा मरणानंतर स्वानंदवासी झाला. दयाळू परमेश्वराने बल्लाळाच्या बापाने केलेला पूजाभंग व देवखंडन यांचा विचार न करतां व बल्लाळाचे आईबाप हे आहेत असे जाणून, त्याच्या दुसऱ्या जन्मीं त्यांचा उद्धार केला.

गणेशभक्त कैवर्तकामुळे राक्षसांचा उद्धार

सूत :– शौनकादि ऋषिहो! विभांडकऋषीला ऋष्यशृंग या नांवाचा (याच्या कपाळावर एक शिंग होते, म्हणून त्याचे नांव ऋष्यशृंग होते.) एक मुलगा होता. त्याने चातुर्मासामध्ये गणपतीचे विधिपूर्वक आराधन केले, म्हणून त्याचे सर्व मनोरथ पूर्ण झाले. फार काय सांगावे? एका कैवर्तकाने कांहीं ब्राह्मण गणपतींचे चातुर्मासव्रत करीत आहेत असे पाहून त्यांस नमस्कार केला व त्यांच्याकडून तें व्रत व त्याचा विधि समजावून घेऊन तो घरी गेला व गणेशाच्या चातुर्मास व्रताला त्याने आरंभ केला. ह्या भजनपूजनाचा प्रभाव असा झाला की, त्याला खाऊन टाकण्याकरता कांही राक्षस त्याने अंगावर चाल करून आले होते, त्यांच्या अंगावर त्याने गणेश नामाने मंतरलेले पाणी टाकले मात्र, तो त्याबरोबर पूर्वजन्मांचे व पूर्वजन्मकृत पापांचे स्मरण होऊन त्यांना पश्चात्ताप झाला, ते रडूं लागले आणि हात जोडून त्याला त्यांनी विनंती केली की, 'आमचा उद्धार होईल असा मार्ग सांग.' ह्या कैवर्तकाने त्यांस सांगितले की. मी चातुर्मासव्रत करतो. 'मी आपल्या एका चातुर्मासाचे पुण्य तुम्हाला देतो. तुमचा उद्धार होईल.' असे

म्हणून त्याने संकल्पपूर्वक उदक सोडले. त्यानंतर लागलीच गणेशदूत तेथे आले आणि त्या राक्षसास गणेशलोकास घेऊन गेले. हा चमत्कार पाहून त्या कैवर्तकाची गणेशभक्ति दृढ झाली आणि तो यावज्जीव अखंड गणेशभक्ति करीत राहिला.

गणपती नामाचे माहात्म्य

सूत :– जनमेजयाच्या सर्पसत्रामध्ये सर्पांचे संरक्षण करणारा आस्तिक या नावाचा एक ऋषी होता. सर्पांचे दुःख व तळमळ पाहून त्याला संसाराचा तिरस्कार उत्पन्न झाला आणि शांति मिळविण्याचा उपाय समजून घेण्यासाठी तो आपल्या बापाकडे (जरत्कारूनामक) गेला व 'मला शांति कशी मिळेल' असे त्याने त्यास विचारले. तेव्हां जरत्कारूने त्यास सांगितले की, तूं 'स्थावर' नामक नगरीमध्यें जा, तें चिंतामणीचे स्थान आहे, तेथें रहा, आणि चिंतामणीचे भजन कर. या क्षेत्रीं चित्त स्थिर होते म्हणून ह्या क्षेत्राला 'स्थावर' असे म्हणतात. असें म्हणून जरत्कारूनें गणेश-ब्रह्माचे रहस्य, गणेशयोग आणि गणेशव्रताचे माहात्म्य आपल्या मुलास सांगितलें. पुढें नाम माहात्म्य सांगतांना जरत्कारू म्हणाला गणपति या नावात 'ग्' हें शक्तिरूप आहे व 'अ' हा सूर्यरूप आहे. म्हणून शक्ति आणि सूर्य मिळून 'ग' हें अक्षर झाले. त्याच्या पुढील 'ण' या अक्षरांत 'ण्' हा विष्णू आणि 'अ' हा शंकर म्हणून विष्णू आणि शंकर मिळून 'ण' हें अक्षर सिद्ध होते. या सर्वांचा स्वामी तो 'गणेशान' किंवा गणपति आहे; किंवा (२) अवि-

बोधामध्यें (सांख्य नामक ब्रह्मामध्ये) जो बोध आहे (ज्ञानरूप ब्रह्म आहे,) त्याचे नांव 'ग' हें आहे. आणि स्वानंदात्मक जी निवृत्ति आहे, तिचें नांव 'ण' हें आहे. यांचा स्वामि तो गणपति होय; (म्हणजे असद्ब्रह्मामध्यें व सद्ब्रह्मामध्यें राहणारे जे सद्सद्ब्रह्म त्याचे नांव 'ग' आहे, व नेतिरूपक जो स्वानंद आहे त्याचे नांव 'ण' आहे.) या चौघांचा जो स्वामी तो गणपति होय; अथवा (३) 'ग' पासून विश्वे उत्पन्न होतात आणि 'ण' पासून ब्रह्मे उत्पन्न होतात, या सर्वांचा जो स्वामी तो गणपति अथवा ब्रह्मणस्पति आहे. हा गणपति आपल्या भक्तांचा मोह नष्ट व्हावा म्हणून नामरूपधर होतो म्हणून गणपतीच्या नावाचा एवढा थोर महिमा आहे की, त्याच्यायोगाने अनंत जन्मांची अनंत पापे नाहीशी होतात. गणपतीला जे गजमस्तक आहे, त्याच्या दोन्ही गंडस्थलांत गणपतीच्या समष्टि व व्यष्टि रूपांचा अंतर्भाव होतो. त्याला जे तीन नेत्र आहेत, तेथे तीन ब्रह्मे (शक्ति, सूर्य व विष्णु) असतात. 'शुंडा हे तुरीय ब्रह्म (शंकर) होय हे व इतर सर्व मुखाचे अवयव ब्रह्मस्वरूप आहेत आणि गणपतीचे शरीर विश्वरूप आहे गणेशाची नांवे अनंत आहेत. तसेच विश्वे व ब्रह्मेही अनंत आहेत. या सर्वांचे भजन, पूजन व कीर्तन होणे जीवाला सर्वथा अशक्यच आहे. म्हणून दररोज एकशेआठ नावांचा तरी गणपतिभक्ताने विश्वासपूर्वक उच्चार करावा. विश्वास नसेल तर नामोच्चाराचे अर्धे फळ नाहीसे होते व दंभाने गणेशनामाचा उच्चार केला तर तीनचतुर्थांश पुण्य नाहीसे होतें. विश्वासाला पूर्ण फळ मिळते.

सूत :- अधिकारी व अनधिकारी हा भेद पाहून व मनांत आणून वेदाने क्रममुक्तिचा मार्ग सांगितला आहे. ब्रह्मादि देव हे

तत्त्वरूप जे ब्रह्म त्याच्यापासून उत्पन्न झाले आहेत. अश्विनीकुमार हे नासिकेपासून उत्पन्न झाले आहेत. अश्विनीकुमारापासून पृथ्वीतत्त्व उत्पन्न झाले, यांत पृथ्वीचा गंध हा पुरुष आणि पृथ्वी ही प्रकृति आहे. ह्या दोघांचा योग हेंच अश्विनीकुमाररूपकब्रह्म आहे. सत्वरजादि त्रिगुणात्मक जे ब्रह्मादि जीव आहेत; त्यांचा देह पृथ्वीतत्त्वमय आहे. हा देह अश्विनीकुमारांनीच उत्पन्न केला. पृथ्वीचे विराटरूपही त्यांनीच उत्पन्न केले. याप्रमाणे ब्रह्मा व विश्व ही उत्पन्न झाली आहेत. ते अश्विनीकुमारापासून होतात, म्हणून पृथ्वीपासून होणारा जो भ्रम आहे त्याचा नाश करण्याकरिता अश्विनीब्रह्माचे रूप संपादन केले पाहिजे. याच्यापुढे वरुण ब्रह्माचा प्रदेश लागतो. याप्रमाणे ऊर्ध्वगामी क्रम सुरू ठेवला ह्मणजे शेवटी स्वानंद ब्रह्माचा अधिगम होतो. परंतु हे सर्व प्राप्त होण्याला प्रथम साधकाने भक्तिपूर्वक गणेशनामाचा जप अखंड केला पाहिजे. हे गणेशब्रह्माचे, योगाचे व नामाचे माहात्म्य ऐकून आस्तिकाने गणेशब्रह्माची आराधना करून शांति मिळविण्याचा निश्चय केला हाच उपदेश शंकरांनी उपमन्यूला केला होता. हा उपदेश ऐकल्यावर मात्र उपमन्यूला आस्तिकाप्रमाणेच गणपतीविषयी आदर उत्पन्न झाला. आणि त्याने आस्तिकाप्रमाणे गणेशपूजन करून शांतियोग साध्य करून घेतला.

आश्विन शुद्ध दशमीला शमीपूजन करण्याचे कारण

सूत :– अश्विन शुद्ध दशमीला संध्याकाळी जे शमीपूजन करतात त्याचे कारण हे आहे की, शंखासुराला मारून विष्णूने सर्व वेद ब्रह्मदेवाच्या स्वाधीन केल्यावर त्यांच्या निर्विघ्न संरक्षणार्थ ब्रह्मदेवाला गणपतीने ‘दशहारा दशमीला शमीपूजन करा’ असा

उपाय सांगितला. दाहीकडून येणाऱ्या विघ्नांचा नाश होतो ह्मणून या दशमीला दशहरा दशमी ह्मणतात. या दिवशी देवांनीं शमीची व गणपतीची पूजा केली व याप्रमाणे वेद राखले.

ईश्वर आणि विश्व

सूत :– ऋषिहो ! हे विश्व कर्माधीन आहे असे कोणी म्हणतात, कोणी ईश्वराधीन आहे असे म्हणतात, आणि कोणी यदृच्छेने हा सर्व व्यापार चालतो असे म्हणतात. तिघांच्याही म्हणण्यांत सत्याचा अंश आहे. परमेश्वराच्या इच्छेने हा सर्व विश्वाचा खेळ चाललेला आहे. परमेश्वराला प्रेरणा करणारा कोणीही नाही म्हणून त्याचे सर्व कारभार यदृच्छेने होतात. यदृच्छेने सर्व कारभार चालतो म्हणून तिसऱ्या पक्षांत खऱ्याचा अंश आहे; माया ही परमेश्वराला सुद्धां मोह उत्पन्न करणारी आहे; ती नित्य खेळणारी आहे. तिची भक्ति अनेकत्त्वावर आहे आणि परमेश्वराने जोपर्यंत मायेचा अंगिकार केला आहे तोपर्यंत ती जशी खेळवेल त्याप्रमाणे परमेश्वर खेळतो. येथे दुसऱ्या पक्षांत सत्याचा अंश आहे, कारण सर्व कांही माया करते. मायेचा त्याने तिरस्कार केला ह्मणजे त्या जड मायेला कांही एक करता येत नाही. यावरून परमेश्वराच्या स्वाधीन सर्व आहे, या म्हणण्यांतही सत्याचा अंश आहे. पुनः असेही ध्यानांत ठेवावयास पाहिजे की, माया ही कर्मस्वरूपिणी आहे. कर्म तीन प्रकारचे; एक स्वर्गसुख देणारे, दुसरे मुक्ति देणारे व तिसरे नरकात घालणारे, असे हे कर्माचे तीन प्रकार आहेत. जीव कर्म करतो, त्याप्रमाणे त्याला फळ मिळते. हा नियम सर्वथा अबाधित आहे. यावरून कर्माच्या स्वाधीन सर्व विश्व आहे हेही खरे आहे. देहवाणी

जे आहेत ते कर्माधीन जगत् आहे असे म्हणतात. अद्वैतवादी सर्व ईश्वराधीन आहे असे म्हणतात आणि योगी जे आहेत ते यदृच्छेने विश्व चालले आहे असे म्हणतात.

सूत :– मुनिहो ! श्रावणामध्ये गणेशाची, भाद्रपदात मयूरेशाची, अश्विनांत विघ्नेशाची, कार्तिकांत वक्रतुंडाची, मार्गशीर्षांत विकटाची, पौषांत लंबोदराची, माघांत गणेशाननाची, फाल्गुनांत गणेशाची, चैत्रांत धूम्रवर्णाची. वैशाखांत हेरंबाची, ज्येष्ठांत विनायकाची व आषाढात गजाननाची भक्तिपूर्वक सेवा केली असतां भक्ताचे सर्व मनोरथ पूर्ण होतात.

गणेश ध्यान व प्रार्थना

सूत :–शंकरांनी ' गंगेला गणेशहृदयस्तोत्र ' सांगितले. या हृदयाचा जप करण्याला आरंभ करण्याच्या आधी ' साधकाने सिंदुरवर्ण त्रिनेत्र, लंबोदर, रक्तवस्त्र, पाशांकुशधर, वरद, अभय, अभयकर, सिद्धिबुद्धिपति, गजवदन, एकदंत, नाभिशेष, अलंकारयुक्त, भक्तवत्सल ' अशा स्वरुपाने ध्यान करावे. नंतर ॐ गणेश, एकदंत, चिंतामणि, विनायक, ढुंढीराज, मयूरेश, लंबोदर, गजानन, हेरंब, वक्रतुंड, ज्येष्ठराज, आशापुरक, वरद, विकट, धरणीधर, सिद्धिबुद्धिपति, ब्रह्मणस्पति, मांगल्येश, विघ्ननायक, सर्वपूज्य, निजस्थित ही गणपतीची एकवीस नावे त्याचे हृदय होतात. त्यांचे ध्यान करावे. ही जी एकवीस नावे दिली आहेत यांचा अर्थ तज्ज्ञांकडून समजून घेऊन ध्यानांत ठेवावा; नंतर पुरश्चरणाच्या विधीने हृदयमंत्राचे ग्रहण करून भजन केले म्हणजे ज्ञान उत्पन्न होते यांत शंका नाही. गंगेने याप्रमाणे तपश्चर्या केली व गणपतीस प्रसन्न करून घेतले. या योगाने तिला ज्ञान झाले आणि ती गणेशाचे भजन करीत आनंदाने राहिली.

शंकर म्हणतात, गणपतीची प्रार्थना करावयाची ती अशी असावी. 'हे गणपते! पुत्र, कलत्र, मातापितर, मित्र, द्रव्य, स्नेही, जीवनविद्या, स्वर्ग, मोक्ष, हे सर्व मला तूंच आहेस. तूं माझा स्वामी आहेस. जे काय मी कायिक, वाचिक, मानसिक कर्म करतो व जे ज्ञान मिळवितो, ते सर्व हे विघ्नेश्वरा! तुझ्या चरणी अर्पण करतो. एक व अनेकांमध्ये योगरूपाने राहून अनेक प्रकारचे भोग तूं भोगतोस. आम्ही सर्व जीव, स्वतंत्र नाही. तुझे सेवक आहोत आणि सर्व विश्वभर तूंच खेळत आहेस ' याप्रमाणे योग्यांनी नित्य प्रार्थना करावी. या प्रार्थनेचे फल गणपति लौकरच देतो.

नंतर दक्षाने विचारल्यावरून मुद्गलाने पुनः एकदा गणेशब्रह्माचे स्वरूप सांगितले व गणेशयोगाची प्रक्रियाहि सांगितली.

मुनिहो! हे स्वरूप आणि ही प्रक्रीया मी तुम्हास पूर्वीच सांगितली आहे, ती ध्यानात ठेवून गणेशब्रह्माचे ज्ञान करून घ्या व गणेशयोगाचे अनुपालन करून विज्ञान संपादन करा. ज्यांनी ज्यांनी याप्रमाणे भक्तिपूर्वक आणि योगतत्वानुसार गणेशब्रह्माचे ज्ञान करून घेतले, ते भक्त इहलोकी सुखी झाले, एवढेच नव्हे, तर त्यांस परमार्थही साध्य होऊन ते स्वानंदवासी झाले.

[इति धूम्रवर्णचरित्र समाप्त]

नवम खंड

—०—

स्वानंदयोग

सूत :- शौनकादि मुनिहो! दक्षाने मुद्गलाला विचारले:- 'पूर्णपद देणारा जो योग आहे त्याचे स्वरूप, कसे? स्वानंद हा कोणत्या प्रकारचा योग आहे? व तो कोणत्या प्रकारचा अयोग आहे? आणि शांति देणारा जो पूर्णयोग त्याचे रूप कसे आहे ते मला सांगा. मुद्गल म्हणाला: स्वानंदापासून नेति, सम, सत्, असत्, अशी चार ब्रह्मे सहज व ब्रह्माच्या स्वेच्छेने आतांच सांगितलेल्या क्रमाप्रमाणे निर्माण झाली. नंतर स्वानंदाच्या सत्तेने या चार ब्रह्मांनी (१) सांख्यरूपी ब्रह्म (सर्वज्ञ), (२) बोधरूपी ब्रह्म (विज्ञान) नंतर (३) अहंरूपी, निर्गुणब्रह्म व (४) बिंदुरूपी सगुण, ही चार ब्रह्मे होत. यानंतर स्थूलसूक्ष्मादि चार प्रकारची विश्वे निर्माण झाली. पण हे सर्व पदार्थ परस्पर-भिन्न होते. तेव्हां या सर्वांनी) तपश्चर्या केली आणि प्रतिदिवशी ज्ञानस्वरूप व ज्ञान देणाऱ्या स्तोत्रांचा नियमने पाठ करून मूलभूत स्वानंदवासी गणेशाचे एकनिष्ठ भजन, पूजन केले. तेव्हां प्रसन्न होऊन स्वानंदवासी गणेशाने सर्वांस त्यांची त्यांची कर्मे नेमून दिली, आणि त्या त्या कर्मास लागणाऱ्या ज्ञानाचाही उपदेश केला. गणपतींनीं असेही वचन दिले की, 'तुमच्या जगद्व्यापाररूप कर्माला सिद्धि मिळावी म्हणून मी तुमच्याजवळ नेहमी वास्तव्य करीन.'

स्वानंदाचा अयोग–योगभ्रष्ट व त्याचा उद्धार

सूत :– मुनिहो ! गणपति हे नानायोगाचे अधिपति आहेत. ज्या वेळेला त्यांची वृति अयोगनामक योगांत असते, तेंव्हा ते मायाशून्य, नित्य, मुक्त, आणि सुखरूप असतात. या गणेशयोगाने स्वानंदाख्य जे सगुणब्रह्म आहे तें नष्ट होतें आणि गणपतीच्या योगसामर्थ्याने तें पुनः उत्पन्न होतें. अशी ही परब्रह्माची योगात्मक, अयोगात्मक क्रीडा मन आणि वाणी यांना सर्वथा अगोचर आहे. हा गणेशयोग शम, दम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि इतक्या अंगानी सिद्ध होतो. हा योग सांगोपांग सिद्ध झाला तर ब्रह्मज्ञान समजण्याला अतिशय सुलभता प्राप्त होते. योगाभ्यासामध्ये काही मोह उत्पन्न होऊन जर पुरुष पुनः विषय सेवन करूं लागला, अनेकत्व पाहूं लागला, सुखदुःखादिकांचा अनुभव घेऊं लागला, तर त्याच्या पूर्वयोगाभ्यासाने त्याला स्वर्गसुख मिळते; पण हे स्वर्गसुख बाहेरचे असल्यामुळे (विषयांपासून मिळणारे असल्यामुळे) गणेशभक्ताला हें सुख नरकदुःखाच्या भोगाइतकीच यातना देते. म्हणून हा भोग संपल्यावर तो योगभ्रष्ट पुरुष शहाणा होतो व योगीकुलामध्ये किंवा श्रीमंताच्या घरी जन्म घेऊन पूर्वसंस्काराच्या सामर्थ्याने पुनः योगमार्गाचा अभ्यास करतो आणि शांति मिळवितो.

चंचल चित्ताला स्थिर करण्याचा व ज्ञानप्राप्तीचा मार्ग

सूत :– चंचल चित्ताला स्थिर करावयाचे असेल तर जीवाने प्रथम सत्कर्म करण्यास लागावे. हळूहळू निष्काम कर्माचा अभ्यास करावा म्हणजे त्याच्यायोगाने पूर्वीच्या अनंत जन्माचे पातक नाहीसे

व्हावयास लागेल. दृढअभ्यास नंतर पूर्ण निष्काम कर्म करतां येऊं लागले ह्मणजे चित्तशुद्ध होतें आणि मनाची चंचलता नाहीशी होते. अशा पद्धतीने कर्म चालले असतां गणेशपचायतनापैकी ज्या देवतेवर विशेष भक्ति असेल त्या देवतेची भजनपूजनादिकांनी भक्ति करावयास लागावे व ही भक्तिही परमेश्वरास समर्पण करावी. विषयाविषयींची विरक्ति, सर्व कर्माचे आणि भक्तीचे गणेशार्पण, सर्व विश्व गणेशरूप आहे असे भान, सर्वांचे कल्याण मात्र व्हावे असा भक्तिचा व कर्माचा हेतु, गणेशाचे नित्य स्मरणयुक्तध्यान, योगाचा शास्त्रपूर्वक अभ्यास, तज्जन्यमनोविजय, आणि एकच ब्रह्म सर्वत्र ओतप्रोत भरले आहे हे ज्ञान, या साधनांचा अनन्यभक्तिने व शास्त्रविधिक्रमाने अधिगम केला तर या जन्मांतच ज्ञानप्राप्ति (म्हणजे पूर्ण आणि शुद्ध शांतिप्राप्ति) हा लाभ होतो.

गणपतीच्या विभूति

सूत :– गणपतीनी एका वेळी नारदाला आपल्या कांही विभूति सांगितल्या होत्या. त्यापैकी कांहीचा मात्र मी आता उल्लेख करतो. तो ऐका:– गणपति म्हणतातः ‘ योगामध्ये मी चित्तनिरोध करणारा मायाशून्य, वस्तूंमध्ये मी अयोग, निजभूतांमध्यें (शक्ति, सूर्य, विष्णु आणि शंकर या चार ब्रह्मांमध्यें) मी अव्यक्त नावाचा स्वानंद, समभावांमध्ये आनंद, जीवांमध्ये आत्मा, नानाभेदामध्यें मी असद्रूप ब्रह्म, सद्वस्तूंमध्ये बोध, देहाभिमान्यांमध्ये मी सद्रूप, देहांमध्ये मी बिंदुरूप, कोशामध्ये मी आनंदकोश, सूक्ष्मजातीमध्यें विज्ञान, विवेकांमध्ये मी मन, चालकामध्ये मी वायु, स्थूलांमध्ये मी अन्न, पुरुषांमध्ये मी ईश्वर, व्यष्टीमध्ये मी प्राज्ञ, इंद्रियांमध्ये मन, भूतांमध्ये

आकाश, शब्दस्पर्शादिगुणामध्ये मी शब्द, देवतांमध्ये मी गुण-
पालनकर्ता, पालकांमध्ये जनार्दन, नाशकामध्ये मी हर, उत्पादकां-
मध्ये मी ब्रह्मा, कर्माचा सूर्यरूपी आत्मा मोहकांमध्ये शक्तिदेवी,
देवांमध्ये इंद्र, आदित्यांमध्ये विनायक, तेजस्वी वस्तूंमध्ये मी भानु,
अमृतामध्ये चंद्र, प्रताप्यांमध्ये मी अग्नि, समप्रवृत्तोमध्ये (निःपक्षपात
आचरणांमध्ये) मी धर्म, नियमाने चालणाऱ्या लोकांमध्ये मी यम,
जलांमध्ये वरुण, राक्षसांमध्ये मदन, भोगामध्ये रति, नागेशांमध्ये शेष,
सर्पात तक्षक, नागात वासुकी, द्वीपात मिष्ट, जलाशय, पर्वता-
मध्ये हिमालय, वृक्षात शमी, देववृक्षांत मंदार, धेनूमध्ये कामधेनू,
औषधि वनस्पतीमध्ये दूर्वा, पक्ष्यांमध्ये मयूर, मृगात सिंह, मासामध्ये
श्रावण, चोरामध्ये मूषकपति वाहनात, अश्वत्थ, ऐश्वर्यात सिद्धी,
विद्यांमध्ये बुद्धि, प्रकाशकांमध्ये चित्त, वेदवंतामध्ये चित, मोहकांमध्ये
मी अभिमान, नरांमध्ये राजा, वर्णामध्ये ब्राह्मण, आश्रमामध्ये संन्यास
पोषकांमध्ये गृहस्थाश्रमी, त्यागयांमध्ये अवधूत, तिथीमध्ये चतुर्थी,
प्रजापतींत दक्ष, ब्रह्मर्षीत भृगु, देवर्षीत नारद, अवधूतांत दत्त,
तत्ववेत्यांत कपिल, योग्यांत शुक, विदेह्यांत जनक, विरक्तांत
सनकादि चार कुमार, ज्ञात्यांत व्यास, कर्मकर्त्यांत वसिष्ठ,
गाणपत्यांत मुद्गल, एकनिष्ठांत भृशुंडी, ब्रह्मभक्तांत बृहस्पति,
अन्नात तीळ, गव्यांत (दुग्धदध्यादींत) घृत, रसांत मधु, जलचरांत
मकर, नद्यांत कौमंडलि, क्षेत्रांत मयूरक्षेत्र, बुद्धिवंतात काशीराज,
उपासकांत गार्ग्य, ध्याननिष्ठांत गृत्समद, दैत्यांत सुबोध, द्वेष्ट्यांत
ज्ञानशत्रु, दुर्जयांत मन, वर्गांत ॐकार, भाविकांत शुक, शुद्धचित्तात
मी त्रिशिरा, उपदेशकांत याज्ञवल्क्य, पौराणिकांत सूत, श्रोत्यांत
शौनक, सेनापतींत स्कंद, यशस्व्यांत विष्णु, पापांत असत्य,

मेद्धारकांत कलह, प्राप्तव्यांत लोभ, मण्यांत चिंतामणि, पवित्र, भावांत (पवित्रवस्तूंमध्ये) ज्ञान, गायनात साम, वेदांत अथर्व, शस्त्रांत परशु, निर्लिप्तांत मी साक्षी, राजश्रीत गज, भ्रामकांत विषय, अप्सरांत रंभा, गंधर्वांत चित्ररथ, वैद्यात शिव, औषधज्ञात्यांत धन्वंतरी, सरोवरांत समुद्र, प्रवाहात जान्हवी, मंत्रांत एकाक्षरी मंत्र, सूक्तांत ब्राह्मणस्पत्य सूक्त, यज्ञांत ज्ञानयज्ञ, प्राणांत समान, शक्तिवंतांत शक्ति, उपनिषदांत बृहदारण्यक, शास्त्रांत योगशास्त्र, अरण्यांत दंडकारण्य, नियमात दंड, अभिमानांत माया, स्मृतित याज्ञवल्क्यस्मृति, छंदांत गायत्री, नगरांत स्वानंद, कलांत योगकळा, नीतिपंडितांत काव्य, (शुक्र) भूमिचरांत वृषभ, गोजातीत नंदिकेश होय ह्या कांही विभूति तेवढ्या मी सांगितल्या आहेत. सर्व विभूति सांगणे केव्हांही शक्यच नाही. जी जी म्हणून श्रेष्ठ वस्तु आहे ती ती माझी विभूति आहे.'

तत्त्वविचार

सुत :– मुनिहो! नंतर मुद्गलाने दक्षाला पुनः एकवार तत्त्व-विचार सांगून कर्माविषयी तो म्हणाला: कर्म, अकर्म आणि विकर्म असे कर्माचे तीन प्रकार आहेत. ही स्वरूपे व ह्यांची फळे मागे सांगितलींच आहेत. विकर्माने नरकप्राप्ति, सकाम कर्माने स्वर्गप्राप्ति आणि निष्काम कर्माने मोक्षप्राप्ति ही फळे विसरू नयेत अशी आहेत. स्वर्गाला जाण्याच्या मार्गाला पितृयान किंवा 'कृष्णगति' असे म्हणतात. जन्ममृत्युचे चक्र येथे अखंड चालू राहते. 'मुक्ति' देणाऱ्या मार्गाला देवयान किंवा 'शुक्लगति' म्हणतात. येथे क्रमाक्रमाने मुक्तिचा मार्ग आक्रमिला जाऊन अंती 'मुक्ति' (शांति) मिळते. शुक्लगति व 'कृष्णगति' या मार्गांची रहस्ये तुम्हास ठाऊकच

आहेत. 'शुक्लगति' सूर्यसाक्षित्वाने क्रमशः मोक्षफलोत्पादक होते व कृष्णगति चंद्रसाक्षित्वाने पुनर्जन्माला कारण होते. नंतर मुद्गलांनी क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यामधील सर्व प्रसिद्ध भेद, त्यांचे भिन्न भिन्न विकार, सत्वरजादि गुण यांचे विवेचन पुष्कळ विस्ताराने केले; पण ते तुम्हांस ठाऊकच आहे; म्हणून त्याचा विचार येथे करण्याचे कारण नाही. वर्णाश्रमांचा विचार आपण मागे केलाच आहे. येथे इतकेच जास्त सांगावयाचे आहे की, द्विजांनी (विप्र-क्षत्रिय-वैश्यांनी) यज्ञोपवीत धारण करावे.

ज्ञानाचा अभ्यास

सूत :– नंतर दक्षाने विचारल्यावरून मुद्गलांनी सांगितले की, (१) धर्माने ब्रह्मप्राप्ति होते. धर्म हे ब्रह्मदेवाचे नाव आहे, हा देव सर्वांस सारख्या रीतीने वागवितो. (२) अर्थ हा सामर्थ्य देणारा पुरुषार्थ आहे. अर्थ हे शंकराचे नांव आहे; अर्थ साध्य झाला म्हणजे शिवलोकास जाता येते. अर्थाचा स्वामी शंकर आहे (३) काम हा भोगात्मक आहे. याचा स्वामी विष्णु आहे याने विष्णुलोक मिळतो. काम हे विष्णूचे नाव आहे. (४) सूर्य हा आत्मरूप असून मुक्तिमार्गाचा साक्षी आहे. हे सांगितल्या नंतर मुद्गलाने निरनिराळ्या दर्शनकारांचे अभिप्राय सांगितले व तो म्हणाला (१) नैय्यायिक हे चैतन्यात्मक ब्रह्म सर्वकारण आहे असे मानतात. चैतन्य नाहीसे झाले म्हणजे सर्वनाश होतो असे त्यांचे मत आहे. आतां गणेशयोगाच्या दृष्टीने चित्ताचे पांच भेद सांगितले आहेत. त्या पांच भिन्न प्रकारांमध्ये जी वस्तु सामान्य आहे, जी वस्तु पांची भेदांमध्ये विद्यमान असते, तीच 'चैतन्यरूप' आहे असे म्हटले म्हणजे गौतम प्रणीत न्याय आणि वेदोक्त गणेशयोग

यामध्ये एकवाक्यताच उत्पन्न होते. (२) कणादप्रमुख तार्किक म्हणतात की, सर्व पदार्थामध्ये जो अभेद आहे, तोच जगत्कारणरूप ब्रह्म आहे. गणेशयोगाप्रमाणेही चित्तपंचकांतील भेद भेदाशून्य केले, म्हणजे प्रकट होणारा जो अभेद तो व तार्किकांचा अभेद यांमध्ये एकवाक्यताच असते. (३) धर्मशास्त्रवेत्ते असे म्हणतात की सच्चिद् आत्मा व सोपाधिक आत्मा या उभयतांचाही लय ज्या एकरूप आत्म्यामध्ये होतो, तो ज्ञानैकरूप आत्मा जगत्कारण आहे. आता गणेशयोगाच्या सिद्धांतानुसार पाहिले असतां चित्ताच्या पांच प्रकारांचे जे निरनिराळे धर्म आहेत त्यांचा क्रमाक्रमाने त्याग केला असतां जे एक केवळ ज्ञानरूप शिल्लक राहते, ते व धर्मशास्त्रप्रणीत ज्ञानरूप ही दोन्ही एकस्वरूपच होतात. (४) सांख्य असे म्हणतात की, संख्या (मिथ्या भान) नष्ट झाले म्हणजे जो बोध व विबोध होतो तद्रूप म्हणजे बोध–विबोधरूप ब्रह्म जगत्कारण आहे गणेशयोगांत चित्ताचे जे पांच प्रकार सांगितले आहेत, त्यांचे प्रकारत्व नष्ट केले असतां जे एकच बोध-विबोधरूप सर्वव्यापी तत्व शिल्लक रहाते ते व सांख्यांचे बोध-विबोधरूप यांतही भेदभाव उरत नाही. (५) मीमांसक असे म्हणतात की, जगत्कारण हे स्वसंवेद्यरूप आहे. गणेशयोगशास्त्रांतही चित्तपंचकाचा त्याग केला म्हणजे स्वसंवेद्य ब्रह्म शुद्धस्वरूपाने प्रकट होते. ते व मीमांसक ज्याचा उल्लेख करतात ते, हा दोन्ही वस्तूतः एक रूपच असतात. याचप्रमाणे इतर ब्रह्मविषयक सिद्धांत जे आहेत त्यामध्ये आणि गणेशब्रह्मयोगामध्ये पारमार्थिक-दृष्टीने अभेदच दृग्गोचर होतो. तेंव्हा गणेशयोगाचा कोणत्याही दर्शनाशी भेद असत नाही हा योग सर्व मतांचा योग्य तेवढा अंगिकार करून सर्वांहून निराळा व सर्वप्रवर्तक असतो, म्हणून हा सर्वश्रेष्ठ आहे.

सूत :- नंतर मुद्गलाने नित्य, नैमित्तिक, प्राकृत आणि सारस्वत अशा चार प्रकारच्या लयांचे स्वरूप सांगितले. कर्म, अकर्म व विकर्म यांचे लय नित्य असतात; फल उत्पन्न झाले म्हणजे त्या त्या कर्माचा लय होतो. हा लय केवळ कर्माधीन आहे; परंतु हा लय व कर्मकर्त्यांचा लय ब्रह्मदेवाचा एक दिवस संपला म्हणजे होतो. यावेळी स्वर्गमंडळापर्यंत असणाऱ्या सर्व लोकांतील जीवांचा लय होतो. (२) आतां नैमित्तिक लय ब्रह्मदेवाचा एक दिवस व एक रात्र हा काळ होय. कृत, त्रेता, द्वापार व कलि ही चार युगे हजार-वेळ फिरली म्हणजे ब्रह्मदेवाचा दिवस होतो. रात्रीची हीच मर्यादा आहे. हा काळ लोटल्यावर जो लय होतो त्याला नैमित्तिकलय म्हणावे. (३) स्थूल, सूक्ष्म आणि सम या तत्वांना एकरूप प्राप्त झाले म्हणजे त्याला प्राकृत लय म्हणावे. (४) वाणीचा आणि मनाचा लय होऊन चित्तांतील पांचही प्रकारांचा लय झाला, संप्रज्ञात व असंप्रज्ञात समाधीचा लय होऊन एकच रूप झाले म्हणजे त्याला सारस्वत लय असे म्हणतात.

हे सर्व ज्ञान केवळ ग्रंथाच्या अभ्यासाने व्हावयाचे नाही. पूर्ण श्रद्धेने, गुरुची सेवा करून व गणेशाची एकनिष्ठ भक्ति करून गुरूनी सांगितलेल्या सिद्धांताचे मनन आणि निदिध्यास जेंव्हां अखंड चालेल; तेंव्हां गणेशयोगाचे व गणेश--ब्रह्माचे ज्ञान होईल. हा अभ्यास चालला असतां बिंबरूपाने देह--निर्वाहापुरते मात्र भोग घ्यावे, सर्वकर्म व सर्व ज्ञान गणेशाला अर्पण करावे, नित्य गणेश--गुणांचे कीर्तन करावे, त्याचे विस्मरण केव्हांही होऊ नये. 'तो सर्वश्रेष्ठ, सर्वसाक्षी व मत्स्वरूपी आहे' अशी भावना ठेवावी, आपली वाणो गणेशमय असावी व संगति गणेश भक्तांचीच

असावी. पाखंडी लोकांच्या वाऱ्याला उभें राहू नये आणि चित्ताच्या पांच प्रकारांमध्ये जे ज्ञान होते त्यावर कोणत्याही प्रकारची भक्ति न ठेवता एक गणेशभजनच अंतःकरणामध्ये ठेवावे हा अभ्यासाचा व अध्ययनाचा विधि आहे. या विधीने ज्ञानविज्ञानाचा लाभ लवकर होतो.

सूत :– याप्रमाणे दक्षाला मुद्गलाने योग पद्धतीचे रहस्य सांगितले. ते ऐकून दक्षाला अतीशय आनंद झाला. त्याच्या सर्व शंका नष्ट झाल्या, त्याचे अंतःकरण भक्तिमय झाले. त्याला ब्रह्मज्ञान झाले आणि विज्ञान देण्यासाठी त्याच्यापुढे प्रत्यक्ष गणेशाची मूर्ति प्रकट झाली. परमेश्वराची दक्षाने स्तुति केली व पूजा केली. गणेश साक्षात्काराचा हा समारंभ पाहण्यास स्वर्गाचे सर्व देव व भूलोकावरील ऋषि आले होते त्यांनीही मुद्गलाची व गणपतीची पूजा केली. जिकडे तिकडे सर्वत्र आनदी आनंद झाला. दक्षाने मुद्गलाची व्यासपूजा केली आणि त्याचा शक्य तेवढा सत्कार करून मोठ्या कष्टाने त्याला निरोप दिला.

सूत :– मुद्गल हा गणपतीचा एक अवतारच होता असे म्हणावयास हरकत नाही. याने सर्व भिन्नमतांमध्ये ऐक्य कसे आहे, ते दाखविले आहे. या पुराणांत गणपतीचे रूप आठ प्रकारचे वर्णिले आहे. ब्रह्मा, विष्णु, शिव, सूर्य, व शक्ति ही पांची रूपें सगुणात्मक (देहधारी) ब्रह्मांची आहेत यांची पूजा सर्व कामुक ज्ञानी लोक करतात. या पूजाकर्मांचा एक विपाक असा होतो की कामुक लोक स्वर्गसुख भोगून परत आल्यावर प्रथम ओंकाराची नंतर दहराकाशांत राहणाऱ्या आत्म्याची, नंतर सगुणगणेशाची आणि नंतर योगशांति देणाऱ्या गणेशपरब्रह्माची, पूजा करण्यास

प्रथम प्रेरित होतात. 'ही पूजा निष्काम असावी.' ही त्यांस पुढे बुद्धि उत्पन्न होते आणि ते सहजच मुक्तिच्या मार्गाला लागतात.

मुग्दल पुराण श्रवणपद्धति व फलश्रुति

गणेशस्वरूप समजण्याला एक मुद्गलपुराणच साधन आहे. व्रतस्थ राहून गणपतीच्या मंदिरांत या पुराणाचे श्रवण कोणत्याही वर्णाश्रमांतील जीवाने शक्य तेवढा वेळ करावे. पुराण समाप्त झाल्यावर उत्सवपूर्वक पोथीची पूजा करून पुराणिकाचीही संभावना यथाशक्ति उत्तम प्रकाराने करावी. या श्रवणाचे फळ निष्काम भक्तांस मोक्ष-दायक, कामुक पुरुषांची इच्छापूर्ति करणारे, आणि शेवटी ज्ञान देणारे, सारांश सर्व श्रोत्यांस कमिअधिक कालांतराने मोक्षमार्गाला नेणारे आहे. या पुराणाच्या पारायणांनी अनेक लोकांस येथे सुखोपभोग व अंती मोक्ष योग यांची प्राप्ति झाली आहे. रोग, पिशाचे, भ्रम इत्यादि बाधांच्या दुःखामुळे ज्यांस आपली आयुष्य यात्रा असह्य झाली होतो त्यांनी या ग्रंथाचे श्रवण पठण केल्यावर त्यांची सर्व दुःखे लयाला जाऊन त्यांस शेवटी ज्ञानप्राप्ति झाली आहे.

असो; या अमृताच्या वाचकांसही गणेशचरित्राच्या ज्ञानाने, त्याच्या निर्गुण व सगुण रूपांच्या बोधाने, त्याच्या योगरहस्याने, व त्याच्या व्रतचरणाने इहलोकी सात्विक सुख व परलोकी अक्षय शांति मिळावी व स्वधर्माकडे त्याची प्रवृत्ति असावी असा आशीर्वाद देऊन सूताने मुद्गल विरचित पुराणाचे प्रवचन संपविले. गणेश-ब्रह्माचे व योगाचे ज्ञान झाल्यानंतर शौनकादिकांनीही सूताचे धन्यवाद गाऊन त्याला यथेष्ट संचार करण्याची अनुज्ञा दिली व आपण गणेश–भक्ति करत राहिले.

[नववें खंड समाप्त.]

* * *

: यंत्र :

यंत्र हे देवतेचे अंतिमस्वरूप समजले जाते. 'देवतात्मकं हि यंत्रम्' ह्या वचनानुसार यंत्र हे देवतास्वरूप असते. ज्या देवतेची मूर्ती नसते पण तिची पूजा करावयाची असते, अशावेळी मूर्ती अगर प्रतिमेच्या ऐवजी त्या देवतेच्या यंत्राची स्थापना केली जाते. मूर्ति स्थापनेने जे फल प्राप्त होते तेच फल यंत्र स्थापनेनेही प्राप्त होते. यंत्रामध्ये मूळ बीजाचे आवाहन केलेले असते व त्यायोगे देवतेच्या मूळ स्वरूपाचेच आवाहन केल्या सारखे होते. देवता ह्या मंत्ररूप, बीजरूप असतात. बीजमंत्राने अथवा नाममंत्राने देवतांचे आवाहन त्या यंत्रामध्ये केले जाते, "यंत्र" या धातूचा अर्थ निबद्ध होणे असा होतो. यंत्राद्वारा त्या यंत्राची देवता खिळवून टाकणे, बांधून टाकणे ही कार्ये साधली जातात.

यंत्र तयार करताना त्यासाठी निरनिराळया धातूंचा वापर करतात. सोने, रुपे, चांदी व तांबे हे चार महत्वाचे धातू यंत्रासाठी उपयोगात आणतात. कांही यंत्रे निरनिराळ्या धातूंच्या मिश्रणानेही तयार करतात. काही वेळा लाकडावर अगर दगडावर कोरूनही यंत्रे तयार करतात व त्यावर मूर्तिंची प्राणप्रतिष्ठा करतात.

शास्त्रमर्यादेने सांगितलेल्या आकारात व प्रकारात यंत्र तयार झाल्यावर ते सिद्ध करावे लागते. यंत्र सिद्ध करण्याचाही विधि

असतो. यंत्र तयार होत असता जे कांही दोष शिल्लक राहतात ते नष्ट करण्यासाठी प्रथम 'अग्न्युत्तारण विधी' करावा लागतो आणि मगच ते यंत्र सिद्ध करावे लागते.

यंत्राची रचना बिंदु, त्रिकोण, षटकोन, वर्तुळ किंवा अष्टदल यास्वरूपात करतात. यंत्राच्या मध्यभागी ज्या देवतेची स्थापना करावयाची असेल त्या देवतेची बीजाक्षरे लिहितात. देवतेची बीजे, बीजाक्षरे ही त्या देवतेची सूक्ष्मरूपाने साकारलेली रूपेच समजली जातात.

ज्याप्रमाणे 'गं' हे बीजाक्षर गणपतीचे त्याचप्रमाणे ऐं, ऱ्हीं, क्लीं ही बीजाक्षरे अनुक्रमे महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ह्यांची होत. ही बीजाक्षरे म्हणजेच बीजमत्र होत. ह्या बीजाक्षर मंत्रात त्या देवतेचा वास असतो (अस्तित्व असते) असा मंत्र-शास्त्राचा सिद्धांत आहे. यावरुन यंत्राचे महत्व फार मोठे आहे हे लक्षात येते.

यंत्र हे रेशमी वस्त्रावर काढावे. त्याचा रंग सौभाग्य वर्धक असावा. यंत्र काढण्यास कुंकू, कस्तुरी किंवा चंदन यापैकी एकाचा वापर करावा रेशमी वस्त्र नसल्यास तांबुस रंगाचे कापड वापरावे.

यंत्राच्या मध्यभागी मूळ बीज लिहावे. सर्वसाधारणपणे यंत्राची रचना एक सारखीच असली तरी ज्या विधानाने उपासना करावयाची असेल त्याचेच बीज लिहिणे उत्तम. बीजाक्षरे लिहिल्यानंतर त्यावर आवरण देवतांची स्थापना करावी लागते. ही आवरणे नऊ पर्यंत असतात. यंत्राला चतुर्द्वार असते.

यंत्र काढून झाल्यावर त्यावर त्या देवतेची प्राणप्रतिष्ठा करावी, म्हणजे ते यंत्र त्या देवतेचे बनते. यंत्र सिद्ध करण्याठी ॐ काराचा पंधरा वेळा उच्चार करावा म्हणजे ते यंत्र सिद्ध होते. स्फटिकादि धातूंची यंत्रे ही पूर्वप्रतिष्ठित म्हणजे स्वयंभू असतात त्यामुळे त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्याची गरज नाही.

सिद्ध झालेल्या यंत्राची शास्त्रोक्त पद्धतीने उपासना केली असता त्या यंत्राची देवता सिद्ध होते. मग ह्या सिद्ध झालेल्या यंत्राद्वारा म्हणजेच देवतेद्वारा आपले इप्सित साध्य करून घेता येते. ज्या उद्देशाने यंत्रपूजा केली जाते त्यानुसार उपासनेत फरक पडतो. शुद्ध हेतुसाठी केलेली उपासना योग्य पथ दर्शविणारी ठरते तर जारण–मारणादि सारख्या अनिष्ट गोष्टीसाठी केल्यास अंती ते यंत्रपूजा करणाऱ्याला घातक ठरते, तेंव्हा असल्या अनिष्ट गोष्टी न करणेच हितावह होय. काही यंत्राच्या केवळ दर्शनानेही फलप्राप्ति होते.

धर्मशास्त्रांच्या मर्यादा सांभाळून जो उपासक उपासना करेल त्याने बीजरूपात्मक, सावरण, यथाशास्त्र सिद्ध केलेल्या यंत्राची पूजा करावी त्यातच त्याचे खरे हीत आहे.


गौरीयामलात चार प्रकारची यंत्रे सागितली आहेत, ती अशी भूपृष्ठ, कूर्मपृष्ठ, पद्मपृष्ठ व मेरुपृष्ठ. भूपृष्ठावरील रेषा नालीप्रमाणे खोल असतात व कूर्मपृष्ठ व पद्मपृष्ठ ही यंत्रे उर्ध्वरेखामय असतात.

यंत्राच्या धातुंच्या वजनासंबंधीसुद्धा शास्त्रात नियम घालून दिलेले आढळतात. शास्त्रशुद्ध वजन नसल्यास उपासनेत अडथळे, संकटे त्रास देतात असे म्हणतात.

* *


श्री गणेश यंत्र

१



श्री गणेश यंत्र

१



स्तोत्रे, आरत्या व भूपाळ्या

मंगलाचरणम्

श्रीगणेशाय नमः। श्रीगुरुभ्यो नमः।। स जयति सिंदुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम्। वासरमणिरिव तमसां राशीन्नाशयति विघ्नानाम्।। १ ।। सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः। लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः।। २ ।। धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजाननः। द्वादशैतानि नामानि यः पठेच्छृणुयादपि ।। ३ ।। विद्यारम्भे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा। संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ।। ४ ।। शुक्लांबरधरंदेवं शशिवर्णं चतुर्भुजम्। प्रसन्नवदनं ध्यायेत् सर्वविघ्नोपशान्तये ।। ५ ।।

* मुग्दल पुराणात सांगितलेला गणेशन्यास *

श्रीगणेशाय नमः।। आचम्य प्राणायामं कृत्वा। दक्षिणहस्ते वक्रतुंडाय नमः। वामहस्ते शूर्पकर्णाय नमः। ओष्ठे विघ्नेशाय नमः सम्पुटे गजाननाय नमः। शिरसि एकंदंताय नमः। चिबुके ब्रह्मणस्पतये नमः। दक्षिणनासिकायां विनायकाय नमः। वामनासिकायां ज्येष्ठराजाय नमः। दक्षिणनेत्रे विकटाय नमः। वामनेत्रे कपिलाय

नम:। दक्षिणकर्णे धरणीधराय नम:। वामकर्णे आशापूरकाय नम:। नाभौ महोदराय नम:। हृदये धूम्रकेतवे नम:। ललाटे मयूरेशाय नम:। दक्षिणबाहौ स्वानंदवासकारकाय नम:। वामबाहौ सच्चित्सुख-धाम्ने नम:। इति मुद्गलपुराणे गणेशन्यास: समाप्त:॥

* संकटनाशन गणेशस्तोत्रम् *

श्रीगणेशाय नमः। नारद उवाच॥ प्रणम्य शिरसादेवं गौरीपुत्रम् विनायकम्॥ भक्तावास स्मरेनित्यमायुःकामार्थ सिद्धये॥ १॥ प्रथमं वक्रतुंडं च एकदन्तं द्वितियकम्॥ तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थतकम्॥२॥ लंबोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च॥ सप्तमं विघ्नराजेंद्रं धूम्रवर्णं तथाष्टमम्॥ ३॥ नवमं भालचंद्रं च दशम तु विनायकम्। एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम्॥ ४॥ द्वादसैतानि नामानि त्रिसंध्यं य: पठेन्नर:॥ न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकरं परम्॥ ५॥ विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम्॥ पुत्रार्थी लभते पुत्रान्मोक्षार्थी लभते गतिम्॥ ६॥ जपेद्गणपतिस्तोत्रं षड्भिर्मासै: फलं लभेत्॥ संवत्सरेण सिद्धिं च लभते नात्र संशय:॥ ७॥ अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा य: समर्पयेत्॥ तस्य विद्या भवेत्सर्वा गणेशस्य प्रसादत:॥ ८॥ इति नारदपुराणे संकटनाशनं नाम गणेशस्तोत्रं संपूर्णम्।

भूपाळ्या

रामानंदकृत

उठा उठा हो सकळिक । वाचे स्मरावा गजमुख । ऋद्धिसिद्धिचा नायक । सुखदायक भक्तांसी ॥ धृ. ॥ अंगी शेंदुराची उटी । माथां शोभतसे कीरिटी । केशर कस्तुरी लल्लाटी । हार कंठी साजिरा ॥१॥ कानी कुंडलांची प्रभा । सूर्य–चंद्र जैसे नभा । माजी नागबंदी शोभा । स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥ कासे पितांबराची धटी । हाती मोदकांची वाटी । रामानंद स्मरता कंठी । तो संकटी पावतो ॥ ३ ॥

गणपतीपुळे येथे म्हटली जाणारी भूपाळी

पहांट झाली वाजुं लागला मंजुळ हा चौघडा ॥ मोरया ॥ उठा उठा हो उठा मोरया नेत्रांते उघडा ॥ धृ. ॥ उठावयाची वेळ सुचवितो आरवुनी कोंबडा ॥ मोरया ॥ संमार्जन करुनी घालुं लागल्या द्वारीं युवती सडा ॥ १ ॥ अंधारहि हा पहा भीतीने मारु लागला दडा ॥ मोरया ॥ होईल म्हणतो मनीं भानुचा अंमल सुरु करडा ॥ २ ॥ द्वारि टाकिला असे सुगंधी सुंदर चंदन सडा ॥ मोरया ॥ शुद्ध जलाने नाभितीर्थिंचा भरुनी आणिला घडा ॥ ३ ॥ नैवेद्याला मोदक, लाडू, लोणी, साखर खडा ॥ मोरया ॥ सर्व सिद्धता करुनि

भूजना द्वारि राहिलो खडा ।। ४ ।। निराकार परि ॐकाराकृति काढुनि मग शुंडा ।। मोरया ।। करोनि पूजा करिन प्रार्थना दुर्मति मम खंडा ।। ५ ।। कार्यनाशकर विघ्ने गांजिति दूर तया दवडा ।। मोरया ।। नष्ट करा हो फोडून टाकुनि सत्वर दुरित खडा ।। ६ ।। 'पुळ्यात' कितितरि भक्त तारिले मीच काय वावडा ।। मोरया ।। 'दीनदयाघन' ब्रीद व्यर्थ हे अपुले नच दवडा ।। ७ ।।

आरत्या

श्रीस्वामी समर्थ रामदासकृत

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।। सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ताफळाची ।।१।। जय देव जय देव जय मंगलमूर्ति । दर्शनमात्रे मन कामना पुरती ।। जय देव जय देव ।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।। हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया ।। जय. ।। २ ।। लबोदर पीतांबर फणिवर वंदना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावें, निर्वाणी रक्षावे, सुरवरवंदना ।। जय. ।। ३ ।।

मुक्तेश्वरकृत

प्रसन्नमाळा विमळा करिं घेऊन कमळा । उंदिर वाहन दोंदिल नाचसि बहुलीळा । रुणझुण रुणझुण करिती घागरिया घोळा । सताल सुस्वर गायन शोभित अवलीळा ।। जय देव जय देव जय वक्रतुंडा । सिंदुरमंडित त्रिशाल सरळ भुजदंडा ।। जय १ ।। सा री ग म प ध नी सप्तस्वर भेदा । धिमकिट धिमकिट मृदुंग वाजति गतिछंदा ।। तातक तातक थय्या करिसी आनंदा । ब्रह्मादिक अवलोकिती तव पदारविंदा ।। जय. ।। २ ।। अभयवरदा सुखदा राजिवदलनयना । परशांकुश लड्डूधर शोभित शुभरदना ।। उर्ध्व-दोंदील उंदिर कार्तिकेश्वर रचना । मुक्तेश्वर चरणांबुजि अलिपरि करि भ्रमणा ।। जय. ।। ३ ।।

(समाप्त)